**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रमेश शेंडगे)**

**पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा**

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने एका महत्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा मांडू इच्छितो. विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असतांना सर्व आमदार निवासांमध्ये दिवस-रात्र तातडीने वैद्यकीय सेवा उपलब्ध होण्यासाठी डॉक्टर व आमदार निवासाचे व्यवस्थापक उपस्थित असणे आवश्यक आहे अशाप्रकारच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. काल आकाशवाणी आमदार निवासामध्ये रहात असलेल्या एका सन्माननीय सदस्यांची अचानक प्रकृती बिघडली, त्यांना अस्वस्थ वाटू लागले, त्यांच्या शरीरामधून घाम येऊ लागला. परंतु त्यांच्या प्रकृतीची तपासणी करण्याकरिता डॉक्टर उपलब्ध नव्हते, मनोरा येथील आमदार निवासामध्ये देखील डॉक्टर उपलब्ध नव्हते. व्यवस्थापकांच्या केबीनमध्ये व्यवस्थापक उपस्थित नव्हते. संबंधित डॉक्टरांशी मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांचा नंबर लागत नव्हता. आज महाराष्ट्राच्या वेगवेगळया भागामध्ये आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे हे आपल्याला माहीत आहे. परंतु आमदार निवासामध्ये रहात असलेल्या आमदारांच्या आरोग्याची काळजी घेण्यास कुणीही तयार नाही अशी अवस्था निर्माण झाली आहे ही गंभीर बाब आहे. त्यामुळे संबंधित सन्माननीय सदस्यांना आम्ही काल एका टॅक्सीमध्ये बसवून सेंट जॉर्जेस हॉस्पिटलमध्ये नेले. त्या ठिकाणी हॉस्पिटलचे डीन तात्काळ हजर झाले. आमदार निवासाच्या व्यवस्थापकांच्या कार्यालयामध्ये हॉस्पिटल व डॉक्टरचे फोन नंबर उपलब्ध नव्हते. ही गंभीर बाब असल्यामुळे आपण या बाबत शासनाला नोंद घेण्याबाबत सूचना कराव्यात अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : अधिवेशन काळात सन्माननीय सदस्यांना तत्काळ वैद्यकीय मदत उपलब्ध होण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी व डॉक्टरनी दक्षता घेतली पाहिजे. या बाबत मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) :सभापती महोदय, आपण केलेल्या सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. अधिवेशन सुरु असतांना सन्माननीय सदस्यांची प्रकृती अचानक बिघडल्यानंतर त्यांना तत्काळ वैद्यकीय मदत मिळण्याच्या दृष्टीने अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे. याबाबत नोंद घेऊन त्या दृष्टीने काळजी घेतली जाईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महाराष्ट्र राज्यात मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी न होणे

**मु.शी.**: महाराष्ट्र राज्यात मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी न होणे या विषयावर सर्वश्री.सुभाष चव्हाण, हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, अरुण गुजराथी, रमेश शेंडगे,प्रा.सुरेश नवले, सर्वश्री विक्रम काळे, अशोक ऊर्फ भाई जगताप, अनिल भोसले, मोहन जोशी, दिप्ती चवधरी, वि.प.स. यांचा प्रस्ताव

चर्चा पुढे चालू...

**तालिका सभापती** : सदर प्रस्तावावरील सन्माननीय सदस्यांची भाषणे 11.00 वाजता थांबविण्यात येऊन त्यानंतर मंत्रीमहोदयांचे उत्तराचे भाषण सुरु होईल. माझ्याकडील यादीनुसार अजून 11 ते 12 सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे असल्यामुळे प्रत्येकाने आपले म्हणणे 3 ते 5 मिनिटामध्ये संपवावे अशी माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी चर्चेला सुरुवात करावी.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माझी आपणास विनंती आहे की, आता या क्षणी सभागृहामध्ये जे सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत त्यांना आपण प्राधान्याने बोलण्याची परवानगी दिली पाहिजे.

**तालिका सभापती** : ज्या सन्माननीय सदस्यांना चर्चेमध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांनी काल माझ्याकडे नावे दिलेली आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, नेहमी सकाळी 10 वाजता उपस्थित होणाऱ्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळत नाही व शेवटी मंत्रीमहोदयांचे उत्तराचे भाषण सुरु होते. या करिता आता सभागृहामध्ये जे सन्माननीय सदस्य उपस्थित आहेत व ज्यांची नावे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ...

यादीमध्ये आहेत त्या सन्माननीय सदस्यांना पहिल्यांदा बोलण्याची परवानगी देण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या महत्वाच्या विषयावर चर्चा घडवून आणून त्यामधून काही महत्वाच्या बाबींचा आढावा घेण्याच्या दृष्टीने एक चांगल्या प्रकारचे वातावरण तयार करण्यात आले आहे. सरकार हे नेहमी राजकीय व सामाजिक इच्छाशक्तीचे द्योतक असते. परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संघर्ष उभा केला त्यामधून हजारो-लाखो लोकांना आपले जीवन बदलण्याची प्रेरणा मिळाली. दलितांसोबत हिंदू स्त्रियांना मतदानाचा अधिकार, हिंदू कोड बिलासाठी केलेले कार्य, या प्रश्नासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला कायदा मंत्रीपदाचा राजीनामा हे या बाबतीतील त्यांचे योगदान अजरामर आहे.

सभापती महोदय, मला यानिमित्ताने काही उदाहरणे द्यावयाची असून शासनाने जून-जुलै महिन्यामध्ये "लोकराज्य" हा साहित्य विषयक अंक प्रकाशित केला आहे. त्यामध्ये 172 साहित्यिकांचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, दया पवार आणि लक्ष्मण माने या तीनच साहित्यिकांचा उल्लेख आहे. त्यामध्ये अन्य दलित साहित्यिक प्रामुख्याने अर्जून डांगळे, नामदेव ढसाळ, मेश्राम, बाबूराव बागुल, गंगाधर पानतावणे, ज्योती लांजेवार, प्रज्ञा लोखंडे अशा अनेक मान्यवर साहित्यिकांचा उल्लेख करण्यात आलेला नाही. तेव्हा शासनाने "लोकराज्य" अंक पुन्हा प्रकाशित करुन त्यामध्ये दलित साहित्यिकांची नावे प्रकाशित करण्यात यावीत अशी माझी पहिली मागणी आहे.

सभापती महोदय, दुसरे असे की, सन 2003 मध्ये सरकारने मानव विकास अहवाल प्रकाशित केला. काल सदनामध्ये या प्रस्तावावरील चर्चेमध्ये भाग घेतांना अनेक सन्माननीय सदस्यांनी दलितांची परिस्थिती मांडली आहे. त्यावरुन दलितांच्या परिस्थितीमध्ये किती बदल झाला आहे याबाबतचा आढावा घेतला नाही, किंवा सरकारने त्याबाबतची माहिती घेतली नाही, किंवा अभ्यास केलेला नाही. मला सर्वात आश्यर्चाची गोष्ट ही वाटते की, दलितांच्या हक्काची सनद राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने प्रकाशित केली आहे. अशाप्रकारची सनद आपण वर्षानुवर्षे देत आहोत परंतु दलित अभ्यासक व काही संशोधक यांच्या मदतीने शासनाने आतापर्यंत किती वचनपूर्ती केली हे समोर आले पाहिजे. आज शासनाच्या समाज कल्याण विभागामध्ये 25 टक्के पदे रिकामी आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ...

त्याचबरोबर पाणी पुरवठा, रोजगार, महसूल, शिक्षण, विधी व न्याय इत्यादीं विभागांबाबत काल मागासवर्गीयांच्या फोरमची सदनामध्ये चर्चा करण्यात आली. मागासवर्गीयांसाठी विधिमंडळाच्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती कल्याण समित्या आहेत, त्या समित्यांनी अहवालाव्दारे या सभागृहामध्ये अनेक सूचना केल्या आहेत. त्या समित्यांच्या अहवालावरील कृती अहवाल देखील शासनाला सादर केले आहेत. त्या बाबतीत समाज कल्याण विभागाने एकदा चर्चा घडविली पाहिजे आणि त्या अहवालामधील शिफारशींची अंमलबजावणी केली पाहिजे. नाही तर पुन्हा तशाच प्रकारच्या सूचना केल्या जातात त्यावर चर्चा केली जाते परंतु त्यामधून फलनिष्पत्ती काहीही होत नाही.

सभापती महोदय, त्यानंतर महार वतन अभ्यास समितीबाबत मला मुद्दा मांडावयाचा आहे. या समितीबाबत भारतीय रिपब्लिकन पक्षाने प्रचंड आंदोलन उभे केले होते. त्यावेळी कै. वसंतदादा पाटील यांनी प्रकाश आंबेडकर आणि जे.जे. पाटील या दोघांवर समितीची जबाबदारी सोपविली होती. त्या बाबत समितीने सहा-सात वर्षे अभ्यास केल्यानंतर शासनाला अहवाल सादर केला. सन्माननीय सदस्य श्री. रामभाऊ पडांगळे यांनी त्या महार वतन अभ्यास समितीचा काल उल्लेख केला. त्या समितीने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी कशाप्रकारे करावी याचा अभ्यास करण्यासाठी सरकाने आय.ए.एस. अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. मला एक गोष्ट खेदाने सांगावीशी वाटते की, सन 2008 मध्ये नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये त्या समितीचा अहवाल मांडण्यात आला. त्या अहवालामध्ये समितीच्या अध्यक्षांनी प्रत्येक शिफारशीपुढे "समाजामध्ये अशांतता माजेल यामुळे ही शिफारस अंमलात आणता येणार नाही" असे लिहिले आहे. या बाबतीत मला आपल्याला विचारावयाचे आहे की, आपण या बाबतीत काय करीत आहोत? महार वतन अभ्यास समितीच्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारने एक कृती कार्यक्रम केला पाहिजे या कडे मला शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे.

त्याचप्रमाणे गायरान अतिक्रमण जमीन धारकांचाही मोठा प्रश्न आहे. कै. सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री असतांना सन 1991 मध्ये मराठवाडा व विदर्भातील गायरान जमिनीसंदर्भात एक जी.आर. काढण्यात आला होता. जे भूमिहीन आहेत ते दहा वर्षापासून कोणत्या जमिनी कसत आहेत याचा आढावा घेण्यात यावा आणि त्या जमिनी पती-पत्नी अशा दोधांच्या नावे करुन देण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ...

याव्यात. 1991 साली काढण्यात आलेल्या या जी.आर. ची अंमलबजावणी 2011 सालापर्यंत सरकारने केलेली नाही. सन 2008 मध्ये या गायरान जमीन हक्कधारकांनी लातूरला एक प्रचंड मेळावा घेतला त्या मेळाव्याला सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री. शरद पवार साहेबांना बोलाविले होते. त्यांनी त्या लोकांना न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले. आज 2011 हे वर्ष सुरु असून आजपर्यंत त्यापैकी एकाही गायरान जमीन धारकाला जमीन मिळालेली नाही. आज त्या ठिकाणी हजारो भूमिहीन लोक आपल्या हक्कासाठी लढत आहेत. त्यांनी लावलेली पिके प्रत्येक वेळी कापून घेतली जातात. ज्या जमिनींवर धनदांडगे लोक आक्रमण करतात त्यांना शासनाचे संरक्षण मिळते. परंतु या भूमिहीन लोकांना न्याय देण्यासाठी शासनाच्या जी.आर.ची अंमलबजावणी कां केली जात नाही? याकडे मला शासनाचे लक्ष वेधावेसे वाटते.

सभापती महोदय, मागासवर्गीय सरपंच आणि पंचायत समितीचे प्रतिनिधी यांना सुध्दा चांगली वागणूक दिली जात नाही. याचे उदाहरण म्हणजे हिंगोली पंचायत समितीच्या सभापती श्रीमती शोभा खिल्लारे या सेनगावच्या पंचायत समितीमध्ये काम करीत आहेत. त्यांच्या डोक्यावर पंचायत समितीचे छत पडल्यामुळे त्या रडत असल्याचे दृश्य सर्व चॅनेल्सवर दाखविण्यात आले. माझी आपणास विनंती आहे की, समाजकल्याण मंत्री या नात्याने आपण सेनगाव पंचायत समितीला भेट द्यावी. त्या ठिकाणी श्रीमती शोभा खिल्लारे सारख्या मागासवर्गीय स्त्री किंवा पुरुष सभापतींना तेथील अधिकारी सहकार्य देत नसतील तर तेथील अडचणींचे स्वरुप जाणून घेण्यात यावे. त्याकरिता विभागीय स्तरावर बैठका आयोजित करणे गरजेचे आहे याकडे मला आपले लक्ष वेधावेसे वाटते.

मागासवर्गीयांची वसतिगृहे आणि तेथील व्यवस्थापनाच्या संदर्भात प्रत्येक अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचना व नियम 93 अन्वये सूचनेव्दारे चर्चा करीत असतो. या संदर्भात माझी ठोस मागणी आहे की, प्रत्येक जिल्ह्यामध्ये विधानसभा आणि विधान परिषदेचे आमदार आणि सामाजिक संघटनांच्या सहभागाने दक्षता समित्या नेमल्या नसतील तर त्या नेमल्या पाहिजेत. आमच्या विभागातील पाच-सहा जिल्ह्यांमध्ये कोणत्या समित्या आहेत याची आम्हाला काहीही माहिती नसते. त्याचप्रमाणे भटक्या व विमुक्त जातीच्या लोकांच्या प्रश्नासाठी माजी आमदार श्री. लक्ष्मण माने यांनी विधानसभेच्या गॅलरीमधून पत्रके फेकली. बापट समितीच्या अहवालातील शिफारशींची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

अंमलबजावणी व्हावी आणि भटक्या विमुक्त जमातीच्या पाठीमागे क्रिमिनल किंवा पूर्वाश्रमीची गुन्हेगार जमात असे लावण्यात आलेले बिरुद काढण्यात यावे अशी त्यांची मागणी आहे. त्याची अंमलबजावणी व्हावी अशी माझी विनंती आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KTG पूर्वी श्री.सरफरे . . . . 10:10

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

सभापती महोदय, याखेरीज दलितांवर सारखे अत्याचार होतात. एखादी खैरलांजी सारखी घटना झाली की आपण आरडाओरड करतो. पण प्रत्यक्षात या बाबत महसूल विभागाची जबाबदारी आहे की, प्रत्येक विभागामध्ये, प्रत्येक जिल्ह्यामध्ये कमिट्या असावयास पाहिजेत आणि ज्या-ज्या कामामध्ये अनुसूचित जातीच्या लोकांचे प्रश्न निर्माण होतात, त्यांना त्याचे निराकरण करण्यासाठी वाव असावयास पाहिजे. म्हणून मला येथे सांगावेसे वाटते की, शिवशक्ती व भीमशक्ती विचाराला शिवसेना प्रमुख माननीय श्री.बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेनेचे कार्यकारी प्रमुख श्री.उध्दवजी ठाकरे रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडियाचे श्री.रामदास आठवले यांनी मान्यता दिली असल्यामुळे याला अभूतपूर्व अशी चालना मिळालेली आहे.परंतु प्रत्यक्षात या सर्व गोष्टींच्या पाठीमागे एक उपेक्षेचे, उपहासाचे आणि शेवटच्या क्षणी त्यातील प्रतिनिधींना तात्पुरत्या स्वरुपामध्ये आपलेसे करावयाचे आणि नंतर फेकून द्यावयाचे हे जे ऑप्शन पॉलिटीक्स असते, त्याच्या पलिकडे आपण जोपर्यंत जात नाही, तोपर्यंत या विषयाच्या पाठीमागे राजकीय इच्छाशक्ती उभी रहाणार नाही असे मला वाटते. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते. धन्यवाद. जय हिंद जय महाराष्ट्र.

----

. . . .बी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेव्दारा निर्वाचित) : आदरणीय सभापती महोदय, याठिकाणी एका अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा होत असताना महाराष्ट्र शासन आणि केंद्र शासनाच्या माध्यमातून मागासवर्गीयांसाठी अनेक योजना होत असतात. परंतु त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी काही ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मागासवर्गीयांच्या शोषणाचे आधार हे अस्पृश्यता, भेदभाव आणि सामाजिक विकलांगत्व हे आहे आणि अशा जातींची अनुसूची तयार करुन त्यांना स्वतंत्र अशा प्रकारची वागणूक राज्य घटनेने दिल्याचे सर्वश्रूत आहे, ज्याला आपण राखीव जागा असे म्हणतो. परंतु आरक्षणाचा लाभ हा मागासगर्वीयांमध्ये अंतर्भूत असलेल्या प्रत्येक जातीला समानतेने मिळत नाही अशी नेहमीच टीका करण्यात येते. अनेक वेळेला निवडणूक प्रक्रिये मध्ये खऱ्या मागासवर्गीयांना डावलले जाते. खोटी प्रमाणपत्रे घेऊन निवडणूक लढविणाऱ्यांचे प्रमाण हा एक चिंतेचा विषय होऊ शकेल. पुण्यातील उदाहरण द्यावयाचे तर 12 ठिकाणी रिझर्वेशनचे उमेदवार असावयास पाहिजे.परंतु त्याठिकाणी खोटी सर्टीफीकेट देऊन जे मागासवर्गीय नाहीत अशांनी गेली पाच वर्षे सत्ता उपभोगली आहे तर काही जणांनी पद देखील उपभोगले आहे. माझा असा प्रश्न आहे की, शासन याबाबतीत काय कारवाई करणार आहे? संबंधितांनी खोटी सर्टीफीकेट देऊन सत्ता उपभोगल्याने खऱ्या मागासवर्गीयांवर झालेला अन्याय कशा प्रकारे दूर केला जाणार आहे हा खरा प्रश्न आहे आणि दिवसेंदिवस ही संख्या वाढतच जाणार आहे. त्यामुळे याबाबतीत अतिशय कडक उपाययोजना करणे अतिशय आवश्यक आहे. मला या गोष्टीचे आश्चर्य वाटते की, जे खरे मागासवर्गीय आहेत, त्यांना जातीचे सर्टीफीकेट वेळेवर मिळत नाही, परंतु खोटी प्रमाणपत्र वेळेवर मिळतात. कारण ही माणसे कोणत्या ना कोणत्या पक्षाशी निगडित असल्यामुळे सर्वच पक्षाचे नेते या प्रकाराकडे सर्रास दुर्लक्ष करतात. त्यामुळे सर्वच पक्षाच्या नेत्यांनी या प्रकाराकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे आणि खऱ्या मागासवर्गीयांना न्याय द्यावा अशी माझी कळकळीची विनंती आहे.

सभापती महोदय, आयडिया ऑफ रिझर्वेशन म्हणून महात्मा फुले यांची ओळख आहे. तसेच प्रॅक्टीस ऑफ रिझर्वेशन खऱ्या अर्थाने शाहू महाराज यांनी राबविले आणि पॉलिसी ऑफ रिझर्वेशनच्या माध्यमातून आरक्षणाचे धोरण हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटनेच्या माध्यमातून समोर आणलेले आहे.अशा या फुले, शाहू, आंबेडकर यांच्या महाराष्ट्रामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेले लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व ही संकल्पना महाराष्ट्रात राबविणे आवश्यक आहे. त्यानुसार मागासवर्गीयातील सर्व घटकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आरक्षण, सोयी-सवलतींचा लाभ मिळावा म्हणून प्रयत्न करणे हा खऱ्या अर्थाने सामाजिक न्यायाचा विषय होऊ शकेल.

सभापती महोदय, अल्पसंख्यांकांसाठी मौलाना आझाद महिला बचत गट व ओ.बी.सी.साठी स्वर्णिमा महिला बचत गट या अतिशय चांगल्या शासकीय योजना आहेत.परंतु ओ.बी.सी.साठी असलेल्या महिला बचत गटांना कम्पल्सरी दोन शासकीय अधिकारी जामीन असल्याशिवाय कर्ज मिळू शकत नाही आणि मला असे वाटते की, हा फार मोठा अन्याय आहे. जी अट मौलाना आझाद महिला बचत गटांना लागू नसताना केवळ याबाबतीत ओ.बी.सी.साठी असलेल्या महिला बचत गटांवर अन्याय का ? या बचत गटांना कोणीही शासकीय अधिकारी जामीन रहाण्यास तयार नसतात. त्यामुळे त्यांना कर्ज मिळत नाही. त्यामुळे ही अट काढून टाकावी अशी माझी विनंती आहे. मी याठिकाणी जात पडताळणीबाबत बोलले आहे. पण जात पडताळणी सर्टीफीकेट वेळेवर न मिळाल्या मुळे कशा अडचणी येतात, याबाबत पुणे विभागाचे उदाहरण द्यावयाचे झाले तर त्याठिकाणी जात पडताळणीसाठी सर्वाधिक प्रकरणे येत असतात. परंतु अपुऱ्या कर्मचाऱ्यांच्या अभावी एकाही प्रकरणाचा वेळेवर निपटारा होऊ शकत नाही. महाविद्यालयातील विद्यार्थी असतील किंवा पदोन्नतीच्या प्रतिक्षेतील सरकारी कर्मचारी असतील,अशा प्रकारची सुमारे 10 ते 12 हजार प्रकरणे खोळंबलेली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे जास्त नुकसान होत आहे.

सभापती महोदय, मला याठिकाणी असे सांगावेसे वाटते की,वैद्यकीय शिक्षणाच्या कागदपत्रां साठी हमीपत्र भरून न घेण्यात आलेली नाशिक येथील विद्यार्थिनी कु.रुपाली भांगरे ही नाराज होऊन पुण्यातून नाशिक येथे परत गेली. तिला सी.ई.टी.मध्ये 65 टक्के गुण मिळाले होते आणि तिच्या शाळेने 22 डिसेंबर 2010 रोजी अनुसूचित जाती पडताळणी समितीकडे अर्ज केला होता. पण अद्यापही तिला जात पडताळणीचे सर्टीफीकेट मिळालेले नाही.त्याचप्रमाणे मला आणखी एका मुद्याकडे लक्ष वेधावयाचे आहे की, समाजकल्याण विभागातर्फे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती थेट त्यांच्या बँकेमध्ये जमा करण्यात येते आणि यासाठी विद्यार्थ्यांना बँकेमध्ये खाते उघडण्याबाबत सांगितले आहे.मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या बँक खाते क्रमांकाची यादी समाजकल्याण विभागाकडे सादर करण्याची जबाबदारी संबंधित शिक्षण संस्थांची आहे.परंतु अनेक महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या बँकेतील खाते क्रमांकाची यादी समाजकल्याण विभागाकडे सोपविलेली नसल्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहिलेले आहेत.आपण आज 21 व्या शतकाकडे जात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असतानाही मागासवर्गीयांवर जो अन्याय होत आहे, त्यासाठी सरकारने काही ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.ज्यावेळेला आपण महाराष्ट्र राज्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहोत, त्यावेळेला आम्हाला शासनाकडून निश्चित या गोष्टींची अपेक्षा आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

----

. . . .बी-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या अधिवेशनामध्ये अनेक प्रकारचे ज्वलंत प्रश्न असतानाही वर्षानुवर्षे एका अर्थाने न सुटलेला असा जातीयतेचा विषय असेल

किंवा जातीच्या आधारावर सरकारने ज्या सवलती दिलेल्या आहेत, त्यातील अपयश असेल त्यासंबंधीचा जो प्रस्ताव आहे, तो या संपूर्ण अधिवेशनातील बाकीच्या प्रश्नांपेक्षा सुध्दा अधिक ज्वलंत आणि महत्वाचा आहे.त्यामुळे सुरुवातीला माझे सहकारी माननीय सुभाष चव्हाण आणि माननीय सदस्य श्री.राम पडांगळे यांचे मी अभिनंदन करतो.कारण त्यांनी एका अर्थाने असे दाखवून दिले की, आम्ही राजकीय लाभापोटी आमचा आवाज दाबून ठेवणार नाही. आम्ही प्रथम आमच्या समाजाचे आहोत आणि त्यानंतर कोणत्या तरी पक्षाचे आहोत.मला असे वाटते की, ही जी भावना आहे,ती कोणत्याही पक्षामध्ये असताना जे मागसवर्गीय असतील, त्यांनी आपापल्या पक्षातील पक्षअभिनवेश बाळगून सुध्दा त्यापेक्षा थोडे वर येऊन आपल्या जातीसाठी ज्या वेगवेगळया योजना आहेत, आपल्या जातीवर होणारा अन्याय आहे त्याबाबतीत एकत्र येऊन काम केले तर त्यातून अधिक न्याय मिळेल असे मला वाटते.

सभापती महोदय, आपण आता जात-पात संपली आहे असे म्हटले तरी ती अजून मनातून संपलेली नाही. मी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचा राष्ट्रीय सरचिटणीस असताना विद्यार्थी परिषदेमार्फत"जातींच्या बाबतीत असलेली आजची स्थिती" या विषयाबाबत अभ्यास करण्या- साठी 45 दिवस देशभरामध्ये प्रवास केला होता आणि ही घटना 1992-93 या वर्षातील असेल.मी विद्यार्थी परिषदेसाठी घरदार सोडून विना वेतन काम करणारा एक पूर्णवेळ कार्यकर्ता होतो आणि आयुष्यभर पूर्णवेळ काम करावयाचे असा मानस असताना देशभरातील 55 राज्यांमध्ये प्रवास केल्यानंतर मी या निष्कर्षाप्रत आलो की, या देशातून जात कधी जाणार नाही. मुंबई शहरामध्ये अनेकांनी असा दावा केला की, आम्ही एकमेकांच्या शेजारी बसतो वगैरे.पण ते सगळे खोटे आहे.मुंबईच्या रेल्वेतून जाताना आम्ही एकत्र प्रवास करतो. त्यामुळे आम्ही जात मानत नाही असे म्हणणारे घरी गेल्यावर मात्र जात मानतात. कारण घरी गेल्यावर तेथे कोण आले आहे ते पाहून तो कोणत्या खोलीपर्यंत येणार आणि आपल्या शेजारी जेवावयास बसणार की नाही हे मुंबईसारख्या शहरामध्ये सुध्दा ठरत असते.त्यामुळे याबाबतीत कोणीही दावा करण्यासारखी स्थिती नाही की, आम्ही सगळे एकत्र आहोत,एकत्र खातो-पितो वगैरे.रेल्वेमध्ये एकत्र बसतात कारण तेथे काही पर्यायच नसतो.तेथील गर्दीमध्ये तुम्हाला दुसऱ्याची जात विचारण्यासाठी वेळ नसतो.त्यामुळे परिस्थिती बदलली पण लोकांची मन:स्थिती बदलली नाही आणि जोपर्यंत ही मन:स्थिती बदलत



श्री.चंद्रकांत पाटील . . . .

नाही, तोपर्यंत मागासवर्गीयांनी कोणत्याही पक्षाच्या आकर्षणाच्या आहारी न जाता आपापले अस्तित्व ठेऊन आपल्या समस्यांसाठी संघर्ष केला पाहिजे असे मला वाटते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, त्याच बरोबर या चर्चेचे दोन भाग केले पाहिजेत.त्यातील एक भाग म्हणजे जातीयता संपणे. आजच वर्तमानपत्रामध्ये बातमी आलेली आहे की, आटपाडी तालुक्यातील एका गावामध्ये लहान मुले चिखलात खेळत होती. त्यावेळी तो चिखल भिंतीवर उडाला आणि त्या भिंतीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे चित्र होते.यावरुन गावातील तरुणांनी त्या लहान मुलांचे मुंडण केले आणि त्यांची गावातून मिरवणूक काढली. हा दोन्ही बाजूचा विषय आहे. अशा प्रकारे ही तेढ वाढत चालली आहे, ती कशी कमी करता येईल याचा विचार केला पाहिजे. आजही परिस्थिती बदलली पण मन:स्थिती बदललेली नाही.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील......

मला आठवते की, ज्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला देण्याचा विषय आला त्यावेळी मराठवाडयात खूप मोठा संघर्ष झाला. त्यावेळी विद्यार्थी परिषदेने संवाद यात्रा नावची यात्रा आयोजित केली होती. त्या यात्रेमधून नामातंराला विरोध का करण्यात येत आहे या बाबतीत लोकांशी संवाद साधण्यात आला. त्यावेळी असे लक्षात आले की, किती तरी चुकीच्या गोष्टी सांगितल्या जात होत्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला दिले तर तुम्हाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला नमस्कार करुन पदवी घ्यावी लागेल. मुळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोला नमस्कार करुन पदवी घ्यायला काय अडचण आहे? पण प्रत्यक्षात ती फॅक्ट नव्हती. तरी देखील अशा प्रकारे आपापल्या जातीचे स्वार्थ मेन्टेन करण्यासाठी चुकीच्या पध्दतीने ब्रेनवॉशिंग चाललेले होते. त्यामुळे संवाद यात्रेच्या माध्यमातून मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देण्यात यावे यासाठी लोकांचे मन परिवर्तन करण्यामध्ये आम्ही खूप यशस्वी झालो.

सभापती महोदय, मला आठवते की आम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो सर्व कार्यकर्त्यांनी आपापल्या घरात लावावा असे अभियान काढल्या नंतर अनेक घरांमध्ये कार्यकर्त्यांना त्यांच्या आई-वडिलांचा विरोध झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो आपल्या घरात कशासाठी लावावयाचा? छत्रपती शिवाजी महाराज यांचा फोटो लाव. पण जसे छत्रपती शिवाजी महाराज आमचे वंशज आहेत तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरसुध्दा आमचे वंशज आहेत. महात्मा ज्योतिबा फुलेसुध्दा आमचे वंशज आहेत, ही मानसिकता आजही त्या त्या तरुणांच्या घरातील जुन्या पिढीमध्ये पोहचली नाही. म्हणून मला या ठिकाणी असे सुचवावयाचे आहे की, जाती निर्मूलनाचा एक प्रयत्न आपण केला पाहिजे आणि दुसरा प्रयत्न प्रामुख्याने सवलतींच्या बाबतीत केला पाहिजे. या सभागृहामध्ये ज्या ज्या वेळी मागसवर्गीयांचा निधी शिल्लक राहिला असा विषय येतो त्या त्यावेळी मला मोठी गम्मत वाटते. लोक खूप उत्तम पध्दतीचे पैसे खात आहेत. खाऊन, खाऊन पोट भरल्यानंतर देखील पैसे शिल्लक रहात आहेत.

सभापती महोदय, या बाबतीत काल घडलेलेच एक उदाहरण लक्षात घेता येईल. सामुदायिक विवाह करणाऱ्या मागासवर्गीय जोडप्यांना 8 हजार रुपये मानधन शासन देईल अशी एक नव्याने योजना आली. जी संस्था या सामुदायिक विवाहाचे आयोजन करील त्यांना प्रती

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील.....

जोडप्याच्या मागे दोन हजार रुपये देण्यात येतात. ही योजना आल्यानंतर लगेचच काही व्यक्ती काम करावयाला लागल्या. दोन-तीन वर्षापूर्वी ज्या मागासवर्गीय जोडप्यांचे विवाह झालेले होते व ज्यांना मुले देखील झालेली होती अशा जोडप्यांचे पुन्हा एकदा या सामुदायिक विवाह योजनेमध्ये विवाह झाल्याचे दाखविले गेले आणि त्यांचे 8-8 हजार रुपये खाल्ले गेले. सभापती महोदय, यासंबंधीचे एक फार मोठे प्रकरण घडलेले आहे. मी नियम 93 च्या सूचनेच्या अन्वये ते प्रकरण सभागृहाच्या निदर्शनास आणून देणार आहे. सभापती महोदय, येणाऱ्या प्रत्येक योजनेमधील पैसे खाण्यासाठी जर नीट ब्रेन ऑपरेट होत असतील तर मग निधी कसा शिल्लक राहतो, हा प्रश्नच आहे. ज्यावेळी नवीन योजना येतात त्यावेळी जुन्या योजनांची माहिती लोकांना मिळत नाही. माननीय मंत्री महोदयांना मी आवाहन करु इच्छितो की, मागासवर्गीयांसाठी कोणकोणत्या योजना आहेत, याची नीट माहिती लोकांसमोर गेली पाहिजे. मागासवर्गीयांच्या योजना मागासवर्गीयांपर्यंत पोहचविण्यासाठी आणि प्रामुख्याने त्या योजनांचा लाभ मिळविण्यासठी प्रचंड कागदबाजी करावी लागते ती कागदबाजी कमी करण्यात यावी. अमुक प्रमाणपत्र देण्यात यावे, तमुक प्रमाणपत्र देण्यात यावे असे सांगण्यात येते. त्या शिवाय त्या योजनेचा फायदा मिळत नाही.

सभापती महोदय, मी एका वर्षापासून माझ्या घराजवळच्या एका वस्तीमधील देवदासींना 400 रुपये दरमहा पेन्शन मिळण्यासाठी झगडत आहे पण ते मिळण्यासाठी सबमिट करावयाच्या प्रमाणपत्रांची यादी इतकी मोठी आहे की, ती प्रमाणपत्रे मिळत नाहीत. त्यातून नव्यानेच जिल्हाधिकाऱ्यांनी असे सांगितले की, आपल्या जिल्हयातील देवदासींचा कोटा पूर्ण झाला आहे. मला कळत नाही की, कोल्हापूर, सातारा आणि सांगली या भागात देवदासींचे प्रमाण जास्त आहे. तेव्हा जेवढया देवदासी आयडेन्टीफाय होतील तेवढया देवदासींना पेन्शन दिले पाहिजे. मग त्यांचा कोटा कसा काय ठरतो? तसेच बीपीएलच्या बाबतीत एकदा निकष ठरविल्यानंतर त्या निकषात बसणाऱ्या सगळयांनाच सुविधा मिळाल्या पाहिजेत. म्हणून मला असे सूचवावयाचे आहे की, सामाजिक न्याय विभागाने मागासवर्गीयांसाठी असलेल्या सर्व योजनांची तसेच त्यांना मिळणाऱ्या सर्व सवलतींची माहिती द्यावी, त्या सर्व सवलतींच्या बाबतीत मार्गदर्शन करावे, प्रबोधन करावे आणि त्यातील कागदबाजी संपवावी, असे आवाहन करुन मी माझे भाषण संपवितो.

----

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सामाजिक न्याय या विषयावर नियम 260 अन्वये मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, काल पासून आपण या विषयावर चर्चा करीत आहेत आणि अतिशय पोटतिडीकेने सर्व पक्षातील सर्व सन्माननीय सदस्य बोलत आहेत. खरे तर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा अशी जी शिकवण दिलेली आहे, त्याचे चित्र खऱ्या अर्थाने आज या सभागृहात पहावयास मिळते आणि सभागृहाच्या बाहेरसुध्दा पहावयास मिळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाने जी शिकवण दिली त्याप्रमाणे ते शिकले, संघटित झाले, आपल्या हक्कासाठी कसे भांडले पाहिजे याचे मूर्तिमंत उदाहरण आज आपल्या सर्वांना सभागृहात पहावयास मिळते, याचे निश्चितपणे कौतुक केले गेले पाहिजे. प्रश्न असा आहे की, ते त्यांचे भांडायचे काम करीत आहेत, न्याय मागण्याचे काम करीत आहेत पण आपण शासन म्हणून काय करतो हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. या राज्याला स्व. यशवंतरावजी चव्हाण साहेब, वसंतराव नाईक साहेब, वसंतदादा पाटील या सर्वांची अतिशय उज्ज्वल आणि पुरोगामी परंपरा मिळालेली आहे. या सर्व नेत्यांनी मागासवर्गीय समाजाकरिता जवळपास 50 च्या आसपास विविध प्रकारच्या योजना आणलेल्या आहेत. 5-6 महामंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत. आयोग स्थापन करण्यात आलेले आहेत. समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. हे सर्व या गोरगरीब, दलित, पददलित समाजाच्या उन्नतीसाठी शासनाच्या वतीने करण्यात येत आहे. याचा उद्देश असा आहे की, या समाजाचे परिवर्तन झाले पाहिजे. उन्नती झाली पाहिजे. प्रगती झाली पाहिजे. सामाजिक परिवर्तन झाले पाहिजे. शैक्षणिक परिवर्तन झाले पाहिजे आणि त्यांनतर सर्वात महत्वाचे आर्थिक परिवर्तन झाले पाहिजे. त्यानंतर ते प्रशासनात येणे गरजेचे आहे, उद्योगामध्ये येणे गरजेचे आहे. व्यवसायामध्ये येणे गरजेचे आहे. या सगळया क्षेत्रात हा समाज पुढे येणे गरजेचे आहे, हा उद्देश होता. हा उद्देश सफल करण्यासाठी जवळपास 50 योजना तयार करण्यात आलेल्या आहेत. महामंडळे स्थापन करण्यात आलेली आहेत.

सभापती महोदय, या ठिकाणी मूलभूत स्वरुपाचा प्रश्न असा आहे की, या योजना अनेक वर्षापासून सुरु आहेत. महामंडळे सुरु आहेत. विविध आयोग स्थापन करण्यात येतात मग ते करतात काय? हाच खरा प्रश्न आहे. या सर्व योजना पूर्णार्थाने या शेवटच्या माणसापर्यंत जातात

..4...

का,जी महामंडळे स्थापन करण्यात आली त्यांना शासन भरभरुन मदत करीत आहे का, त्यांची आर्थिक उन्नती निश्चितपणे होत आहे का, औद्योगिक संस्था काढण्यात आल्या आहेत तेथे कारखाने उभे राहिले आहेत का, घरकुलाच्या संदर्भात काही गोष्टी करण्यात येतात त्या पूर्ण होतात का आणि हे सर्व पाहणारी जी यंत्रणा आहे ती यंत्रणा बरोबर काम करीत आहे का? हाच माझ्या दृष्टीने कळीचा मुद्दा आहे. ही यंत्रणा जर बरोबर काम करीत नसेल तर त्याला जबाबदार कोण आहेत. असे जे जबाबदार अधिकारी असतील मग ते कोणीही असोत आणि कोणाच्याही जवळचे असोत त्याना चाप लावून त्यांच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे. त्यामध्ये शासन का कमी पडते, याचे खऱ्या अर्थाने संशोधन करण्याची गरज आहे. म्हणून किमान आज तरी या विषयाच्या बाबतीत शासनाकडून ठोस निर्णयाची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, अनेक लोक अनेक प्रकारे बोलत असतात. या सर्वांचा वारसा आदरणीय श्री. पवार साहेबांनी खऱ्या अर्थाने चालविला आहे. या सर्व समाजाला न्याय देण्याचे काम आदरणीय पवार साहेब मुख्यमंत्री असताना केले गेले. सर्व मागासवर्गीयांसाठी बजेटमध्ये 10 टक्क्याची तरतूद त्यांनी त्यांच्या कारकिर्दीमध्ये केली. आदिवासी समाजासाठी जशी तरतूद करण्यात आली तशी मागासवर्गीयांकरिता सुध्दा केलेली आहे आणि ती सामाजिक जाणीव म्हणून केलेली आहे. मराठवाडा विद्यापीठाचा नामांतराचा विषय दलित समाजाच्या प्रतिष्ठेचा आणि स्वाभिमानाचा विषय झाला होता तो सुध्दा सर्व राजकीय किंमत देऊन आदरणीय पवार साहेबांनी तो पूर्ण केला. दलित समाजाचा जो स्वाभिमानाचा विषय होता तो पूर्ण करण्याचे काम आदरणीय श्री. पवार साहेबांनी केले. तीच परंपरा आणि त्याच जाणीवेचे विचार येथून पुढच्या काळातील जी सर्व मंडळी मग ते सन्माननीय श्री. अजित पवार असतील, सन्माननीय श्री. मधुकर पिचड साहेब असतील किंवा अन्य सर्व नेते असतील ते चालवित आहेत याचे मूर्तिमंत उदाहरण गेल्या 10 तारखेला पक्षाचा वर्धापन दिन हा पुढील वर्षभरात साजरा करीत असताना त्याची रुपरेषा अशी असावी, कशी प्रगती करावी, कसे पुढे जावे याचे धोरण ठरविणारा असतो. पण त्या वर्धापन दिनाच्या दिवशी फक्त या मागासवर्गीयांच्या कल्याणाकरिता सामाजिक हक्क परिषद घेतली गेली आणि पूर्ण वर्षभर मागासवर्गीयांकरिता आतापर्यंत आमच्या पक्षाने घालून दिलेली जी परंपरा आहे ती पुढे नेण्याचे काम आम्ही करणार आहोत, हे या पक्षाने या ठिकाणी दाखवून दिलेले आहे.

यानंतर श्री. बरवड....

श्री. विनायक मेटे ....

पुढे वर्षभर आम्ही हे करणार आहोत. त्यासाठी आमच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आदरणीय श्री. मधुकरराव पिचड यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ माननीय मुख्यमंत्र्यांना भेटले, सगळ्या गोष्टींची त्या ठिकाणी चर्चा केली आणि चांगले निर्णय घेतले. त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे आणि इतर सन्माननीय सदस्य सुध्दा असतील. अनेक गोष्टी केल्या.

सभापती महोदय, मी जास्त बोलणार नाही पण मी निश्चितपणे सांगू इच्छितो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चैत्यभूमीच्या ठिकाणी 6 डिसेंबरला तसेच 14 एप्रिलला शासनाचे प्रतिनिधी आणि आपण सर्व नतमस्तक होण्यासाठी जात असतो किंवा ज्या ज्या ठिकाणी जमेल त्या ठिकाणी जात असतो. पण चैत्यभूमीच्या विषयाच्या संदर्भात मी शासनाला नम्र विनंती करतो की, त्या ठिकाणी महामानव परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय स्मारक व्हावे अशी जी सगळ्या समाजाची मागणी आहे ती शासनाने पूर्ण करणे गरजेचे आहे. याचे कारण असे की, तो विषय जर आपण जास्त चिघळत ठेवला तर मराठवाडा विद्यापीठासारखी परिस्थिती या समाजामध्ये निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही, असंतोष निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. ते का होत नाही हे मला कळत नाही. श्री. विजय कांबळे हे आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत सामाजिक समता मंचचे काम करीत आहेत. त्यांनी आधी याबाबत मागणी केली होती. आता अनेक लोक पुढे जात आहेत. त्या राजकारणात मला जावयाचे नाही. माझे असे म्हणणे आहे की, कोणीही म्हणू द्या, कोणाच्याही कोंबड्याने सूर्य उगवू द्या, पण तो उगवू द्या. कोणीही मागणी करा, त्याबद्दल प्रश्न नाही. परंतु चैत्य भूमी येथे इंदू मिलच्या जागेवर त्यांचे राष्ट्रीय स्मारक झाले पाहिजे. ते का करु नये ? ती मिल 10-15 वर्षापासून बंद पडलेली आहे. त्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय पातळीवरचे स्मारक व्हावे. त्यांनी अगोदर ते स्मारक समुद्रात व्हावे अशी मागणी केली होती. परंतु शासनाने नाही असे सांगितले. त्यानंतर मग इंदू मिलच्या जागेची मागणी केली. श्री. सुशीलकुमार शिंदे साहेब असताना त्यांनी या संदर्भात बैठक घेतली. त्यांनी मान्य केले. त्यानंतर श्री. अशोक चव्हाण साहेब होते तसेच श्री. दयानिधी मारन यांनी त्या ठिकाणी येऊन बैठका घेतल्या, घोषणा केल्या. आपण प्रत्येक वेळी त्या ठिकाणी जातो तेव्हा घोषणा करतो पण पुढे

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे ....

काहीही झाले नाही. त्यानंतर श्री. विजय कांबळे हायकोर्टामध्ये गेले. कोर्टामध्ये केस लागली. कोर्टाने असा निर्णय दिला की, हा सामाजिक, अतिशय ज्वलंत आणि महत्वाचा विषय आहे आणि शासनाने जातीने लक्ष घालून या विषयाच्या संदर्भात लवकरात लवकर निर्णय घेतला पाहिजे. या बाबतीत निर्णय होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, मला आपल्या मार्फत शासनाकडे विचारणा करावयाची आहे. मी कोणाबद्दल आकस बाळगून बोलत नाही पण तफावत कशी दिसते याचे उदाहरण आपल्याला सांगतो. नांदेडला गुरु-ता-गद्दी कार्यक्रम झाला. त्यासाठी केंद्र शासनाने आणि राज्य शासनाने 2 हजार कोटी रुपये खर्च केले. नाशिकला कुंभमेळा झाला. त्या ठिकाणी शेकडो कोटी रुपये खर्च केले. त्या ठिकाणी का खर्च केला याबाबत काही म्हणणे नाही. तो प्रश्न जसा महत्वाचा आहे तसा हा सुध्दा अस्मितेचा विषय आहे. ते आपण का करीत नाही ? त्या स्मारकासाठी जमीन का देत नाही ? आपण कशामुळे मागे राहतो, हे आपण पहावयास नको का ? आपण अनेक सन्माननीय सदस्य परदेशामध्ये जातो. त्या देशातील जे राष्ट्रीय नेते असतील, महापुरुष असतील त्यांचे जीवनमान लोकांना समजावे म्हणून स्मारके बांधतात. आपण राष्ट्रीय पुरुषांचे जीवनतत्व अंगीकारावे म्हणून त्यांची स्मारके बांधतो मात्र या संदर्भात कशासाठी डोळेझाक करतो ? खरे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिल्लीला निधन झाल्यानंतर त्या ठिकाणी त्यांचे स्मारक व्हावयास पाहिजे होते. त्या ठिकाणी आपण स्मारक उभे करु शकलो नाही. त्या राजकारणात मी जात नाही. या ठिकाणी सुध्दा आधी गिरगावला स्मारक करण्याचे ठरविले पण गिरगावला सुध्दा यासाठी जागा दिली नाही. नंतर आपण दादरला करण्याचे ठरविले पण त्या ठिकाणी सुध्दा त्यांची परवड होऊ नये अशी माझी मनापासून मागणी आहे.

सभापती महोदय, मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, आपण काही गोष्टींचा निश्चितपणे विचार केला पाहिजे. आपण अनेक योजना राबवितो त्याप्रमाणे प्रशासनामध्ये नोकरीतील जो अनुशेष आहे त्याचाही एकदा आपण आराखडा तयार केला पाहिजे. आपण हा अनुशेष किती वर्षात संपविणार आहात, अधिकारी, कर्मचारी यांच्या भरतीच्या बाबतीत शासन कधी निर्णय घेणार

...3...

RDB/ KGS/ KTG/

श्री. विनायक मेटे ....

त्याबाबत शासनाने एक आराखडा तयार करावा आणि त्या टप्प्यानुसार कार्यवाही करावी आणि त्यांना न्याय देण्याचे काम करावे. एक अतिशय महत्वाचा विषय एका मिनिटात मांडून मी आपले भाषण संपविणार आहे. आपण सगळ्या योजना राबवितो पण त्या योजना राबवित असताना मलई दुसरे लोक खावयास लागले आहेत. याचे एक उदाहरण मी देऊ इच्छितो. आपण औद्योगिक सहकारी संस्था काढल्या. त्या समाजातील लोकांना रोजगार मिळावा, ते उद्योगपती व्हावेत, व्यावसायिक व्हावेत म्हणून आपण औद्योगिक सहकारी संस्थांना मान्यता देतो. आतापर्यंत या औद्योगिक संस्थांना अडीच हजार कोटी रुपये दिले. आतापर्यंत 319 संस्था दिलेल्या आहेत.

**तालिका सभापती** (श्री. रमेश शेंडगे ) : सन्माननीय सदस्यांना दिलेला वेळ संपलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. या नंतर सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी आपले भाषण सुरु करावे.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. उल्हास पवार ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आणि सामाजिक चळवळीमध्ये, दलित चळवळीमध्ये काम करणारे आमचे मित्र श्री. सुभाष चव्हाण आणि इतर सन्माननीय सदस्यांनी या सभागृहामध्ये जो प्रस्ताव मांडलेला आहे तो अत्यंत जिव्हाळ्याचा आणि कोणत्याही एका पक्षाच्या दृष्टीने नव्हे तर सर्वांच्या दृष्टीने अत्यंत गंभीर आणि महत्वाचा आहे. या ठिकाणी विचार मांडत असताना या गहन विषयावर मी अतिशय थोडक्यात माझे विचार मांडण्याचा प्रयत्न करतो.

सभापती महोदय, खरे तर स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतर सामाजिक पुनरुत्थानासाठी, सामाजिक समतेसाठी, सामाजिक विषमता मोडण्यासाठी, जाती निर्मूलन होण्यासाठी अनेक महाभागांनी आणि महात्म्यांनी, थोर पुरुषांनी प्रयत्न केले. परंतु कालपासून मी या सदनातील चर्चा पाहिली आणि ऐकली किंबहुना जात पडताळणीच्या संदर्भात 4 महिन्यांची मुदत वाढविण्यासंबंधीच्या बिलावरची चर्चा सुध्दा मी ऐकत होतो आणि माझे मन थोडेसे अशा अर्थाने विषण्ण झाले की, एकविसाव्या शतकाच्या या वाटचालीमध्ये आपण अश्मयुगात गेलो की काय असे वाटावयास लागले. दुर्दैवाने जाती मोडण्याऐवजी, जाती विसरण्याऐवजी, जाती निर्मूलन करण्याऐवजी, सामाजिक समतेच्या ऐवजी पोटजाती घट्ट करण्याचा प्रयत्न अप्रत्यक्षपणे होतो की काय अशी भीती, अशी शंका, अशी वेदना या निमित्ताने माझ्या मनाला झाली. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी स्वातंत्र्यपूर्व काळापासून जाती विसरा, जाती मोडा, जाती पुसा असे सांगितले. परंतु घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जातीअंताचा लढा दिला. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी डिप्रेस्ड क्लास सोसायटीच्या माध्यमातून सामाजिक पुनरुत्थान करण्याचा प्रयत्न केला. महामानव ज्योतिबा फुले यांनी सामाजिक समतेसाठी शेवटच्या माणसाला न्याय देण्याचा प्रयत्न केला, त्याची वेदना बोलकी केली. हे सामर्थ्य या महाराष्ट्राच्या नेत्यांनी देश पातळीवर, आंतरराष्ट्रीय पातळीवर दाखवून दिलेले आहे. त्याच्याही पलीकडे बाराव्या, तेराव्या शतकामध्ये संत नामदेवांसारख्या एका संताने चोखोबांच्या अस्थींची समाधी पंढरपूरच्या नामदेव पायरीच्या समोर बांधली, त्या चोखोबाचे दर्शन घेऊन विठ्ठलाच्या दर्शनासाठी जावे लागते. असा क्रांतिकारक निर्णय 700 वर्षापूर्वी घेऊन दाखविला.

या सर्व गोष्टी या ठिकाणी घडत असताना मी अतिशय नम्रपणे सांगतो की, त्या वेळी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. उल्हास पवार .....

शाळा असेल, नसेल, त्यांना कशाचाही अधिकार नव्हता. संत चोखोबांचे सगळे अभंग अनंत भट नावाच्या ब्राम्हण माणसाने लिहून काढले आहेत. सामाजिक समतेच्या दृष्टीने हा फार मोठा विचार आहे. म्हणून या ठिकाणी हे सगळे विचार मांडत असताना मी अत्यंत विनम्रपणे सांगतो की, कोणत्या तरी जातीच्या बाजूने आणि कोणत्या तरी जातीच्या विरोधात आपण जेव्हा तीव्रतेने बोलतो तेव्हा असे वाटते की आपण नेमके डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मांडत आहोत का ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

नेमके महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार मांडतो काय, संत चोखाबांचे विचार मांडतो काय, संत तुकाराम महाराजांचे विचार मांडतो काय, अशी वेदना माझ्या मनाला होते. म्हणून हा समाजात पिचलेला, दुभंगलेला, अतिशय उपेक्षित, वंचित असलेला, गावकुसाबाहेर असलेला हा समाज आहे, त्यांच्यावर हजारो वर्षे अन्याय झालेला आहे. या अन्यायाशी संघष करीत असताना त्या त्यावेळच्या या महान व्यक्तिमत्वांनी, नेत्यांनी, संतांनी प्रयत्न केलेला आहे, तो विसरुन चालणार नाही. एकविसाव्या शतकामध्ये, जागतिकीकरणाच्या युगामध्ये जग पुढे चाललेले असताना सुध्दा खैरलांजीसारखी प्रकरणे होतात, दलितांवर अन्याय होतात हे दुर्दैवी आहे, दरोडा घालून महिलांवर अत्याचार होतात. हे सर्व पाहिल्यानंतर मन विषण्ण होते. म्हणून माणसातील माणसाला जागे करण्याचे काम प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी व या महामानवांनी केलेले आहे. त्या दृष्टीने आपण वाटचाल करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे घटनेच्या प्रारुप समितीचे अध्यक्ष झाले होते. आपण त्यांना घटनेचे शिल्पकार म्हणतोच. आपल्यात मतमतांतर असताना सुध्दा शासनाने योग्य निर्णय घेतले पाहिजेत. प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर डॉ.जब्बार पटेल आणि श्री.गिरीश कर्नाड यांनी जागतिक कीर्तीचा चित्रपट मराठी आणि इंग्रजी भाषेतून तयार केला. तो चित्रपट अतिशय गाजला. अडीच तासाचा चित्रपट पाहिल्यानंतर मनस्वी आनंद झाल्याशिवाय रहात नाही. माननीय श्री.रा.सु.गवई, माननीय श्री.बाळासाहेब आंबेडकर व आम्ही सर्वांनी तो चित्रपट पाहिला आहे. त्या चित्रपटातील दृश्ये पाहिल्यानंतर आपल्या लक्षात येते की, या सगळयामध्ये ध्येय जरी एक असले तरी राष्ट्रपुरुष महात्मा गांधी आणि प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यात टोकाचे मतभेद होते. त्यांचे मार्ग वेगळे होते.

त्यावेळी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर घटनेची संपूर्ण तयारी झाली होती. परंतु घटनेच्या ड्राफ्टचे चेअरमन कोणाला बनवावयाचे याबाबतचे चित्रपटात जे दृश्य चित्रित केले आहे ते तुम्ही आम्ही सर्वांनी पाहण्यासारखे आहे. त्यातून मार्गदर्शन घेण्यासारखे आहे. पंडित जवाहरलाल नेहरु हे गांधीजींना भेटण्यासाठी गेल्यावर असे म्हणतात की, या ड्राफ्ट कमिटीचे चेअरमन निवडण्यासाठी आपण जगातील विद्वानांना बोलवू. यावर गांधीजी मिश्कीलपणे हसले व म्हणाले की, नाही,





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपल्या देशात विद्वान आहेत. त्यावर पंडितजींनी गांधीजींना विचारले होते की, कोण विद्वान आहेत ? या घटना मसुदा समितीचे चेअरमन कोण असावे ? तेव्हा गांधीजींनी पंडितजींना असे उत्तर दिले की, "The most sufferer of this country should be the Chairman of this Draft Committee", ते फक्त प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर होऊ शकतात. हे मोठेपण तुम्ही आम्ही शिकणार की नाही ? ही जी मानसिकता आहे ती ओळखता आली पाहिजे. कारण गांधीजींनी ओळखले होते की, शेवटच्या माणसाला न्याय द्यावयाचा असेल तर या देशात एकच माणूस आहे, एकच विद्वान आहे, उपेक्षित समाजाचे दु:ख, वेदना ज्यांनी प्रत्यक्षात सहन केलेल्या आहेत असा विद्वान माणूस चेअरमन असला पाहिजे आणि ते एकमेव प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर आहेत. हे गांधीजींनी सांगितले आहे.

1932 सालच्या कराराला 2007 मध्ये 75 वर्षे पूर्ण झाली होती. त्यावेळी माननीय श्री.प्रकाश आंबेडकर यांच्यापासून ते माननीय श्री.रामदास आठवले यांच्यापर्यंत सर्वांनी त्याचे स्वागत केले. तो अमृत महोत्सव साजरा केला. त्यावेळी जागतिक पातळीवरचा पुण्याच्या येरवडा जेलमध्ये करार झाला होता. ज्याला पुणे करार असेही म्हणतात. त्या करारावर तिघांच्या सह्या आहेत. पुण्यातील बापूसाहेब राजभोज म्हणजेच पां.ना.राजभोज यांची सही आहे. माननीय श्री.बापूसाहेब राजभोज हे प.पू.डॉ.बाबासाहेबांचे 14 वर्षे खाजगी सचिव होते. त्यांनी त्यांना का नेमले होते, बाबासाहेबांना सर्व दलितांना एकत्र आणावयाचे होते. मला हे सांगताना वेदना होतात. या संदर्भात माझे वैयक्तिक मत असे आहे की, दलितांकरिता राज्यात एकच महामंडळ असावयास पाहिजे. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या नावाने एक महामंडळ आहे, वसंतराव नाईक यांच्या नावाने भटक्या विमुक्त समाजासाठी एक महामंडळ, अण्णाभाऊ साठेंच्या नावाने मातंग समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ, आपण असे का करतो ? डॉ.बाबासाहेबांनी सर्व दलित, बारा बलुतेदार हे सर्व एका झ ेंड्याखाली यावेत असा प्रयत्न केला. मला बौध्दवासी दादासाहेब रुपवते यांची आठवण होते. ते असे नेहमी म्हणत असत. सामाजिक समता व विषमता मोडण्याचा लढा जगामध्ये पाहिला तर तो दुर्दैवाने अपयशाचा आहे. त्याचे कारण असे आहे की, या दलितवर्गाकडून संघर्ष होत असताना त्यांच्यात फूट पाडण्याचा प्रयत्न हे विशिष्ट वर्ग करीत असतो. त्याला काहीही म्हणा, सनातनी म्हणा, स्वार्थी म्हणा, मागासलेले म्हणा. मी हे का म्हणत आहे ?

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय बापूसाहेब राजभोज यांच्यासारख्या दलित घटकाला डॉ.बाबासाहेबांनी आपल्याबरोबर 14 वर्षे खाजगी सचिव म्हणून ठेऊन घेतले होते. 1932 सालच्या करारावर त्यांची सही आहे. हे सर्व विसरुन गेलो की काय ? या ठिकाणी कोणी तरी असे म्हटले आहे की, आपण राज्यात एक वेगळे अभियान सुरु करु. त्याबाबत त्यांची भूमिका चांगली असू शकते, वाईट असणार नाही. ते असे म्हणाले की, एक अभियान घेऊन सर्व जातींवर शिक्कामोर्तब करुन टाकू. मला ते ऐकताना माझ्या मनाला फार वेदना झाल्या, आपल्याला जे विसरावयाचे आहे, अवघा मानव एक आहे हे आपल्याला सिध्द करावयाचे आहे. त्या वाटचालीमध्ये दुर्दैवाने हे आपल्याला करावे लागते. त्याचेही कारण असे आहे की, जातीच्या आरक्षणानुसार लॉट उचलतो, त्यानंतर जाती सिध्द करण्यास सांगतो. पण मी अत्यंत नम्रपणे सांगतो, माझा कोणावर आरोप नाही. पण जसजशा सवलती अधिक मिळू लागल्या तसतसे कोणी खोटे फायदे घेऊ लागले तर त्या अधिकाऱ्यांनी तरी काय करायचे ? आपण एका बाजूला असे म्हणतो की, 8 दिवसात ते दिले नाही तर अधिकाऱ्यांवर कारवाई होईल. पण पुरावेच संबंधितांना दिले नसतील तर त्या अधिकाऱ्याने काय करावयाचे ? जे प्रामाणिक असतील, खरे असतील, वंचित असतील त्यांना न्याय मिळाला पाहिजे. खोट्या लोकांनी ते फायदे घेण्याचा प्रयत्न केला तर तो देखील तुम्ही आम्ही मिळून सर्वांनी हाणून पाडला पाहिजे. सामाजिक ऐक्याच्या दृष्टीने आपण सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे. जात, जात असे म्हणत इतक्या जातींचा येथे उल्लेख झाला आहे. मी काल सन्माननीय सदस्य श्रीमती विद्याताई चव्हाण यांना सांगितले होते. सुरेश भटांच्या कवितांच्या ओळी मी या ठिकाणी या पूर्वीही सांगितल्या आहेत. ते गझलमध्ये असे म्हणतात की,

"शेवटी वेद मंत्रांनी अन्याय एवढा केला,
मशहूर ज्ञानीया झाला,
गोठ्यातच जगला, गेला,
पुसतात जात हे मुडदे मसणात एकमेकाला,
कोणीच विचारत नाही माणूस कोणता मेला"

4....



श्री.उल्हास पवार....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

काय आपला समाज आहे ? आपण विज्ञान युगात चाललो आहे, अंतराळात चाललो आहे, चंद्रावर माणूस पोहोचला आहे, मंगळावर पाणी आहे की नाही याचा शोध चालू आहे. या गोष्टीवर आपण चिंतन करीत आहोत, मी या निमित्ताने सामाजिक ऐक्याचे चिंतन करीत आहे. जेव्हा स्व.यशवंतराव चव्हाण यांनी रिपब्लिकन पक्षाचे दादासाहेब गायकवाड यांच्याबरोबर युती केली होती. त्यावेळी त्यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला होता तो प्रश्न मला आजही आठवत आहे. ही राजकीय गणितासाठी केलेली युती आहे का ? स्व.यशवंतराव यांचे हे वाक्य आहे, राजकीय गणितासाठी नाही, संख्या वाढविण्यासाठी नाही, सामाजिक अभिसरणासाठी ही युती केलेली आहे. ही त्यांची वाक्ये आहेत. म्हणून त्या ठिकाणी...

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण आम्हाला 5-7 मिनिटांचा वेळ दिला होता. परंतु सन्माननीय सदस्यांना किती वेळ दिला आहे ?

श्री.उल्हास पवार : सन्माननीय सदस्य श्रीमती नीलमताईंना सांगू इच्छितो की, आपण या प्रस्तावासाठी वेळ वाढवून मिळण्यासाठी प्रयत्न करु. सभागृहात चांगले वातावरण निर्माण होऊ लागले असल्यामुळे आपण जरा श्रवण भक्ती करावी. आपल्यालाच बोलण्याचा अधिकार आहे काय ? आपण पार दलितांकडून तिकडे गेलात, आपण माझ्या भाषणात अडथळा निर्माण करु नका. मी कधी मतमतांतरे केलेली नाहीत.

डॉ.नीलम गोऱ्हे : मला जो अनुभव आला, तो आता श्री.रामदास आठवले यांना सुध्दा आलेला आहे. म्हणून आमची जी भूमिका आहे ती आम्ही मांडू शकतो. सन्माननीय सदस्यांनी सरकारने या प्रस्तावाच्या अनुषंगाने काय केले पाहिजे याबद्दल भाष्य केले पाहिजे. जनरल भाषण करु नये. येथे काही साहित्य संमेलनाची भाषणे चालली नाहीत.

श्री.उल्हास पवार : सन्माननीय सदस्यांनी राग येऊ देऊ नये. त्या एका डब्याकडून दुसऱ्या डब्याकडे गेल्या आहेत, एवढेच मला म्हणावयाचे आहे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य आपले विचार व्यक्त करीत आहेत. त्यांनी काय बोलावयाचे आणि काय नाही हा त्यांचा वैयक्तिक हक्क आहे.

5....



**तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे ):** सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. या प्रस्तावासंबंधी आपल्याकडे आता कमी वेळ शिल्लक राहिलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार : मी मघाशी म्हटल्या प्रमाणे सामाजिक अभिसराणासाठी केलेली ही युती आहे असे स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांनी सांगितले होते. त्याची परिणती मी आपल्याला सांगतो की, त्यावेळी महाराष्ट्रात कोणत्याही प्रकारचे आरक्षण नसताना, कोणतीही चर्चा नसताना स्व.वसंतराव नाईक यांच्या सारखी व्यक्ती माणूस या महाराष्ट्राची पावणे बारा वर्षे मुख्यमंत्री होऊ शकली, स्व.सुधाकरराव नाईक हे मुख्यमंत्री होऊ शकले, श्री.सुशीलकुमार शिंदे हे मुख्यमंत्री होऊ शकले, बॅ.अंतुले साहेब हे मुख्यमंत्री होऊ शकले. स्व.कन्नमवार हे मुख्यमंत्री होऊ शकले. हे महाराष्ट्राचे सामाजिक क्रांतीचे जे केंद्र आहे की ज्या केंद्राने आपल्या देशाला मार्गदर्शन केले आहे. म्हणून या सगळया योजना होत असताना, विचारमंथन होत असताना निश्चितपणे अजूनही काही गोष्टी अपु-या आहेत.  मग शिष्यवृत्ती असेल, मागासवर्गीय विद्यार्थ्यांची वसतिगृहे असतील, आज पुण्याला संत ज्ञानेश्वर वसतिगृह, औरंगाबादला संत तुकाराम वसतिगृह आहे, पुण्याला संत जनाबाई वसतिगृह आहे. या सर्व वसतिगृहांची आधुनिक व्यवस्था करण्याची आवश्यकता आहे. एवढेच नव्हे तर त्यांचा निर्वाह भत्ता 140 वरुन 330 पर्यंत केलेला आहे.  मला सांगण्यास आनंद होतो की, आजच्या आपल्या महामहिम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील या राज्याच्या समाजकल्याण मंत्री असताना माननीय श्री.जयदेव गायकवाड त्यावेळी ते पँथरमध्ये होते. त्यांनी व मी या मुलांचा आहार भत्ता अपुरा पडत असल्यामुळे तो वाढविण्यासाठी प्रयत्न केले होते. तो भत्ता वाढविण्याचे काम तत्कालीन समाजकल्याण मंत्री माननीय श्रीमती प्रतिभाताई पाटील यांनी केले होते.

सभापती महोदय, मागासवर्गीय मुलांना परदेशी जाऊन शिक्षण घेण्यासाठी केवळ 25 मुलांना शिष्यवृत्ती मिळत होती.  परंतु आता ती 50 विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत आहे.  ही योजना सुरु झाल्यापासून आजपर्यंत 172 दलित विद्यार्थ्यांनी ही शिष्यवृत्ती मिळविली आहे. ग्रामीण भागातील दलितांच्या घरांची योजना असेल या सगळया दृष्टीने प्रयत्न केला पाहिजे. या निमित्ताने चर्चा करीत असताना ती एकांगी होता कामा नये, यादृष्टीने आपण चर्चा करावी अशी नम्र सूचना करतो आणि या ठिकाणी थांबतो.

------

यानंतर श्रीा.खर्चे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सभागृहात सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी मागासवर्गीयांच्या सोयी-सवलतींच्या अनुषंगाने चर्चा करण्यासाठी आणलेल्या प्रस्तावावर माझे विचार मी व्यक्त करणार आहे.

महोदय, मी तीन वर्षे सामाजिक न्याय विभागाचा राज्यमंत्री म्हणून या सरकारमध्ये काम केले आहे. पण शासनाचे धोरण खरोखरच मागासवर्गीयांना सवलती देण्यासाठी आहे काय, हे मात्र मला अद्यापही समजले नाही. मी यासंदर्भात अनेक वेळा प्रयत्न देखील केले. दरवर्षी 800 ते 900 कोटीची तरतूद बजेटमध्ये मागासवर्गीयांसाठी करण्यात येते पण हा पैसा खर्च होत नाही. मंत्रिमंडळात बजेटवर चर्चा करताना मागासवर्गीयांसाठी अमुक योजना झाली पाहिजे, तमुक योजना झाली पाहिजे असे दोन्ही पक्षातील मंत्री सांगतात आणि बजेट सुध्दा पास करतात पण प्रत्यक्षात मात्र मागासवर्गीयांना कोणत्याही प्रकारचा फायदा मिळत नाही. त्यात काही ना काही अडचणी निर्माण केल्या जातात. वित्त विभागाचा कार्यभार राष्ट्रवादी या घटक पक्षाकडे आहे. पण समाज कल्याण विभागाच्या कोणत्याही योजना सामाजिक न्याय विभागाकडून, सामाजिक न्याय मंत्र्यांकडून पुढे केल्या तर त्याला "खो" घालण्याचेच प्रयत्न होतात, ही वस्तुस्थिती आहे. मग त्यात मागास वर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती असेल किंवा वसतिगृहांचा निर्वाह भत्ता असेल, त्यावर सरळ निर्णय होत नाही. आज मागासवर्गीय वसतिगृहातील मुलांना महिन्याला फक्त 630 रुपये इतकाच निर्वाह भत्ता मिळतो, पण एवढ्या कमी रकमेत भागत नाही ही वस्तुस्थिती असताना देखील त्यात वाढ केली जात नाही, हे या पुरोगामी राज्याचे दुर्दैव आहे. जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील अनुदानित वसतिगृहांची अवस्था तर अत्यंत दयनीय अशीच आहे. संचालकांची सुध्दा फार मोठी अडचण होत आहे. त्यात जिल्हा परिषदेत जो भ्रष्टाचार होतो त्यामुळे संचालकाच्या हातात काहीच पडत नाही एवढी वाईट परिस्थिती आहे. म्हणून शासनाने केवळ घोषणा करुन भागणार नाही तर जी अनुदानित वसतिगृहे आहेत ती शासनाकडे वर्ग करावीत. तसेच या वसतिगृहांची विद्यार्थी क्षमता 25 वरुन 100 पर्यंत वाढवावी असा विचार शासन करीत आहे पण या अनुदानित वसतिगृहांना जागा सुध्दा नाही आणि शासन या संचालकांना जागेचे भाडे देत नाही. कर्मचाऱ्यांचे पगार देत नसल्याने कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत कमी आहे, याचाही विचार शासनाने करावा अशी मी विनंती करतो.

....2...

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर .....

महोदय, दादासाहेब गायकवाड स्वाभिमान योजना शासनाने राज्यात सुरु केली आहे. पण या योजनेची अवस्था सुध्दा चिंताजनक आहे असेच म्हणावे लागेल. कारण या योजनेच्या माध्यमातून दलितांना ज्या जमिनी दिल्या जातात त्या नापीक असतात, त्यात काहीच पिकत नाही. आजच्या परिस्थिती जमिनीचे भाव एकरी पाच लाखापासून दहा लाखापर्यंत वाढलेले आहेत. अशा परिस्थितीत शासन मात्र पैसे वाढवून देत नाही म्हणून माझी अशी सूचना आहे की, ही स्वाभिमान योजना बंद करावी अन्यथा पाच ते दहा लाखापर्यंतची जमीन देण्याबाबत विचार करावा.

महोदय, प्रत्येक तालुक्यात मुला-मुलींसाठी शासनाने वसतिगृहे बांधलेली आहेत पण त्यातील एकही वसतिगृह अद्याप सुरु झालेले नाही. दलितांसाठी राज्यात शासनाने 353 निवासी शाळा तयार केल्या आहेत पण त्या सुरु करण्यासाठी कोणतीच तरतूद केली जात नाही. हीच परिस्थिती औद्योगिक सहकारी संस्थांची असून बोगस लोकांना शासनाने उद्योग सुरु करण्यासाठी पैसे दिले, त्यांची चौकशी वगैरे काहीच नाही. अशा सर्व बोगस प्रकरणांची शासनाने चौकशी करावी व जे गरजू आहेत त्यांना अनुदान देण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

महोदय, शेवटचा मुद्दा मला दादर येथील "इंदू" मिलच्या संदर्भात मांडावयाचा आहे. या मिलची जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाला मिळावी म्हणून आम्ही अनेक वेळा शासनाकडे निवेदने दिली आहेत. ही जागा शासनाने दिली नाही तर या राज्यात "शाहू-फुले-आंबेडकर" यांचे नाव घेऊन राज्य करण्याचा या शासनाला अधिकार नाही, असेच मी म्हणेन. तसेच यासांठी आम्हाला आंदोलन करावे लागेल. शेवटी आंदोलन केल्याशिवाय कधीच काही मिळत नसते. महाराष्ट्र राज्य सुध्दा आंदोलन करुनच मिळालेले आहे. मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेबांचे नाव देण्यासाठी सुध्दा 17 वर्षे आंदोलन करावे लागले होते. म्हणून शासनाने या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी "इंदू" मिलची संपूर्ण जागा द्यावी अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

------



अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मागासवर्गीयांसाठी जो प्रस्ताव सभागृहात चर्चेसाठी आणला आहे त्यावर माझे विचार मी अगदी थोडक्यात मांडणार आहे.

महोदय, या प्रस्तावाच्या निमित्ताने मी फक्त पाच-सहा मागण्या शासनाकडे करणार आहे. त्यात क्रिमीलेयर वगैरे सोडून सर्व मागासवर्गीयांना दारिद्र्यरेषेखालचे समजून सर्व फायदे द्यावेत. दुसरी मागणी अशी आहे मागासवर्गीयांना सवलती मिळण्यासाठी 20 हजार रुपये वार्षिक उत्पन्नाची मर्यादा ठेवलेली आहे त्यामुळे त्यांना कोणताही फायदा होणार नाही, ती मर्यादा वाढविण्यात यावी. तसेच मागासवर्गीयांसाठी जी तरतूद करण्यात येते तो पैसा खर्च झाला नाही तर पुढील वर्षी खर्च करता येईल अशा प्रकारची तरतूद संबंधित कायद्यात करावी. राज्यात अनुसूचित जातीची 10 टक्के व जमातीची 8 टक्के एवढी लोकसंख्या असून त्या प्रमाणात त्यांच्यासाठी निधीची तरतूद केली जाते पण ही रक्कम खर्च होत नाही म्हणून लॅप्स होते. ही रक्कम लॅप्स न होता पुढील वर्षी खर्च करण्याची सुविधा निर्माण करण्याची गरज आहे. तसेच मागासवर्गीयांसाठी असलेल्या विविध महामंडळांसाठी अर्थसंकल्पाच्या 10 टक्के रक्कम द्यावी.

त्यानंतर जातीचे दाखले व्यक्तिला न देता संपूर्ण कुटुंबासाठी देण्याची व्यवस्था करावी. कारण एक मुलगा टोकरे-कोळी तर दुसरा मुलगा ओबीसी असे प्रकार होणार नाहीत, म्हणून संपूर्ण कुटुंबासाठी असे दाखले मिळाले पाहिजेत. शिक्षणाच्या संदर्भात कोणत्याही अटी न घालता इंग्रजी, मराठी अथवा भारताबाहेर शिक्षणाची संधी मिळत असेल तर ती देखील मागासवर्गीयांना देण्यात यावी. कारण शेवटी गरिबी हा सर्वात मोठा रोग आहे, कॅन्सर आणि टी.बी. पेक्षा मोठा रोग म्हणजे गरिबी असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते. तसेच संत गाडगे बाबा यांनी सुध्दा सांगितले की, शिक्षणासाठी पैसे नसतील तर ज्या ताटात खातो ते ताट विका आणि हातात भाकरी घेऊन खा पण आपल्या मुलांना शिकवा, म्हणून शिक्षण हे महत्वाचे आहे व त्यासाठी शासनाने तशी संधी उपलब्ध करुन द्यावी, अशी मी विनंती करतो. आश्रमशाळेत राहणाऱ्या मागासवर्गीयांना निर्वाह भत्त्याची रक्कम वाढवून दिल्याची बातमी मी ऐकली होती पण याबाबत सुध्दा शासनाने विचार करावा अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

------

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी मागासवर्गीयांच्या सोयी-सवलतींच्या संदर्भात जो प्रस्ताव आणला त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, प्रथम मी सन्माननीय सदस्यांचे आभार मानतो कारण एका दुर्लक्षित विषयाकडे त्यांनी शासनाचे लक्ष वेधले आहे. या निमित्ताने मी शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करणार आहे की, अल्पसंख्याक समाजात सुध्दा मोठ्या संख्येने म्हणजेच जवळपास 82 टक्के एवढी दलितांची संख्या आहे. सन 1950 मध्ये महामहीम राष्ट्रपतींनी हिंदू व दलितांची यादी तयार केली होती तशाच जाती मुस्लीम जमातीत सुध्दा आहेत. कारण मुस्लीम समाजात न्हावी, धोबी, कुरेशी, खाटिक अशा प्रकारच्या हिंदू समाजाला पॅरलल पोट जाती आहेत. पण हिंदू व दलितांसाठी ज्या योजना शासन बनविते त्यांचा फायदा मुस्लीम समाजातील या पॅरलल जातींना कधीच मिळत नाही. याचे एक उदाहरण मी सभागृहाच्या व शासनाच्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ AKN/ KTG/ ST/ KGS/ प्रथम श्री. खर्चे..... 11:00

(सभापतीस्थानी मा. तालिका सभापती श्री. मोहन जोशी )

श्री. सय्यद पाशा पटेल.....

सय्यद रहिम जुल्लू मदारी हा गेवराईमधील मुलगा असून त्याच्या टीसीवर "मदारी गारुडी" असा उल्लेख आहे. असे असतांनाही जिल्हाधिकारी, बीड यांनी या विद्यार्थ्याला "मदारी गारुडीचे" प्रमाणपत्र दिले नाही. शासनाकडे अपिल केल्यानंतर जिल्हाधिकारी बीड यांना या प्रकरणी निर्णय घेण्यास सांगितले गेले तसेच गृह चौकशी करण्यास सांगितलेले असतांनाही जिल्हाधिका-यांनी संबंधित विद्यार्थ्यास प्रमाणपत्र दिले तर नाहीच उलट त्याला हाय कोर्टात जाण्यास सांगितले. हाय कोर्टामध्ये गरीब कसा काय जाऊ शकतो? हायकोर्टात जाण्यासाठी 50 हजार रुपये फी दिल्याशिवाय वकील सुध्दा मिळत नाही अशी परिस्थिती आहे. सर्व खरे असतांना अशी परिस्थिती आहे. या बिचा-याचे कोण वाली आहे ? मुस्लीम समाजामध्ये मुलांनी, मुजावर, फकीर, पेडारी, नागबंद तांबोळी, आत्तार,पिंजारी, नदाब, अस्वलवाले, पैलवान, दरवेशी, डोंबारी, उंटवाले, गवळी, भंगी, खाटीक, हलालखोर, मेहतर, मोची अशा एकंदर 44 जाती आहेत. या जातींना कधीही न्याय मिळालेला नाही. सन 2007 मध्ये माजी मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी मुस्लिमामध्ये 44 जाती असल्याचे मान्य केले होते व त्यांना आम्ही सवलती देऊ असे सांगितले होते. जर आपण त्यांना प्रमाणपत्रच मिळू देणार नसाल तर सवलती आपण कोठून देणार आहात ? ज्यावेळेस प्रमाणपत्र मागण्यास माणूस जातो तर त्याच्याकडून प्रथम टीसीची मागणी केली जाते. शिकलेच नाही तर टीसी कोठून देणार ? नातेवाइकांचा पुरवा द्या असे सांगितले जाते परंतु नातेवाईक शिकलाच नसेल तर त्याचा पुरावा काय देणार ?

माननीय पवार साहेबांनी 1994-95 मध्ये सांगितले होते की, आता ज्या जाती आहेत त्या जातीचे त्यांच्याकडे प्रमाणपत्र नसेल तर त्यांची गृह चौकशी करुन जातीचे प्रमाणपत्र द्या. परंतु दुर्दैवाने अशा प्रकारची रिस्क अधिकारी घेतच नाही. जेथे मिळते तेथे कोणीही इंटरेस्ट घेतो व जेथे काहीच मिळत नाही तेथे कोणीही इंटरेस्ट घेत नाही. त्यामुळे प्रमाणपत्र मिळत नाही. या निमित्ताने मी मंत्रीमहोदयांना विचारु इच्छितो की, कृपा करुन एवढया दिवसापासूनचा हा खेळ चालू आहे आता या पुढे असा खेळ करु नका. अल्पसंख्यांकामधील ज्या मागासलेल्या जाती आहेत त्यांचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी आपण खरोखर काही सोय करणार आहात काय ? यांना प्रमाणपत्र

...2..

श्री. पाशा पटेल...

मिळाले तरच त्यांना पुढील सोयी मिळू शकतील नाही तर नाही.

या प्रसंगी मी दोन महत्वाचे मुद्दे उपस्थित करणार आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितले आहे की, शिक्षणाशिवाय माणसाला पर्याय नाही. हे जर खरे असेल तर या समाजाला शिक्षण मिळाले पाहिजे. दलित आदिवासी मुलांना स्कॉलरशिप मिळते आणि जर एखाद्या संस्थेत अल्पसंख्यांक मागासवर्गातील मुलाचा नंबर लागला व त्याच्याकडून फी चे पैसे मागितले तर संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करतो येतो. अती मागासर्गीय जी मंडळी आहेत, अल्पसंख्यांकामधील जे दलित आहेत अशा मुलांकडून फी मागितली तर संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल केला गेला पाहिजे. असे झाले तरच त्यांना न्याय मिळेल. प्रवेश घेतल्याशिवाय स्कॉलरशिप मिळूच शकत नाही. गेल्या वर्षाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची स्कॉलरशिप अजूनही त्यांच्या पदरात पडली नाही. दोन दोन वर्षे थांबून त्यांना कोणी प्रवेश देणार आहे काय ? इतर विद्यार्थ्यांना जो न्याय आहे तोच न्याय अल्पसंख्यांक मागासवर्गातील मुलांना मिळाला पाहिजे. या प्रसंगी माझी एक विनंती आहे की, आपल्याला आता मागासर्गीयांचा विचार नक्की करावा लागणार आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मिळण्यासाठी जी दमछाक होती ती कमी करणे आवश्यक आहे व त्यासाठी मार्ग काढण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांना प्रमाणापत्र लवकर मिळाले पाहिजे. प्रमाणपत्र मिळण्यासाठी टाईमबाऊंड प्रोग्राम घेतला गेला पाहिजे. अल्पसंख्यांक दलित विद्यार्थ्यांकडून फी मागितली तर संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल झाला पाहिजे. या सर्व गोष्टीमध्ये आपण निर्णय घ्यावा एवढी कळकळीची विंनती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. ----

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त ) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये सभागृहात जी चर्चा उपस्थित करण्यात आलेली आहे त्यावर मी माझे विचार मांडणार आहे. कोण कोणत्या समाजाचा, जाती, धर्माचा आहे असा विचार कोणाच्याही मनात येत नाही. गरीब, कष्टकरी समाजाला मदत करणे हा माणुसकीचा धर्म आहे. इतिहासातून धडा शिकून समाजामध्ये सुधारणा करत करत समाजाच्या उज्ज्वल भविष्यासाठी झटणारी असंख्य समाज सेवकांची, संतांची थोर परंपरा आपल्या महाराष्ट्राला लाभली आहे. जिजाऊंनी शिवबाला घडवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, शाहू महाराज, गोखले, आगरकर अशा किती तरी थोर नेत्यांनी महाराष्ट्र घडवलेला आहे. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून 64 वर्षे झालेली आहेत. आपल्या देशाचा विकास ब-यापैकी झालेला आहे. आपले राज्य पुरोगामी म्हटले जाते. मागासवर्गीयांच्या विकासासाठी राबविण्यात येणा-या अनेक योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होतांना दिसत नाही. आपल्या देशातील 80 टक्के जनता समाज घटकांमध्ये मोडते. महाराष्ट्र शासनाने रोजगार हमी योजना 1978 पासून सुरु केली असून ही योजना संपूर्ण देशात अंमलात आणली गेली आहे.

महाराष्ट्र शासनाने अनेक योजना दुर्बल घटकांसाठी केल्या असून त्या द्वारे स्वत:च्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न वंचित घटकांसाठी केलेला आहे. शासनाने अनेक महामंडळे सुरु केलेली आहेत. महात्मा फुले विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, वंतराव नाईक विकास महामंडळ, मौलाना आझाद विकास महामंडळ तसेच अनेक कल्याणकारी योजना केद्र शासनाने व राज्य शासनाने तयार केलेल्या आहेत. परंतु खरे कल्याण कोणाचे होते आहे हा प्रश्न आपल्या समोर पडलेला आहे. आज मागासवर्गीय भटके विमुक्त, अल्पसंख्याक व महिला घटकांची काय अवस्था आहे याचाच आता विचार करण्याची वेळ आलेली आहे. आज आपल्या देशाची आर्थिक स्थिती चांगली आहे. परंतु असे असतांना आज 60-70 टक्के लोक शासकीय योजनेंपासून वंचित आहे. आपला देश एककीकडे महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहतो आहे. आपल्या देशात गरीब आणि श्रीमंत असा फार मोठा विरोधाभास आहे. शहरात सुध्दा गरिबी व श्रीमंती असा मोठया प्रमाणात विरोधाभास आहे. शहरी भागातील श्रीमंत व्यक्तीकडे कसल्याही प्रकारची कमतरता नाही.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्रीमती विद्या चव्हाण.....

गरीब व श्रीमंतीची दरी कमी करण्यासाठी शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी झाली तरच हा विरोधाभास कमी होऊ शकेल. परंतु योजनांची अंमलबाजावणी प्रभावीपणे केली जात नाही.

मला या ठिकाणी अभिमानाने सांगावेसे वाटते की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सामाजिक परिवर्तन परिषदेचे आयोजन केले होते त्यामध्ये मागासर्गीयांसाठी सनद तयार करण्यात आली होती व त्यामध्ये अनेक चांगले मुद्दे मांडण्यात आले होते. हिंदू कोड बिलाच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उल्लेख केला होता त्याची अंमलबजावणी महाराष्ट्रात कशी होईल, स्त्रियांना सत्तेत प्रत्यक्षात वाटा कसा मिळेल यासाठी अनेक प्रयत्न माननीय पवार साहेबांनी केलेले आहे. त्याचे पालन झाले तर त्याचा फायदा प्रत्येक वंचित घटकांना मिळू शकेल. समाज कल्याण उपसंचालक कार्यालयात जातीचा दाखला देण्यात येतो त्यासाठी 50 हजार रुपये मागितले जातात खरे म्हणजे यासंदर्भातील चौकशी आपण करणार आहात काय ?

**उप सभापती** : चर्चेला वेळ फार कमी उरलेला असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी मुद्यांचे रिपीटेशन टाळावे अशी सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, इचलकरंजी येथे सहा औद्योगिक सहकारी संस्था मंजूर करण्यात आल्या आहेत. विदर्भामध्ये एकही औद्योगिक सहकारी संस्था का मंजूर केली नाही, याची चौकशी झाली पाहिजे. स्व.राजीव गांधी यांनी सांगितल्याप्रमाणे, आपल्या देशामध्ये योजनेतील फक्त 15 टक्के निधी तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचत असेल तर शासनाने या गोष्टीचा विचार करुन योजना पूर्ण क्षमतेने संबंधित लाभार्थ्यांपर्यंत कशा पोहोचतील या दृष्टीने आणि योजनांमध्ये जे कोणी गैरप्रकार करीत असतील त्यांच्यावर कारवाई करण्याची भूमिका स्वीकारण्यात यावी एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सुरुवातीलाच मी सत्ताधारी पक्षाचे माननीय सदस्य सर्वश्री माणिकराव ठाकरे, हेमंत टकले आणि सुभाष चव्हाण यांनी हा ठराव मांडल्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, या सभागृहात मागासवर्गीयांच्या प्रस्तावावर चर्चा चालू असताना बजेटमध्ये मात्र किती तरतूद केली जाते? मागासवर्गीय कल्याण विभागाचा 700 ते 800 कोटी रुपयांचा निधी दरवर्षी इतर विभागांकडे वळविला जातो. गेल्या दोन वर्षात कोणत्या विभागांकडे या विभागाचा निधी वळविला, तो का वळविला, खर्च का केला नाही या प्रश्नाची उत्तरे मंत्री महोदयांनी सुरुवातीलाच दिली तर या चर्चेतून काही तरी निष्पन्न झाल्यासारखे होईल.

सभापती महोदय, बॅकलॉगच्या संदर्भात अनेकदा बोलले जाते. आजही महाराष्ट्रात मोठया प्रमाणात बॅकलॉग शिल्लक आहे. त्याची कारणे काय आहेत याची एक श्वेतपत्रिका सरकारने प्रसिध्द केली पाहिजे. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचा बॅकलॉग पूर्ण झाला आहे, ती आकडेवारी सरकार जाहीर करु शकेल. परंतु तो काही फुशारकीचा विषय नाही. वर्ग.1 पदांवर किती मागासवर्गीय उमेदवारांना नियुक्ती दिली, किती पदांवर पदोन्नती दिली, पदोन्नती का अडविली गेली, महत्वाची पदे असतील त्यावेळी मागासवर्गीय अधिकाऱ्यांना का डावलले जाते, या प्रश्नांचे मंत्री महोदयांनी सभागृहाला स्पष्टीकरण दिले पाहिजे. हा प्रश्न केवळ सामाजिक न्याय विभागापुरता मर्यादित नसून राज्य शासनाच्या इतर सर्व विभागांबाबत या निमित्ताने मी आपले लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, सुप्रीम कोर्टामध्ये दलित मुस्लीम आणि दलित ख्रिश्चन यांच्या संदर्भात एक खटला चालू आहे. केंद्र सरकार आणि देशातील अनेक राज्य सरकारांनी त्या बद्दल भूमिका घेण्याचे मान्य केले आहे. केंद्र सरकारने अद्याप आपली भूमिका स्पष्ट केलेली नसली तरी अनेक राज्यांनी स्वत: आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. महाराष्ट्र राज्यात दलितांमध्ये जे मुस्लीम धर्मीय आहेत, दलितांमध्ये जे ख्रिश्चन धर्मीय किंवा अन्य धर्मीय आहेत त्यांना सवलती मिळत नाहीत. 1934 पासून 1950 पर्यंत या सर्व वर्गांना सवलती मिळत होत्या. भंगी, मेहतर, मदारी आदी वर्गाला सवलती मिळत होत्या. 1950 नंतर घटनेमध्ये बदल करुन अनुसूचित जातींना सवलती लागू केल्यानंतर सुध्दा एक प्रेसिडेन्शीयल ऑर्डर काढण्यात आली. घटनेमध्ये तसा उल्लेख नसताना प्रेसिडेन्शीयल ऑर्डरद्वारे अशा प्रकारच्या सवलती केवळ हिंदू धर्मियांना मिळतील असे सांगण्यात आले. त्यामुळे हा सर्व वर्ग बाजूला फेकला गेला आहे. 1934 ते 1950 पर्यंत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

ज्यांना सवलती मिळत होत्या, त्या वर्गांना पुन्हा न्याय देण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. उत्तरप्रदेश आणि दक्षिणेकडील अनेक राज्यांनी ख्रिश्चन आणि मुस्लीम दलितांना सवलती देण्याचा प्रस्ताव माननीय राष्ट्रपती आणि केंद्र सरकारकडे पाठविला आहे. सुप्रीम कोर्टात खटला चालू असताना या विषयाला बळकटी द्यावयाची असेल तर महाराष्ट्र शासनाने स्पष्ट ठराव करुन तशी मागणी केली पाहिजे.

सभापती महोदय, माननीय शिवप्रभूंना मोठया प्रमाणात त्यांच्या कामामध्ये मदत करणारे मदारी, मेहतर हे जातीने मुस्लीम आणि दलित होते. या वर्गाला सवलती मिळाल्या पाहिजेत अशी मंत्री महोदयांकडे मी या निमित्ताने मागणी करतो. केवळ धर्माच्या बंधनामुळे ज्या सवलती या वर्गाला मिळत नाहीत त्या वर्गासाठी केंद्र सरकारचा निर्णय होईल तेव्हा होऊ दे, माननीय राष्ट्रपतींचा निर्णय होईल तेव्हा होऊ दे, तो पर्यंत महाराष्ट्र शासनाने मदारी, मेहतर यांच्यासाठी नवीन महामंडळ स्थापन करावे आणि या वर्गाला पुढे आणण्यासाठी कार्यक्रम आखावा अशी मागणी करुन माझे भाषण संपवितो.

---------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण आणि इतर सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा ठराव या सभागृहापुढे चर्चेला आणल्याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदय, मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी शासनाकडून वेगवेगळ्या प्रकारच्या योजना आखल्या जातात. त्याचा फायदा संबंधितांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जातो. खऱ्या अर्थाने शासकीय योजनांचा फायदा ज्या लोकांना मिळाला पाहिजे त्या लोकांपर्यंत या योजना पोहोचत नाहीत. कारण अंमलबजावणी करण्यामध्ये आपण कमी पडतो. या ठरावाच्या निमित्ताने मी मागणी करतो की, योजनेच्या संदर्भात जो निर्णय झाला तो निर्णय आणि त्या निर्णयाच्या अनुषंगाने संबंधितांना फायदा मिळण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांकडून अंमलबजावणी होण्यामध्ये, अंमलबजावणी योग्य प्रकारे होते किंवा नाही यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने काळजी घेण्याची आवश्यकता आहे. योग्य प्रकारे अंमलबजावणी झाली नाही तरी देखील संबंधित अधिकाऱ्यांवर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही. त्यामुळे खऱ्या अर्थाने मागासवर्गीयांना न्याय द्यावयाचा असेल, त्यांच्यापर्यंत योजना पोहोचवायच्या असतील तर योग्य पध्दतीने आणि निर्देशानुसार अंमलबजावणी न करणाऱ्या आणि कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर, मग तो कोणत्याही दर्जाचा असला तरी त्या अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या मागासवर्गीयांना जे जातीचे प्रमाणपत्र दिले जाते, नॉन क्रिमीलेयरचे प्रमाणपत्र दिले जाते त्या संदर्भात राज्य शासनाने निश्चित केलेली मागासवर्गीयांची उत्पन्नाची मर्यादा आणि केंद्र सरकारने निश्चित केलेल्या उत्पन्नाच्या मर्यादेमध्ये प्रचंड तफावत आहे. केंद्र सरकारची उत्पन्न मर्यादा 6 लाख रुपये आहे. तीच मर्यादा राज्य सरकारने लागू करण्याची आवश्यकता आहे. तरच खऱ्या अर्थाने मागासवर्गीयांना न्याय दिल्याचे समाधान मिळू शकेल.

सभापती महोदय, मागासवर्गीय विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी त्यांचे 100 टक्के शैक्षणिक शुल्क शासनामार्फत भरले जाते. इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना ही सवलत 50 टक्के मिळते. जे विद्यार्थी या शिक्षणासाठी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतात त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क घेण्याची आवश्यकता नाही. तसे शासनाचे स्पष्ट निर्देश आहेत. परंतु मागासवर्गीय विद्यार्थी अभियांत्रिकी आणि वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश घेत असताना शैक्षणिक संस्थांकडून शुल्क घेतले जाते व जेव्हा शासनाकडून शुल्काची प्रतिपूर्ती होईल तेव्हा ते शुल्क परत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

केले जाते, अशा प्रकारच्या घटना राज्यात घडत आहेत. म्हणून मागासवर्गीय विद्यार्थ्यांना बँकांकडून किंवा इतरांकडून कर्ज घेऊन शैक्षणिक शुल्क भरावे लागते. मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क घेऊ नये अशा प्रकारचे स्पष्ट निर्देश राज्यातील शैक्षणिक संस्थांना देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, अनुशेषाबाबत अनेकांनी या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. अनुशेषाचा आढावा निश्चितपणे घेण्यात येईल. परंतु या संदर्भात श्वेतपत्रिका काढण्याची आवश्यकता आहे. महत्वाचे म्हणजे घटनेने विविध जाती जमातींसाठी जे काही आरक्षण निश्चित करुन दिले आहे त्यामध्ये शासनाला परिपत्रक काढून बदल करता येत नाही किंवा टक्केवारीमध्ये बदल करता येत नाही. जर अनुसूचित जातीसाठी 13 टक्के आरक्षण निश्चित केले असेल तर 13 टक्के लोकांना सवलतीचा फायदा मिळाला पाहिजे. ठाणे जिल्हयामध्ये अनुसूचित जातीसाठी 8 टक्के आरक्षण का लागू केले? कायद्यानुसार 13 टक्के आरक्षण लागू असताना हे प्रमाण 8 टक्क्यावर का आणले? यामुळे त्या जिल्हयातील अनुसूचित जातीच्या 5 टक्के लोकांवर शासन अन्याय करीत आहे. कायद्यात दुरुस्ती न करता केवळ परिपत्रक काढण्यात येऊन आरक्षण बदलण्यात आले आहे. प्रकरण न्यायालयात गेले तर 13 टक्क्याप्रमाणे ठाणे जिल्हयातील अनुसूचित जातीचा अनुशेष भरावा लागेल आणि 13 टक्के लोकांना सवलतीचा फायदा द्यावा लागेल. आरक्षणाच्या टक्केवारीमध्ये बदल करण्याचा कोणताही अधिकार राज्य शासनाला नाही. या मुद्याचा राज्य शासनाने विचार करावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

-------

नंतर श्री.शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 260 अन्वये मागासवर्गीयांच्या कल्याणा संदर्भात जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मागासवर्गीयांचे कल्याण करण्याच्या दृष्टीने आघाडी सरकारच्या वतीने अनेक प्रयत्न होत आहेत. मागासवर्गीयांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात बजेट करणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील पहिले राज्य आहे. मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी हे आघाडी सरकार अतिशय तळमळीने आणि प्रामाणिकपणे चांगले काम करीत आहे. मला येथे अभिमानाने सांगावेसे वाटते की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये, छत्रपती शाहू महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये मागासवर्गीय समाजाला सामाजिक न्याय देण्याचा प्रयत्न आमचे नेते आदरणीय श्री.शरद पवार करीत आहेत. मग मंडल आयोगाची अंमलबजावणी असेल, मराठवाडा विद्यापीठास डॉ.बाबासाहेब आंबडेकर यांचे नाव देण्याचा प्रश्न असेल, या सर्व बाबी आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने सामाजिक हक्क परिषद आयोजित करण्यात आली होती. त्या परिषदेमध्ये सर्व समाजातील लोकांना बरोबरीने घेऊन, एक चांगल्या प्रकारचा विचार विनिमय करुन एक "सनद" आदरणीय श्री.शरद पवार साहेब यांच्या माध्यमातून शासनाला सादर केलेली आहे. ही "सनद" शासनापर्यंत पोहोचली की नाही याची मला माहिती नाही. मला अनेक मुद्दे मांडावयाचे आहेत, परंतु वेळ फार कमी आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे तयार करण्यात आलेली "सनद" मी आपल्यामार्फत शासनाला सादर करतो. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, या "सनद" मध्ये जे नमूद केलेले आहे त्याची आपण अंमलबजावणी करावी. आपण ही सनद मान्य केल्यास मागासवर्गीयांमध्ये एक प्रकारचा आत्मविश्वास निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा या सनदेतील शिफारशींची जशाच्या तशी अंमलबजावणी करावी अशी माझी मंत्री महोदयांना विनंती आहे, एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------

....2.

श्री एस.क्यू.जमा : सभापति महोदय, मुझे बोलने के लिए अवसर प्रदान कीजिए. मुझे बोलने नहीं दिया गया तो मैं हाऊस में खड़ा रहूंगा. मैं सुबह 10.00 बजे से यहां पर बैठा हूं और मेरी पार्टी की तरफ से मेरा तीसरे नंबर पर नाम था. मैं अनुशासन का पालन कर रहा हूं. मुझे बोलने के लिए परमिशन क्यों नहीं दी गई ? मैं यहां पर खड़ा रहूंगा.

**उपसभापती** : मी या ठिकाणी आल्यानंतर माननीय सभापतींनी माननीय मंत्री महोदयांना उत्तरासाठी सुरुवात करण्यास सांगितले होते. सन्माननीय सदस्य माझ्यावर दबाव आणणार असतील ते योग्य नाही...गोंधळ...सम्माननीय सदस्य, कृपा कर के आप शांत हो जाइए अन्यथा मैं आपकी कोई बात नहीं सुनुंगा.

श्री एस.क्यू.जमा : सभापति महोदय, इस बात की जांच होनी चाहिए कि मुझे क्यों नहीं बोलने दिया गया ? मुझे इस बात का जवाब दिया जाए कि मेरे साथ अन्याय क्यों किया जा रहा है ? इस विषय पर बोलने के लिए कल से मेरा नाम दिया गया है. मैं वाकआऊट करता हूं.

(सम्माननीय सदस्य श्री एस.क्यू.जमा सभागृह से बाहर जाते है.)

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा यांनी गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी सांगितले की, मला बोलण्याची परवानगी का मिळाली नाही याची चौकशी झाली पाहिजे. सभागृहात कोणताही प्रस्ताव किंवा अल्पकालीन चर्चा होते त्यावेळी त्या त्या पक्षाकडून कोण कोण सदस्य भाषण करणार आहेत त्यांची नावे पक्षाच्या प्रतोदांकडून माननीय पीठासीन अधिकाऱ्यांकडे दिली जातात. सत्ताधारी पक्षाचे सदस्य भाषण करण्यासाठी परवानगी मागत आहेत. सन्माननीय सदस्यांनी आपल्यावर आरोप केलेला नाही. त्यांनी पक्षाच्या प्रतोदांवर आरोप केलेला आहे.

**उप सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, मी सभागृहात आलो त्या वेळी माननीय सभापतींनी मंत्री महोदयांना उत्तरासाठी पाचारण केले होते. मी याठिकाणी आलो तेव्हा सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण, सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, रामनाथ मोते यांनी भाषण करण्यासाठी हात वर केले होते. त्यांनी सांगितले आम्ही जास्त वेळ घेणार नाही. पाच-पाच मिनिटांमध्ये मुद्दे मांडतो. सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू,जमा यांनी भाषण करण्यासाठी हात वर केला होता हे माझ्या निदर्शनास आले नाही, ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्य श्री.रमेश

.....3.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शेंडगे यांनी हात वर केल्यावर मी त्यांना एक मिनिट बोलण्याची संधी दिली. सन्माननीय सदस्य एक जबाबदार सदस्य आहेत. सन्माननीय सदस्यांनी माझ्यावर दबाब आणण्याचा प्रयत्न केला. मी दबावाला कधी घाबरत नाही आणि माझा तसा स्वभाव देखील नाही. मी सभागृहातील प्रत्येक सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देतो. आज आपण असा प्रकार केला, उद्या अन्य सदस्य असा प्रकार करतील. या आसनावर कोणीही असो, आपण सर्वांनी या आसनाचा सन्मान ठेवला पाहिजे. सन्माननीय सदस्यांना आपले म्हणणे मांडावयाचे असले तरी त्या साठी आग्रह करण्याची ही पध्दत योग्य नाही. सन्माननीय सदस्यांना त्यांचे म्हणणे मांडावयाचे असेल तर त्याला माझी काही हरकत नाही. काल माननीय सभापतींनी वेळ वाढवून दिली. आज सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.45 वाजता सुरु करायची आहे. सभागृहाची परवानगी असेल तर मी आणखी काही सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देतो. मात्र माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणाची वेळ माननीय सभापती ठरवून देतील त्याप्रमाणे होईल.

श्री एस.क्यू. जमा : सभापति महोदय, मैंने इससे पहले कई बार कहा है कि जो बीएसी है उन्होंने समय निश्चित करना चाहिए और माननीय सभापति ने रुलिंग देना चाहिए कि विरोधी पक्ष के और सत्ताधारी पक्ष के सदस्य कितने समय तक बोलेंगे. बोलने के लिए जो समय निश्चित होगा, उसमें कितने सदस्य बोलेंगे, उसके लिए पार्टी का जो व्हीप है वह उनके नाम देगा. इसके बारे में कोई स्ट्रीक्टली डिसीप्लीन फालो नहीं हो रहा है. सभापति महोदय, मेरा व्यक्तिगत तौर पर आपके ऊपर आरोप नहीं है. मैंने बोलने के लिए कल से नाम दिया है और आज सुबह से यहां आकर बैठा हूं. मुझे बोलने के लिए जिस समय मौका मिलना चाहिए था, वह नहीं मिला. मैंने हाथ ऊपर किया. मैं यहां देख रहा हूं कि जो सदस्य डिसीप्लीन से, हाथ ऊपर उठाकर बोलने के लिए अनुमति मांगते है, उनको बोलने के लिए कम समय मिलता है. जिनको ज्यादा समय लेना होता है, वे ज्यादा समय लेते है. लेकिन जब हम लोगों का बोलने का समय आता है, जो कि डिसीप्लीन से बैठे रहते है, उनसे कहा जाता हे कि एक,दो,तीन मिनिट बोलिए. समय हो गया. अब माननीय मंत्री महोदय का जवाब होगा, ऐसा कहा जाता है. माननीय सभापति की, बीएसी की जिम्मेदारी है कि इसका पालन होना चाहिए. अगर इस बारे में स्ट्रीक्टली निर्णय नहीं होगा तो मैं भी बाकी सदस्यों के जैसा बीच में खड़ा होकर अपनी बात कहूंगा. आपके प्रति मेरा कोई असम्मान नहीं है. अगर आपको कोई दुख हुआ हो तो उसके लिए मैं खेद प्रकट करता हूं.

.....4.

04-08-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) I-4

AJIT/ AKN/ ST/ पूर्वी श्री.भोगले.... 11:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा यांनी येथे कामकाज सल्लागार समितीचा विषय उपस्थित केला. सन्माननीय सदस्यांना भाषण करण्याची संधी मिळाली पाहिजे. कामकाज सल्लागार समितीमध्ये निर्णय झालेला आहे की, अडीच तासाची चर्चा तीन-साडेतीन तास झाली तरी चालेल, परंतु प्रत्येक पक्षाच्या वतीने गट नेता आणि दोन-तीन-चार सदस्य, जसे संख्याबळ असेल त्या प्रमाणे वेळ मिळेल. मग कोणत्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यायची हे त्या त्या पक्षाच्या प्रतोदांनी ठरवावायचे आहे. परंतु काल हा नियम बाजूला ठेवण्यात आला. आम्ही त्यावर काही भाष्य केले नाही. आपण मला सांगावे की, आमच्या बाजूच्या सदस्यांना बोलण्यासाठी किती वेळ मिळाला ? 40 मिनिटांच्यावर आम्ही वेळ घेत नाही. त्याबद्दल आमची तक्रार नाही. आपण जेव्हा नियम सैल करता त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.जमा यांच्या सारख्याला आपल्या भावना व्यक्त कराव्या लागतात. कामकाज सल्लागार समितीमध्ये ठरल्याप्रमाणे कामकाज चालविले पाहिजे. गट नेते आणि दोन तीन सदस्य या प्रमाणे वेळ वाटून घेतला पाहिजे. मग सदस्यांनी देखील त्यांच्या वाट्याला जो काही वेळ येईल त्या वेळेत भाषण पूर्ण केले पाहिजे. काल आपण वेळ वाढवून दिला. आजही तसाच प्रकार झाला. वेळ वाढविल्याबद्दल माझ ी तक्रार नाही. आसनावरील माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी, मी आपला उल्लेख करीत नाही, त्यांनी कोणाला किती वेळ द्यावा या सर्व गोष्टी सांभाळल्या पाहिजेत. सचिवांनी कामकाज सल्लागार समितीमध्ये असे असे ठरले आहे असे माननीय पीठासीन अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले पाहिजे. या ठरावावर प्रत्येकाने दोन मिनिटे, पाच मिनिटे बोलावे असे ठरले होते काय ? आपल्याला बोलण्याची संधी मिळाली याचे समाधान आहे, परंतु त्यामुळे विषयाला न्याय मिळत नाही. तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा यांनी याठिकाणी जो विषय मांडलेला आहे त्याचे नीट पालन झाले पाहिजे. आपण या ठिकाणी जी काही चर्चा करतो त्यामध्ये विचारांचे आदान-प्रदान असते.

**उप सभापती** : मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, आपणास उत्तरासाठी किती वेळ लागेल ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मला 25 ते 30 मिनिटे लागतील.

......5.



**उप सभापती** : सभागृहाची विशेष बैठक सकाळी 10.00 ते 11.30 पर्यंत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.45 वाजता सुरु होणार आहे. तेव्हा मी सभागृहाच्या विशेष बैठकीची वेळ

10 मिनिटे वाढवीत आहे. या वेळेत सन्माननीय सदस्य श्री.एस.क्यू.जमा बोलतील. माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरा दाखल भाषणासाठी माननीय सभापती दिवसभरात जी वेळ ठरवून देतील त्या वेळी त्यांचे भाषण होईल.

यानंतर श्री.सरफरे..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस.क्यू.जमा (महाराष्ट्र विधानसभा व्दारा निर्वाचित) : सभापति महोदय, मैं सिर्फ यह कहना चाहता हूं कि मैं बोलने के लिए समय इसलिए मांग रहा था कि कल जो प्रस्ताव माननीय श्री सुभाष चव्हाण जी ने लाया, कल से मैं सभी सदस्यों के भाषण सुन रहा था. मैं इसलिए समय चाह रहा था क्योंकि मैं उनका अभिनंदन करना चाहता हूं. सभी पक्ष के सभी माननीय सदस्यों ने कल से आज तक बहुत ही सेन्सेटीव विषय पर उन्होंने बहुत अच्छा मार्गदर्शन किया है, बहुत अच्छा भाषण किया है. सभी लोगों ने सामाजिक समता, जो एक गंभीर विषय है, जिसकी बुनियाद आजादी की लड़ाई में शुरु हुई, महात्मा गांधी जी ने शुरु किया और जिसका परिणाम है कि डॉक्टर बाबासाहब आंबेडकर जी ने हमें संविधान दिया. मैं सभी सम्माननीय सदस्यों का अभिनंदन करना चाहता हूं. कल हमारे साथी, सम्माननीय सदस्य श्री राम पंडागळे जी ने और आज सम्माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी साहब ने, सम्माननीय सदस्य श्री उल्हास पवार साहब ने, सम्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते जी ने भी कल बहुत अच्छा भाषण किया. उन्होंने बहुत कुछ बॅलेन्स करने की कोशिश की. मैं सभी सम्माननीय सदस्यों का अभिनंदन करता हूं. जो मुद्दे यहां पर आए और जिसका जिक्र सम्माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी जी ने किया है, हमारे मुस्लिम समाज के पिछड़ों के बारे में जिक्र किया है. उनका समर्थन करते हुए अपनी बात समाप्त करता हूं, जयहिंद.

-------

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : या चर्चेवरील शेवटचे सन्माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांचे शेवटचे भाषण झाल्यानंतर ही चर्चा स्थगित करण्यात येईल.

श्री. भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण साहेबांनी काल एक चांगला प्रस्ताव या सभागृहामध्ये मांडला आहे. त्या प्रस्तावावर कालपासून अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्या मुद्यांची पुनरुक्ती टाळून माझे विचार या ठिकाणी मांडणार आहे. माझा पहिला मुद्दा मांडीत असतांना या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्यांनी ज्या तीव्रतेने आपले मुद्दे मांडले आहेत त्या संदर्भात मी एवढेच म्हणणार आहे की, शासनाने गेल्या साठ वर्षामध्ये मागासवर्गीयांच्या विकासासाठी आणलेल्या अनेक योजनांचे आजपर्यंत कधीही मूल्यमापन झालेले नाही. त्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्या काय, त्या पोहोचण्यामध्ये कोणते अडसर आले, त्यापैकी किती योजना पोहोचल्या आणि न पोहोचलेल्या योजना कोणत्या कारणांनी अडून राहिल्या, पोहोचलेल्या योजनांपैकी किती योजनांचा गैरवापर करण्यात आला याचे कुठेतरी मोजमाप केले गेले पाहिजे.

सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा असा आहे की, शासनाने बदललेल्या परिस्थितीमध्ये पुन्हा नवीन कोणत्या योजना केल्या पाहिजेत या बाबतीत या सभागृहामध्ये जे मागासवर्गीय सदस्य आहेत त्यांच्या मताचा, मनाचा कानोसा घेण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी मला तिसरा मुद्दा असा मांडावयाचा आहे की, मागासवर्गीय समाजामध्ये आपण नेहमी पहातो की, ते ठरावीक मूठभर त्या योजनांचा लाभ घेतात आणि बाकीचे लोक हे आपल्या स्वत:च्या भावंडाना उपाशी ठेवीत असल्याचे पहावयास मिळते. याबाबतीत काही तरी कडक उपाय योजना करण्याची इच्छाशक्ती दाखविली पाहिजे. तसे केले तरच या तीन योजना त्या लोकांपर्यंत पोहोचतील, त्यामधून त्या लोकांचा खऱ्या अर्थाने विकास होईल. त्याचप्रमाणे समाजामध्ये शिकलेला, सवरलेला एक मागासवर्गीयांचा वर्ग तयार होत आहे. त्या वर्गाने शासनाने सामाजिक बांधिलकीतून आपल्याला हे सर्व दिले आहे, त्यामुळे मी एकदा उन्नत झाल्यानंतर , प्रगत झाल्यानंतर मी समाज व्यवस्थेमध्ये सुध्दा सारखाच मिसळलो पाहिजे, सामाजिक बांधिलकीने राहिले पाहिजे हा विचार केला पाहिजे. परंतु आज तो विचार मनात न ठेवता सूडाची भावना मनामध्ये ठेवणारा एक वर्ग तयार होत आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवानराव साळुंखे....

तो वर्ग समाजात निर्माण होणार नाही अशाप्रकारची भूमिका शासनाने स्वीकारुन सामाजिक समरसतेच्या दिशेने पावले टाकण्याची आवश्यकता आहे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

**उप सभापती** : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.45 वाजता भरेल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.34 ते 11.45 पर्यंत स्थगित झाली.)

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापतीस्थानी - माननीय सभापती**

**नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेबाबत**

**सभापती** : माझ्याकडे सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, सर्वश्री.दिवाकर रावते, रामदास कदम व डॉ.नीलम गोऱ्हे यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.

"राज्यातील आदिवासी मुलांसाठी असलेल्या आश्रमशाळा व वस्तीगृहे यासाठी दि.24 मार्च ते 31 मार्च 2011 ह्या एका आठवडयात तब्बल 142 कोटी रुपयांची खरेदी करणे, ह्या खरेदीमध्ये पत्र्यांच्या पाट्या, खेळणी, बिस्कीट,चिक्की तसेच फिनाईल साबण, अन्नधान्य ह्या वस्तूंचा तसेच माहिती पुस्तिका, ध्वनीचित्र मुद्रित साहित्य, सोलर, हिटर, बायोमेट्रीक प्रणाली इत्यादी अनेक वस्तूंचा समावेश असणे, ज्या वस्तूंची खरेदी केली आहे, त्या वस्तूची खरोखर गरज आहे काय याची कोणत्याही अधिकाऱ्यांनी तपासणी न करणे, आदिवासी आश्रमशाळा वसतीगृहात इ.मध्ये टॉयलेटची सोय आहे की नाही याचे सर्वेक्षण न करता फिनायील इ. खरेदी करणे, 1 लाख 69 हजार 317 पत्र्यांच्या पाट्या नक्की कुठे लागल्या. तसेच एवढ्या छोट्या आकाराच्या या पाट्या खरेदी करावयास कोणी संमती दिली याबाबत शंका असणे, सरळ खरेदीला वैतागून आदिवासी राज्यमंत्री ना.राजेंद्र गावित यांनी हे प्रकरण थांबविण्याची किंवा आपले मंत्रीपद बदलण्याची थेट मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी करणे. सदर खरेदीबाबत आदिवासी मुले तसेच त्यांचे पालक यांच्या मध्ये पसरलेला असंतोष, शासनाने यासंबंधात करावयाची कार्यवाही याबाबत सविस्तर चर्चा करण्यासाठी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यात यावा व या विषयावर चर्चा करण्यात यावी." मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना या बाबतीत दोन मिनिटांमध्ये म्हणणे मांडण्यासाठी परवानगी देतो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आम्ही ज्या-ज्यावेळी आदिवासी भागामध्ये फिरतो म्हणजे मग मेळघाट असेल, वाडा-मोखाडा असेल, ठाणे किंवा नाशिक जिल्हा असेल, त्याठिकाणी शासनाने आदिवासी मुलांच्या आयुष्याशी खेळ चालविला आहे आणि याचे ज्वलंत उदाहरण येथे मांडण्यात आलेले आहे. 24 मार्च ते 31 मार्च पर्यंत एकंदर 142 कोटी रुपयांची खरेदी झालेली आहे. वर्षभरामध्ये आदिवासी विभागाकडे करोडो रुपये येत असतात. पण ते खर्च केले जात नाहीत आणि शेवटच्या 7 दिवसामध्ये आदिवासी विभागातर्फे 142 कोटी रुपयांची खरेदी केली जाते. यामध्ये बिस्कीटे आहे, शाळेचे साहित्य आहे.आश्रमशाळेमध्ये टॉयलेट नसले तरी फिनाईल घेतलेले आहे. जर अशा प्रकारची खरेदी होणार असेल तर ही दुर्दैवी बाब आहे. कारण हे साहित्य तेथील

आदिवासीच्या मुलांपर्यंत पोहोचत नाही आणि आदिवासींची मुले कुपोषणामुळे मरत आहेत याबाबत सदनामध्ये देखील चर्चा झालेली आहे. सभागृहामध्ये दोन दिवसापूर्वी देखील चर्चा झालेली आहे, पण तरीदेखील नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना का द्यावा लागली? कारण त्याचे उत्तर मिळाले नाही. या विषयाच्या संबंधात सदनामध्ये चर्चा होणार नसेल तर या आदिवासींना कोण न्याय देणार असा प्रश्न आहे. एका बाजूला आपण मागासवर्गीयांसाठी प्रस्ताव मांडतो आणि दुसऱ्या बाजूला आदिवासीच्या मुलांना या गोष्टी मिळत नाहीत.

सभापती महोदय, या विभागाचे माननीय मंत्री आणि माननीय राज्यमंत्री यांच्यातील भांडण आपल्याला सर्वांना सर्वश्रुत आहे. सभापती महोदय, यासाठी बिगर आदिवासी व्यक्तीला मंत्री बनविले जेणेकरुन आदिवासींसाठी देण्यात येणारा निधी त्यांच्यापर्यंत पोहोचेल. परंतु दुर्दैवाने तसे झाले नाही आणि यांच्याच नातेवाईकांनी कॉन्ट्रॅक्ट घेण्यास सुरुवात केली आहे.म्हणून माझी अशी विनंती आहे की, जर आज आपण मागासवर्गीयांच्या प्रश्नाबाबत चर्चा करणार असलो तरी मागासवर्गीयांमधील एक घटक हा आदिवासी देखील आहे, जो मोठया प्रमाणात महाराष्ट्रात आहे. म्हणून त्यांना जर न्याय द्यावयाचा असेल तर मी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना मांडली आहे जेणेकरुन आजचे सभागृहाचे कामकाज बाजूला सारुन, प्रश्नोत्तराचा तास बाजूला सारुन या प्रस्तावावर चर्चा करण्यात यावी. आम्ही या वेदना कुठे मांडावयाच्या, कोणत्या माध्यमातून मांडावयाच्या हा प्रश्न आहे.सभापती महोदय, याठिकाणी मी जी मागणी केलेली आहे, त्यावर अतिशय सहानुभूतीपूर्वक विचार करावा. कारण माननीय सभापती महोदय, आपण आदिवासींची बाजू घेणारे आहात. म्हणून याबाबतीत विचार करुन माझ्या या भूमिकेला न्याय द्यावा अशी विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी 289 अन्वये आदिवासी विभागामध्ये जो खर्च झालेला आहे, त्याच्या अनुषंगाने प्रश्न मांडलेले आहेत. आज सभागृहापुढे असलेल्या कामकाजाच्या दृष्टीने पाहिले तर या संबंधीचा विषय कामकाज आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेमध्ये नाही. त्या मुळे आजच्या कामकाजामध्ये याला वेगळी प्रॅयॉरिटी देणे शक्य नाही.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ AKN/ KGS/ KTG/ ST/ प्रथम सौ. रणदिवे... 11:50

सभापती.....

पण ही वेदना आदिवासी विभागाची आहे. कोणत्या तरी स्तरावर या बाबतीत चर्चा होणे आवश्यक आहे. दिनांक 12 ऑगस्टपर्यंत हे अधिवेशन असल्यामुळे या वर वेगळी चर्चा देता येईल अशी शक्यता मला वाटत नाही. म्हणून मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी, आदिवासी विकास विभागाच्या मंत्री महोदयांबरोबर चर्चा करावी. सन्माननीय सदस्यांना त्यांच्या व्यथा त्याच्याकडे मांडता येतील. सन्माननीय सदस्यांची तयारी असेल तर ही चर्चा माझ्या दालनामध्ये सुध्दा घेण्याची माझी तयारी आहे. अशा प्रकारे या व्यथा मांडण्याच्या दृष्टीने एक वेगळा मार्ग काढता येईल, असे मला वाटते.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण जो निर्णय दिलेला आहे त्या निर्णयाच्या बाहेर आम्ही जाणार नाही. पण दालनात ज्या चर्चा होतात त्या चर्चांमधून नेहमीच काही निष्पन्न होते असे नाही. म्हणून या सभागृहात ही चर्चा झाली पाहिजे. सताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांचे सुध्दा हेच म्हणणे आहे. हे मत माझ्या एकटयाचे नाही. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांचे जसे मत आहे तसेच सत्ताधारी पक्षातील सदस्यांचे देखील मत आहे. सात दिवसात एवढे पैसे खर्च करण्यात आलेले आहेत ते पैसे कसे खर्च करण्यात आले हे या सभागृहाला समजण्याचा हक्क आहे त्यामुळे सभापती महोदय, कृपा करुन आपण मला एक तासाची नियम 97 अन्वये चर्चा द्यावी अशी मी विनंती करतो.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, महत्वाचा प्रश्न आहे त्यामुळे यावर एक तासाची चर्चा आज, उद्या किंवा सोमवारी केव्हा तरी घ्यावी अशी सभागृहाच्या माध्यमातून मी आपल्याला विनंती करतो.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, आपण ही चर्चा दिल्यास त्याला शासनाची काहीही हरकत नाही. सन्माननीय सदस्यांनी जी इच्छा प्रकट केली आहे, जी भावना प्रकट केली आहे त्यानुसार सभापती महोदय, आपण सूचना केल्याप्रमाणे एक तर दालनामध्ये संबंधित मंत्री महोदयांना मी एक बैठक बोलावण्यास सांगेन अन्यथा या सभागृहात ही चर्चा करण्यास वेळ देण्यात येणार असेल तर ती चर्चा करण्याची शासनाची तयारी आहे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : ठीक आहे. सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या चर्चेला मान्यता दिलेली आहे. मी एक तासाची चर्चा देण्याच्या दृष्टीने जरुर प्रयत्न करीन. लगेच एक-दोन दिवसात ही चर्चा देता येणार नाही पण पुढच्या आठवडयात ही चर्चा कशी देता येईल या दृष्टीने मी निर्णय घेईल.

श्री. दिवाकर रावते (बसून) : सभापती महोदय,मी दिलेली एक चर्चा बाकी आहे.

**सभापती** : होय, ते  माझ्या लक्षात आहे.

---

...3..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**वाढीव तुकड्यांना गेल्या 6-7 वर्षात शासनाने मान्यता न दिल्याबद्दल**

**(1) * 18348 श्री.रामनाथ मोते, श्री.संजय केळकर , श्री.भगवान साळुंखे , श्री.नागो गाणार** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी संख्येनुसार वाढीव तुकड्यांना व नैसर्गिक वाढीच्या तुकडयांना शासनाने गेल्या 6-7 वर्षात मान्यता दिली नसुन हजारो प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाकडे जिल्हा निहाय किती वाढीव तुकड्यांना मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झाले आहेत,

(3) वाढीव तुकडयांना मान्यता न देण्याची कारणे काय आहेत,

(4) वाढीव तुकड्यांना मान्यता देतांना पूर्वलक्षी प्रभावाने मान्यता देण्याचे शासनाचे धोरण आहे काय ?

**प्रा. फौजिया खान**, **श्री.राजेंद्र दर्डा यांच्या करिता** : (1) हे अशंत: खरे आहे.

(2) माध्यमिक विभागाच्या 9200 व आदिवासी उपयोजना क्षेत्रातील 361 तुकडयांचे प्रस्ताव प्राप्त आहेत.

(3) व (4) धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब विचाराधीन आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय,शासनमान्य शाळांमध्ये विद्यार्थी संख्येच्या आधारे तुकडयांना परवानगी दिली जाते. ज्या ठिकाणी विद्यार्थी संख्या वाढते त्या ठिकाणी शासनाच्या प्रचलित नियमानुसार, निकषानुसार वाढीव तुकडयांच्या वर्गांना परवानगी दिली जाते. ही परवानगी दिल्या नंतर इयत्ता पाचवीचा किंवा इयत्ता आठवीचा जो पायाभूत वर्ग आहे त्याच्या पुढच्या वर्षी नैसर्गिक वाढीनुसार इयत्ता नववी व इयत्ता दहावीच्या तुकडया तयार होतात त्या तुकडयांनाही शासनाकडून मान्यता घ्यावी लागते. इंग्रजी माध्यमाच्या तुकडयांना शिक्षण उप संचालक मान्यता देतात तर अन्य तुकडयांना शासन मान्यता देते. या राज्यातील जवळ जवळ 9000 पेक्षा अधिक तुकडयांचे प्रस्ताव शासनस्तरावर आले असताना शासनाने त्यांना मान्यता दिली नाही हे शासनाने उत्तरामध्ये मान्य केले आहे. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, हे प्रस्ताव शासनाकडे केव्हा आले? 6-7 वर्षे हे प्रस्ताव प्रलंबित का ठेवण्यात आले? आता तातडीने पंधरा दिवसाच्या आत, एका महिन्याच्या आत या सर्व प्रस्तावाचा निकाल लावून या सर्व तुकडयांना मान्यता देण्यात येणार आहे काय?

...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18348......

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, यामध्ये दोन भाग आहेत. एक प्राथमिक आणि एक माध्यमिक. सन 2009 ते 2011 या कालावधीत प्राथमिक शाळांच्या नैसर्गिक वाढीच्या अतिरिक्त 150 तुकडयांची मगणी होती, त्याप्रमाणे मान्यता दिलेली आहे. माध्यमिक शाळांच्या बाबतीत ही गोष्ट खरी आहे की, दिनांक 13 ऑगस्ट, 2004 मध्ये 5500 तुकडयांना मान्यता दिली होती पण त्यानंतर शासन मान्यता देऊ शकले नाही. आज एकंदर सर्व शिक्षण विभागाची परिस्थिती बघितली तर आयसोलेशनमध्ये कुठल्याही एका विषयाला आपल्याला हात घालता येत नाही. पट पडताळणी झालेली आहे, प्रस्ताव आलेले आहेत पण राज्यात इतरही अनेक प्रश्न आहेत. त्यामुळे याचा संपूर्ण अभ्यास करुन निर्णय घेणे आवश्यक आहे. कारण अनेक शाळा अशा आहेत की, मग त्या शासकीय शाळा असोत की, खाजगी शाळा असतो या शाळांमध्ये कुठे फक्त 9 किंवा 10 विद्यार्थी आहेत तर कुठे 19 विद्यार्थी आहेत अशी परिस्थिती असेल तर आयसोलेशनमध्ये शासन कुठलाही विषय घेऊ शकत नाही याचे कारण असे की, सर्वांचे फायनान्शियल इम्प्लीकेशन्स असतात. त्यामुळे या बाबतचा सर्वंषक अभ्यास करुन, पट पडताळणी करुन, तुकडीचे निकष पुन्हा निश्चित करुन, ट्रान्स्पोर्टची व्यवस्था करुन, क्लबिंग करता येईल काय या सगळयांचा एकत्रित विचार करण्याचा शासनाचा मानस आहे. त्यानंतर शासन या बाबतीत निश्चितच निर्णय घेईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, दर वर्षी ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवडयामध्ये ही पट पडताळणी संबंध राज्यामध्ये स्पेशल ड्राईव्ह घेऊन केली जाते. तो स्पेशल ड्राईव्ह झाल्यानंतर तुकडयांची निश्चिती केली जाते. दर वर्षी स्पेशल ड्राईव्ह घेऊन संच मान्यता होत त्या अनुषंगानेच ज्या शाळांच्या तुकडया वाढतात, त्या शाळांचेच प्रस्ताव छाननी करुन राज्य शासनाकडे प्राप्त झालेले आहेत, असे आम्हाला वाटते. एकदा छाननी झाल्यानंतर आणि तो प्रस्ताव संचालकांनी शिफारस करुन राज्य शासनाकडे पाठविल्यानंतर शासनाने गेल्या तीन वर्षापासून या राज्यातील एकाही तुकडीला मान्यता दिलेली नाही. आज या तुकडयांवर काम करणारे शिक्षक पगाराशिवाय काम करीत आहेत. म्हणून शासनाने पळवाट काढण्याचे धोरण थांबविले पाहिजे. 9200 तुकडयांना हे अधिवेशन संपण्यापूर्वी तातडीने मान्यता देण्यात येणार आहे काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या तुकडयांना मान्यता दिली पाहिजे ही निश्चितच योग्य आणि खरी गोष्ट आहे पण मी थोडयावेळा पूर्वी सांगितल्याप्रमाणे हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे. लवकरात लवकर या बद्दलचा निर्णय घेण्यात येईल आणि मान्यता देण्यात येईल.



SMT/ AKN/ KGS/ KTG/ ST/ प्रथम सौ. रणदिवे... 11:50

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 18348...

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर दिशाभूल करणारे आहे. सन 2005 साली 5500 हजार तुकडया देण्यात आलेल्या आहेत आणि आज जवळजपास 9200 तुकडया मान्यता प्राप्त आणि निकषात बसणाऱ्या आहेत. त्या संबंधीचे सर्व अहवाल संचालकाकडून आलेले आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, हा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित असल्यामुळे शिक्षक उपाशीपोटी काम करीत आहेत. म्हणून अनुदान देण्याच्या बाबतीतील निर्णय पंधरा दिवसात घेण्यात येईल का ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी व्यक्त केलेल्या भावनेशी आम्ही सगळेच सहमत आहोत. सन 2004 नंतर गेल्या सहा-सात वर्षात अतिरिक्त तुकडया किंवा नैसर्गिक वाढीच्या तुकडया देण्यात आलेल्या नाहीत पण या बद्दलचा जो प्रस्ताव आहे तो शासनाला मार्च, 2011 च्या शेवटी प्राप्त झालेला आहे.

यानंतर श्री. बरवड...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 18348 .... श्री. राजेंद्र दर्डा...

संचालक माध्यमिक आणि उच्च माध्यमिक यांच्या माध्यमातून 25 मार्च, 2011 रोजी हे प्रस्ताव शासनास सादर झालेले आहेत. मात्र त्याच वेळेला मोठ्या प्रमाणावर तक्रारी आहेत की, अनेक ठिकाणी विद्यार्थी नसताना त्या ठिकाणी शिक्षक सुध्दा आहेत. मी आपल्याला नावे देऊ शकेन. त्यामुळे शासनातर्फे जाणीवपूर्वक निर्णय घेण्यात आला आहे की, पुढच्या 15 दिवसाच्या आत या सगळ्या शाळांची एकाच दिवशी पट पडताळणी होईल. त्याच्यातून एकूण विद्यार्थी, उपलब्ध असलेले शिक्षण, अतिरिक्त होणारे शिक्षक आणि या शिक्षकांचे निश्चित समायोजन आणि आवश्यकता असेल तर या समायोजनाशिवाय जितके अतिरिक्त किंवा नैसर्गिक वाढीसाठी लागणारे शिक्षक असतील ते देण्याबाबत शासनाची भूमिका आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांची भूमिका अतिशय स्पष्ट आहे मी त्याचे स्वागत करतो. परंतु गेल्या पाच वर्षामध्ये बंद पडलेल्या तुकड्या किंवा कमी झालेल्या तुकड्यांची संख्या 9 हजार पेक्षा जास्त आहे. अशा तुकड्यांची संख्या जवळपास 15 हजार पेक्षा जास्त आहे. माननीय मंत्री महोदयांनी अशा तुकड्यांची निश्चित संख्या सांगावी. नैसर्गिक वाढीनुसार जी मागणी आहे ती रास्त आहे. जे बोगस वगैरे आहे ती ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील वगैरे भानगड असेल. पण माध्यमिकची मागणी रास्त आहे. या 9 हजार तुकड्या आपल्याला सहज देता येतील. एकही रुपया न मागता, वित्त विभागाकडे न जाता, कोणताही अतिरिक्त शिक्षक न मागता आणि कोणतीही अतिरिक्त तुकडी न मागता बंद पडलेल्या तुकड्यांचे जर नीट समायोजन केले तर ते होऊ शकते. यापूर्वी 2007 ला शासन निर्णय झालेला आहे. फक्त गेल्या चार वर्षात यासंबंधीचा आढावा घेतला गेलेला नाही. यामध्ये आपला दोष नसून ही खात्याची चूक आहे. खात्याची ही चूक दुरुस्त करण्याची जबाबदारी आता आपल्यावर आहे. आपण हे ताबडतोब करणार का ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील साहेब असे म्हणाले की, वित्त विभागाकडे जाण्याची गरज नाही. पण ज्या ठिकाणी पैसे आणि वित्तची आवश्यकता असते त्याबाबतीत वित्त विभागाकडे जावे लागते. सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले त्याबाबत मला कल्पना आहे. आपण सांगितले की, वर्ग बंद झालेले आहेत, तुकड्या बंद झालेल्या

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ AKN/

ता. प्र. क्र. 18348 .... श्री. राजेंद्र दर्डा...

आहेत आणि हे जरी असले तरी मी आपल्याला सांगितल्याप्रमाणे येत्या 15 दिवसाच्या आत म्हणजे 15 ऑगस्ट पर्यंत आम्ही ही पट पडताळणी करणार आहोत. त्याबद्दल शासनाने निर्णय घेतलेला आहे. आपण सांगितल्याप्रमाणे ज्या ठिकाणी पूर्वीच्या तुकड्या बंद पडलेल्या आहेत, या तुकड्या फक्त ग्रामीण भागामध्येच बंद पडलेल्या आहेत अशी परिस्थिती नाही तर शहरी भागामध्ये आणि मुंबई शहरामध्ये सुध्दा मोठ्या प्रमाणावर तुकड्या बंद पडल्याचे दिसेल. या सगळ्यांचा आढावा घेण्यात येईल आणि निश्चितपणे समायोजनाच्या माध्यमातून आणि समायोजन केल्यानंतर सुध्दा आवश्यकता असेल तर नैसर्गिक आणि अतिरिक्त तुकड्यांना मान्यता देण्यात येईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न होता. बोगस विद्यार्थीसंख्या दाखविणे वगैरे बाबी आहेत त्याची शासनाने चौकशी करावी आणि ज्यांना देय्य असेल त्यांनाच मान्यता द्यावी पण ज्यांच्याकडे खरोखरच निकषानुसार 70 पर्यंत एक तुकडी 71 ते 120 पर्यंत दुसरी तुकडी आहे आणि आज काही ठिकाणी 200-200 विद्यार्थी असताना एकच तुकडी आहे. त्या ठिकाणी एका तुकडी ऐवजी तीन तुकड्या होऊ शकतात. त्या ठिकाणी विद्यार्थी संख्या आहे. आपण सांगितले की, मार्चमध्ये आमच्याकडे प्रस्ताव आले. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी सांगितल्याप्रमाणे ऑगस्टमध्ये हे प्रस्ताव शासनाकडे जातात. हे प्रस्ताव 6 वर्षे शासनाकडे का आले नाहीत ? ज्यांनी शासनाकडे प्रस्ताव पाठविले नाहीत अशा संबंधित अधिकाऱ्यांवर आपण काय कारवाई करणार आहात ? ज्या शाळांमध्ये विद्यार्थीसंख्येच्या आधारावर तुकड्या देय आहेत त्यांची आपण तपासणी करावी, पडताळणी करावी, एकदा नव्हे तर दोनदा पडताळणी करावी पण ज्यांना देय्य आहे त्या तुकड्या आपण पडताळणी करुन तातडीने या महिना अखेरपर्यंत देण्याची व्यवस्था करणार आहात का ? माननीय मंत्री महोदयांनी 15 दिवसात पडताळणी करु असे सांगितले. या महिना अखेरपर्यंत तुकड्यांचे आदेश शासन काढणार का ?

श्री. राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सांगितले की, अनेक ठिकाणी एका वर्गात 75 विद्यार्थी आहेत, 80 विद्यार्थी आहेत. निश्चितपणे अशा ठिकाणी अतिरिक्त तुकडीची आवश्यकता आहे या आपल्या मताशी मी सुध्दा सहमत आहे फक्त आपल्याला सांगितल्याप्रमाणे आढावा घेऊन ज्या ठिकाणी असे अतिरिक्त विद्यार्थी आहेत त्या ठिकाणी निश्चितपणे हे काम शासन करील.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पदवीस्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणकशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, शारीरिक शिक्षण यासारख्या वैकल्पिक विषयास**
**अनुदान देण्यास होत असलेला विलंब**

**(2) * 17971 डॉ.रणजित पाटील , श्री.भगवान साळुंखे , श्री.नागो गाणार , श्री.वसंतराव खोटरे , प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.विक्रम काळे , श्री.एम.एम.शेख** : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. 3510/2010 व 2007 च्या याचिका क्रमांक 998 मध्ये दिनांक 18.01.2011 रोजी दिलेल्या निकालानुसार पदवीस्तरावरील अनुदान प्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणक शास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, शारीरिक शिक्षण या सारख्या वैकल्पिक विषयाला अनुदान देण्याबाबत शासनाने 15 दिवसात निर्णय घ्यावा असा निकाल दिला आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, संगणकशास्त्र विज्ञान या विषयास (पदवी स्तरावरील वैकल्पिक/ऐच्छीक) अनुदान देताना शासनाने भेदभाव केल्याप्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे त्वरित कार्यवाही करुन न्याय देण्याबाबतचे निवेदन पदवीधर मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी मा.उच्च व तंत्र शिक्षणमंत्री यांना दिनांक 9 मे, 2011 रोजी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, त्याबाबतचा प्रस्ताव शासनाने मंत्रीमंडळासमोर निर्णयासाठी ठेवला आहे काय,
(4) असल्यास, उपरोक्त बाबतीत घेण्यात आलेल्या निर्णयाचे स्वरुप काय,
(5) नसल्यास, उपरोक्त बाबतीत लागणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे** : (1) होय,
(2) होय,
(3),(4) व (5) येणाऱ्या मंत्रीमंडळ बैठकीमध्ये याबाबत निर्णय अपेक्षित आहे.

सभापती महोदय, छापलेल्या उत्तरामध्ये मला आपल्या अनुमतीने थोडी दुरुस्ती करावयाची आहे. उपप्रश्न क्रमांक (3), (4) व (5) ला "येणाऱ्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये याबाबत निर्णय अपेक्षित आहे" असे उत्तर दिले आहे त्याऐवजी "दिनांक 28.7.2011 रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय झाला. आज कन्फर्मेशन अपेक्षित आहे" असे वाचावे.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, हायकोर्टाच्या निर्देशानुसार निर्णय घेतला त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. कदाचित या प्रश्नाशी संबंधित नसेल पण मी एक प्रश्न विचारु इच्छितो. उच्च शिक्षणामध्ये प्रत्येक तालुक्यामध्ये जे कोर्सेस नाहीत ते त्या ठिकाणी 100 टक्के अनुदानावर सुरु करावेत असा शासनाने खूप दिवसांपूर्वी घेतलेला निर्णय प्रलंबित आहे. त्याबद्दल सुध्दा तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. तो निर्णय शासन घेईल का ?



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ AKN/

ता.प्र.क्र. 17971 .....

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, जो कोर्स नाही त्यासंदर्भातील निर्णय घेण्याच्या संदर्भात अनुदानित वगैरे नाही परंतु या बाबतीत मी सजेशन फॉर ॲक्शन एवढे म्हणेन.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माझी सजेशन नाही. या बाबतीत शासनाचा निर्णय झ ाालेला आहे. या ठिकाणी चुकीचे उत्तर रेकॉर्डवर राहील.

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे.

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या निर्णयाच्या अधीन राहून शासनाने 28.7.2011 रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेतल्याचे सांगितले त्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. जेव्हा या विनाअनुदानित तत्वावरील महाविद्यालयांना मान्यता दिल्या तेव्हापासून अनुदान दिले जाणार आहे की, येथून पुढे दिले जाणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, 1.4.2012 पासून या महाविद्यालयांना 100 टक्के अनुदानावर आणले जाईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. हा प्रश्न 7-8 वेळा सभागृहामध्ये आला. शासनाने कोर्टाच्या निर्णयाच्या अधीन राहून हा निर्णय घेतला. यामध्ये आतापर्यंत किती महाविद्यालये अनुदानित झालेली आहेत आणि कोणत्या सालापासून झालेली आहेत.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, यामध्ये संगणक शास्त्रासाठी 135 महाविद्यालये, इलेक्ट्रॉनिक्स शास्त्रासाठी 8 महाविद्यालये आणि शारीरिक शिक्षणासाठी 19 महाविद्यालये अशा पध्दतीने ही महाविद्यालये 1.4.2012 पासून अनुदानावर आणण्याच्या संदर्भात शासनाने निर्णय घेतलेला आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो की त्यांनी सातत्याने या सभागृहात सकारात्मकच उत्तर दिलेले होते. 2001 पूर्वी जी अनुदानित महाविद्यालये होती त्यामध्ये संगणकशास्त्र विषय, शारीरिक शिक्षण विषय हे विनाअनुदानित तत्वावर दिले होते आणि त्यांना अनुदानावर आणण्याचा निर्णय आपण घेतलेला आहे पण याच

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 17971 .....

महाविद्यालयांमध्ये 2001 पूर्वीपासून काही सामाजिक शास्त्राचे विषय सुध्दा आहेत. उदा. भूगोल, समाजशास्त्र, असे विषय राहिलेले आहेत. अशाच महाविद्यालयातील 2001 पूर्वीचे जे विषय राहिलेले आहे त्या विषयांच्या बाबतीत सुध्दा महाविद्यालयांना याच निर्णयाप्रमाणे शासन अनुदान देणार का ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्रिमंडळामध्ये निर्णय झाला आहे आणि कन्फर्मेशन अपेक्षित आहे अशा प्रकारचे उत्तर सभागृहामध्ये कधी येत नाही. गेले काही दिवस मी पाहतो की, मुख्य सचिवांबरोबर बोलणे चालू आहे अशा पध्दतीचे उत्तर दिले जाते. आपले मंत्री इतके कमकुवत झाले आहेत का की त्यांना कन्फर्मेशनची खात्री नाही. निर्णय झाला आहे की होणार आहे ? शासनाचा निर्णय झाला की नाही या बाबतीत ठोस उत्तर न देता माननीय मंत्री महोदय चाचपडत उत्तर का देत आहेत ? त्यामुळे ही पध्दत बंद करण्यास सांगावे. हे सर्व अधांतरी चालल्यासारखे वाटते.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी 'मंत्रिमंडळाच्या' शब्दाऐवजी 'शासन' असा शब्द वापरणे आवश्यक आहे. तशा पध्दतीने शब्द वापरण्यात येईल.

---

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**रात्रशाळांसाठी शिक्षण सेवक योजना रद्द करणेबाबत**

**(3) * 18474 श्री.कपिल पाटील , श्री.जयंत प्र.पाटील** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिवसाच्या शाळेत प्रदीर्घ अनुभव असलेल्या शिक्षकांना रात्रशाळांमध्ये नेमणूक करताना पुन्हा शिक्षण सेवक योजना लागू करु नये अशी मागणी शिक्षक भारतीने केली होती, हे खरे आहे काय,

(2) तत्कालीन शिक्षण मंत्र्यांनी रात्रशाळेसाठी शिक्षण सेवक योजना रद्द करणेबाबत आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाचे शुध्दीपत्रक न निघण्याबाबतची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1) होय.

(2) होय.

(3) प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न नवीन शिक्षण सेवक नेमले जातात त्यांच्याकरिता नाही. त्यांना शासनाच्या नियमानुसार नेमले जावे, त्याबद्दल माझा आक्षेप नाही. एक शासन निर्णय असा आहे की, ज्यांनी सहाय्यक शिक्षण सेवक म्हणून सेवा केलेली आहे. त्यांना पुन्हा नवीन शाळेत नेमणूक देताना पुन्हा नव्याने सहाय्यक शिक्षण सेवक म्हणून नेमू नये. त्याची अंमलबजावणी होत आहे. परंतु रात्र शाळेच्या बाबतीत ज्यांनी प्रदीर्घ अनुभव दिवसाच्या शाळेत मिळविला आहे, त्यांना अर्धवेळ नोकरीसाठी अर्ज करावा लागतो त्यावेळी चुकीचे इंटरप्रिटिशन केले जाते. ज्याचा उल्लेख जी.आर.मध्ये केलेला नाही. अशा शिक्षकांना शिक्षण सेवक म्हणून नेमले जाते. कारण रात्र शाळेमध्ये अनुभवी शिक्षकांनीच शिकविले पाहिजे असा 40 वर्षांपूर्वी शासनाचा निर्णय झ ालेला आहे. त्यामुळे ही जी विसंगती आहे ती शासन दूर करणार आहे का ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, ही विसंगती दूर करण्यासाठी शासन एक महिन्याच्या आत निर्णय घेईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी रात्र शाळेतील शिक्षण सेवकांच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा त्याच्या इंटरप्रिटिशनचा प्रश्न विचारला आहे. रात्र शाळांचा केवळ हाच प्रश्न नाही तर त्यांच्या अनेक समस्या आहेत. हे प्रश्न वर्षानुवर्षे शासन स्तरावर प्रलंबित आहेत. शासनाने या प्रश्नांसबंधी एक समिती गठित केली होती. त्या समितीचा अहवाल शासनाकडे आलेला आहे, या रात्र शाळांच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी त्या अहवालावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे ?

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

ता.प्र.क्र.18474....

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हा प्रश्न फक्त रात्र शाळांमधील शिक्षकांसंबंधीचा आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नासंबंधी माहिती घेऊन त्यांना कळविण्यात येईल.

श्री.भगवानराव साळुंखे : रात्र शाळांना पूर्ण वेळ शाळांचा दर्जा देण्याचे धोरण आहे काय, वाढते औद्योगिकरण व दारिद्र्य रेषेखालील शिकणारी मुले हे लक्षात घेऊन प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एक रात्र शाळेला मान्यता देण्याचे शासनाचे धोरण आहे का ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, रात्र शाळेला पूर्ण वेळ करता येणार नाही. याचे कारण असे की, रात्र शाळेतील विद्यार्थी आपले दिवसाचे काम संपल्यानंतर रात्री शाळेत शिकण्यासाठी येतात, ही शाळा 3 तासांची असते. बाकी सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे ते सजेशन फॉर ॲक्शन.

-------

3......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर होणेबाबत**

**(4) * 17932 प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे , श्री.एम.एम.शेख , श्री.जयंत प्र.पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.मनीष जैन , ॲड.उषाताई दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.सतीश चव्हाण , श्री.अरुणकाका जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक 13107 ला दिनांक 22 मार्च, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील उच्च माध्यमिक विभागातील शिक्षकांना दिनांक 1 मार्च, 2000 ऐवजी दिनांक 1 जानेवारी, 1996 पासून सुधारित वेतनश्रेणी (5 व्या वेतन आयोगाप्रमाणे) लागू करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे काय,

(3) नसल्यास, उपरोक्त बाबतीत लागणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1) नाही.

(2) नाही.

(3) कार्यवाही सुरु आहे.

प्रा.दिलीपराव सोनावणे : सभापती महोदय, राज्यातील उच्च माध्यमिक शिक्षकांच्या वेतनश्रेणीबाबत जवळपास 10-11 वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित आहे. आपल्या सभागृहात कोणत्या ना कोणत्या आयुधाद्वारे या प्रश्नावर चर्चा झालेली आहे. हा विषय अतिशय साधा आहे. जुन्या वेतन आयोगानुसार कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना 6500 ची वेतनश्रेणी दिली होती ती चुकीची होती. 6500 ऐवजी 7225 अशी वेतनश्रेणी मार्च, 2000 पासून लागू करण्यात आली. मात्र राज्यात सर्व प्रवर्गाला दि.1.6.1996 पासून सुधारित वेतनश्रेण्या लागू झाल्या. म्हणून दि.1.1.96 ते मार्च, 2000 पर्यंतची तफावत दूर करण्यासाठी मी हा प्रश्न विचारलेला आहे. या प्रश्नासंबंधी आपण देखील निर्देश दिले आहेत. माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांनी सुध्दा मध्यस्थी केली होती. परंतु आजही नेहमीप्रमाणे उत्तर देण्यात आलेले आहे की, याबाबत कार्यवाही सुरु आहे. म्हणून हे अधिवेशन संपण्याच्या आत शासनाचा निर्णय होईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, ही मागणी अनेक वर्षांपासून केली जात आहे. त्यासंबंधी अनेक बैठका झालेल्या आहेत. अनेक वेळा हा प्रश्न सभागृहात उपस्थित केलेला आहे. अनेक वेळा याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागामध्ये पाठविण्यात आल्यावर वित्त विभागाने नकारात्मक उत्तर दिलेले आहे. तरीही आपण याबाबत पाठपुरावा करीत आहोत. यानंतरही पुन्हा वित्त

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विभागाकडे पाठपुरावा करण्यात येईल.

श्री.भगवान साळुंखे : मंत्री महोदयांनी आता असे उत्तर दिले आहे की, शालेय शिक्षण विभाग वित्त विभागाकडे पाठपुरावा करीत आहे. आम्ही विलंबाची कारणे प्रश्नात विचारली होती, पण लेखी उत्तरात "कार्यवाही सुरु आहे" असे उत्तर दिलेले आहे. मागील 3 वर्षातील 9 अधिवेशनात शासनाकडून हेच उत्तर दिले जात आहे. ही मागणी शिक्षण खात्याला बरोबर आहे असे वाटत असेल तर वित्त विभागाकडे विचारणा करुन त्याबाबतची घोषणा हे अधिवेशन संपण्यापूर्वी केली जाईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, आपल्याला अशी मर्यादा घालता येणार नाही. हा प्रश्न सुटण्यासाठी विभागाने सकारात्मकच दृष्टीकोन ठेवलेला आहे. फायनान्शिअल इम्प्लिकेशनमध्ये बसत नसेल तर त्यानुसार निर्णय होईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, आजच्या लेखी उत्तरामुळे आपण फार मागे गेलो आहोत. दिनांक 15.4.2010 रोजी माननीय शालेय शिक्षण मंत्री, माननीय वित्त मंत्री, 5-6 आमदार, महासंघाचे प्रतिनिधी यांची एक बैठक झाली. त्या बैठकीत माननीय शिक्षण मंत्र्यांनी असे सांगितले होते की, हा प्रश्न सुटण्यासाठी मी ताबडतोब वित्त मंत्र्यांकडे जाऊन कार्यवाही करीन. हे सांगूनही दीड वर्ष झालेले आहे. वर्षानुवर्ष हा प्रश्न सुरु आहे. उच्च शिक्षण विभागाशी संबंधित असलेला प्रश्न 8 वेळा उपस्थित केला होता. हा प्रश्न देखील 15 वेळा उपस्थित केलेला आहे. म्हणून 15 दिवसाच्या आत निर्णय घेतला जाईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या प्रश्नासंबंधी 15 दिवसाच्या आत निर्णय घेता येणार नाही. यामध्ये बरीच गुंतागुंत आहे.

------

**सभापती** : प्रश्न क्रमांक 19094, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे.

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात. )

सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. मी या प्रश्नावर किमान 4 सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी दिलेली आहे. मी आता पुढील प्रश्नाकडे गेलो आहे.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य सभात्याग करतात. )

5...

**अमरावतीसह राज्यात विशेषत: मोखाडा (जि.ठाणे) येथील लोकचेतना व दीपशिखा प्रशिक्षणाच्या खर्चामध्ये लाखो रुपयांचा झालेला गैरव्यवहार**

**(५) * १९०९४ डॉ.सुधीर तांबे , श्री.राजन तेली , श्री.सुभाष चव्हाण , श्री.जयवंतराव जाधव , श्री.हेमंत टकले , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.अनिल भोसले , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.हुसेन दलवाई , श्री.चरणसिंग सप्रा , श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावतीसह राज्यात सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत शाळांना लागणाऱ्या खरेदीसाठी विशिष्ट संस्थेला कंत्राट दिले असून संबंधित दुकानांमधून दिले जाणारे साहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याच्या तक्रारी शिक्षण परिषदेकडे अनेक शिक्षक संघटनांनी माहे एप्रिल, २०११ च्या पहिल्या आठवड्यात केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) ठाणे जिल्ह्यामध्ये सर्व शिक्षा अभियानांतर्गत घेण्यात आलेल्या लोकचेतना आणि दीपशिखा प्रशिक्षणाच्या खर्चामध्ये लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याच्या तक्रारी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार शाळांना व विद्यार्थ्यांना चांगल्या प्रतीचे साहित्य मिळण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे. सभापती, पंचायत समिती, मोखाडा व इतर पदाधिकारी यांनी यासंदर्भात तक्रारी केलेल्या आहेत.

(३) व (४) निकृष्ट साहित्य किंवा खरेदीतील अनियमितता इत्यादी बाबत ज्या जिल्ह्यांबाबत तक्रारी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, सदर झालेल्या आहेत, त्याठिकाणी तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्यांसंदर्भात प्राप्त तक्रारीमध्ये तथ्य नसल्याचे आढळून आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.सुधीर तांबे : राज्याच्या विविध भागामध्ये सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मोठ्या प्रमाणात शालेय साहित्य खरेदी करण्यात आले आहे. त्याबाबत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. लेखी उत्तरात सदर तक्रारींमध्ये तथ्य असल्याचे मान्य केलेले आहे. सर्व शिक्षा अभियानासाठी मोठ्या प्रमाणावर निधी प्राप्त झाला आहे. परंतु त्याचा विनियोग व्यवस्थित न झाल्यामुळे त्याचा मूळ उद्देश सफल होत नाही. अशा तक्रारी झाल्यामुळे दोषी अधिकाऱ्यांविरुध्द शासन कारवाई करणार आहे काय ?

6....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हा प्रश्न दोन विषयाशी निगडीत आहे. एक म्हणजे सर्व शिक्षा अभियान अंतर्गत अध्ययन समृध्दी कार्यक्रमासाठी खर्च करण्यात आलेल्या निधीशी संबंधित आहे आणि दुसरा विषय म्हणजे मोफत व सक्तीचे शिक्षण अभियान, लोक चेतना अभियान व दीप शिखा यासंबंधीचा आहे. पहिला विषय अमरावती, औरंगाबाद व चंद्रपूर या जिल्ह्यांशी संबंधित आहे. या तीन जिल्ह्यांमध्ये अध्ययन समृध्दी योजनेसाठी जी खरेदीची प्रक्रिया आहे....

यानंतर श्री.खर्चे.....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 19094........ श्रीमती फौजिया खान .....

महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून आलेल्या गाईडलाईन्स नुसार हा निधी शाळा स्तरावर वर्ग करुन त्याच स्तरावर खरेदी करण्यात यावी अशी करणे आवश्यक होते. चंद्रपूर जिल्ह्यात ही प्रक्रिया अवलंबिलेली नाही कारण कोणत्याही प्रकारचे कोटेशन्स वगैरे न मागविता जिल्हा स्तरावरच अशी खरेदी करण्यात आली व यासंबंधीची तक्रार स्वत: सभापतींनीच केली होती. त्या तक्रारीनुसार चौकशी केली असता जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार ही खरेदी झाल्याची माहिती मिळाली. त्यानुसार या प्रकरणाची चौकशी एक महिन्यात आत करण्याचे ठरविले आहे. त्याचबरोबर औरंगाबाद जिल्ह्यात करण्यात आलेल्या खरेदीची चौकशी शिक्षण उप संचालक यांनी केली. वास्तविक ही खरेदी या जिल्ह्यात शाळा स्तरावरच करण्यात आली आहे. पण जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी यासंदर्भात एक बैठक घेऊन त्यात 710 शाळांमध्ये एकाच एजन्सीकडून ती खरेदी केल्याचे निष्पन्न झाले. या 710 शाळांनी जी खरेदी केली आहे त्यांनी प्रॉपर प्रोसिजर फॉलो केली पण त्यांना तोंडी आदेश देण्यात आल्याचे निष्कर्षामध्ये आढळून आले. अमरावती जिल्ह्यातील खरेदीमध्ये काहीच आढळून आलेले नाही. त्यांनी रितसर ठराव घेतला होता. पुढील वेळेस जी खरेदी कंझ्युमर फोरमच्या माध्यमातून करण्यात आली त्यानुसार त्यांना सूचना दिल्या आहेत. ठाणे जिल्ह्यात "लोकचेतना" आणि "दीपशीखा" या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या संदर्भात तक्रारी आल्या होत्या. त्याची चौकशी केली असून त्यामध्ये कसलेही तथ्य आढळून आले नाही.

श्री. जयवंतराव जाधव : महोदय, मंत्री महोदयांना मी विचारु इच्छितो की, सभागृहात सन्माननीय सदस्य जेव्हा आक्रमक होतात तेव्हा त्यात काही तरी तथ्य असते. तसेच ज्या तक्रारी आलेल्या असतात त्या माहिती घेऊनच केलेल्या असतात म्हणूनच असा प्रश्न विचारला जातो व त्याची चौकशी केली जाते असे शासनाकडून सांगण्यात येते. वास्तविक चौकशी करणे म्हणजे त्या चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याला एक प्रकारे "कुरण" आपण उपलब्ध करुन देतो असे म्हटले तर चूक होणार नाही. मी ठामपणे सांगू इच्छितो की, अनेक जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारच्या चौकशा करुन शेवटी त्यांचे निर्दोषत्व सिध्द होत असते. या चौकशांमध्ये सुध्दा दोषी अधिकारी हे निर्दोष सिध्द झाल्याचेच निष्पन्न होईल. या निमित्ताने मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, ठामपणे चौकशी करुन खऱ्या अर्थाने दोषींवर कारवाई होईल असा प्रयत्न शासन करणार आहे काय ?



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 19094........

श्री. राजेंद्र दडा : महोदय, ठाणे जिल्ह्यातील "लोकचेतना" व "दीपशीखा" या दोन प्रशिक्षण कार्यक्रमांचा येथे उल्लेख झाला. त्यासंदर्भात प्रथम दीपशीखा या कार्यक्रमाच्या माध्यमातून 26130 मुलींना प्रशिक्षण दिलेले आहे. लोकचेतना या कार्यक्रमाद्वारे सुध्दा प्रशिक्षणाचे कार्य चालू आहे. मोखाडा तालुक्याबद्दल जी तक्रार करण्यात आली त्याची चौकशी केली असता फक्त जागा बदलण्यात आली व त्यामुळे शिक्षकांना जो त्रास झाला त्याबद्दल फक्त तेथील प्रतिनियुक्त्या रद्द करण्यात आल्या, त्यामुळे कोणावरही कारवाई करण्याची गरज नाही.

श्री. दिवाकर रावते : महोदय, आज पहिल्यांदाच सत्तारुढ पक्षाच्या सदस्याने या प्रश्नाच्या संदर्भात आपला संताप व्यक्त करुन ते सभागृहाबाहेर निघून गेले, याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. या सभागृहात प्रश्नोत्तराचा तास अत्यंत महत्वाचा मानला जातो व पीठासीन अधिकारी म्हणून आपणाकडून देखील प्रामाणिकपणे सदस्यांना संरक्षण दिले जाते. या प्रश्नांच्या माध्यमातून राज्यातील अनेक प्रश्नांना वाचा फुटण्याची शक्यता असते. पण अशा प्रश्नांना मंत्री महोदयांकडून लपवालपवीची उत्तरे देण्यात येतात हे योग्य नाही. पहिल्या प्रश्नात मंत्री महोदयांनी सुधारणा केली कारण धोरणात्मक बाब सांगितली आहे. पण तिसऱ्या व चौथ्या प्रश्नात मंत्री महोदयांनी चौकशी केली पण जागा बदलली व कोणतेही तथ्य आढळून आले नाही असे उत्तर दिले. पण पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात मात्र "अंशत: खरे आहे" असे उत्तर दिले आहे. या अनुषंगाने माझा प्रश्न असा आहे की, अमरावती जिल्ह्यात निकृष्ट दर्जाचे साहित्य खरेदी केले हे खरे आहे काय, या प्रश्नाला शासनाकडून अमुक अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात आली, अशा प्रकारचे उत्तर देण्याची अपेक्षा होती. तसेच पंचायत समिती, मोखाडाकडून तक्रार आल्यानंतर त्याला सुध्दा "अंशत: खरे आहे" असे उत्तर दिले, शासनाकडून हे काय चालू आहे हेच स्पष्ट होत नाही. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना अशा प्रकारची दिशाभूल करणारी उत्तरे देणे हे योग्य नाही. या सदनात जेव्हा तक्रारी केल्या जातात तेव्हा संबंधितांवर कारवाई सुध्दा झाली पाहिजे. मंत्री महोदयांनी सांगितले की, तक्रार अमुक दिवशी आली व त्याची चौकशी करण्यात येईल. पण अधिवेशन संपल्यानंतर अशी कारवाई कधी होते हे यातून स्पष्ट होत नाही व सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना न्याय मिळत नाही.

.....3...



PFK/ पूर्वी श्री. खंदारे .... 12:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सभागृहात सर्वच सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारण्याऐवजी दोन मिनिटांचा वेळ केवळ प्रश्न डेव्हलप करण्यासाठी घेतला तर अन्य सदस्यांवर कदाचित अन्याय होईल. म्हणून माझा नेहमीच असा प्रयत्न राहिला आहे की, दररोज किमान 10 तारांकित प्रश्नावर तरी सभागृहात चर्चा झाली पाहिजे. पण गेल्या पाच-सहा दिवसात मी पाहतो की, सातव्या प्रश्नावरच आपल्याला प्रश्नोत्तराचा तास स्थगित करावा लागतो. कृपया सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, थोडक्यात व स्पेसिफिक प्रश्न विचारावेत.

श्री. राजेंद्र दर्डा : महोदय, प्रश्नाला शासनाकडून दिलेले उत्तर एकदम बरोबर आहे. याचे कारण असे की, अमरावतीच्या प्रश्नामध्ये "निकृष्ट दर्जाचे साहित्य खरेदी केले आहे काय" अशी विचारणा केली म्हणून त्याचे उत्तर "अंशतः खरे आहे" असे द्यावे लागले. ठाणे जिल्ह्याच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला "हे खरे आहे, सभापती, पंचायत समिती, मोखाडा व इतर पदाधिकारी यांनी तक्रारी केलेल्या आहेत" असे उत्तर दिलेले आहे. पण या तक्रारीत कोणतेही तथ्य आढळून आले नाही. एक गोष्ट निश्चितपणे सांगू इच्छितो की, राज्यात कुठेही व कोणताही भ्रष्टाचार झाला तर त्याला शालेय शिक्षण विभाग कधीच पाठीशी घालणार नाही, हे मी स्पष्ट सांगत आहे. अमरावती व चंद्रपूर जिल्ह्यात किंवा औरंगाबाद जिल्ह्यातील तक्रारींमध्ये तथ्य आढळून आले आहे. 15 एप्रिल 2011 रोजी यासंदर्भात माझ्याकडे तक्रार आल्यानंतर त्यासंदर्भात तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांची समिती नियुक्त करण्यात आली होती. त्या समितीने चंद्रपूर जिल्ह्याचा संपूर्ण अभ्यास केला. औरंगाबाद जिल्ह्यात केलेल्या खरेदीची चौकशी विभागीय आयुक्तांनी केली व त्याच पध्दतीने अमरावती जिल्ह्यातील तक्रारींबाबत देखील चौकशी करण्यात आली.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 19094 .....**

श्री. राजेंद्र दर्डा...

या विषयाच्या संदर्भात प्राथमिक अहवाल आल्यामुळे मला असे वाटते की, या तिन्ही ठिकाणी अधिक सखोल चौकशी होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे विभागीय आयुक्तांनी यासंदर्भात संपूर्ण चौकशी करुन त्याचा अहवाल एक महिन्याच्या आत शासनास उपलब्ध करुन द्यावा एवढेच मी या प्रसंगी सांगू इच्छितो.

श्री. जयंत प्र.पाटील :सभापती महोदय, लोक चेतना व दीप शिखा या योजनेत राज्यामध्ये किती जणांना ट्रेनिंग मिळाले व त्यासाठी एकंदर किती रक्कम खर्च झालेली आहे, या योजनेत एकंदर प्रकार किती आहेत ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, दीप शिखा ही योजना राज्यातील 17 जिल्हयांमध्ये व काही महानगरपालिकेतील एकंदर 523 सेंटर्सवर घेण्यात आली होती. 523 सेंटर्सपैकी 448 ग्रामीण व 75 शहरी केंद्रांमध्ये प्रशिक्षणाचा कार्यक्रम घेण्यात आला होता. यामध्ये एकंदर 26,130 मुलींना प्रशिक्षण देण्यात आले होते. लोक चेतना या कार्यक्रमांअर्तगत शालेय व्यवस्थापन समिती तसेच ग्राम शिक्षण समितीच्या 8.52 लक्ष सदस्यांना सदर प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, सर्व शिक्षा अभियानासाठी केंद्र सरकार पैसे पाठवित असते. सर्व शिक्षा अभियानासाठी आपल्या राज्याला किती पैसे मिळाले आहेत? सर्व शिक्षा अभियानांतर्गत खरेदीवर कोणाचा अंकुश असतो ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भातील संपूर्ण माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**रोजगार हमी योजनेअंतर्गत देण्यात येणारे मजुरीचे दर अत्यल्प असल्याने कामाकरिता मजूर मिळत नसल्याबाबत**

**(६) * १८०५५ श्री.मनीष जैन** : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या वतीने मागेल त्याला काम व कामाप्रमाणे दाम ही योजना राबविली जात आहे व या योजनेअंतर्गत अनेक शासकीय कामे केली जातात परंतु शासनाकडून कमी दाम मिळत असल्याने सदर शासकीय कामांसाठी पुरेसे मजूर मिळत नाहीत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सद्य स्थितीतील महागाईची स्थिती पाहता रोजगार हमी योजनेत देण्यात येणारे मजुरीचे दर अत्यल्प असून ते वाढवून द्यावेत अशी वारंवार मागणी होत आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनामार्फत या संदर्भात कोणती ठोस पावले उचलली जाणार आहेत ?

**श्री. गुलाबराव देवकर, डॉ.नितीन राऊत यांच्या करिता :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत प्रथमच केंद्र शासनाने दिनांक १४ जानेवारी, २०११ च्या अधिसूचनेनुसार देशातील विविध राज्ये व केंद्र शासित प्रदेशांसाठी अकुशल कामाच्या मजुरीचा दर निश्चित केला आहे. त्यायोगे महाराष्ट्रासाठी रुपये १२७/- प्रतिदिन इतका मजुरी दर निश्चित करण्यात आला आहे. हा दर दिनांक १४ फेब्रुवारी, २०११ पासून राज्यात लागू करण्यात आला आहे. सदर अकुशल कामाच्या मजुरीचा दर केंद्र शासनाने निर्धारित केला असल्याने राज्य शासनाने स्वतंत्र रित्या मजुरीचा दर निश्चित करण्याचा आता प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. मनिष जैन : सभापती महोदय, मी जो प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाला लेखी उत्तर बरोबर मिळालेले नाही. महाराष्ट्राच्या मजुरांना आपण कन्स्ट्रक्टीव्ह काम देणार आहोत की, नाही. आपल्या मजुरांना केवळ दगड-खडी फोडण्याचीच कामे आपण देणार आहोत काय ? मिनिमम वेजेस ॲक्ट प्रमाणे २४७ रुपये मजुरी दिली गेली पाहिजे. परंतु आपण केवळ १२७ रुपयेच मजुरी देत आहेत. त्यामुळे १२७ रुपयांच्या मजुरीच्या दरात आपण काही वाढ करणार आहोत काय ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना ही केंद्र सरकारची योजना आहे. आपल्या राज्यात केवळ एमआरईजीएसचीच योजना सुरु आहे. आपली रोजगार हमी योजना आता बंद आहे. एमआरईजीएसमधील कामावर जे मजूर काम करतात त्यांना दर दिवसाला १२७ रुपये या प्रमाणे मजुरी दिली जाते. यामध्ये सर्व प्रकारची कामे करुन घेतली जातात. एमआरईजीएस मधील मजुराने जर १२७ रुपयांपेक्षा अधिक काम केले तर वरील रक्कम राज्य सरकार देत असते.

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: १८०५५ .....**

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, सरकारी सेवेतील चतुर्थ श्रेणी कामगारांना कमीतकमी ५ ते ६ हजार रुपये दर महिन्याला पगार मिळत असतो. परंतु शेतीमधील मजुर उन्हामध्ये ८ तास राबून, घाम गाळून काम करतो त्याला केवळ १२७ रुपये रोज दिला जातो. उन्हामध्ये माती खणण्यासाठी किती कॅलरीज खर्च होतात व त्या कॅलरीज मिळवण्यासाठी मजुराला किती रुपयाचे अन्न खावे लागते? याचा आपण काही अभ्यास केलेला आहे काय ? सरकारच्या कॉस्ट इंडेक्स प्रमाणे मजुराला एका दिवसाला २८० रुपये मजुरी मिळाली पाहिजे. १९७२ मध्ये गावामध्ये मजुराला २.५ रुपये रोज मिळत होता परंतु त्यावेळेस २०० रुपये तोळे सोने होते. आता २४ हजार रुपये तोळा असा सोन्याचा दर असल्यामुळे मजुराला किती रुपये मजुरी मिळाली पाहिजे ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, कॅलरीज वगैरे सर्व गोष्टीचा विचार करुन केंद्र सरकारने ....

**सभापती :** सन्माननीय राज्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आपल्याला समजला नसेल तर सदर प्रश्न आपण त्यांना पुन्हा विचारण्यास सांगू शकता. परंतु सन्माननीय सदस्यांनी जर योग्य प्रश्न विचारला असेल तर त्या प्रश्नाचे उत्तर आपल्याला द्यावेच लागेल. या ठिकाणी आपण रोजगार हमी योजनेतील मजुरांना किती मजुरी मिळते याची माहिती दिलेली आहे तसेच मिनिमम वेजेस ॲक्ट नुसार किमान मजुरीचा दर सांगितलेला आहे त्यामुळे यामध्ये फरक का आहे ? असा त्यांचा पहिला प्रश्न आहे. १९७२ मध्ये मजुरी २.५ रुपये व सोने २०० रुपये तोळा होता परंतु आता सोने २४ हजार रुपये तोळा आहे त्यामुळे त्या प्रमाणात मजुरी किती मिळाली आहे का ? असा सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी प्रश्न विचारलेला आहे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी विचारलेला प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. १९७२ मध्ये २.५ रुपये मजुरी होती व त्यावेळेस सोन्याचा दर २०० रुपये तोळा होता परंतु आता सोन्याचा दर २४ हजार रुपये तोळा असल्यामुळे आता रोजंदारी किती मिळाली पाहिजे यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी जे गणित मांडलेले आहे त्याबाबत शासनाला अभ्यास करुन रोजगार किती द्यावा ते ठरवावे लागेल.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: १८०५५ .....**

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, अकुशल कामाच्या मजुरीचा दर केंद्र शासनाने निर्धारित केल्यामुळे राज्य शासनाने स्वतंत्ररित्या मजुरीचा दर निश्चित करण्याचा आता प्रश्न उद्‌भवत नाही असे म्हटलेले आहे. रोजगार हमी योजना या राज्यात प्रथम सुरु झाली व त्यानंतर ही योजना संपूर्ण राज्यात सुरु झालेली आहे. रोजगार हमी योजना समितीमध्ये मी स्वत: काम केलेले असल्यामुळे रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचार आपल्याला प्रथम निपटून काढावा लागेल. सर्वच जिल्हयांमध्ये रोजगार हमी योजनेची कामे सुरु नाहीत. सर्व जिल्हयात रोजगार हमी योजनेची कामे सुरु व्हावीत यासाठी आपण समतोल साधणार आहोत काय ? मागच्या वर्षी सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये शून्य टक्के रोजगार हमी योजना राबविण्यात आली होती. रोजगार हमी योजनेत मिळत असलेल्या १२७ रुपयाच्या दरामध्ये आपण वाढ करणार आहात काय ? सन्माननीय सदस्यांनी सोन्याचा आणि मजुरीचा दर सांगितला आहे त्याचा अभ्यास आपण जरुर करा परंतु रोजगार हमी योजना काही ठरावीक जिल्हयांपुरती मर्यादित न ठेवता सर्व जिल्हयांसाठी सुरु केली जाणार आहे काय ? सरकारी धोरणातील राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या निर्णयातील तफावत दूर केली तरच भ्रष्टाचार दूर होईल त्यामुळे रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचार दूर केला जाणार आहे काय ?

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी जो शेवटचा प्रश्न विचारला आहे त्याला "होय" असे उत्तर आहे. १९७२ च्या दुष्काळामध्ये महाराष्ट्रात रोजगार हमी योजना सुरु करण्यात आली होती. खरे म्हणजे दुष्काळी परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी महाराष्ट्रात ही योजना सुरु करण्यात आली होती. राज्यामध्ये रोजगार हमी योजना राबवित असतांना अनेक जिल्हयामध्ये मजूर मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात रोजगार हमी योजनेसाठी एकही मजूर मिळत नाही. सिंधुदुर्ग जिल्हयातील रोजगार हमी योजनेसाठी कामे राखून ठेवूनही मजूर नसल्यामुळे कामे होत नाहीत. राज्य सरकार दर वर्षी रोजगार हमी योजनेसाठी हजारो कामे राखून ठेवत असते. प्रत्येक जिल्हयात रोजगार हमी योजनेतील कामांची संख्या वेगळी असते. विदर्भ, मराठवाड्यात रोजगार हमी योजनेसाठी मजूर

...५..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: १८०५५ .....**

श्री. नारायण राणे ....

मोठया प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे त्या ठिकाणी रोजगार हमी योजनेची कामे मोठया प्रमाणात होत असतात. परंतु कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात रोजगार हमी योजनेवर काम करणा-या मजुरांची संख्या फार कमी प्रमाणात आहे. पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी तालुक्यात रोजगार हमी योजनेच्या कामांवर रोजगार उपलब्ध होत असतो. रोजगार हमी योजनेत सर्व जिल्हयात समान कामे देणे हे सरकारच्या हातामध्ये नसते. मागेल त्याला काम देणे...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18055..... श्री.नारायण राणे.....

हा कायद्याचा एक भाग आहे. त्यामुळे मागेल त्याला काम देण्याची जबाबदारी सरकारने स्वीकारली आहे. रोजगार हमी योजनेच्या दराबद्दल शासन विचार करेल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले की, राज्य सरकारची रोजगार हमी योजना सुरु नाही. राष्ट्रीय रोजगार हमी योजना सुरु आहे. हे अतिशय महत्वाचे विधान करीत असताना राज्याची योजना बंद करण्याचा निर्णय कधी घेण्यात आला आणि का घेतला याचा मंत्री महोदय खुलासा करतील काय? राज्याच्या रोजगार हमी योजनेसाठी जनतेकडून व्यवसाय कर वसूल केला जातो तो कर वसूल करणे बंद करण्यात येईल काय?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, राज्य सरकारच्या योजनेतील कोणतीही कामे सुरु नाहीत. दिनांक 1.4.2008 पासून सर्व जिल्हयांमध्ये केंद्र सरकारच्या योजनेतील कामे सुरु असून इतर सर्व कामे बंद आहेत. राज्य सरकारची रोजगार हमी योजना बंद केल्याचे जाहीर केलेले नाही, परंतु त्या योजनेतील कोणतीही कामे सुरु नाहीत.

श्री.दिवाकर रावते : व्यवसाय कर वसूल केला जात आहे तो बंद करण्यात येईल काय?

श्री.नारायण राणे : राज्याची रोजगार हमी योजना बंद केलेली नाही. केंद्र सरकारची योजना त्याच धर्तीवर सुरु आहे. केंद्राच्या योजनेला प्राधान्य देण्यामागे हा हेतू आहे की, केंद्र सरकारचा जास्तीत जास्त निधी राज्याला मिळावा आणि जास्तीत जास्त विकासाची कामे व्हावीत. म्हणून पहिले प्राधान्य त्या योजनेला दिले आहे. राज्याच्या रोजगार हमी योजनेंतर्गत जी कामे घेतली जातात त्या कामांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न सुरु आहे. कोणतीही योजना बंद केलेली नाही.

**सभापती** : मी आता पुढील प्रश्न पुकारीत आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्यासाठी उभे असतात)

**सभापती** : रोजगार हमी योजनेच्या अनुषंगाने प्रश्न विचारण्यास शक्य तेवढी संधी मी सन्माननीय सदस्यांना दिलेली आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्याचा आग्रह धरीत असतात)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर बसावे. या सभागृहात बसलेले प्रत्येक माननीय सदस्य शेतीशी संबंधित आहेत. माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांना मी सांगू.....

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

इच्छितो की, या सभागृहात जोराने बोलले म्हणजे आपण शेतकरी आहोत हे सिध्द होते असे नाही. मी माननीय सदस्य श्री.मनिष जैन याना शेवटची संधी देत आहे. माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.मनिष जैन : सभापती महोदय, मी आपला अतिशय आभारी आहे. आपण माननीय राज्यमंत्री महोदयांना समज द्यावी. त्यांनी अभ्यासपूर्ण निर्णय सभागृहात जाहीर करावा. ते सभागृहाची दिशाभूल करीत आहेत.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर बसावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहाचा आखाडा करावयाचा असेल तर आम्ही तयार आहोत. सत्ताधारी पक्षाकडून दादागिरीची भाषा का केली जात आहे?

श्री.किरण पावसकर : सगळे मंत्री महोदय अभ्यास करुन सभागृहात येत असतात, त्यामुळे त्यांना अभ्यास करण्यास सांगण्याची आवश्यकता नाही.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर बसावे. माननीय सदस्य श्री.मनिष जैन यांना मी सांगू इच्छितो की, ते तरुण आहेत, त्यांच्यावर अन्याय झाल्यासारखे मला वाटले म्हणून मी त्यांना प्रश्न विचारण्याची संधी दिली. आपल्याकडून राज्याची रोजगार हमी योजना किंवा राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या दृष्टीने प्रश्न विचारणे अपेक्षित होते. परंतु मंत्री महोदयांच्या अनुषंगाने अशा पध्दतीने वक्तव्य करणे योग्य नाही. ते आक्षेपार्ह वाक्य रेकॉर्डवरुन वगळण्यात येईल.

श्री.मनिष जैन : सभापती महोदय, व्यवसाय कराबद्दल मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो. राज्याची रोजगार हमी योजनेची कामे बंद असतील तर व्यापाऱ्यांना व्यवसाय कर का भरावा लागतो? मंत्री महोदयांनी राज्याची योजना सुरु नाही असे सांगितले. सरकार या संदर्भात भूमिका स्पष्ट करणार आहे का?

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी व्यवसाय कराबद्दल उल्लेख केलेला आहे. राज्याची रोजगार हमी योजना सुरु आहे.

-------

..3..



**राज्यात सर्व प्रकारच्या नवीन शाळांना मान्यता देण्याबाबत**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(७) * १७७५७ श्री.भगवान साळुंखे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.नागो गाणार , श्री.रामनाथ मोते , श्री.कपिल पाटील , श्री.जयंत प्र.पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.संजय केळकर , श्री.एम.एम.शेख , डॉ.दीपक सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक १३७८३ ला दिनांक २९ मार्च, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २० जुलै, २००९ च्या शासन निर्णयाने राज्यात सर्व प्रकारच्या नवीन शाळांना मान्यता देण्याबाबत बृहत आराखडा तयार करण्याचे आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) तसेच नवीन शाळा व वाढीव तुकड्यांसंदर्भात बृहत आराखडा मंजुरीसाठी कोणती कार्यवाही केली आहे,
(३) असल्यास, नवीन मराठी माध्यमिक शाळांचा बृहत आराखडा शासनाने पूर्ण केला आहे काय,
(४) असल्यास, सन २०११-२०१२ च्या शैक्षणिक वर्षापासून किती व कोणत्या प्रकारच्या नवीन शाळांना मान्यता देण्यात आल्या आहेत,
(५) राज्यातील लाखो विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होऊ नयेत यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(६) केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता :** (१) होय.
(२) व (३) दिनांक ११/०७/२०११ रोजी बृहत आराखडा प्रसिध्द केला आहे.
(४) नाही.
(५) व (६) १६ जुलै, २००९ रोजी मंत्रिमंडळात झालेल्या निर्णयानुसार नवीन प्राथमिक व माध्यमिक शाळा परवानगी संदर्भात तज्ज्ञांच्या मदतीने बृहत आराखडा तयार करावयाचा होता. बृहत आराखडा, शाळेची गरज व शाळा परवानगी संदर्भात धोरण लक्षात घेवून मंत्रीमंडळ उपसमिती नवीन शाळा परवानगी संदर्भात निर्णय घेईल. त्यानुषंगाने बृहत आराखडा हरकती मागविण्यासाठी जाहीर केलेला आहे.

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, नवीन शाळांना मान्यता देण्याबाबत केवळ मराठी माध्यमांच्या शाळांचा बृहत आराखडा शासनाने तयार केला आहे. परंतु मराठी माध्यम वगळता सीबीएसई, आयसीएसई आणि इतर सर्व प्रकारच्या अन्य माध्यमांच्या शाळांबाबत बृहत आराखडा सरकार घोषित करणार आहे का?

प्रा.फौजिया खान : शासनाने जो उपक्रम केलेला आहे तो सभागृहाला सांगणे गरजेचे आहे. जीआयएस मॅपिंग, फिजिकल व्हेरिफिकेशन करुन पब्लिकसाठी वेब साईटवर बृहत आराखडा खुला केलेला आहे. जनतेकडून सूचना व हरकती मागविण्यात आल्या आहेत. मराठी माध्यमाच्या शाळांबाबत हा बृहत आराखडा तयार केलेला आहे. इंग्रजी माध्यमांच्या शाळांबद्दल सध्या बृहत आराखडा तयार केलेला नाही. सेल्फ फायनान्स स्कूलसाठी शासन एक विधेयक आणणार आहे.

..4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ज्या लोकांना स्वत:चा निधी खर्च करुन शाळा सुरु करावयाची आहे, त्यांच्यासाठी लवकरच एक विधेयक सभागृहात मांडले जाणार आहे.  सीबीएसई, आयसीएसई वा इतर कोणतेही बोर्ड असेल, त्या अंतर्गत ज्यांना स्वत:चा निधी खर्च करुन शाळा सुरु करण्याची इच्छा असेल तर ते राज्यात कुठेही शाळा सुरु करु शकतात, अशा प्रकारचे विधेयक आणले जाणार आहे.

श्री.एम.एम.शेख : सभापती महोदय, शासनाने जो बृहत आराखडा जाहीर केला आहे तो अंतिमत: मंजूर केलेला आहे की पूर्णत: मंजूर केलेला आहे? या आराखड्यानुसार येत्या शैक्षणिक वर्षापासून नवीन शाळांना मान्यता दिली जाईल काय?

प्रा.फौजिया खान : बृहत आराखडा वेब साईटवर खुला करण्यात आला असून जनतेकडून सूचना व हरकती प्राप्त झाल्यानंतर त्यांचा अभ्यास करुन मंत्रिमंडळासमोर निर्णय घेण्यात येईल आणि त्यानंतर परवानगी देण्यात येणार आहे.

नंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17757...

श्री.चंद्रकात पाटील : सभापती महोदय, ज्या नवीन शाळा होतील त्या अनुदानित की विना अनुदानित असणार आहेत ? जर शाळा विनाअनुदानित असतील तर त्या शाळांतील शिक्षकांना इतर शाळांतील शिक्षकां प्रमाणे पगार दिला पाहिजे, असे संस्था चालकांकडून हमीपत्र शासन घेणार आहे काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सध्या जाहीर करण्यात आलेला बृहत आराखडा ग्रामीण भागासाठी आहे. हा बृहत आराखडा जाहीर झाल्यानंतर त्याला काही आक्षेप येतील किंवा त्या मध्ये त्रुटी असतील त्या दूर करुन त्यास अंतिम स्वरुप देण्यात येईल. या शाळा अनुदानित असतील की विना अनुदानित असतील असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला. त्याबाबत सांगू इच्छितो की, राईट टू एज्युकेशन ॲक्ट प्रमाणे प्राथमिक शाळेसाठी 1 कि.मी., उच्च प्राथमिकसाठी 3 कि.मी. आणि माध्यमिक शिक्षणासाठी 5 कि.मी. अशी परिसीमा ठरविलेली आहे. ज्या ठिकाणी दोन हजार लोकवस्ती असेल आणि वर सांगितलेल्या कि.मी.मध्ये शाळा उपलब्ध नसतील तर त्या ठिकाणी प्राधान्याने अनुदानित शाळा काढण्यास परवानगी देणार आहोत. परंतु बृहत आराखड्यानुसार जाहिरात देऊन अनुदानित शाळा देण्यात येतील.

**सभापती** : आज सकाळी सभागृह सुरु झाल्यावर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी नियम 289 अन्वये मुद्दा उपस्थित केला होता. त्या मध्ये प्रश्नोत्तराच्या तासातील सहा मिनिटे गेली. त्या मुळे मी प्रश्नोत्तरासाठी सहा मिनिटे वाढवून दिली आहेत.

आता प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे

श्री.चंद्रकात पाटील (समिती सदस्य ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 5 ऑगस्ट, 2011 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणा-या अशासकीय विधेयकांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 4 ऑगस्ट, 2011 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. अशासकीय विधेयकांना खालील प्रमाणे वेळ देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

**अशासकीय विधेयके पुर:स्थापनार्थ-**

1. सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 8- महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक 2011, श्री.दिवाकर रावते वि.प.स. - 10 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2. सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 9 - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (सुधारणा) विधेयक, 2011, श्री.विजय सावंत, वि.प.स. - 10 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

**अशासकीय विधेयके विचारार्थ -**

1. सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 3 - महाराष्ट्र इमारत बांधकाम व्यवसायातील कामगार (नोकरीचे नियमन व कल्याण) विधेयक, 2011- श्री.किरण पावसकर, वि.प.स. - 60 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2. सन 2011 चे वि.प.वि.क्रमांक 4 - बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2011 - श्री.विनोद तावडे व इतर वि.प.स.- 70 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

**सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री.चंद्रकात पाटील : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

------

04-08-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) R-3
AJIT/ पूर्वी श्री.भोगले. 12:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र भूविकास महामंडळ, पुणे यांचे सन 2003-2004 ते 2005-2006 या वर्षांचे वार्षिक लेखा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

-----

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचा सन 2002-2003, 2003-2004, 2004-2005, 2005-2006, 2006-2007, 2007-2008 व 2008-2009 या वर्षांचा अलग लेखा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अलग लेखा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहेत.

-----

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण मुंबई यांचा सन 2009-2010 या वर्षाचा अलग लेखा परीक्षा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : अलग लेखा परीक्षा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

----

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय,मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन 2009-2010 या वर्षाचा वार्षिक लेखा परीक्षा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखा परीक्षा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

----

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके (वस्त्रोद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन 2009-2010 या एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

-----

..5..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ प्रोसिजरबाबत**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा पॉईट ऑफ प्रोसिजर आहे. आपण आजची कामकाजपत्रिका पाहिल्यास नियम 260 अन्वये सत्ताधारी पक्षाकडील प्रस्ताव पहिल्या क्रमांकावर तर विरोधी पक्षाकडील प्रस्ताव दुसऱ्या क्रमांकावर दाखविण्यात आलेला आहे. खरे म्हणजे आज विरोधी पक्षाच्या कामकाजाचा दिवस आहे. तेव्हा आमचा प्रस्ताव पहिल्या क्रमांकावर असावयास पाहिजे होता. परंतु दिनांक 3 ऑगस्ट 2011 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविलेला सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव पहिल्या क्रमांकावर दाखविलेला आहे. हा प्रस्ताव आपण नंतर घ्यावा अशी माझी विनंती आहे. विरोधी पक्षाच्या कामकाजाचा दिवस असेल तर विरोधी पक्षाच्या कामकाजाला प्राधान्य दिले पाहिजे असे मला वाटते. राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्ना संबंधी आमचा प्रस्ताव आहे. हा महत्वाचा प्रस्ताव आहे. तेव्हा माझी आपणास विनंती आहे की, आपण प्रथम विरोधी पक्षाचा प्रस्ताव चर्चेला घ्यावा. त्यानंतर उरलेल्या वेळेत कालचा राहिलेला प्रस्ताव घ्यावा.

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी जो मुद्दा मांडला त्या बाबत मी सांगू इच्छितो की, अधिवेशन सुरु झाल्यापासून कामकाज पत्रिकेत दर्शविलेले कामकाज पहिल्या दोन-तीन दिवसांमध्ये पूर्ण करता आलेले नाही. मंगळवारी सत्ताधारी पक्षाकडील प्रस्ताव तर गुरुवारी विरोधी पक्षाकडील प्रस्ताव आपण चर्चेला घेतो. मंगळवारी आणि गुरुवारी असणारे प्रस्ताव आपण प्राधान्याने घेण्याचा प्रयत्न करतो. आपल्याकडील प्रस्ताव लॅप्स होत नाहीत. आपण असे केले तर ते अन्याय केल्यासारखे होईल. आपण या पूर्वी जे प्रस्ताव दिले होते त्या संदर्भात माझ्या दालनात देखील चर्चा झाली होती. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रस्ताव अगोदर चर्चेला घेण्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेते आणि गट नेते श्री.दिवाकर रावते यांनी माझ्या दालनात चर्चा केली. त्या वेळी मी सन्माननीय सदस्य सर्वश्री सुभाष चव्हाण आणि विनायक मेटे यांना बोलावून सांगितले की, सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव पहिला असला तरी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी त्यांचा प्रस्ताव अगोदर घेण्याची विनंती केलेली आहे. तेव्हा सन्माननीय सदस्य सर्वश्री सुभाष चव्हाण आणि विनायक मेटे यांनी त्यांची विनंती मान्य केली. त्या प्रमाणे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**......

दुसऱ्या दिवशी कायदा आणि सुव्यवस्थेवरील प्रस्तावावर आपण प्रथम चर्चा केली. त्या दिवशी असे ठरले होते की, प्रथम कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रस्तावावर चर्चा करायची त्या नंतर आजचा जो प्रस्ताव आहे त्या वर चर्चा करायची. त्या प्रस्तावा वरील चर्चा त्याच दिवशी पूर्ण होणार नव्हती म्हणून आपण आज माननीय मंत्री महोदयांचे उत्तर ठेवले आहे. आज सत्ताधारी पक्षाकडून भ्रूण हत्येच्या संदर्भातील प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. हा प्रस्ताव दिनांक 3 ऑगस्ट 2011 रोजीच्या कामकाजात दाखविलेला होता आणि आज गुरुवार असल्यामुळे नियमाप्रमाणे विरोधी पक्षाकडील देखील प्रस्ताव चर्चेला आहे, अशी वस्तुस्थिती आहे. कोणता प्रस्ताव प्रथम घ्यावा या संदर्भात सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांनी चर्चा करुन निर्णय घेतला तर त्यास माझी काही हरकत नाही. माझे म्हणणे आहे की, हे दोन्ही प्रस्ताव महत्वाचे आहेत आणि या दोन्ही प्रस्तावांवर चर्चा झाली पाहिजे.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सकाळच्या सत्रामधील प्रस्तावावरील सन्माननीय सामाजिक न्यायमंत्र्यांचे उत्तराचे भाषण व्हावयाचे आहे. त्याकरिता आपण मंत्रीमहोदयांना अर्धा तास दिल्यास त्यांचे उत्तराचे भाषण पूर्ण होईल.

**सभापती** : लक्षवेधी सूचना संपल्यानंतर सकाळच्या सत्रातील सन्माननीय सामाजिक न्यायमंत्र्यांचे प्रस्तावावरील उत्तराचे भाषण सुरु होईल व ते अर्ध्या तासात पूर्ण होईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, आपण मघाशी म्हणाल्याप्रमाणे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांचा आजचा शेतकऱ्यांचा नियम 260 अन्वये प्रस्ताव देखील महत्वाचा आहे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्रामध्ये स्त्रीभ्रूण हत्त्या होत आहेत, त्यामुळे मुलींचे प्रमाण घटत चालले आहे या दृष्टीने त्या विषयावरील प्रस्ताव देखील तितकाच महत्वाचा आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते व गटनेते यांच्याबरोबर चर्चा झाल्यानंतर आपण कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावाला प्राधान्य दिले. त्याप्रमाणे या सभागृहामध्ये प्रथम त्या विषयावरील चर्चा घडवून आणली. माझी आपणास विनंती आहे की, स्त्रीभ्रूण हत्त्येच्या संदर्भातील प्रस्ताव गेल्या दोन-तीन दिवसापासून कामकाजाच्या क्रमामध्ये दाखविण्यात येत असून देखील त्यावर चर्चा सुरु होत नाही म्हणून त्या प्रस्तावावर प्राधान्याने प्रथम चर्चा व्हावी.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, स्त्रीभ्रूण हत्त्येच्या संदर्भातील प्रस्ताव महत्वाचा आहे याबद्दल कुणाचेही दुमत नाही. परंतु आज विरोधी पक्षाचा दिवस असल्यामुळे आणि शेतकऱ्यांचा अत्यंत महत्वाचा विषय असल्यामुळे त्या प्रस्तावाला प्राधान्य देऊन आपण प्रथम चर्चा सुरु केली तर योग्य होईल त्यादृष्टीने आपण निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : मी मघाशी आपणास सांगितले आहे की, कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावावर चर्चा होती त्या वेळी सन्माननीय विरोधी पक्षनेते व गट नेते यांनी माझ्या नजरेला ती बाब आणली. त्या नंतर मी सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण व सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांना बोलाविले आणि सांगितले की, या संदर्भात आपण सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांबरोबर चर्चा करावी. त्या प्रमाणे त्यांनी एकत्रितपणे चर्चा करुन दुसऱ्या दिवशी कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावावर प्रथम चर्चा करण्याचे ठरविले व त्या नंतरच्या प्रस्तावा वरील चर्चा प्रलंबित ठेवण्यात आली ती आज पहिल्या क्रमांकावर दाखविण्यात आली आहे. मला आपणास सांगावयाचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ...

आहे की, ही क्रमवारी पहिल्या दिवसापासूनच बदलली आहे. सुरुवातीचे तीन दिवस पुष्कळसे काम झाले नाही. त्या व्यतिरिक्त अन्य महत्वाचे व तातडीचे असलेले काम आपण पूर्ण केले. त्या नंतर तिसऱ्या दिवसापासून आपले कामकाज नियमितपणे सुरु झाले आहे. म्हणून मला सांगावयाचे आहे की, आज गुरुवार असल्यामुळे आजच्या कामकाजाच्या क्रमामध्ये दुसऱ्या क्रमांकावरील विरोधी पक्षाचा प्रस्ताव दाखविण्यात आला असला तरी स्त्रीभ्रूण हत्त्येचा प्रस्ताव प्रलंबित असल्यामुळे तो पहिल्या क्रमांकावर दाखविण्यात आला आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना संपल्यानंतर सकाळच्या सत्रातील प्रस्तावावर सन्माननीय सामाजिक न्यायमंत्री उत्तर देणार आहेत तो प्रस्ताव देखील सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी मांडलेला आहे. त्याचप्रमाणे स्त्रीभ्रूण हत्त्येच्या संदर्भातील पहिल्या क्रमांकावर दाखविण्यात आलेला प्रस्ताव देखील सत्ताधारी पक्षातर्फे मांडला जाणार आहे. याचा अर्थ आज एका दिवसात आपण सत्ताधारी पक्षाचे दोन प्रस्ताव घेत आहोत. मला हे मान्य आहे की, आपण आम्हाला कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावाच्या बाबतीत सहकार्य केले...

**सभापती** : मी आपल्याला नेहमी सहकार्य करीत असतो.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, त्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करतो. आपण आम्हाला न्याय देत आहात त्याबद्दल दुमत नाही. आजही आम्हाला आपणाकडून न्याय मिळावा याकरिता आम्ही विनंती करीत आहोत. आजचा गुरुवार हा आमचा दिवस असतांनाही सत्ताधारी पक्षातर्फे दोन प्रस्ताव होणार आहेत व आमचा प्रस्ताव मागे राहणार आहे एवढेच मी आपल्या निदर्शनास आणीत आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. रामदासजी कदम साहेब मी मघाशी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला आहे. सुरुवातीचे तीन दिवस काही महत्वाच्या विषयावर आपल्याला चर्चा करावी लागल्यामुळे आपले नियमित कामकाज पुढे ढकलावे लागले. हे करीत असतांना नियम 260 अन्वये देण्यात आलेले प्रस्ताव अत्यंत महत्वाचे असल्यामुळे ते लॅप्स करण्यात आलेले नाहीत. नियम 260 अन्वये प्रस्ताव असेल, लक्षवेधी सूचना असेल किंवा अन्य विषय असले तरी मी ते लॅप्स होऊ देत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी आपले एका गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छितो की, आजच्या कामकाजामध्ये दाखविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना आणि नियम 93 अन्वये सूचनेवरील निवेदने यावरील चर्चा उद्या विशेष बैठक घेऊन करण्यात यावी. म्हणजे या चर्चेवरील एक तासाचा वेळ वाचू शकेल. त्यामुळे आमचा विरोधी पक्षाचा प्रस्ताव व सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव अशा दोन्ही प्रस्तावावरील चर्चा मंत्रीमहोदयांच्या उत्तरासहीत संध्याकाळी 7.00 वाजेपर्यंत पूर्ण होईल. हे करीत असतांना या चर्चेमध्ये भाग घेणाऱ्या सन्माननीय सदस्यांनी वेळेची मर्यादा संभाळली तर वेळेमध्ये चर्चा पूर्ण होईल. काल मांडण्यात आलेल्या प्रस्तावाला वेळ होण्याचे कारण म्हणजे तो विषय सामाजिक न्यायाचा होता व त्यावर अनेक सन्माननीय सदस्यांना आपल्या भावना व्यक्त करावयाच्या असल्यामुळे वेळेच्या नियमावर आम्ही बोट ठेवले नाही. त्या प्रस्तावाला आपणही न्याय दिलात त्याबद्दल आपणास धन्यवाद देतो. तसेच, आजच्या कामकाजातील विषय देखील वेगळया अर्थाने महत्वाचे आहेत. पावसाळी अधिवेशन सुरु असून पहिला आठवडा संपला व आता दुसरा आठवडा देखील संपणार आहे. या अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा झाली नाही. फक्त एका प्रश्नावर चर्चा झाली तो प्रश्न आपण 20 मिनिटे चालविला. मला आपल्याला विनंती करावयाची आहे की,उद्या सकाळी 10.00 ते 11..00 या वेळेत विशेष बैठक घेऊन लक्षवेधी सूचना व नियम 93 अन्वये निवेदने यावरील चर्चा घ्यावी. आणि आज पहिल्यांदा आमचा प्रस्ताव घेऊन त्यानंतर सत्ताधारी पक्षाचा प्रस्ताव घेण्यात यावा. ही चर्चा संध्याकाळी 7.00 वाजेपर्यंत पूर्ण होईल.

**सभापती** : त्या करिता संबंधित मंत्रीमहोदयांना तत्काळ सांगावे लागेल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आजच्या दोन्ही महत्वाच्या प्रस्तावांच्या दृष्टीने केलेली सूचना अतिशय महत्वाची आहे. आज सामाजिक न्याय विभागाच्या मंत्रीमहोदयांचे उत्तराचे भाषण सुध्दा होणार आहे हे सर्व कामकाज संध्याकाळी 7 वाजेपर्यंत होऊ शकते. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी केलेल्या सूचनेला आमचे सर्वांचे पूर्ण समर्थन आहे. आजच्या लक्षवेधी सूचना उद्या विशेष बैठक घेऊन चर्चेकरिता घेता येतील व आपण असे अनेक वेळा केले आहे. शेतकऱ्यांचा प्रश्न तितकाच महत्वाचा आहे.

**सभापती** : या ठिकाणी नियम 260 अन्वये दोन प्रस्ताव आहेत त्या पैकी पहिला कोणता प्रस्ताव चर्चेकरिता घ्यावयाचा ते सांगा.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, स्त्रीभ्रूण हत्त्येच्या संदर्भातील चर्चा पहिल्यांदा घेतली पाहिजे. याचे कारण ही चर्चा प्रलंबित राहिलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, काल सत्ताधारी पक्षाचा वार असल्यामुळे काल त्यांचा प्रस्ताव घेतला त्यावरील चर्चा आजही सुरु आहे. आज विरोधी पक्षाचा वार असल्यामुळे आमचा प्रस्ताव पहिल्यांदा चर्चेकरिता घेण्यात यावा आणि त्यानंतर स्त्रीभ्रूण हत्येचा दुसरा प्रस्ताव देखील आजच घेण्यात यावा.

श्री. भाई जगताप : हा नवीन प्रस्ताव नाही. तो यापूर्वी झालेला नाही म्हणून पुढे पुढे सरकत आज आलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सभापतींनी तो लॅप्स केलेला नाही.

श्री. भाई जगताप : सभापती महोदयांनी सभागृहाचे कोणतेही कामकाज लॅप्स केले नाही.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, आजच्या कामकाजामध्ये दाखविण्यात आलेली विधेयके देखील चर्चेकरिता घेण्यात यावीत अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी जी पध्दत ठरविण्यात आली आहे, त्यामध्ये सर्वांच्या संमतीने आपण बदल करीत असतो. त्यावेळी प्रथेप्रमाणे ठरविण्यात आलेल्या कामकाजामध्ये बदल करीत असतांना दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्य एकत्रित चर्चा करुन निर्णय घेत असतो. त्याप्रमाणे कायदा व सुव्यवस्थेचा प्रस्ताव प्राधान्याने पहिल्यांदा घेण्यात आला. त्याला आम्ही संमती देऊन त्यानंतरचा ठराव दुसऱ्या क्रमांकावर ठेवला. या ठिकाणी स्त्री भ्रूण हत्त्येचा विषय असेल किंवा शेतकऱ्यांचा विषय असेल हे दोन्ही विषय अत्यंत महत्वाचे आहेत. परंतु स्त्रीभ्रूण हत्त्येचा विषय सारखा पुढे ढकलला जात होता म्हणून आज आपण लावलेल्या क्रमानुसार तो प्रस्ताव चर्चेकरिता घेण्यात यावा. हे दोन्ही प्रस्ताव महत्वाचे असल्यामुळे त्यावरील चर्चा मंत्रीमहोदयांच्या उत्तरासहीत आजच व्हावी यादृष्टीने सभागृहाचे कामकाज चालावे अशी माझी आपणास विनंती आहे.

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला आपणास नम्रपणे सांगितले पाहिजे की, आमचा प्रस्ताव घेतल्यानंतर तुमच्या प्रस्तावावरील चर्चा अपूर्ण राहिली हा एक भाग झाला. परंतु त्या दिवशी प्रस्ताव चर्चेला घेतल्यामुळे शासनाचे काम अडले, त्याकरिता रात्री साडे दहा वाजेपर्यंत बसून विधेयके सुध्दा मंजूर करुन घेतली त्याबद्दल आम्ही तक्रार सुध्दा केली नाही.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

फक्त थोडीशी कुरकुर केली.पण आम्ही माननीय सभापतींचे आदेश मान्य केले आणि रात्री 10.45 वाजेपर्यंत सभागृहामध्ये बसून विधेयके सुध्दा मंजूर केली आणि विधेयकाच्या संबंधातील शासकीय कामकाज शिल्लक ठेवलेले नाही. काल देखील आपण ते कामकाज केले.आम्ही विरोधी पक्ष असताना सुध्दा एका बाजूने शासकीय कामकाज करण्यासाठी मदत करतो. आज कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेले दोन्ही प्रस्ताव चर्चेसाठी घ्यावयाचे आहेत. आजच्या कामकाज पत्रिकेवरील पान क्र.5 वरील अनु.क्र.2 वर शेतकऱ्यांच्या संबंधातील जो प्रस्ताव दाखविण्यात आलेला आहे, त्यावर फार काळ चर्चा होईल अशातला भाग नाही. परंतु पान क्र.5 वरील अनु.क्र.1 वर स्त्रीभ्रूण हत्येच्या बाबतीतील जो विषय आहे, त्यामध्ये आम्हालाही इंटरेस्ट आहे. हा प्रस्ताव आम्ही मांडणार होतो, पण तो तुम्ही मांडत आहात. माझे असे म्हणणे आहे की, विरोधी पक्षातर्फे एक प्रस्ताव आहे आणि सत्तारुढ पक्षाने सभागृह चालविण्याबाबत मोठेपणा दाखविलाच पाहिजे.

श्री.भाई जगताप : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब ज्या भावना व्यक्त करीत आहेत, तशाच प्रकारच्या भावना आपण कायदा आणि सुव्यवस्थेच्या चर्चेच्या वेळी व्यक्त केल्या आणि आम्ही ताबडतोब मान्य केले. कारण तो महत्वाचा होता.

**सभापती** : आता मी निर्णय देतो. आजच्या कामकाज पत्रिकेवर जी शासकीय विधेयके दाखविण्यात आलेली आहेत, ती आज प्राधान्याने पूर्ण करु या. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे आणि इतर सन्माननीय सदस्य यांचा कामकाज पत्रिकेवरील अनु.क्र.दहा वर नियम 260 अन्वये पहिल्या क्रमांकाचा प्रस्ताव दिलेला आहे आणि दुसरा प्रस्ताव माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेब आणि इतर सन्माननीय सदस्यांचा आहे. आपण मघाशी त्या संदर्भात 15 मिनिटे चर्चा केली आणि त्यातून मला सत्तारुढ पक्षातील आणि विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांच्या भावनाही समजल्या. तसेच मला असे वाटते की, आजच्या कामकाज पत्रिकेवर अनु.क्र.9 वर दाखविण्यात आलेल्या विधेयकांवरील चर्चा तातडीने संपवावयाची असेल तर ......

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आम्हाला विधेयकावर बोलावयाचे आहे.

**सभापती** : या विधेयकांवर बोलण्यासाठी वेळ असेल तर देऊ.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी विनंती आहे. आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये जी विधेयके दाखविण्यात आलेली आहेत, त्यातील 27 क्रमांकाचे बिल हे प्रभाग समित्यांच्या बाबतीत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेले विधेयक क्रमांक 24 हे महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (फी वसुलीचे विनियमन) या बाबत आहे.

श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, आम्हाला या विधेयकावर बोलावयाचे आहे, त्यामुळे ते आज चर्चेसाठी घेण्यात येऊ नये. त्यामध्ये वेळ जाईल. आपण समजून का घेत नाही ?

**सभापती** : मी कायम सर्वांना समजून घेतो, आपण सभापतींना असे कसे म्हणत आहात? आपण सभापतींना असे कसे म्हणत आहात की, तुम्ही समजून घेत नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला असे म्हणावयाचे आहे की, आम्हाला समजून घ्या.

**सभापती** : मग तसे म्हणा. आता मी सभागृहाचे कामकाज 15 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे आणि त्या दरम्यान आपण सर्वांनी एकत्र बसून निर्णय घेऊ. त्या नंतर सभागृहाचे कामकाज सुरु करु. या नंतर सभागृहाचे कामकाज जेवणाच्या मध्यंतरानंतर दुपारी 01 वाजून 45 मिनिटांनी सुरु होईल.

(सभागृहाची बैठक 01.12 ते 01.45 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

यानंतर कु.थोरात . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**सभापतीस्थानी तालिका सभापती माननीय श्री. रमेश शेंडगे**

**तालिका सभापती** : सभागृहाचे कामकाज 2.00 वाजेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

( सभागृहाची बैठक 1.45 ते 2.00 वाजेपर्यंत तहकूब झाली )

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**सभापती** : सन्माननीय सदस्य विरोधी पक्ष नेते आणि गट नेते यांच्याबरोबर मी सविस्तर चर्चा केली आहे. आजच्या कामकाज पत्रिकेवर नियम 260 अन्वये जे प्रस्ताव दर्शविलेले आहेत त्या पैकी चर्चेसाठी प्रथम कोणता घ्यावा, दुसरा कोणता घ्यावा यासंबंधी त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर मी या निर्णयाप्रत आलेलो आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नाच्या अनुषंगाने जो प्रस्ताव दिलेला आहे तो महत्वाचा आहे आणि स्त्रीभ्रूण हत्या या विषयावरील प्रस्ताव देखील तितकाच महत्वाचा आहे. म्हणून दोन्ही बाजूच्या नेत्यांशी सल्लामसलत केल्यानंतर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांचा प्रस्ताव प्रथम चर्चेचा घेण्याचा मी निर्णय घेतला आहे.

मी या पूर्वी देखील या सदनात विशद केलेले आहे की, सभागृहाच्या कामकाजा विषयी मी नियम समितीची दोन वेळा बैठक बोलविली होती. एका बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्ष नेते आणि विविध पक्षाचे गट नेते यांच्या बरोबर सविस्तर चर्चा केली आहे. त्या बैठकीत सभागृहाचे जे दैनंदिन कामकाज आहे ते विशिष्ट वेळेमध्ये पूर्ण करण्याच्या दृष्टीने काही पध्दत अवलंबणे गरजेचे आहे. या अनुषंगाने सभागृहाची बैठक सकाळी 11 वाजता सुरु झाल्यानंतर संध्याकाळी 6 वाजेपर्यंत कामकाजपत्रिकेवरील कामकाज पूर्ण झाले पाहिजे असे ठरविण्यात आले आहे. दुपारी 1.30 ते 2.00 वाजेपर्यंत चहापानासाठी सुट्टी घेण्याचे ठरविले आहे. सकाळी 11 ते 1.30 या वेळेमध्ये प्रश्नोत्तराचा तास, कागदपत्रे सादर करणे, नियम 93 अन्वयेच्या सूचना, नियम 93 अन्वयेची निवेदने असे कामकाज संपवावयाचे. त्या नंतर दुपारी 2 ते संध्याकाळी 6 या वेळेमध्ये शासकीय विधेयके, नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाची 2-2.30 तासाची चर्चा असेल. ते काम देखील संपविले पाहिजे अशी त्या बैठकीत चर्चा करण्यात आली आहे. एखाद्या दिवशी अपवाद म्हणून संध्याकाळी 6 नंतर सुध्दा आपल्याला कामकाज सुरु ठेवणे गरजेचे आहे. परंतु अपवाद म्हणून त्या कामकाजाकडे पाहिजे पाहिजे. या सदनाचे कामकाज दिनांक 25 जुलै, 2011 रोजी सुरु झालेले आहे. त्या पैकी पहिल्या तीन दिवसासाठी निश्चित केलेले

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

कामकाज पूर्ण होऊ शकले नाही. त्या त्या वेळी देखील महत्वाचे इश्यू होते. मग बॉम्बस्फोटाचा विषय असेल, गिरणी कामगारांच्या प्रश्नाचा विषय असेल, या विषयामुळे आपल्याला त्या दिवशी सभागृहाचे कामकाज तहकूब करावे लागले. त्या मुळे त्या त्या दिवशी वेगवेगळी चर्चा करावी लागली. म्हणून कामकाज पत्रिकेवरील कामकाज पुढे गेले. त्यावेळी मला दुसरा मार्ग चोखाळता आला असता. त्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवरील काम झालेच नाही तर मग ते लॅप्स करणे हा सोपा मार्ग असतो. परंतु माझा व्यक्तिगत अनुभव असा आहे की, सन्माननीय सदस्यांना एखादी बाब कामकाजात आणण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात. मग अर्ध्या तासाच्या चर्चा असतील, लक्षवेधी सूचना असतील किंवा अन्य प्रस्ताव असतील. म्हणून मी कोणत्याही आयुधाचे कामकाज लॅप्स करीत नाही. म्हणून माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा अडीच तासात पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात यावा. मधल्या काळामध्ये आपल्याला वेळेचे नियमन करता आले नाही. म्हणून मी आज या संबंधी निर्णय घेतलेला आहे. कामकाजपत्रिकेवरील कामकाज व्यवस्थितपणे पूर्ण करावयाचे असेल तर नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाची चर्चा अडीच तासात संपली पाहिजे. त्या साठी असा नियम केला पाहिजे की, अडीच तासाच्या चर्चेपैकी 30 मिनिटांचा वेळ मंत्री महोदयांच्या उत्तरासाठी मिळावा, विरोधी पक्षासाठी व सत्तारुढ पक्षाच्या सन्माननीय सदस्यांसाठी 1-1 तासाचा वेळ मिळावा. विरोधी पक्षापैकी भारतीय जनता पक्षाचे नेते आणि दोन सन्माननीय सदस्य, शिवसेना पक्षाचे नेते आणि दोन सन्माननीय सदस्य, अपक्षांपैकी दोन सन्माननीय सदस्य, तसेच सत्तारुढ पक्षातील सदस्य संख्या मोठी असल्यामुळे काँग्रेस पक्षातील 3 नेते आणि एक सन्माननीय सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील 3 नेते आणि एक सन्माननीय सदस्य या प्रमाणे एकूण 16 सन्माननीय सदस्यांना चर्चेत भाग घेता येईल. माननीय विरोधी पक्ष नेत्यांना व गट नेत्यांना मी विनंती करतो की, आपण नावे देत असताना या पध्दतीने नावे द्यावीत. परंतु त्या पेक्षा अधिक नावे आली तर पीठासीन अधिकारी म्हणून मी असेन, माननीय उप सभापती असतील किंवा तालिका सभापती असतील त्यांचे देखील हे काम आहे की, त्यांनी त्या त्या पक्षातील फक्त 3 नावे घ्यावीत, त्या पुढील नावे घेऊ नयेत. जर

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ....

आपण असे केले तर आपल्यासमोर असलेले कामकाज आपल्याला पूर्ण करता येईल. ही पध्दत काटेकोरपणे पाळणे गरजेचे आहे. सध्या अडीच तासाच्या चर्चेऐवजी 3 तास चर्चा होत आहे. परंतु अडीच तासाची चर्चा अडीच तासातच संपली पाहिजे. आज मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी विनंती करीन की, नियम 260 अन्वयेचा आपला पहिला प्रस्ताव आहे. तो 2 तासात संपला तर मला आनंदच होईल. परंतु हा प्रस्ताव दोन तासातच संपला पाहिजे असे मी सभापती म्हणून माझ्या तोंडाने बोलणे बरोबर होणार नाही. पण कमीत कमी वेळेमध्ये तो प्रस्ताव कसा पूर्ण होईल या साठी आपण प्रयत्न केला पाहिजे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आता आपण असे म्हटले आहे की, नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा दोन किंवा अडीच तासात पूर्ण झाली पाहिजे. आपण असेही म्हटले की, सत्तारुढ पक्षासाठी एक तास आणि विरोधी पक्षासाठी 1 तास आणि मंत्री महोदयांच्या उत्तरासाठी अर्ध्या तासाचा वेळ उपलब्ध होईल. परंतु आम्ही प्रस्ताव मांडल्यानंतर प्रस्ताव मांडणाऱ्या सन्माननीय सदस्यांना कमी वेळ मिळेल. शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधीचा हा विषय आहे. मी 5-10 मिनिटात या विषयावरील प्रस्ताव मांडू शकत नाही. त्या नंतरच्या सन्माननीय सदस्यांनी 3 मिनिटात, 5 मिनिटात भाषण पूर्ण करण्यास सांगितले जाते. अपु-या वेळेमुळे त्या विषयाला न्याय मिळत नाही. म्हणून प्रस्ताव मांडणाऱ्या प्रस्तावकास वेगळा वेळ दिला पाहिजे, इतर सन्माननीय सदस्यांना सुध्दा 5 मिनिटांत भाषण संपवावे, 3 मिनिटांत भाषण संपवावे असे सांगितले होते. परंतु पुरेसा वेळ दिला तरच त्या प्रस्तावाला न्याय दिल्यासारखे होईल. माझ्या सूचनेबाबत आपण विचार करावा.

**सभापती** : त्या दिवशी नियम समितीच्या बैठकीमध्ये आपण हे निश्चित केलेले आहे. परंतु आता आपण प्रस्ताव मांडणाऱ्या सदस्यांना अधिक वेळ देण्याची सूचना केली आहे. सत्तारुढ पक्षाकडून प्रस्ताव मांडला जाईल त्या वेळी त्याही प्रस्तावकांना अधिक वेळ द्यावा लागेल. मी ही सूचना तपासून पाहतो. परंतु कमीत कमी वेळेमध्ये सन्माननीय सदस्यांनी आपली भाषणे पूर्ण करण्याची पध्दत आपल्या अंगी बाणावावी लागेल. त्या दृष्टीने आपला प्रयत्न असला पाहिजे.

4.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस.क्यू. जमा : सभापति महोदय, मेरा पॉइंट ऑफ इनफोरमेशन है. आपने जो व्यवस्था दी है, वह स्वागत योग्य है. आपकी व्यवस्था फायनल है. मेरा एक ही अनुरोध है कि आपने सत्ताधारी पक्ष के लिए एक घंटे की समय सीमा निश्चित की है और इस एक घंटे की समय सीमा में काँग्रेस पक्ष के 4 सदस्य और राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष के 4 सदस्य बोलेंगे. हमने सभागृह में यह देखा है कि माननीय सभापति के आसन से घंटी बजाने के बावजूद माननीय सदस्य बोलते रहते हैं तो इस बारे में आपको कुछ निर्णय करना पड़ेगा. मेरा आपसे अनुरोध है कि जो माननीय सदस्य निर्धारित समय से ज्यादा बोलते हैं तो उनका माइक बंद कर देना चाहिए या इस प्रकार की कुछ अन्य व्यवस्था होनी चाहिए.

. . . . नंतर श्री खर्चे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : महोदय, नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाबद्दल सभागृहात आपण जो निर्णय दिला त्या निर्णयावर मी कोणतेही मत प्रदर्शन करु शकत नाही. मी फक्त एवढेच सदनाच्या व आपल्या निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की, दि. 2 ऑगस्ट, 2011 रोजी व काल सुध्दा "स्त्री भ्रूण हत्या"संबंधीचा प्रस्ताव पहिल्या क्रमांकावर होता त्यावर गेली दोन दिवस चर्चा होऊ शकली नाही, आज देखील तो प्रस्ताव दुसऱ्या क्रमांकावर गेल्यामुळे त्यावर चर्चा होणे शक्य होईल असे वाटत नाही. ज्याप्रमाणे राज्यात स्त्री भ्रूण हत्या होत आहेत, त्याप्रमाणे सभागृहात सुध्दा त्यावरील प्रस्तावाची हत्या होते की काय अशी भीती वाटते.

श्री. दिवाकर रावते : महोदय, पीठासीन अधिकारी म्हणून एकदा आपण निर्णय दिल्यानंतर पुन्हा त्यावर भाष्य करणे योग्य नाही, किंवा तसा सदस्यांना अधिकार नाही.

श्री. विनायक मेटे : महोदय, सभागृहाचा एक सदस्य म्हणून मला तो अधिकार आहे. मागील आठवड्यात विरोधी पक्षाकडून जो प्रस्ताव आला होता तो पहिल्या क्रमांकावर घेण्यात आला होता. आज मात्र आमचा प्रस्ताव दुसऱ्या क्रमांकावर दाखविलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभागृहात उपस्थित राहण्याची आपल्या सत्तारुढ पक्षाची जबाबदारी असताना देखील परवा आम्ही शासनाचे कामकाज पूर्ण करण्यासाठी रात्री 10.45 वाजेपर्यंत सभागृहात उपस्थित होतो, याचे सन्माननीय सदस्यांनी भान ठेवावे.

श्री. विनायक मेटे : आम्ही देखील तेव्हा सभागृहात उपस्थित होतो. महोदय, आपण दिलेल्या निर्णयाचा आम्ही आदर करतो. पण विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी प्रत्येक गोष्टीत बोलून कामकाजात खोळंबा निर्माण करणे हे योग्य नाही. म्हणून माझी या निमित्ताने अशी मागणी आहे की, सत्तारुढ पक्षाच्या वतीने स्त्री भृण हत्येसंबंधीचा जो प्रस्ताव दिलेला आहे तो आज पहिल्या क्रमांकावर आहे. तो आजच चर्चेला घ्यावा.

श्री. भाई जगताप : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना सभागृहातील कामकाजाबाबत काय चर्चा झाली त्याबाबत माहिती नसल्याने कदाचित त्यांचा गैरसमज झाला असावा. या सभागृहात कोणते कामकाज घ्यावे यासाठी माननीय सभापतींच्या दालनात माननीय विरोधी पक्षनेते व सत्तारुढ पक्षातील काही नेते यांची माननीय सभापतींसोबत चर्चा झाली. त्यात कामकाज पत्रिकेवरील प्रस्तावावरील चर्चेला प्राधान्य देण्याबाबत सुध्दा चर्चा झाली. त्यासाठी

...2...

04-08-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) W-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ......

आजच्या कामकाज पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना व इतर कामकाज पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला. कामकाज पत्रिकेवर दाखविलेले दोन्ही प्रस्ताव महत्वाचे आहेत. त्यात राज्यात जास्त पावसामुळे झालेले नुकसान तसेच वेळेवर पाऊस सुरु न झाल्याने झालेल्या दुबार पेरण्या वगैरेचा विषय आहे. दुसरा प्रस्ताव स्त्री भ्रूण हत्यांबाबतचा आहे. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन माननीय सभापतींच्या दालनात चर्चा झाली. त्या बैठकीत ठरले की, यातील एका प्रस्तावाला दोन तास आणि सत्तारुढ पक्षाकडून आलेल्या प्रस्तावाला दोन तास वेळ देण्यात येईल, त्यामुळे कोणता प्रस्ताव अगोदर की नंतर असा वाद सभागृहात होऊ नये अशी मी विनंती करतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी सत्तारुढ पक्षाकडून आलेल्या प्रस्तावावरील चर्चा आजच घ्यावी अशी विनंती केली आहे. शक्यतो ही चर्चा आजच घेण्यात येईल. तसे शक्य झाले नाही तर सोमवार, दिनांक 8 ऑगस्ट, 2011 रोजी सदर चर्चा घेण्याबाबत विचार करता येईल.

श्री. विनायक मेटे : महोदय, सत्तारुढ पक्षाकडील प्रस्तावावर उद्या चर्चा घ्यावी.

श्री. भाई जगताप : सत्तारुढ पक्षाकडून आलेल्या प्रस्तावावर आज चर्चा होणार नसेल, ती चर्चा सोमवारला घेण्याचे ठरले तर पुढे ढकललेल्या आजच्या कामकाज पत्रिकेवरील कामकाजाबाबत विचार करण्यास हरकत नाही.

**सभापती** : मघाशीच आपण दोन्ही प्रस्तावांवरील चर्चा पूर्ण करण्याबाबतचा विचार करीत होतो. पण सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी ही चर्चा उद्या घ्यावी असे सुचविले. पण उद्या प्रस्तावावर चर्चा घेणे शक्य नसल्याने किमान सोमवारला तरी ही चर्चा घेण्यास हरकत नाही. दरम्यानच्या वेळेत आपण लक्षवेधी सूचना घेतल्या तर बरे होईल, असे मला वाटते.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, दोन्ही प्रस्तावावर चर्चा करुन घ्यावी म्हणून आजच्या कामकाज पत्रिकेवरील जे कामकाज बाजूला ठेवले होते ते कामकाज आज उरकून घ्यावे, असे मला वाटते.

**सभापती** : सामाजिक न्याय विभागाचे मंत्री महोदय आता नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाला उत्तर देतील.

--------

...3...



PFK/ पूर्वी श्री. खंदारे .... 14:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सदस्यांच्या राजीनाम्याची घोषणा

**सभापती** : विधान परिषद नियम 266 (5) च्या तरतुदींना अनुसरुन मी सभागृहाला असे कळवितो की, महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा विधान परिषदेवर निवडून आलेले श्री. हुसेन उमर दलवाई, वि.प.स. यांनी महाराष्ट्र विधान परिषदेतील त्यांच्या जागेचा दिलेला राजीनामा बुधवार, दिनांक 3 ऑगस्ट, 2011 रोजी मध्यान्होत्तर स्वीकारला आहे.

-------

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: महाराष्ट्र राज्यात मागास वर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी न होणे

**मु.शी.**: महाराष्ट्र राज्यात मागास वर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी न होणे या विषयावर सर्वश्री सुभाष चव्हाण, हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, अरुण गुजराथी,रमेश शेंडगे, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री विक्रम काळे, अशोक उर्फ भाई जगताप, अनिल भोसले, मोहन जोशी, दिप्ती चवधरी, वि.प.स. यांचा प्रस्ताव

( चर्चा पुढे सुरु ......

श्री. शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री सुभाष चव्हाण, हेमंत टकले, माणिकराव ठाकरे, अरुण गुजराथी, रमेश शेंडगे, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री विक्रम काळे, भाई जगताप, अनिल भोसले, मोहन जोशी, दिप्ती चवधरी यांनी महाराष्ट्रातील एस.सी., एस.टी., व्ही.जे.एन.टी., ओ.बी.सी., एस.बी.सी. इ.मागास प्रवर्गाच्या कल्याणाच्या संदर्भात ज्या योजना राबविल्या जातात त्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या प्रस्तावावर चर्चा केली. या चर्चेतून अनेक सन्माननीय सदस्यांनी अत्यंत चांगले उपाय देखील सुचविले आहेत, त्याबद्दल मी प्रथम त्यांचे आभार मानतो. नियोजन आयोगाने राज्यांमध्ये एस.सी. व एस.टी. ची जेवढी लोकसंख्या असेल तेवढ्या प्रमाणात त्यांच्या उन्नतीसाठी बजेट दिले पाहिजे असे ठरविले आहे. त्याप्रमाणे 10.20 टक्के एवढी तरतूद मागासवर्गीयांसाठी केली जाते. केंद्राच्या या निर्णयाची अंमलबजावणी करणारे आपले राज्य हे देशाच्या पातळीवर एकमेव राज्य असेल.

श्री. कपिल पाटील : महोदय, मघाशी मी माझ्या भाषणात सुध्दा सांगत होतो आता मंत्री महोदयांनी उत्तरात देखील विधान केले की, केंद्रात एस.सी. व एस.टी. ला त्यांच्या घटनात्मक अधिकारानुसार जो निधी मिळतो तो वापरणारे आपले राज्य हे एकमेव राज्य आहे. मघाशी मी आक्षेप घेतला होता. मागील वर्षी बजेटमध्ये सुध्दा हे आकडे आले होते. मघाशी प्रश्नोत्तराच्या तासात सुध्दा यासंबंधीचे आकडे समोर आले होते. ते म्हणजे दरवर्षी 700 ते 800 कोटी रुपये जाणीवपूर्वक अखर्चित दाखवून अन्य विभागाकडे हा निधी डायव्हर्ट केला जातो.....

श्री. शिवाजीराव मोघे : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आपण एस.सी. व एस.टी. साठी आलेला निधी खर्च न करता इतर विभागांकडे डायव्हर्ट केला जातो असा मुद्दा मांडला, तो तपासून त्यावर नंतर निर्णय देण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे :

सभापती महोदय,दर वेळी 10-20 टक्के तरतूद करण्यात येते. पण कधी बजेटला कट असेल अथवा एखादी योजना रद्द झाली असेल तर केलेली तरतूद पूर्ण खर्च होत नाही. सन 2011-12 मध्ये 4233 कोटी रुपयांची तरतूद यासाठी करण्यात आलेली आहे. जिल्हा पातळीवर 800 कोटी रुपयांपेक्षा जास्त फंड देण्यात आलेला आहे. अनुसूचित जातीच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी खूप चांगले विचार मांडलेले आहेत. अनुसूचित जाती विधान मंडळ फोरम, सामाजिक परिवर्तन हक्क परिषद तसेच सामाजिक समता पक्षाच्या संदर्भात काँग्रेस पक्ष तसेच राष्ट्रवादी पक्षाकडून माहिती आलेली आहे. पूर्वीच्या काळात शिष्यवृत्ती कॉलेजमध्ये जात होती व त्यामुळे बरीच महाविद्यालये विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देत नव्हती. कॉलेजने शिष्यवृत्ती दिली तर फर्निचर, लॅबरोटरी अशी कारणे देऊन पैसे कट करत होते. परंतु मागील वर्षी आपल्या राज्यात 15 जून, 2011 पर्यंत ई-स्कॉलरशिपसाठी 14,29,690 अकाऊंटस उघडण्यात आलेले आहेत. विद्यार्थ्यांचे 14,29,690 अकाऊंट उघडून विद्यार्थ्यांच्या अकाऊंटमध्ये डायरेक्ट पैसे जमा केले जात आहेत. सन 2010-11 मध्ये 1502.48 कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. जवळ जवळ 300-350 कोटी रुपयांचे या माध्यमातून सेव्हींग सुध्दा झालेले आहे. कॉलेज ग्रँटेड असो किंवा नसो परंतु त्या ठिकाणी मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षण घेत असेल तर त्याला स्कॉलरशिप दिली जात असते. एसएससी बोर्डामधून कोड नंबर काढल्यामुळे यापुढील काळात एकही विद्यार्थी डबल स्कॉलरशिप घेऊ शकणार नाही. विद्यार्थ्यांच्या नावाने एकदा अकाऊंट उघडल्यानंतर हा विद्यार्थी ग्रॅज्युएट, पोस्ट ग्रॅज्युएट होई पर्यंत त्याला दुसरे अकाऊंट ओपन करण्याची गरज पडणार नाही. या विषयाच्या संदर्भात अनेक सूचना तसेच तक्रारी आल्या होत्या, काही पोलीस केसेस सुध्दा झाल्या होत्या या सर्वांचा आधार घेऊन यासंदर्भात आम्ही फार चांगले काम केलेले आहे. विद्यार्थ्यांचे अकाऊंट उघडण्यामध्ये ब-याच वेळा कॉलेजचे सहकार्य मिळत नाही ही मोठी अडचण आहे. परंतु यासाठी आम्ही कँप घेऊन विद्यार्थ्यांचे अकाऊंटस ओपन केलेले आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी सविस्तर आकडेवारी दिलेली आहे. दर वर्षी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती आणि फी जमा केली तर विद्यार्थ्यांना भविष्यात त्रास होणार नाही. परवा प्रश्नोत्तराच्या तासात हा प्रश्न मी उपस्थित केला होता. मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, संत गजानन महाराज, अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची गेल्या चार वर्षापासूनची फी जमा झालेली नाही. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुडकर यांनी इंजिनिअरिंग कॉलेजच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. यामध्ये ओबीसींना फंड कमी असतो. परंतु केंद्रशासनाची स्कॉलरशिप आपण विद्यार्थ्यांना डायरेक्ट देत असतो. यामध्ये आपण फार मोठे काम केलेले आहे. औद्योगिक सहकारी संस्थेमध्ये 2000 कोटी रुपये गेले अशी माहिती मध्यंतरीच्या काळात अचानक आली होती. यासंदर्भात मी विभागाकडून माहिती घेतल्या नंतर माझ्या असे निदर्शनास आले आहे की, औद्योगिक सहकारी संस्था सन 2004-05 मध्ये सुरु झाली होती. सन 2007-08 पर्यंत 76 औद्योगिक सहकारी संस्थांना मान्यता देण्यात आली होती. सन 2009-2010 व 2010-2011 या दोन वर्षात 296 संस्थाना मान्यता दिली होती. एकूण 372 संस्थांना मान्यता दिलेली आहे. भाग भांडवल व दीर्घ मुदतीचे कर्ज मिळून 49 प्रकल्प आता पूर्णत्वास आले असून 29 प्रकल्प पूर्ण झालेले आहेत. सन 2011-12 मध्ये यासंदर्भात 200 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. यामध्ये 500 कोटीच्यावर खर्च केला गेला नाही. परंतु 2000 कोटीच्यावर खर्च करण्यात आलेला आहे ही जी माहिती आहे ती चुकीची आहे. पहिल्या वर्षी एका विशिष्ट जिल्हयामध्ये औद्योगिक सहकारी संस्था देण्यात आल्या होत्या. परंतु आता आम्ही यासंदर्भात सर्क्युलर काढले असून अनुसूचित जातीची जेवढी लोकसंख्या आहे तेवढयाच प्रमाणात फंड देण्यात यावेत अशा प्रकारची तरतूद करण्यात आलेली आहे. आता कोणत्याही जिल्हयाची मक्तेदारी आम्ही ठेवलेली नाही.

सभापती महोदय, सन 2008 पूर्वीचे 421 कोटी रुपयांचे कर्ज माफ करण्यात आलेले आहे. राष्ट्रीय बँक थकीत कर्ज 134.41 तसेच राष्ट्रीय महामंडळ कर्ज 172.71 कोटी, राष्ट्रीय बँकेचे 114 कोटी रुपयांचे कर्ज आपण माफ केलेले आहे. यावेळेस 69 कोटी रुपयांचे भाग भांडवल महामंडळाला दिलेले असल्यामुळे कर्जवाटप सुध्दा चांगल्या प्रकारे होईल हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब आपल्या भाषणात म्हणाले होते की, कॉंग्रेसने खूप काही केलेले आहे. त्यामुळे यासंदर्भात मला अभिमान वाटतो. महाराष्ट्र राज्यात जेवढे कायदे झालेले आहे तेवढे कायदे इतर राज्यामध्ये झालेले नाहीत. महाराष्ट्र शासनाने गरीब माणसांना जमीन सुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे. जमिनीच्या संदर्भात महाराष्ट्र शासनाने 7 ते



अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे.....

8 कायदे केलेले आहेत. सिलिंगचा कायदा, अतिक्रमण झाले असेल तर त्याला रेग्युलराईज करणे , कुळ कायदा, असे अनेक कायदे काँग्रेसच्या काळात या राज्यात झालेले आहेत. लाखो गरिबांना जमीन देण्याचे काम शासनाने केलेले आहे. परंतु आता जमिनी कमी झालेल्या आहेत, फॉरेस्ट तसेच रेव्हेन्यूची जमीन सुध्दा कमी झालेली आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदी माननीय सुशील कुमार शिंदे असतांना त्यांच्या काळात खाजगी लोकांच्या जमिनी शासनाने विकत घेऊन त्या अनुसूचित जाती जमातींच्या गरिबांना दिलेल्या आहेत. आतापर्यंत 16000 एकर जमीन अनुसूचित जाती जमातीच्या लोकांना दिलेल्या आहेत. आता जमिनीचे दर वाढलेले आहेत. रेडी रेकनरपेक्षा 20 टक्के जास्त दराने जमीन घेण्याचा अधिकार जिल्हाधिका-यांना दिलेला आहे परंतु त्यामुळे जमीन उपलब्ध झालेली नाही. जमिनीच्या संदर्भात 24 कोटी रुपयांची तरतूद शासनाने केलेली असून 24 कोटी रुपये खर्च झाले पाहिजे असा आमचा प्रयत्न राहणार आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये 10 लाख लोक बीपीएल धारक असून त्यांच्याकडे स्वत:चे पक्के घर नाही. 10 लाख लोकांपैकी तो कोणत्याही जाती धर्माचा असला तरी त्याला धर दिले जाणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या आघाडी सरकारने यासंदर्भात फार मोठा निर्णय घेतलेला आहे. घरकुलाच्या संदर्भातील योजनेची अंमलबजावणी मागील वर्षापासून सुरु झाली आहे. इंदिरा आवास योजनेमध्ये अनुसूचित जाती-जमातींच्या लोकांसाठी 60 टक्के कोटा असतो. या योजनेत कोटा कमी असल्यामुळे टार्गेट पूर्ण होत नसल्यामुळे अनुसूचित जाती-जमातीचा आपल्या राज्याचा जो फंड आहे तो वापरला गेला पाहिजे अशी भूमिका महाराष्ट्र शासनाने घेतलेली आहे. मागील काळात ग्रामीण भागामध्ये 68000 ग्रामीण घरे बांधण्याचे काम सुरु झाले आहे. यातील निम्म्यापेक्षा अधिक घरांचे काम पूर्ण झाले आहे. एक ते दीड महिन्यात 68000 घरे बांधण्याचे काम पूर्ण होतील एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. ही घरे इंदिरा आवास सोडून आहेत. यावर्षी या योजनेसाठी 800 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली असून त्यासाठी 1.86 लक्ष टार्गेट ठेवण्यात आलेले आहे.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे........

देशाला 1947 साली स्वातंत्र्य मिळाले, महाराष्ट्र राज्याची निर्मिती होऊन 50 वर्षे पूर्ण झाली परंतु गरीब माणसाला रहावयास घर नाही या सारखी दुसरी दुर्दैवाची गोष्ट नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले की, पहिल्यांदा या गोष्टीला प्राधान्य द्यावे. या गरीब कुटुंबांना घर मिळाले पाहिजे. या कामासाठी जास्तीत जास्त निधी दिला जावा. सरकारच्या या उदार धोरणामुळे अनुसूचित जातीसाठी 800 कोटी रुपये राखून ठेवले आहेत. विभागाकडे कर्मचारीवर्ग पुरेसा नसल्यामुळे डीआरडीए मार्फत ग्रामीण भागात अतिशय चांगली घरे बांधण्याचे काम केले जात आहे. या योजनेमध्ये गैरव्यवहार होत आहेत, भ्रष्टाचार होत आहे असे आरोप केले जातात. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, लाभार्थ्यांच्या हातामध्ये अनुदानाच्या रकमेचा चेक द्यायचा आहे. जी घरे बांधली जातात त्या घरांचे फोटो सादर करावे लागतात. योजनेमध्ये कोणतीही गडबड होत नाही. कोणत्या प्रकारची घरे बांधली जावीत या संदर्भात नियम ठरवून दिलेले आहेत. केवळ विभागाच्या मंत्र्यांनी माझ्या गावात योजना राबवावी किंवा माननीय मुख्यमंत्र्यांनी माझ्या गावात योजना राबवावी असे सांगितले म्हणून त्या गावात योजना राबविता येत नाही. केंद्र शासनाने योजनेचे नियम ठरवून दिलेले आहेत. ज्या गावांमध्ये बीपीएलची लोकसंख्या कमी आहे अशी चढती श्रेणी तयार करुन उद्दिष्ट पूर्ण करावयाचे आहे.

सभापती महोदय, पूर्वी पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागविले होते. साधारणपणे 6 लाख अर्ज प्राप्त झालेले होते. त्या अर्जांची छाननी केल्यानंतर 3.53 लाख लाभार्थ्यांकडे अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र असल्याचे सिध्द झाले आहे. या अर्जामध्ये 1 लाख रुपयांच्या वार्षिक उत्पन्नाची अट अंतर्भूत केलेली होती. अर्जदारांकडे घर आहे की नाही, प्लॉट आहे की नाही हे तपासून घ्यायचे आहे. बीपीएल वगळता एपीएलमध्ये जे अनुसूचित जातीचे लोक आहेत त्यांना सुध्दा पुढच्या काळात घरे बांधून देणार आहोत, हे सभागृहाला अभिमानाने सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, जात पडताळणी समितीमार्फत जाचक काम केले जाते, वेळेवर जात पडताळणी प्रमाणपत्र मिळत नाही, गैरव्यवहार केले जातात अशा तक्रारी आलेल्या आहेत. परंतु ज्या प्रमाणात बोलले जाते तेवढे गैरव्यवहार होत नाहीत हे मी सभागृहाला सांगू इच्छितो. या संदर्भात जरुर काही उपाययोजना केलेल्या आहेत. सेतू योजना पुणे, मुंबई आणि धुळे जिल्हयात सुरु केलेली आहे. संपूर्ण राज्यात ही सेतू योजना लागू करणार आहोत. पुढील काळात स्थानिक

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे.....

स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीसाठी जे उमेदवार आरक्षित पदासाठी अर्ज भरणार आहेत त्यांच्या जात प्रमाणपत्र पडताळणीचे काम फक्त सध्याच्या 15 जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडून होणार नाही. त्यांच्याकडे कामाचा प्रचंड व्याप आहे, मोठ्या संख्येने जात प्रमाणपत्राची पडताळणी करणे शक्य होत नाही. त्यामुळे एक चांगला निर्णय घेण्यात आला आहे. राज्यात अनुसूचित जातीसाठी स्वतंत्र समित्या कार्यरत आहेत. शासनाकडून पुढील आठ दिवसात नोटिफिकेशन प्रसिध्द केले जाणार आहे. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली जाणार आहे. राज्यात 34 जिल्हयांमध्ये अशा प्रकारची समिती गठीत होणार आहे. या समितीकडे फक्त स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संदर्भातील म्हणजे ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, महानगरपालिका यांच्या निवडणुकीच्या संदर्भात कास्ट व्हॅलिडीटीचे काम सोपविले जाणार आहे. कायद्याप्रमाणे निवडणुकीचा फॉर्म भरण्याच्या वेळी कास्ट व्हॅलिडीटी असेल तरच फॉर्म भरता येतो. याची अंमलबजावणी व्हावी म्हणून प्रत्येक जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली जाणार आहे. जेणेकरुन कोणाचा हक्क हिरावून घेता येणार नाही. काही लोकांकडून जातीचे बोगस प्रमाणपत्र सादर करुन निवडणूक लढविली जाते. निकालानंतर विरुध्द पक्षाच्या उमेदवाराकडून निवडणूक निकालाला आव्हान दिले जाते. परंतु अपात्र उमेदवाराकडून पाच-पाच वर्षे त्या पदाचा उपभोग घेतला जातो. भविष्यकाळात असे होऊ नये म्हणून ही नवीन व्यवस्था करण्यात येत आहे. शासकीय नोकरी, पदोन्नती या संदर्भात कास्ट व्हॅलिडीटीचे काम नियमितपणे 15 समित्यांकडून केले जाणार आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली तेव्हा राज्यातील 15 समित्यांच्या ठिकाणी 2 अधिकारी वगळता इतर सर्व प्रमुख अधिकारी हे ॲडिशनल दर्जाचे होते हे निदर्शनास आणण्यात आले. सोलापूर आणि नांदेड येथे नवीन समिती स्थापन केली आहे. 15 जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांकडे एप्रिल, 2011 पर्यंत म्हणजे 1 जानेवारी ते 31 डिसेंबर, 2010 पर्यंत कास्ट व्हॅलिडीटीसाठी 4.30 लाख अर्ज प्राप्त झाले होते. डिसेंबर 2010 अखेर त्यापैकी 3.40 लाख अर्ज निकाली काढण्यात आले. ऑगस्ट, 2002 पासूनच्या 17159 प्रकरणांची व्हॅलिडीटी शिल्लक आहे. इंजिनिअरिंग व मेडिकल शिक्षणासाठी प्रवेश दिले जातात, अशा विद्यार्थ्यांसाठी 11 वी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबरोबरच कास्ट व्हॅलिडीटी देण्याचे काम केले जाते.

..3..



SGB/ 14:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मोहीम हाती घेऊन शैक्षणिक कारणासाठी कास्ट व्हॅलिडीटी दिली जाते. कास्ट व्हॅलिडीटी देत असताना गैरव्यवहार होऊ नयेत या दृष्टीकोनातून पूर्ण व्यवस्था करण्यात आली आहे.

सभापती महोदय, शासनाने एक महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. केंद्र शासनाच्या पातळीवर बँका, विमा कंपन्या आदी आस्थापनामध्ये लिपिक पदांसाठी भरती केली जाते. या पदांसाठी शैक्षणिक अर्हता 10 ते 12 वीपर्यंत असते. ग्रामीण भागातील सुशिक्षित मुलांना या नोकर भरतीची माहिती नसते. क वर्ग नगरपालिकेच्या हद्दीमध्ये राहणाऱ्या मुलांना याची माहिती नसते. या दृष्टीने राज्य शासनाने एक योजना तयार केली आहे. सामाजिक न्याय विभागाचे राज्यात 7 विभाग आहेत. प्रत्येक विभागामध्ये 200 उमेदवारांना या नोकर भरतीच्या दृष्टीने प्रशिक्षण देण्यात येणार आहे. म्हणजे राज्य स्तरावर एकूण 1400 उमेदवारांना दर महिन्याला प्रशिक्षण काळात त्यांच्या निवास व भोजनासाठी 1000 रुपये अनुदान दिले जाणार आहे. प्रशिक्षण देण्यासाठी जाहिरात काढून संस्थांची निवड केली आहे. पुणे येथील स्टडी सर्कल या संस्थेला पुणे विभागाचे काम दिलेले आहे. इतर ठिकाणी संस्थांची निवड केली जाणार आहे. तीन महिन्यात त्या त्या विभागातील सुशिक्षित मुलांना स्पर्धा परीक्षेची जाहिरात कुठे प्रसिध्द होते, परीक्षेचे पेपर कसे सोडवायचे, परीक्षेच्या दृष्टीने कोणकोणती पुस्तके वाचावयाची या संदर्भातील साहित्य पुरविले जाणार आहे, प्रशिक्षणाचा खर्च दिला जाणार आहे. पुढील दोन वर्षात यापैकी 50 टक्के मुलांना नोकरी मिळेल असा आम्हाला विश्वास आहे. प्रत्येक राष्ट्रीयकृत बँका, विमा कंपन्या, भारतीय रेल्वे आस्थापनांमध्ये आपल्या राज्यातील सुशिक्षित मुलांची निवड झाली पाहिजे. क वर्ग नगरपालिकेच्या क्षेत्रात राहणाऱ्या मुलांना या आस्थापनांमध्ये नोकरी मिळाली पाहिजे या दृष्टीने प्रयत्नशील आहोत. मायक्रो गोष्टी करण्याचा प्रयत्न करीत आहोत.

सभापती महोदय, वसतिगृहाच्या संदर्भात एक चांगला निर्णय घेतला आहे. माननीय सदस्य श्री.राम पंडागळे, श्री.सुभाष चव्हाण यांनी वसतिगृहाबद्दल काही मते मांडली आहेत. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना कोणकोणत्या सुविधा पुरविल्या पाहिजेत याचे नियम 1984 साली निश्चित केलेले आहेत. त्यांना गरम पाणी मिळते की नाही,संगणक प्रशिक्षण मिळते की नाही,टी.व्ही.पहावयास मिळतो की नाही हे सांगता येत नाही. शासनाने दिनांक 26.7.2011 रोजी एक जी.आर.निर्गमित केला आहे.यापूर्वी वसतिगृहातील प्रत्येक विद्यार्थ्याला किती ग्रॅम तेल पुरविले पाहिजे,आहारात किती

..4..



**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे.....

पोळ्या द्यायच्या याचे नियम ठरलेले होते. या पुढील काळात नॉर्म्स लागू होणार नाहीत. प्रत्येक विद्यार्थ्याला पोटभर जेवण, चांगल्या संस्थेमार्फत संगणक प्रशिक्षण देणार आहोत. मॉडर्न अशा प्रकारची हायटेक व्यवस्था वसतिगृहामध्ये केली जाणार आहे. तेथे शिक्षण घेऊन बाहेर पडणारा विद्यार्थी हा परिपूर्ण असला पाहिजे अशी भावना आहे. राज्यात 271 शासकीय वसतिगृहे होती. आता नवीन 100 वसतिगृहे मंजूर केली आहेत. अनेक ठिकाणी जागा उपलब्ध झालेली नाही. 100 पैकी 63 ठिकाणी जागा उपलब्ध झाली आहे. ज्या ज्या ठिकाणी जागा उपलब्ध होईल तेथे इमारत उभी करण्याचे काम करीत आहोत.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, आदरणीय मंत्री महोदयांनी उत्तर देत असताना जोरदार घोषणा केली आहे. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना पोटभर जेवण दिले जाणार आहे या संदर्भात मी शासनाचे अभिनंदन करतो. यापुढील काळात विद्यार्थ्यांना पोटभर जेवण देणार आहात, म्हणजे आतापर्यंत जेवण दिले जात नाही का?

नंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य मागासवर्गातील आहेत. मी देखील मागासवर्गातील आहे. आश्रमशाळेतील सर्व मुलांना पोटभर जेवण देण्यात येते. ज्या ठिकाणी कंत्राटदाराची नेमणूक केलेली आहे त्यांच्यासाठी अट होती की, विद्यार्थ्यांना पोटभर जेवण दिले पाहिजे. ही बाब सन्माननीय सदस्यांना चांगली माहिती आहे. सन्माननीय सदस्यांनी इतका सूक्ष्म अभ्यास करु नये, अशी माझी त्यांना विनंती आहे.

सभापती महोदय, पूर्व मॅट्रीकच्या शिष्यवृत्ती, परीक्षा फी चा प्रश्न होता. सन 2007 पूर्वी अधिकाऱ्यांकडून चुकून बृहन्मुंबईमध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांची परीक्षा फी भरण्यात आली होती. नंतर 2007 मध्ये बंद करण्यात आली. शासनाने अशी फी द्यावी असा सर्वांचा आग्रह होता. तेव्हा आम्ही मंत्रिमंडळापुढे गेलो आणि सांगितले की, अनुसूचित जाती आणि विमुक्त भटक्या जातीच्या विद्यार्थ्यांना मग ते इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थी असले तरी त्यांना ही सवलत दिली पाहिजे. तेव्हा संस्थेला पैसे देण्यापेक्षा त्या विद्यार्थ्यांना पैसे का देण्यात येऊ नये असा विचार पुढे आला. तेव्हा त्याप्रमाणे प्रस्ताव सादर करावा असे सांगण्यात आले. मध्यंतरी माननीय उच्च न्यायालयाने आदेश दिला की, आपण चुकून अशी फी भरली असली तर इंग्रजी माध्यमांच्या शाळांतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची फी सरकारने दिली पाहिजे. या संदर्भात निर्णय घेण्यासाठी आम्हाला वेळ पाहिजे होता म्हणून सरकार या आदेशाच्या विरुध्द सर्वोच्च न्यायालयात गेले. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, एक महिन्याच्या आत पूर्व मॅट्रीकच्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मग ते कोणत्याही माध्यमाच्या शाळेतील असो त्यांना शिष्यवृत्ती दिली जाईल.

सभापती महोदय, दादर येथील इंदू मिलची 12 एकर जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी मिळावी यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत. या बाबत सर्वांचे एकमत आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताला राज्य घटना दिली. ही राज्य घटना देताना त्यांनी सर्वांना समान न्याय दिलेला आहे. जो दबलेला समाज आहे त्याला वर आणण्यासाठी तरतूद केलेली आहे. या देशामध्ये प्रचंड गरिबी आहे. 1952 मध्ये जेव्हा निवडणुका झाल्या, त्यावेळी लोकांच्या पायात चपला नव्हत्या, अंगावर फाटकी वस्त्रे होती, परंतु अशा अवस्थेमध्ये त्यांनी मतदान केले. त्यांना

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे...

माहीत होते की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जी घटना लिहिली आहे त्यामुळे आज ना उद्या माझे भले होईल. देशातील लोकशाही कोणी टिकवली असे मला कोणी विचारले, तर मी सांगेन की या देशातील लोकशाही गरीब माणसांनी टिकवली आहे. कारण गरिबांनी कायम मतदान केलेले आहे. गरिबांना रहाण्यासाठी घर नाही, त्यांच्याकडे शेती नाही, असे असताना लोकशाही टिकविण्यासाठी ते मतदान करीत होते. त्यांना माहीत होते की, आज ना उद्या मला जरुर न्याय मिळेल. त्यानंतर जमिनीच्या संदर्भात देशभर कायदे झाले. गरिबांना जमिनी मिळाल्या. आपल्या बाजूच्या पाकिस्तान, बांगला देश, नेपाळ, श्रीलंका या देशांमध्ये लोकशाही टिकली नाही.परंतु भारत देशामध्ये लोकशाही टिकण्याचे एकमेव कारण म्हणजे आपली राज्य घटना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिली आणि त्यामध्ये सर्वांना समान न्याय दिला. तसेच देशातील सूज्ञ जनतेमुळे लोकशाही टिकली आहे हे मला येथे सांगितले पाहिजे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय चांगले भाषण करीत आहेत. त्यांनी लोकशाही कशी टिकली हे आपल्या भाषणात सांगितले. माझा त्यांना प्रश्न आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची मागणी होती की, माझा बौध्द समाज इतर समाजाच्या बरोबरीने येण्यासाठी 10 वर्षाची मुदत द्यावी, त्याप्रमाणे कॉंग्रेस पक्षाने मुदत दिली. परंतु गेल्या 60 वर्षापासून ही मुदत वाढविली का जात आहे ? डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना जी लोकशाही अपेक्षित होती ती मागील 60 वर्षात साकार का झाली नाही, याला जबाबदार कोण आहे ? मागील 50 वर्षामध्ये केंद्रामध्ये आणि राज्यामध्ये आपल्याच पक्षाची सत्ता आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्वप्न अजून साकार झालेले नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मनातील बौध्द समाज आज देखील इतर समाजाच्या बरोबरीने आलेला नाही.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी चांगला मुद्दा मांडला. 10 वर्षामध्ये हा समाज इतर समाजाबरोबर यावयास पाहिजे होता. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण अनेकदा नियोजन करतो परंतु सर्वच गोष्टी त्याप्रमाणे होतात असे नाही.

..3..


AJIT/ पूर्वी श्री.भोगले. 14:40
असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, डॉ.बाबसाहेब आंबेडकरांचे जे स्वप्न होते ते पूर्ण झाले पाहिजे, हा घटनेचा अवमान आहे असे मी समजतो.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, दहा वर्षापेक्षा जास्त कालावधी लागेलला आहे ही बाब खरी आहे,परंतु कामाची गती वाढलेली आहे. फक्त मागासलेल्या नाही तर समाजातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याचे काम घटनेने केलेले आहे हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, डॉ.बाबसाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी दादर येथील इंदू मिलची जागा मिळण्या संदर्भात माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांची चर्चा झालेली आहे. दादर येथील इंदू मिलची जागा आपल्याला मिळालीच पाहिजे अशी माननीय मुख्यमंत्र्यांची इच्छा आहे. हा क्रेडीट घेण्याचा विषय नाही. या प्रश्नासाठी विरोधी पक्षाला सोबत घेऊन दिल्लीत जाऊ आणि जागा मिळविण्यासाठी प्रयत्न करु अशा प्रकारची भूमिका सरकारने घेतलेली आहे. हा वादाचा प्रश्न नाही. त्यादृष्टीने जागा मिळविण्यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत.

(काही सन्माननीय सदस्य मध्येच बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**उप सभापती** : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे, माननीय मंत्री महोदयांना त्यांचे भाषण पूर्ण करु द्यावे. त्यानंतर आपले काही प्रश्न असतील ते आपण विचारावेत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, दिल्लीमध्ये आणि राज्यामध्ये त्यांच्या पक्षाचे सरकार आहे. तेव्हा निर्णय घेण्यात काही अडचण नसावी.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, यामध्ये क्रेडीट घेण्याचा प्रश्न नाही. या प्रश्नावर आम्ही सर्वजण एक आहोत हे दाखविण्यासाठी यासाठी मी तसा उल्लेख केलेला आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये अपंगाच्या 271 शाळा असून या सर्व शाळा 100 टक्के अनुदानित आहेत. अन्य राज्यात इतक्या मोठ्या प्रमाणावर अशा शाळा नाहीत. आपल्याकडे अपंगाचे स्वतंत्र महामंडळ आहे जे इतर राज्यांमध्ये फार क्वचित आहे. पूर्वी सहा हजार उत्पन्न असलेल्या अपंगाना आपण कर्ज देत होतो, परंतु आता त्यामध्ये वाढ करुन ही मर्यादा 1 लाख रुपयांपर्यंत वाढविलेली आहे. आपण अपंगाना 25 हजार रुपये कर्ज देत होतो त्यामध्ये वाढ करुन ही मर्यादा



अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे..

दीड लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आलेली आहे. तसेच त्यांना 20 टक्के सबसिडी देण्याची प्रोव्हीजन केलेली आहे. त्यांच्या काही मागण्या येत नाहीत, अपंग मोर्चे काढत नाहीत म्हणून सरकारला त्यांच्या बाबतीत काही संवेदना नाही असा कुणाचा समज असेल तर तो गैरसमज चुकीचा आहे. सन 2002 पूर्वीच्या 138 अपंग शाळांना अनुदान देण्या संदर्भातील फाईल वित्त विभागाकडे आहे. वित्त विभागाने ती फाईल क्लीअर केलेली आहे तेव्हा त्या शाळांना सुध्दा लवकर अनुदान मिळेल असा मला विश्वास आहे.

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दुसरा महत्वाचा प्रश्न उपस्थित केला की, शासनाने सामाजिक न्याय भवन बांधले नाही, निवासी शाळा बांधल्या नाहीत, आणि ज्या बांधल्या आहेत त्यापैकी एकही शाळा सुरु झालेली नाही ही गोष्ट खरी आहे. सभापती महोदय, पूर्वी 100 निवासी शाळा बांधण्याचा निर्णय झाला होता. विधानसभेच्या सन्माननीय अध्यक्षांच्या दालनामध्ये झालेल्या बैठकीला सन्माननीय मुख्यमंत्री,सन्माननीय उप मुख्यमंत्री या सर्वांना बोलाविण्यात आले होते. त्या बैठकीमध्ये असा निर्णय घेण्यात आला होता की, 100 शाळांच्या इमारतींची कामे पूर्ण् होवो अगर न होवो त्या शाळा आपण सुरु कराव्यात. त्यानंतर घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये असे सांगण्यात आले की, ज्या शाळांच्या इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले आहे त्या शाळा या वर्षीपासून सुरु कराव्यात . त्याप्रमाणे 44 ठिकाणी इमारती पूर्ण झाल्या असून त्या ठिकाणी तात्पुरत्या शाळा आम्ही सुरु केल्या आहेत. त्या करिता नोकर भरतीचे काम सुरु केले असून पुढील एक महिन्यात भरती प्रक्रिया पूर्ण होईल. पुढील वर्षी त्या इमारतींचे काम पूर्ण होवो अगर न होवो त्या करिता भाडयाच्या इमारती घेऊन 100 ठिकाणी शाळा सुरु करण्याचा शासनाने निर्धार केलेला आहे.

सभापती महोदय, माझ्याकडे हा विभाग सोपविण्यात आला त्यावेळी राज्यात एकाच ठिकाणी सामाजिक न्याय भवन बांधण्यात आले होते. आम्हाला सहा ठिकाणी हे सामाजिक न्याय भवन बांधावयाचे होते परंतु पाच ठिकाणी जागा मिळालेली नव्हती. आता आम्हाला सर्व ठिकाणी जागा मिळालेली असून त्या ठिकाणी कामे सुरु आहेत, त्यापैकी काही ठिकाणी सामाजिक न्याय भवनाचे काम पूर्ण झाले आहे. त्याठिकाणी लागणारा कर्मचारी वर्ग भरण्याकरिता वित्त विभागाने मान्यता दिलेली आहे. अशाप्रकारे सामाजिक न्याय भवनाच्या पूर्ण झालेल्या इमारती आम्ही तत्काळ ट्रान्सफर करुन दिलेल्या आहेत. आपल्याला माहित आहे की, भवन रिकामे असले की, त्या ठिकाणी रिकामटेकडेपणाचे काम भरपूर होते. रिकामटेकडे या अर्थाने की, त्या ठिकाणी खोडसाळपणा करणे, अलमाऱ्या घेऊन जाणे, पत्ते खेळणे असे प्रकार होत असतात.

सभापती महोदय, आपल्याला हेही माहित आहे की, 80 टक्के आमदारांकडून स्पेशल केस करुन वसतिगृहामध्ये प्रवेश देण्याची मागणी करण्यात येते. त्यांच्या गावातील एखादा गरजू गरीब मुलगा असेल व त्याला कमी टक्के मार्क मिळाले असतील तर त्याला वसतिगृहामध्ये प्रवेश मिळत

श्री.शिवाजीराव मोघे...

नाही. आज तर 80 ते 85 टक्क्यापर्यंत प्रवेश बंद झाले आहेत. या करिता 1 हजार वसतिगृहे आपण बांधलेली आहेत. त्यामध्ये 80 टक्के अनुसूचित जातीसाठी व 20 टक्के इतर जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी राखीव जागा आहेत. ज्या ठिकाणी इमारती पूर्ण झालेल्या आहेत त्या आम्ही ट्रान्स्फर केल्या आहेत. इतर ठिक्राणी सुध्दा ही व्यवस्था करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. आपल्या राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमातीची लोकसंख्या 1 कोटी आहे. हा समाज सुध्दा अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीप्रमाणेच मागासलेला आहे. या वर्गाकडे कै. वसंतराव नाईक यांच्या काळापासून आजपर्यंत शासनाचे पूर्ण लक्ष आहे. या वर्गाकरिता 950 आश्रमशाळा राज्यात सुरु असून त्या 100 टक्के अनुदानित आहेत. त्या 100 टक्के आश्रमशाळा संस्था चालवितात. काही ठिकाणी शाळा चालविण्यामध्ये अडचणी आहेत त्या सोडविण्याचे प्रयत्न सुरु आहेत व त्यामध्ये त्यांना न्याय देण्याचे काम सुरु आहे.

सभापती महोदय, विमुक्त व भटक्या जमातींच्या लोकांना शासन घरे देते परंतु आजही जे लोक गावाबाहेर पाल करुन राहतात त्यांच्याकरिता या वर्षी 20 कोटींची तरतूद करण्यात आली असून घरकुल योजनेमधून त्यांना जास्त जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जेणेकरुन तो आपल्या घरासमोर बगीचा करु शकेल, जनावरे पाळून दुग्धोत्पादन करु शकेल. अशाप्रकारची एक चांगली योजना आम्ही करणार आहोत. या वर्षी 50 कोटींची तरतूद करुन व्ही.जे.एन.टी. समाजाचे जे लोक पाल करुन राहतात त्यांना घरे देऊन त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याची योजना या वर्षीपासून सुरु करीत आहोत.

सभापती महोदय, त्यानंतर बॅकलॉगचा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 14 एप्रिल हा जन्म दिवस आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी 13 एप्रिल रोजी रात्री अकरा वाजता एक निवेदन प्रसिध्द केले की, "उद्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म दिवस असल्यामुळे आज आम्ही असे जाहीर करीत आहोत की, पुढील वर्षभरामध्ये मागासवर्गीयांचा जेवढा अनुशेष असेल तो कोणत्याही परिस्थितीत भरण्यात येईल" हे सांगण्यास मला आनंद होत आहे.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे ॲट्रॉसिटी कायद्याबद्दल काही सन्माननीय सदस्यांनी विचार मांडले आहेत. त्यांनी सांगितले की, यामध्ये कन्विक्शनचे प्रमाण कमी आहे. याबाबतीत शासनाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे....

वित्त व संसदीय कार्य विभागाच्या मान्यतेने एक महत्वपूर्ण निर्णय घेतला असून त्या बाबत मंत्रीमंडळापुढे जाऊन सहा महसूली विभागामध्ये आम्ही सहा स्वतंत्र न्यायालये स्थापन करणार आहोत. त्या ठिकाणी जी काही प्रकरणे प्रलंबित असतील ती निकाली काढण्यात येतील. यामध्ये दोन प्रकारच्या केसेस असतात, काही ठिकाणी खोटया केसेस दाखल करुन सर्वसामान्य माणसाला त्रास दिला जातो तर काही ठिकाणी खरोखरच एखाद्या व्यक्तीवर अन्याय होतो त्याला देखील न्याय मिळत नाही. याकरिता सहा स्वतंत्र न्यायालये स्थापून या लोकांना लवकर न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी मला सेनगाव पंचायत समितीला भेट देण्यास सांगितले आहे. त्या पंचायत समितीच्या सभापती मागासवर्गातील एक महिला असून त्यांच्यावर अन्याय होत असेल तर मी स्वत: जावून त्यांची भेट घेईन. राज्यात असे प्रकार कुठेही होऊ नयेत आणि होत असतील तर ती शासनाच्या दृष्टीने गंभीर बाब आहे असे मी आपल्याला सांगू इच्छितो. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी "लोकराज्य" च्या अंकामध्ये श्री. गंगाधर पानतावणे यांच्यासारख्या महत्वाच्या साहित्यिकांचा उल्लेख झाला नाही असे सांगितले. या बाबत अनवधानाने उल्लेख करावयाचा राहिला असेल तर "लोकराज्य" अंकाच्या संपादकांना त्या बाबतीत जे काही करता येईल ते करावे असे सांगण्यात येईल.

सभापती महोदय, व्यसन मुक्तीच्या संदर्भात शासनाची भूमिका सांगून मी माझे भाषण संपविणार आहे. हा प्रश्न केवळ मागासवर्गीयांपुरता मर्यादित नसून सर्वांचाच प्रश्न आहे. व्यसनमुक्ती हा विषय मनुष्याला पटकन समजत नाही परंतु महिलांना पटकन समजतो. दारु पिणारा माणूस हा आपली आई, पत्नी, बहिण, मुलगी यांच्यावर पहिला हल्ला करतो. या करिता दारु, गुटखा, गांजा असो या संदर्भात मंत्रीमंडळाने एक चांगला निर्णय घेतला असून केवळ कायदा करुन व्यसनमुक्ती होऊ शकत नाही. आपण गडचिरोली, वर्धा या जिल्ह्यामध्ये देखील पहातो की त्या ठिकाणी लोक जास्त दारु पितात, परंतु ती महाग असलेली पितात. सभापती महोदय, व्यसनमुक्ती ही केवळ सरकारच्या भरवशावर होऊ शकत नाही. व्यसनमुक्तीचे काम हे प्रचंड स्वरुपाचे आहे, ते लोकांनीच करावे लागेल. सर्वांच्या सहभागाने आपण व्यसनमुक्तीचे काम हाती घेऊ या. याकरिता सर्वांचे सहकार्य मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पडांगळे : सभापती महोदय, या सभागृहामध्ये सन्माननीय मुख्यमंत्री व सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन करीत असतांना सांगितले आहे की, इंदू मिलच्या जागे संदर्भात केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्र्यांबरोबर चर्चा झाली असून इंदू मिलची जागा डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासाठी, चैत्यभूमीसाठी देण्याचे त्यांनी कबूल केले आहे. त्या प्रमाणे या सभागृहामध्ये घोषणा करण्यात आली त्यावेळी सर्व सन्माननीय सदस्यांनी बाके वाजवून त्या घोषणेचे स्वागत केले आहे. असे असतांना सन्माननीय सामाजिक न्यायमंत्री परत मागे कशासाठी जात आहेत? ते म्हणाले की, विरोधी पक्षनेत्यांचे शिष्टमंडळ घेऊन दिल्लीला जाणार आहे. या पैकी खरे काय आहे? एका बाजूला निर्णय झाला असल्याचे सांगितले जाते आणि दुसऱ्या बाजूला सामाजिक न्यायमंत्री शिष्टमंडळ घेऊन जाणार असल्याचे सांगतात. यामध्ये आपण कुणाची फसवणूक करीत आहात, ही फसवणूक आपण किती वेळा करणार आहात, या आंबेडकरवादी पददलित समाजाला आपण किती वेळा फसविणार आहात असा माझा प्रश्न आहे?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, निर्णय झाल्याचे मी सांगितलेले नाही. ती जागा एनटीसीच्या ताब्यात असल्यामुळे ती मिळविण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरु आहेत असे मी सांगितले आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, महार वतनाच्या जमिनीच्या संदर्भात मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. त्या संदर्भात मंत्रीमहोदयांनी खुलासा केलेला नाही.

(गोंधळ)

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिल्यानंतर एखाद-दुसऱ्या सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला तर ती गोष्ट वेगळी आहे. परंतु आता या ठिकाणी सर्वच सन्माननीय सदस्य प्रश्न विचारावयाला लागले तर या प्रस्तावावर झालेल्या चर्चेला काही अर्थच रहाणार नाही.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, महार वतनाच्या जमिनीचा उल्लेख उत्तराच्या भाषणामध्ये आलेला नाही. तो एक महत्वाचा मुद्दा आहे.

( अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात )

**उप सभापती** : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

या प्रस्तावावरील चर्चा संपलेली आहे. आता कोणाही सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारता येणार नाहीत.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी "नागपूर येथील विद्यापीठाच्या नवीन अभ्यासक्रमात मराठीचा समावेश परदेशी भाषेमध्ये असून सदर प्रकरणाबाबत विद्यापीठाचे प्रवक्ते यांच्याशी विद्यार्थ्यांनी संपर्क साधला असता कायद्याचा अभ्यास करण्यासाठी परदेशी विद्यार्थी येतात, त्यांच्यासाठी मराठी भाषा ही परदेशी आहे अशा पध्दतीचा खुलासा केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "पाथरी जि.परभणी येथे शासनाने बी.ओ.टी. तत्वावर पंचायत समिती व व्यापारी संकुले उभारणीस कंत्राटदाराला विविध अटी, निकष, नियम यांची पूर्तता करुन प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करण्यास निर्देश दिले असताना कंत्राटदाराने अटींची पूर्तता न करता बांधकाम केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी "नाशिक, बारामती, सांगली येथील द्राक्ष फळांवरील आधारित वाईनला राज्य उत्पादन शुल्कामध्ये जशी सवलत दिली जाते त्याचप्रमाणे कोकणातील आंबा, काजू, फणस, करवंद, जांभूळ, चिकू, आवळा, चिंच, रतांबे इत्यादी फळांवरील प्रक्रिया युनिटला उत्पादन शुल्क माफ करण्याचा निर्णय घेणेबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पाशा पटेल, रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर यांनी " भिवंडी निजामपूर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक खर्चात आयुक्तांनी केलेला गैरप्रकार व भ्रष्टाचार " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती......**

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, धनंजय मुंडे यांनी "राज्यातील साखर कारखान्यांमध्ये ऊस गाळत असताना वीज निर्मिती करण्याची गरज" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी "बीड जिल्हयातील गोदाकाठच्या गावांना दरवर्षी जायकवाडी प्रकल्पात पाणी वाढल्यानंतर पुराचा धोका निर्माण होत असून या गावांचे पुनर्वसन तसेच आपत्ती व्यवस्थापन साहित्य पुरवठा करण्याची आवश्यकता असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी "मुंबईतील ऑपेरा हाऊस परिसरातील हिरे व्यापाऱ्यांनी शासनाचा विक्रीकर बुडविल्याचे निदर्शनास येऊन अद्यापपर्यंत त्यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल न होणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, धनंजय मुंडे यांनी "संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना यामधील बहुतेक ठिकाणी काही लाभार्थ्यांच्या मृत्यूनंतर सुध्दा बँकेत पैसे जमा होण्याचे घडत असलेले प्रकार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "वैद्यकीय अभ्यासक्रम एम.बी.बी.एस.साठी संपूर्ण भारतात एकच सी.ई.टी ही 'नीट' प्रवेश परीक्षा वेगळया धर्तीवर असल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वेळ कमी मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

---

....4...



SMT/ ST/ KGS/ AKN/ KTG/ 15:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अल्पसंख्यांकाच्या पाल्यांना शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती न होणे.

**मु. शी.** : अल्पसंख्यांकाच्या पाल्यांना शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती न होणे या बाबत सर्वश्री पाशा पटेल, रामनाथ मोते, धनंजय मुंडे, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

प्रा. फौजिया खान ( अल्पसंख्यांक विकास मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : निवेदनावर फक्त एकच उप प्रश्न विचारता येईल.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, अनुसूचित जाती जमाती व भटक्या जमातीतील वैद्यकीय, अभियांत्रिकी व अन्य व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना 100 टक्के शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्काची मदत मिळते. सच्चर समितीच्या अहवालानुसार मुस्लिम समाज हा दलितापेक्षा दलित झालेला आहे असा माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग साहेबांनी उल्लेख केलेला आहे. या निमित्ताने मला शासनाला फक्त एकच प्रश्न विचारावयचा आहे की, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसारखे अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना त्या त्या कॉलेजची फी दिली जाईल काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्नात उल्लेख केल्या प्रमाणे 100 टक्के रीएम्बर्समेन्ट फक्त एस.सी., एस.टी.च्या विद्यार्थ्यांसाठी होते. बाकीच्या संवर्गातील विद्यार्थ्यांसाठी होत नाही. ही योजना अल्पसंख्यांक विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येते आणि अल्पसंख्याक विद्यार्थी ज्या शैक्षणिक अभ्यासक्रमात शिक्षण घेत असतील त्या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे वार्षिक शैक्षणिक शुल्क किंवा 25 हजार रुपये या पध्दतीची रक्कम शिष्यवृत्ती म्हणून देण्यात येते. ही बाब खरी आहे की, 25 हजार रुपये ही कमी रक्कम आहे. पण हा विभाग सुध्दा नवीन आहे त्यामुळे या विभागाची या योजनेसाठीची एकूण बजेटरी प्रोव्हिजन एस.सी.,एस.टी.च्या विद्यार्थ्यांप्रमाणे नाही. पण सन्माननीय सदस्यांची भावना लक्षात घेऊन ही तरतूद वाढविण्याच्या संदर्भात विभागाच्या माध्यमातून आवश्य शिफारस करण्यात येईल.

**उप सभापती** : सम्माननीय सदस्य श्री एस.क्यू.जमा जी, मैंने पहले ही कहा है कि एक निवेदन पर एक ही प्रश्न पूछा जाएगा.

श्री एस.क्यू.जमा : सभापति महोदय, मैं माननीय मंत्री महोदय को धन्यवाद देना चाहता हूं. क्योंकि उन्होंने कहा है कि इस पर सहानुभूतिपूर्वक विचार करेंगे. मेरा एक ही प्रश्न है. एससी, एसटी के लिए जो 100 प्रतिशत ग्रांट मिलती है. सरकार ने इसके लिए 25 हजार रुपये की लिमिट रखी है. यह मायनॉरिटी डेवलपमेंट से संबंधित प्रश्न है. माननीय प्रधानमंत्री जी के 15 सुत्री कार्यक्रम में अल्पसंख्याक के लिए 15 प्रतिशत का बजट हर विभाग में निर्धारित किया गया है और महाराष्ट्र शासन ने उसको मान्य कर के 2006 में सभी विभाग को यह आदेश सर्क्यूलेट किया है.प्राथमिक शिक्षा विभाग का साल का जो बजट है,उसका 15 प्रतिशत ॲलोकेशन यदि

...6...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस.क्यु, जमा......

आपने अलग किया और उससे हमारे बच्चों के लिए, गरीब और पिछड़े मुस्लिम समाज के विद्यार्थी है, उन पर खर्च कर सके तो उन बच्चों की उन्नति हो सकेगी. अत: क्या यह राशि 25 हजार रुपये से बढ़ाकर 50-60 हजार रुपये कर सकते है ? क्योंकि आदेश के मुताबिक हर खाते में 15 प्रतिशत का बजट ॲलोकेशन होना चाहिए. 25 हजार रुपये की रक्कम आप उस फंड से, मायनॉरिटी डेवलपमेंट डिपार्टमेंट के बाहर, अपने विभाग से करने का प्रावधान कर सकते है क्या ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी प्रश्न विचारला आहे परंतु उच्च शिक्षण विभागामध्ये अशा पध्दतीने अल्पसंख्याकांचे बजेटिंग केले जात नाही. अल्पसंख्यांकाचे बजेटिंग अल्पसंख्यांक विभागाच्या वतीने केले जाते. आमच्या विभागाकडे फक्त वितरित केले जाते. मात्र बजेटिंग तिकडेच केले जाते. सभापती महोदय, मी या ठिकाणी एवढेच सांगेन की, फी रीएम्बर्समेन्टची जी स्कीम आपल्या राज्यामध्ये चालू आहे, त्यामध्ये एस.सी.,एस.टी.च्या विद्यार्थ्यांसाठी 100 टक्के आणि ओ.बी.सी.,व्ही.जे.एन.टी.वगैरे विद्यार्थ्यांसाठी 50 टक्के फीचे रींएम्बर्समेन्ट केले जाते. अल्पसंख्यांकामध्ये जे एस.सी.,एस.टी. आणि ओ.बी.सी.वगैरे असतात त्यांना ही योजना लागू आहेच सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी प्रश्न विचारला की, 25 हजार रुपयाची जी अपर लिमिट आहे ती वाढवावी, तेव्हा या बाबतीत वाढ कशी करता येईल या बाबतीत शासन निश्चितपणे विचार करील.

----

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

..7...

**नियम 93 अन्वयेच्या निवेदन क्रमांक 2 बाबत**

**उप सभापती** : नियम 93 अन्वयेच्या निवेदन क्रमांक 2 बाबत संबंधित माननीय मंत्री महोदय सभागृहात आता उपस्थित नसल्यामुळे हे निवेदन नंतर चर्चेला घेण्यात येईल.

---

**पृ. शी.** : रोजंदारी कामगारांना 5 वा वेतन आयोग लागू करण्यात येवून रोजंदारी कामगारांना कायम करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी न होणे

**मु. शी.** :रोजंदारी कामगारांना 5 वा वेतन आयोग लागू करण्यात येवून रोजंदारी कामगारांपा कायम करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी न होणे या बाबत श्री. जयंत प्र.पाटील यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना.

**उप सभापती** : सूचना देणारे सन्माननीय सदस्य अनुपस्थित आहेत परंतु या सूचने बाबतचे निवेदन सन्माननीय मंत्री महोदयांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावे.

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्य सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : श्री. प्रशांत लहाने यांनी उल्हासनगर महानगरपालिकेच्या इमारतीसमोर केलेले आत्मदहन

**मु. शी.** : श्री. प्रशांत लहाने यांनी उल्हासनगर महानगरपालिकेच्या इमारतीसमोर केलेले आत्मदहन यासंबंधी माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री. प्रशांत लहाने यांनी दि. 2.8.2011 रोजी सकाळी 9.45 वाजता उल्हासनगर महानगरपालिकेच्या इमारतीसमोर आत्मदहन केल्याबाबतच्या विषयावर मी आपल्या अनुमतीने पुढील निवेदन करीत आहे:-

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ AKN/ ST/

**उप सभापती** : हा प्रश्न माझ्या ठाणे जिल्ह्यातील माझ्याच मतदारसंघातील आहे. या संदर्भात माझ्याकडेही बरीच माहिती आलेली आहे आणि त्या माहितीच्या संदर्भात उद्या त्या ठिकाणचे डी.सी.पी. आणि त्या पोलीस ठाण्याचे पोलीस इन्स्पेक्टर यांना मी सकाळी 11.00 वाजता बैठकीला बोलविले आहे. माझी माननीय गृह राज्यमंत्र्यांना विनंती आहे. उद्या मी आपल्याला आठवण करुन देईन. आपल्याला जर वेळ असेल आणि आपण बैठकीला आला तर जास्त बरे होईल.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, ठीक आहे.

----

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ AKN/ ST/

**पृ. शी.** : नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावरील धावपट्टीवर जनावरे विमानांच्या चाकाखाली येऊन मृत होण्याचे वाढलेले प्रमाण

**मु. शी.** : नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावरील धावपट्टीवर जनावरे विमानांच्या चाकाखाली येऊन मृत होण्याचे वाढलेले प्रमाण यासंबंधी श्री. एस.क्यु.जमा,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. एस. क्यु. जमा ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावरील धाव पट्टीवर मागील काही दिवसापासून पाळीव / जंगली जनावरे विमानाच्या चाकाखाली येवून मृत होण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येणे, अशा घटनांमुळे मोठा अपघात होवून मोठ्या प्रमाणात जीवित हानी होण्याचा धोका उत्पन्न होणे, सदरील धावपट्टीच्या व विमानतळाच्या परिसराची सुरक्षेच्या दृष्टीकोनातून शासनाने उपाययोजना करण्याची गरज व शासनाची प्रतिक्रिया."

प्रा. फौजिया खान ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ AKN/ ST/

श्री एस.क्यू.जमा : सभापति महोदय, नागपुर विमानतल पर पिछले दो महीने में ऐसी 5-6 घटनाएं हुई है जिससे बड़ी विमान दुर्घटना टल गई. माननीय मुख्यमंत्री जी के ध्यान में यह बात आयी इसलिए उन्होंने विभागीय आयुक्त की जांच करने के लिए नियुक्ति की. उन्होंने जांच के दौरान यह पाया कि वहां पर बहुत सारे उपाय करने की आवश्यकता है. शासन ने जवाब में लिखा है कि वहां पर जानवर हटाने के लिए तथा कम्पाऊण्ड वॉल ठीक करने के लिए व्यवस्था की गई है. लेकिन एअरपोर्ट का रखरखाव करने वाली एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया और इसकी ज्वाइंट वेंचर कंपनी एमआईएल के पास पैसा ही नहीं है. एअरपोर्ट से उनकी डेली की जो आमदनी है उससे उनके पास कोई बड़ा फंड उपलब्ध नहीं है कि जिससे वे रिपेअर का काम वहां पर कर सके. इसलिए मेरा यह प्रश्न है कि एमआईएल को महाराष्ट्र शासन की ओर से विमानतल सुधारने के लिए, उसके ऑपरेशन्स को ठीक करने के लिए, विमान यात्रा और विमान को सुरक्षित करने के लिए कोई विशेष निधि देने की योजना है क्या ताकि तत्काल कुछ काम हो सके ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या बाबतीत सांगू इच्छिते की, नागपूर विमानतळावर एका फ्लाईटसमोर एक डुक्कर आले होते आणि एका दुर्घटनेपासून ते वाचले. त्यानंतर अनेक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत आणि त्याचा उल्लेख निवेदनामध्ये करण्यात आलेला आहे. अशी दुर्घटना होऊ नये म्हणून रन-वे गार्डची नियुक्ती करण्यात आलेली आहे. ते प्रत्येक फ्लाईटच्या 45 मिनिटांपूर्वी स्क्रुटीनी करतात, झोन गन्स फायर करतात. त्याशिवाय वन विभागाच्या मदतीने प्राणी पकडून बाहेर काढण्यात आलेले आहेत. ऑपरेशनल एरियामध्ये महानगरपालिकेच्या मदतीने कुत्र्यांना बाहेर काढण्याचे काम करण्यात आले आहे. 13.4 किलोमीटरची जी कंपाऊंड वॉल आहे त्या ठिकाणी अर्ध्या फुटाच्या 12 ठिकाणी भेगा पडल्या होत्या, 8 इंचाची 86 भोके पडली होती, त्या ठिकाणी लोखंडी जाळ्या लावण्यात आल्या, डागडुजी करण्यात आली. त्याशिवाय 117 हेक्टरचा वायुसेनेचा भाग आहे. त्यांना सुध्दा विनंती करण्यात आली होती पण त्यांच्याकडून अजून काही करण्यात आलेले नाही. त्यांना पुन्हा विनंती करण्याचे काम शासनाकडून करण्यात येणार आहे. सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेली आहे की, मिहानखाली हा सगळा प्रकल्प आहे. हा मोठा प्रकल्प असून यामध्ये मोठा निधी खर्च करुन सगळे काम होणार आहे आणि शासन यावर लक्ष ठेऊन आहे.

---

...5...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्र. 2 नंतर घेण्याबाबत**

**उप सभापती** : मी माननीय गृहमंत्री तसेच गृह राज्यमंत्री यांना सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य एका बैठकीला गेले असल्यामुळे त्यांनी मला विनंती केलेली आहे की माझी लक्षवेधी सूचना नंतर घ्यावी त्यामुळे आजच्या कामकाजातील दुसरी लक्षवेधी सूचना मी नंतर पुकारतो.

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : इंडियन इमू लाईफ प्रा. लि. कंपनीकडे नशिक परिसरातील हजारो शेतकऱ्यांचे दोनशे कोटी रुपये अडकून पडणे

**मु. शी.** : इंडियन इमू लाईफ प्रा. लि. कंपनीकडे नशिक परिसरातील हजारो शेतकऱ्यांचे दोनशे कोटी रुपये अडकून पडणे यासंबंधी सर्वश्री जयवंतराव जाधव, हेमंत टकले, अनिल भोसले, रमेश शेंडगे, संदिप बाजोरिया, पाशा पटेल, धनंजय मुंडे, केशवराव मानकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयवंतराव जाधव ( नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पशुसंवर्धन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"इमू पालनाच्या नावाखाली नाशिक परिसरातील हजारो शेतकऱ्यांना फसवणाऱ्या इंडियन इमू लाईफ प्रा.लि. कंपनीकडे शेतकऱ्यांचे सुमारे दोनशे कोटी रुपये अडकून पडणे, राज्यातील इमू हॅचरीज चालक इमूची अंडी खरेदी करण्यास टाळाटाळ करत असल्याने इमू पालक शेतकऱ्यांची होत असलेली कुचंबणा, परिणामी इमू व्यावसायिक शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष व निराशेची भावना, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. गुलाबराव देवकर ( पशुसंवर्धन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ AKN/ ST

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत मी आपल्याला एक विनंती करतो. यामध्ये कलम 420 चे गुन्हे सुध्दा झालेले आहेत त्यामुळे माननीय गृह राज्यमंत्र्यांना सुध्दा यामध्ये लक्ष घालण्याची विनंती करावी. सभापती महोदय, आज देशात आणि राज्यात सगळीकडे शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे, भारताचा अविभाज्य भाग आहे आणि त्याला विविध अंगाने कोठे तरी जोडधंदा मिळावा या हेतूने शासन असेल किंवा इतर निमशासकीय कंपन्या असतील त्यांच्या माध्यमातून या शेतकऱ्यांना जोडधंदा देण्याच्या निमित्ताने, उदरनिर्वाहाच्या साधनाकरिता अधिक काही उपाययोजना करण्याच्या दृष्टीकोनातून इमू पालन हा व्यवसाय पुढे आलेला होता.

सदरहू व्यवसायामध्ये 30 ते 35 हजार रुपयांमध्ये इमूची एक जोडी मिळते. इमू हा मुरुम खाऊन जगणारा प्राणी आहे. सुरुवातीला असे सांगण्यात आले होते की, 500 रुपयाला एक याप्रमाणे इमूची अंडी विकली जातील. 500 रुपयाला एक याप्रमाणे इमूच्या अंड्याची असलेली किंमत नंतर 1 हजार रुपये, दीड हजार रुपये, दोन हजार रुपयांपर्यंत गेलेली होती. परंतु अशी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर शेतकऱ्यांना असे वाटावयास लागले होते की, आपल्याला अशा पध्दतीने या इमूच्या व्यवसायातून खऱ्या अर्थाने जोडधंदा मिळेल आणि म्हणून शेतकरी या जोडधंद्याच्या निमित्ताने या व्यवसायाकडे आकर्षित झाला. त्या निमित्ताने शेतकऱ्यांनी या व्यवसायाला सुरुवात केली. इमूच्या अंड्याची किंमत 2 हजार रुपयांपर्यंत गेल्यानंतर, दरम्यानच्या काळामध्ये या इमू व्यवसायाची कोठे तरी चांगली उन्नती होत होती, हा व्यवसाय कोठे तरी वाढीस लागत असताना ज्या हॅचरीज कंपन्या होत्या त्यांनी इमूची अंडी घेण्यासच नकार दिला. त्या अंड्यांची किंमत 100 रुपये, 200 रुपये, 300 रुपयांपर्यंत खाली आली. यामध्ये इमू पालनाचा आणि अंड्यांचा विषय होता पण या दरम्यान समाजातील काही समाजकंटकांनी इमू पालनाचा व्यवसाय अतिशय चांगल्या पध्दतीने जात आहे अशा पध्दतीचे चित्र समाजामध्ये निर्माण केले.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव....

समाजामध्ये ज्या विघातक शक्ती आहेत त्यांनी व समाजकंटकांनी गैरफायदा घेऊन इमू पालनाच्या व्यवसायाच्या नावाखाली आज 1 हजार रुपये गुंतवा, 21 दिवसांनी 3 हजार रुपये मिळवा, 1 लाख लाख रुपये गुंतवा, 30-35 दिवसांनी 3 लाख रुपये मिळवा, अशा पध्दतीने नाशिक, बीड व इतर जिल्ह्यांनी धंदा सुरु केला आहे. यामध्ये गोरगरीब जनता, शेतकरी या योजनेकडे आकर्षित झालेला आहे. त्यांना जी काही किंमत मिळत होती ती त्यामध्ये गुंतविली आहे. म्हणून नाशिक जिल्ह्यात या ज्या काही कंपन्या होत्या त्या कंपन्यांनी हा धंदा मांडला होता. नाशिक जिल्ह्यामध्ये अशाप्रकारे 1 हजार कोटींच्या ठेवी स्वीकारण्यात आल्या आहेत.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपला प्रश्न विचारावा.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, नाशिक जिल्ह्यात इमू पालनाच्या अंतर्गत गैरव्यवहार झालेला आहे. त्या अनुषंगाने 1 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली होती. गुंतवणूक करुन घेणाऱ्या कंपनीच्या सर्व संचालकांना आज फरार म्हणून घोषित केलेले आहे. पोलीस स्टेशनमध्ये केवळ कलम 420 अन्वये गुन्हा दाखल करुन संबंधित ठिकाणच्या समाजकंटकांनी त्यांना आज फरार केलेले आहे. इमू पालन व्यवसायाच्या निमित्ताने ज्यांनी लोकांची फसवणूक केली आहे त्यांच्यावर कारवाई केली जाईल काय व 1 हजार कोटी रुपये गुंतवणूक घेऊन जे फरार झाले आहेत त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, नाशिक जिल्ह्यात इमू पालनाचा व्यवसाय सुरु झाला होता. जसजसा तो व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढू लागला तसतसे लोकांना फसविणाऱ्या कंपन्या राज्यात निर्माण झाल्या. त्यामध्ये एक प्रकार नुकताच उघडकीस आला. इंडियन इमू लाईफ प्रा.लि.कंपनी, पंचवटी, नाशिक या कंपनीने एक योजना लोकांसमोर आणली. त्यामध्ये त्यांनी सांगितले की, तुम्ही एका अंडयात दोन हजार रुपयांची गुंतवणूक केली तर 3 महिन्यामध्ये तुम्हाला 3720 रुपये मिळतील. साहजिकच थोड्याशा लोभामुळे अनेक लोकांनी या योजनेत पैसे गुंतविले. शासनाकडे जी माहिती उपलब्ध झाली आहे त्यानुसार श्री.रंगनाथ राजकृष्ण वाजे रा.पांढुर्ली, ता.सिन्नर व त्यांच्या 18 साथीदारांनी या योजनेत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली होती. गुंतवणूक

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर......

केल्यानंतर मुदत संपल्यानंतर पैसे मागण्यासाठी गेले तर कोणीही मालक किंवा इतर कोणीही सापडले नाही. त्यामुळे त्यांच्या असे लक्षात आले की, गुंतवणूक केलेला पैसा बुडालेला आहे. त्यांची फसवणूक झाली आहे. त्यामुळे श्री.रंगनाथ वाजे व त्यांच्या सहकाऱ्यांनी दिनांक 13.2.2011 रोजी देवळाली पोलीस कॅम्प पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला. त्यानंतर संबंधित गुन्हेगारांवर कलम 420 खाली व इतर कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यात सुध्दा अशा प्रकारची फसवणूक करण्यात आली आहे. श्री.हरीष जयप्रकाश दीक्षित यांनी अशा प्रकारची योजना आणून 72,66,800 रुपयांची लोकांची फसवणूक केली आहे. शिवाजीनगर, बीड येथे 2.5.2011 रोजी फिर्याद दाखल झालेली आहे. कलम 419, 420 व 434 अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कंपनीचे कोणतेही कार्यकर्ते, पदाधिकारी पोलिसांना आढळून आले नाहीत, अशा प्रकारची माहिती पोलीस स्टेशनकडून शासनाला प्राप्त झाली आहे. यात जवळपास 12 लोकांविरुध्द गुन्हे दाखल झालेले आहेत.

**उप सभापती** : मंत्री महोदय, या लोकांच्या मालमत्तेविषयी वर्तमानपत्रात बातम्या आल्या आहेत. हे लोक फरार झालेले आहेत. परंतु या लोकांच्या मालमत्ता शासनाने जप्त कराव्यात, अन्यथा त्या सुध्दा हातातून जाण्याची शक्यता आहे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, त्यासंबंधी नाशिकच्या पोलीस स्टेशनने कारवाई केली आहे.

**उप सभापती** : पोलीस स्टेशनने कलम 420 अन्वये गुन्हा दाखल करण्याच्या पलीकडे काहीही केलेले नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही घटना पाहिली तर यामध्ये शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात फसविले गेले आहे. म्हणून सीआयडी मधील एस.पी.लेव्हलच्या अधिकाऱ्यामार्फत त्यांना दोन पोलीस निरीक्षक व इतर कर्मचारी देऊन अतिशय तातडीने या गुन्ह्याची चौकशी केली जाईल व या लोकांच्या मालमत्ता जप्त करण्यापासून ते त्यांना अटक करण्यापर्यंतच्या सर्व कारवाया केल्या जातील.

3....



NTK/ AKN/ ST/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, हा प्रश्न एका जिल्ह्यापुरता नाही तर सबंध महाराष्ट्रात निर्माण झाला आहे.

श्री.आर.आर.पाटील : या इमूचे वाटप करुन, त्याची अंडी देऊन लोकांची फसवणूक केलेली आहे. राज्यात जेवढ्या घटना घडल्या आहेत, तक्रारी आलेल्या आहेत त्या सीआयडीकडे सर्व एकत्र केल्या जातील. या प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्यामुळे सीआयडीमधील एस.पी.दर्जाच्या अधिकाऱ्यांना दोन चांगले अधिकारी व आवश्यक तो कर्मचारी वर्ग दिला जाईल. स्थानिक पोलीस स्टेशन सीआयडीच्या मार्गदर्शनाखाली काम करतील. परंतु मुख्य तपासाची जबाबदारी सीआयडीकडे असेल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, इंडियन इमू लाईफ प्रा.लि.कंपनी, नाशिक या कंपनीचे संचालक श्री.हरीष दीक्षित यांच्याविषयीची सर्व माहिती निवेदनात दिली आहे. या राज्यातील शेतकरी 20-25 हजार रुपयांच्या कर्जापोटी आत्महत्या करीत आहेत. या शेतकऱ्यांचे 28 कोटी रुपये, 11 लाख रुपये, 72 लाख रुपये इतक्या मोठ्या रक्कमांची फसवणूक झाली आहे. देवळाली कॅम्पमध्ये गुन्हा नोंदविला गेला आहे, बीडमध्ये गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. परंतु श्री.हरीष दीक्षित व त्यांच्या सहकाऱ्यांना अटक कधी होणार आणि त्यांच्या मालमत्तांवर टाच कधी आणणार आहात असा माझा पहिला प्रश्न आहे. या निवेदनात जे नमूद केले आहे ते शासनाच्या दृष्टीने भयानक आहे. "सद्यस्थितीत इमू पालनासाठी राज्य शासनाची कोणतीही योजना मंजूर नाही" एकीकडे कुक्कुट पालन चालते, शेळीमेंढी पालन चालते, दुधदुभत्यासाठी अनेक योजना आहेत. ऑस्ट्रेलियामधील अर्थव्यवस्थेत इमू पालनाचा मोठ्या प्रमाणात उपयोग होत असेल तर आपले राज्य शासन इमू पालनाच्या या वर्षात काही योजना तरी बनविणार आहे काय, हा एकमेव पक्षी असेल, ज्याच्या नखापासून ते पिसांवर आधारित उद्योग केले जातात. त्यामुळे इमू पालनासाठी राज्यात कोणतीही योजना नसावी हे दुर्दैव म्हणावे लागेल. शासन यासाठी काही नवीन योजना बनविणार आहे काय ?

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांना मी सांगू इच्छितो की, या कंपन्यातील लोकांनी या योजनेद्वारे आतापर्यंत शेतकऱ्यांना गंडा घातला आहे. पण शासनाने काही योजना आणली तर हे लोक राज्यालाच गंडा घालतील.

4...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : ही वस्तुस्थिती आहे.  या इमू पालनातील केवळ गुन्हेगारीबद्दलचे निवेदन समोर आले आहे. कोकणात इमू पालन मोठ्या प्रमाणात होत आहे.  म्हणून त्याच्या अंड्यांची विक्री, पक्षांची विक्री करण्यासाठी नवीन योजना राबविली जाईल काय व कधीपासून राबविली जाईल ?

यानंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत चांगली सूचना केली आहे. "इमूपालन" या व्यवसायाच्या बाबतीत कृषी विभागाने जरी कोणतीही योजना केली नसली तरी सन्माननीय सदस्यांनी उदाहरण दिल्याप्रमाणे इतर देशात जाऊन या व्यवसायाबाबत पाहणी करण्यात येईल. त्यासंबंधीची माहिती घेऊन आपल्या राज्यात देखील तसे धोरण निश्चितपणे तयार केले जाईल.

-------

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नवीन सुरक्षा रक्षक महामंडळाच्या स्थापनेमुळे जुन्या सुरक्षा रक्षक मंडळात नोंदणी झालेल्या सुरक्षा रक्षकांवर ओढवलेले बेकारीचे संकट

**मु.शी.**: नवीन सुरक्षा रक्षक महामंडळाच्या स्थापनेमुळे जुन्या सुरक्षा रक्षक मंडळात नोंदणी झालेल्या सुरक्षा रक्षकांवर ओढवलेले बेकारीचे संकट यासंबंधी श्री दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : महोदय, नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सन 1981 मध्ये स्थापन करण्यात आलेल्या राज्य सुरक्षा रक्षक मंडळात सभासदत्वासाठी विहित आठवी उत्तीर्ण ही शैक्षणिक अर्हता धारण करणारे सुमारे 23 हजार सभासद नोंदणीकृत असणे, मात्र शासनाने नुकतीच गृह खात्यातंर्गत बॅलार्ड पिअर, मुंबई येथे नवीन सुरक्षा रक्षक महामंडळाची स्थापना करताना त्यात सभासदत्वासाठी बारावी उत्तीर्ण ही अर्हता निश्चित करणे, परिणामी जुन्या सुरक्षा रक्षक मंडळाच्या सभासदांना या नव्या महामंडळाचे सदस्यत्व दुरापास्त होणे, तसेच गृह खात्याने सर्व निम सरकारी आणि सरकारी कार्यालये तसेच अन्य कंपन्या यांना पत्र पाठवून महामंडळातील सुरक्षा रक्षकांच्या सेवा घेण्याबाबत सूचना करणे, परिणामी जुन्या सुरक्षा रक्षक मंडळातील सुरक्षा रक्षकांवर ओढवलेली उपासमारीची पाळी, त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व प्रतिक्रीया."

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : महोदय, या लक्षवेधी सूचनेत सुरुवातीला सांगितले आहे की, सन 1981 मध्ये स्थापन करण्यात आलेल्या राज्य सुरक्षा रक्षक मंडळात सभासदत्वासाठी विहित आठवी उत्तीर्ण ही शैक्षणिक अर्हता धारण करणारे सुमारे 23 हजार सभासद नोंदणीकृत आहेत. त्यानंतर शासनाने नवीन सुरक्षा रक्षक महामंडळाची स्थापना केली व त्यात ही अर्हता बारावी पास ठेवली आहे. पूर्वीची अर्हता आठवी पास असून त्या जवळपास 30 हजार सुरक्षा रक्षकांवर या नवीन महामंडळामुळे बेकारीचे संकट ओढवणार आहे, असे दिसते. मागील वेळेस सभागृहात उत्तर देत असताना माननीय गृह मंत्र्यांनी सांगितले होते की, सुरक्षा रक्षक मंडळाच्या संदर्भात नियम 24 च्या बाबतीतील कार्यवाही तहकूब ठेवण्यात येईल, या कायद्यामध्ये तशी दुरुस्ती करावी लागणार आहे. अनेक आस्थापना सुरक्षा रक्षकांची मागणी करतात. पण नवीन महामंडळामुळे जुने सुरक्षा रक्षक बेकार होणार आहेत आणि नवीन महामंडळाचे जे बॅलॉर्ड पियरला कार्यालय आहे तेथे नवीन सभासदांची नोंद होणार आहे. 30 वर्षापूर्वीचे हे जुने सुरक्षा रक्षक मंडळ असून त्या मंडळाच्या माध्यमातून आज राज्यात नोंदणीकृत असलेल्या 30 हजार सुरक्षा रक्षकांपुढे बेकारीचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

नवीन सुरक्षा रक्षक महामंडळाच्या निर्मितीमागे शासनाचा उद्देश असा आहे की, जे निवृत्त जवान असतील त्यांना यात सामावून घ्याव. तसेच त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, कायद्यातील ज्या तरतुदीमुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे त्या कायद्यात बदल करावा लागेल, तो बदल आपण केला आहे काय, तसेच जुन्या सुरक्षा रक्षक मंडळाच्या आस्थापना कायम राहतील आणि त्या आस्थापना गृह विभागाच्या हस्तक्षेपाशिवाय कायम स्वरुपी सुरु राहतील व कायद्यात बदल करण्यासंबधीचा प्रस्ताव पुढील अधिवेशनात मांडण्यात येईल, असेही मंत्री महोदयांनी सांगितले होते. हाच उद्देश ही लक्षवेधी सूचना लावण्यामागे होता. या निमित्ताने माझा प्रश्न असा आहे की, जुन्या सुरक्षा रक्षक मंडळात नोंदणीकृत झालेल्या 30 हजार सभासदांबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे, तसेच अध्यादेश काढून जर यासंबंधीच्या कायद्यात बदल केला असेल तर त्याचे विधेयकात रुपांतर करण्यासाठी शासन याच अधिवेशनात ते विधेयक सभागृहात मान्यतेसाठी आणणार आहे काय ?

....4...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील : महोदय, सुरक्षा रक्षकासंबंधी गृह विभागाने जो कायदा केला आहे त्याची व्याप्ती थोडी जास्त असल्याने कामगार कायद्याखाली जे सुरक्षा रक्षक मंडळ आहे त्यामुळे कामगारांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबतीत गृह विभागाच्या वतीने मी असे स्पष्ट करु इच्छितो की, जुन्या सुरक्षा रक्षक मंडळातील लोकांवर या नवीन महामंडळामुळे कोणत्याही प्रकारची गदा आणली जाणार नाही. ज्या पध्दतीने ते यापूर्वी काम करीत होते त्याच पध्दतीने यापुढेही काम करीत राहतील व त्यामध्ये शासनाचा अथवा गृह विभागाचा कोणताही हस्तक्षेप होणार नाही. आजच्या परिस्थितीत पोलीस खात्यातील अनेक पोलिसांना रिझर्व्ह बँक अथवा अन्य राष्ट्रीयकृत बँका किंवा वेगवेगळे कॉर्पोरेशन्स यांच्या आस्थापनेवर पाठविले जाते. वास्तविक आपण प्रशिक्षीत केलेल्या पोलिसांना कायदा व सुव्यवस्थेचे काम करणाऱ्या पोलिसांना अशा आस्थापनांवर पाठवावे लागते. पण हे नवीन महामंडळ तयार करण्यामागचा शासनाचा हेतू म्हणजे पोलीस दलावरील ताण कमी व्हावा, कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या कामासाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध व्हावे असा आहे. यामध्ये मुख्यत: एक्स-सर्व्हिसमन, निम लष्कराचे जवान, निवृत्त पोलीस यांना घेतले तर आपले प्रशिक्षीत पोलीस देण्याची गरज पडणार नाही. यापुढे अशा आस्थापनांवर हे प्रशिक्षीत लोक पाठविले जातील. तसेच वेगवेगळ्या आस्थापनांवर जे जुने सुरक्षा रक्षक आहेत ते त्यांच्या पध्दतीनेच काम करीत राहतील. म्हणजे आज पोलीस पाठवितो तेथे ज्यांना शस्त्रास्त्रांचे शिक्षण दिलेले असते असे नवीन महामंडळानुसार नोंदणी झालेले गार्ड्स पाठविण्यात येतील. तसेच यासंबंधीच्या कायद्यात दुरुस्तीबाबत जे आश्वासन दिलेले आहे ती प्रक्रिया विभागाच्या वतीने सुरु आहे. पुढील अधिवेशनापर्यंत हा कायदा सभागृहात आणून ही दुरुस्ती करण्यात येईल. तसेच जुन्या सुरक्षा रक्षक महामंडळातील नोंदणी झालेल्या सुरक्षा रक्षकांवर कोणतेही बेकारीचे संकट येणार नाही.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस.क्यू.जमा : सभापति महोदय, माननीय गृहमंत्री जी ने जो उत्तर दिया है, यही उत्तर उन्होंने 15 दिसम्बर, 2010 को नागपुर के अधिवेशन में भी दिया था. माननीय गृहमंत्री जी आपका जो निर्णय है वह एकदम फायनल है. लेकिन कलम 23,24 और 25 के कारण थोड़ा कन्फ्युजन हो रहा है. क्योंकि आज भी मुंबई में, एमटीएनएल में एक से डेढ़ हजार निजी सुरक्षा गार्ड काम कर रहे है. आज वहां पर जो 2010 में नया पुलिस महामंडल बना है, वे इंटर्व्यू ले रहे है. उनका साक्षात्कार ले रहे है. वे उन लोगों को एमटीएनएल भेजेंगे. वहां निजी सुरक्षा गार्ड जो काम कर रहे है, उनको चिंता है कि उनको बंद कर दिया जाएगा. मेरा आपसे स्पेसिफिक प्रश्न यह है कि ऐसा नहीं होना चाहिए. इसके बारे में आप उसकी गॅरण्टी ले और आपने कहा कि कलम 23,24 और 25 में सुधारणा करनी है, उसके बारे में जल्द से जल्द कार्यवाही करें. जब तक कार्यवाही नहीं होती तब तक किसी भी सुरक्षा गार्ड पर अॅक्शन न हों. उनको हटाया नहीं जाना चाहिए. इस बात की गॅरण्टी लेनी चाहिए.

दूसरा प्रश्न यह है कि जो निजी सुरक्षा गार्ड काम कर रहे है, पहले वह आठवी के लिए थे और नये में 12 वी के लिए लिखा है. पुराने सुरक्षा गार्ड शारीरिक रुप से सक्षम और अच्छे है, वे काम कर रहे हैं. उनमें से जिनके पास बारहवी पास का सर्टीफिकेट नहीं है, उनको अच्छा सुरक्षा गार्ड बने रहने देने के लिए उनकी शैक्षणिक योग्यता को शिथिल करने के बारे में क्या सरकार विचार करेगी ?

श्री. आर.आर.पाटील : सुरक्षा रक्षक मंडळाकडे जे कर्मचारी काम करीत आहेत अशा ठिकाणी नवीन महामंडळात नोंदणी झालेले गार्ड्स पाठविण्याचा विचार नाही. त्यांच्या नोकरीवर कोणत्याही प्रकारचे गंडांतर येणार नाही. तसेच या जुन्या सुरक्षा रक्षकांमध्ये त्यांच्या नोकरीबाबत जी साशंकता निर्माण झाली आहे ती भीती यासंबंधीच्या कायद्यात दुरुस्ती केल्यानंतर संपूर्णपणे नष्ट होईल, त्यामुळे त्यांच्या सेवेवर कोणताही परिणाम होणार नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, दिनांक 15.12.2010 रोजी माननीय गृहमंत्र्यांनी सभागृहात स्पष्ट केले होते की, "अन्य राज्यातून स्वत:च्या सुरक्षेसाठी काही लोक बंदुकीचे तसेच रिव्हॉल्वरचे लायसन्स घेऊन येतात व अशा काही व्यक्ती सुरक्षा एजन्सीमध्ये काम करीत असतात". त्यामुळे आतापर्यंत अशा किती एजन्सीजवर कारवाई करण्यात आलेली आहे, यासंदर्भात किती लोकांना अटक करण्यात आलेली आहे, किती एजन्सीचे परवाने रद्द करण्यात आलेले आहेत ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, एजन्सीने अशा प्रकारच्या व्यक्ती बाहेरच्या राज्यातून आणल्या आहेत असे नसून काही लोक स्वत:च्या संरक्षणासाठी लायसन्स घेतात आणि त्या लायसन्सचा वापर नोकरी मिळण्यासाठी करतात. अन्य राज्यातील लायसन्स घेऊन ज्या व्यक्ती नोक-या करीत असल्याचे आढळून आले आहे त्यांचे लायसन्स रद्द करुन त्याची माहिती केंद्र सरकारला कळविण्याचे काम पोलिसांमार्फत केले जाते. आता पर्यंत किती लोकांवर कारवाई करण्यात आलेली आहे यासंदर्भातील माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही परंतु यासंदर्भातील माहिती मी नक्की देईन. यासंदर्भात आतापर्यंत अनेक लोकांवर कारवाई करण्यात आलेली आहे. एजन्सीला बंदुकीचे लायसन्स सेवा करण्यासाठी तसेच प्रोटेक्शन करण्यासाठी दिले जात असते. परंतु ज्या व्यक्ती स्वसंरक्षणाच्या लायसन्सचा उपयोग नोकरीसाठी किंवा दुस-याच्या संरक्षणासाठी करीत असतील तर तसे ते करता येत नाही. जेथे जेथे असे प्रकार आढळून आलेले आहेत त्या त्या ठिकाणचे लायसन्स रद्द्द करण्यात आलेले असून त्याची माहिती केंद्र सरकारला कळविण्यात आलेली आहे. अन्य राज्यातील स्वसंरक्षणासाठीचे लायसन्स आपल्या राज्यात नोकरीसाठी वापरता येणार नाही तसेच वापरु सुध्दा दिले जाणार नाही.

-----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : नागपूरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय(मेडिकल) आणि इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो) येथे रुग्णांची होत असलेली हेळसांड

**मु. शी.**: नागपूरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय(मेडिकल) आणि इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो) येथे रुग्णांची होत असलेली हेळसांड यासंबंधी सर्वश्री नागो गाणार, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. ना.गो. गाणार ( नागपूर विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" नागपूरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडीकल) आणि इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो) येथे गेल्या अनेक महिन्यांपासून असलेला औषधांचा अपुरा पुरवठा, रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नसणे, अपुरा कर्मचारी वर्ग, तसेच अनेक डॉक्टरांची रिक्त असलेली पदे, मेयो रुग्णालयात एम.सी.आय. च्या नावाखाली रुग्णांचे हाल करणे, अनेक विभाग बंद असणे, वैद्यकीय उपकरणे देखभाल दुरुस्ती अभावी नादुरुस्त असणे, गरीब रुग्णांना उपचारा अभावी परत जावे लागणे, सिकल सेल विभाग बंद असणे, रुग्णालयाच्या आधुनिकीकरणाचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असणे, त्याचप्रमाणे नागपूरातील सुपर स्पेशालिटी रुग्णालयात सहयोगी प्राध्यापक, असोसिएट प्राध्यापक व प्राध्यापक ही पदे रिक्त असणे, वर्ग-३ व वर्ग-४ ही पदे सुध्दा रिक्त असणे, डॉक्टर नसल्याने वॉर्डाची जबाबदारी नर्सेसवरच असणे, नागपूरातील तिनही रुग्णालयांना मिळणारा निधी अपूरा असणे, रुग्णांची हेळसांड होणे, परिणामी गरीब रुग्णांना होत असलेला त्रास, मेयो रुग्णालयात दिनांक २९ जून, २०११ रोजी ओपीडीच्या प्रवेश द्वारासमोर एका गरीब रुग्णाचा उपचाराअभावी झालेला मृत्यू, सर्वसामान्य नागरिकांमध्ये यामुळे पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची भुमिका व प्रतिक्रिया."

डॉ. विजयकुमार गावित ( वैद्यकीय शिक्षणमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असे करीत असतांना मी आपल्या अनुमतीने निवेदनात पुढील दुरुस्ती करु इच्छितो.

पृष्ठ क्रमांक 2 मधील चवथ्या ओळीत "सीटीस्कॅन" असा उल्लेख आहे त्या ठिकाणी सिटीस्कॅन 3 दिवसापासून बंद आहे असे वाचण्यात यावे. तसेच तिस-या पॅरामध्ये "मेयो रुग्णालयातील आधुनिकीकरणाच्या संदर्भातील प्रस्ताव तसेंच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तसेच रुग्णालयातील बांधकाम बीओटी तत्वावर करण्यासाठी मंत्री मंडळाच्या उप समिती समोर प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे" हा मजकूर वगळण्यात यावा.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नागो गाणार : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मेयो हॉस्पिटल, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, डागा हॉस्पिटल मधील दुरावस्थेच्या संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आलेली आहे. या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात मंत्रीमहोदयांचे लेखी उत्तर अतिशय मोघम आहे. या ठिकाणची परिस्थिती अतिशय भीषण आहे. या हॉस्पिटलमध्ये रोग्यांना आवश्यक ती औषधे मिळत नसल्याचे कारण विचारले तर औषधाचा पुरवठा करणा-या कंपन्यांची बिले दिली गेली नाहीत असे सांगितले जाते. यासंदर्भात मी प्रश्न विचारु इच्छितो की, मेयो तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय या दोन्ही रुग्णालयांच्या आधुनिकीकरणाचे प्रस्ताव बीओटी तत्वावर करण्यासाठीचा प्रस्ताव मंत्री मंडळाच्या उपसमिती समोर कधी आलेला आहे, या प्रस्तावास मंजुरी कधी पर्यंत दिली जाणार आहे, मंत्री महोदयांनी यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला आहे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील खाटांची संख्या वाढविण्याचा प्रस्ताव गेल्या 7-8 वर्षापासून संचालनालयाने शासनाकडे पाठवूनही आजपर्यंत त्यास मंजुरी देण्यात आलेली नाही ही बाब खरी आहे काय, नागपुरातील या तिन्ही हॉस्पिटलातील अधिष्ठातांना आर्थिक अधिकार वाढवून देण्याचा प्रस्ताव गेल्या अनेक वर्षापासून शासनाकडे प्रलंबित आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाच्या उप सचिवांनी हा प्रस्ताव वित्त विभागाला सादर केला होता परंतु त्यामध्ये त्रुटी आल्याने त्या त्रुटींची पूर्तता अजून पर्यंत झालेली नसल्यामुळे हा प्रस्ताव पुन्हा शिफारसींसह वित्त विभागाकडे सादर केलेला नाही ही बाब सत्य आहे काय, शासनाकडून हा प्रस्ताव कधी पर्यंत वित्त विभागास सादर करण्यात येईल व त्याला कधी पर्यंत मंजुरी मिळेल याची मंत्री महोदयांनी कृपया माहिती देण्याची आवश्यकता आहे.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सरकारी वैद्यकीय कॉलेजमध्ये व हॉस्पिटलमध्ये मार्च पर्यंत बिले देण्याच्या बाबतीतील अडचणी होत्या. जवळ जवळ 99 टक्के बिले मार्च पर्यंत देण्यात आली असून त्यानंतर त्यांना पुरेसे मेडीसीन उपलब्ध करुन देण्यासाठी इंदिरा गांधी मेमोरियल कॉलेज आयजीएमसीला 3.21 कोटी रुपये व जीएमसीला 7.39 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. या ठिकाणी औषधे देण्यास अडचणी नाहीत. परंतु मधील काळात ग्लोव्हजच्या किमती वाढल्या होत्या तसेच ज्या आरसी झाल्या होत्या त्यांनी सप्लाय करण्यास नकार दिला होता. नकार दिला तर आपल्याला ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्यात येईल अशा प्रकारचे निर्देश त्यांना देण्यात आले होते. दुस-या बाजूने लोकलमध्ये मेडीसीन खरेदी करुन काम भागविण्याची नोटीस दिलेली आहे. ..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित...

सन्माननीय सदस्यांनी डीनच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, डीनचे वित्तीय अधिकार कमी असल्यामुळे सर्व बिले एकदम निघत नाहीत. त्यामुळे माननीय मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना विनंती केल्यामुळे त्यांनी वित्त विभागाबरोबर बैठक घेऊन डीनचे अधिकार वाढवून देण्यास मान्यता दिलेली आहे. या विषयाच्या संदर्भात येत्या आठ दिवसात वित्त विभाग व मेडिकल एज्युकेशन विभागाच्या अधिका-यांची एक बैठक आयोजित करण्यात आलेली असून या बैठकीमध्ये या विषयाच्या संदर्भातील अंतिम निर्णय केला जाणार आहे. इंदिरा गांधी शासकीय महाविद्यालय व जीएमसीला पंतप्रधान सुरक्षा योजनेतून निधी मिळणार आहे त्यामधून जी इमारत बांधली जाणार त्यामध्ये अधिक खाटांची तरतूद केली जाणार आहे. खाटांच्या संदर्भातील प्रस्ताव पूर्वीच मान्य झालेला असल्यामुळे आता हा प्रश्न राहिलेला नाही.

सभापती महोदय, मेयो रुग्णालयामध्ये बीओटी तत्वावर काम करावयाचे होते ते आता बंद करण्यात आलेले आहे. शासन यासंदर्भात प्रोजेक्ट तयार करीत असून तो इंडियन मेडिकल कौन्सिलच्या नॉर्म्सप्रमाणे करावा लागत असतो व तसा तो करण्यात येईल. या सर्व कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे. या कामासाठी निधी सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आला असून टेंडर 8-15 दिवसात मिळेल. सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत ते सर्व मुद्दे आता मार्गी लागलेले आहेत.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात अजुनही 2 प्रश्न अनुत्तरित राहिलेले आहेत. लक्षवेधी सूचनेमध्ये वर्ग 3 व वर्ग 4 ची पदे रिक्त आहेत, असोसिएट प्राध्यापक, प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत. परंतु उत्तरात म्हटले आहे की, या ठिकाणी सर्व कर्मचारी वृंद आहे. तसेच पुढे असेही म्हटले आहे की, शासनाकडून उरलेली पदे भरण्यासाठी सतत पाठपुरावा करण्यात येत आहे. या ठिकाणची पदे किती वर्षापासून रिक्त आहेत व ही पदे कधी पर्यंत भरली जाणार आहेज ? गौरीशंकर मेढेकर हा रुग्ण वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात दाखल झाला होता. परंतु उत्तरात असे म्हटले आहे की, डिसचार्ज अगेन्स्ट मेडिकल ॲडव्हायजर घेऊन तो निघून गेला व नंतर मृत आढळला. त्यामुळे शव विच्छेदनात गौरीशंकर

डॉ.नीलम गो-हे....

मेढेकरांचा मृत्यू कशामुळे झाला याची माहिती उत्तरामध्ये नमूद करण्यात आलली नसल्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देण्याची आवश्यकता आहे. रुग्णालयात पेशंटच्या बाबतीत जर असे होत असेल तर रुग्णालयाला पुरेशी सुरक्षा नाही असा त्याचा अर्थ होतो. अर्भके पळविण्याच्या प्रकरणाची चर्चा या सभागृहात आपण वारंवार केलेली आहे. त्यामुळे या ठिकाणची रिक्त पदे कधीपर्यंत भरली जाणार आहेत तसेच गौरीशंकर मेढेकरांच्या मृत्यूचे कारण काय ? सन्माननीय सदस्य श्री.गाणार यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. मंत्री महोदयांनी ज्या प्रमाणे ससून रुग्णालयाच्या संदर्भात ससून हॉस्पिटलमध्ये लोकप्रतिनिधी समवेत बैठक घेतली होती तशी बैठक सन्माननीय सदस्य श्री.गाणार यांच्या बरोबर नागपूरच्या हॉस्पिटलमध्ये घेतली जाणार आहे काय ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नागपूर, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर तसेच सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये प्रोफेसर आणि असोसिएट प्रोफेसरांची तसेच लेक्चरर्संची पदे मोठया प्रमाणात रिक्त होती. मधल्या काळात एमपीएससी कडून पदे भरली न गेल्यामुळे ही पदे भरली रिक्त राहिली होती. मधील काळात अनुभवी असोसिएट पोफेसर मिळत नव्हते तसेच अनुभवी असोसिएट प्रोफेसर प्राध्यापकही मिळत नव्हते. ही पदे भरण्याच्या संदर्भात आता आम्ही मार्ग काढलेला आहे.

यानंतर श्री. भोगले ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक.4... डॉ.विजयकुमार गावीत.....

या राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री यांनी सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग, वैद्यकीय शिक्षण विभागाच्या प्रतिनिधींबरोबर बैठक घेतली. त्या बैठकीत त्यांनी विनंती केली की, तात्पुरती पदोन्नती देण्यास परवानगी देण्यात यावी. त्या बैठकीच्या माध्यमातून निश्चितपणे चांगला तोडगा निघाला. अनेक विभागाची पदे भरली गेली आहेत व पुढील दीड-दोन महिन्यात उर्वरित पदे भरली जातील. असोसिएट प्रोफेसर्सना प्रमोशन द्यायचे आहे. प्रमोशन देत असताना लेक्चरर पदाचा पाच वर्षाचा अनुभव आवश्यक असतो. परंतु लेक्चरर्सना रिलॅक्सेशन देऊन दोन वर्षाचा किंवा एक वर्षाचा अनुभव असला तरी प्रमोशन देण्याचा निर्णय घेतला आहे. पाच ते सहा विभागांचे प्रस्ताव मान्य केले आहेत. महिन्याभरात जी काही पदोन्नतीने पदे भरावयाची आहेत ती निश्चितपणे भरली जातील. एमपीएससीकडून जाहिरात देण्यात येऊन बऱ्याच पदांबाबत उमेदवारांची निवड झालेली आहे. दोन महिन्याच्या आत वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमधील 90 टक्के पदे भरली जातील. वर्ग.3 च्या पदाचा प्रश्न निर्माण झाला आहे. वर्ग.3 ची पदे भरण्यास बंदी असल्यामुळे अत्यावश्यक सेवा म्हणून वर्ग.3 ची पदे भरण्यास परवानगी देण्यात यावा असा प्रस्ताव सादर केला आहे. ही पदे भरण्याचा प्रयत्न सुरु आहे. पुढील दोन महिन्यात सिस्टर इनचार्ज आणि स्टाफची 99 टक्के पदे पदे भरली जातील. त्यामुळे दोन्ही प्रश्न निश्चितपणे सुटणार आहेत.

सभापती महोदय, गौरीशंकर नावाच्या रुग्णाचा उल्लेख केला गेला. दिनांक 24.5.2011 रोजी हा रुग्ण बेशुध्द अवस्थेत ॲडमिट झाला होता. त्या रुग्णाचे दोन-तीन डॉक्टरांनी निदान केले होते, परंतु निश्चित निदान होऊन शकलेले नव्हते. पुढील दोन-तीन दिवसात त्या रुग्णाची प्रकृती सुधारुन तो फिरायला लागला. हा रुग्ण कोणालाही न सांगता रुग्णालयाबाहेर गेला. दुसऱ्या दिवशी तो त्या दवाखान्याच्या पटांगणात मृत अवस्थेत आढळून आला. त्या रुग्णाचा व्हिसेरा तपासणीसाठी पाठविला असून त्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूचे निश्चित कारण कळू शकेल. सभापती महोदय, प्रत्येक मेडिकल कॉलेजमध्ये जाऊन मी बैठका घेत आहे व तेथील प्राध्यापकांचे, जनतेचे, रुग्णांचे आणि विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्याचा मी प्रयत्न करीत आहे. नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांबाबत बैठक घ्यायची राहिली आहे. ही बैठक घेत असताना तेथील मंत्री, स्थानिक खासदार, आमदार, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष/सभापती यांना बैठकीला बोलावण्यात येईल. अधिवेशन संपल्यानंतर 15 दिवसाच्या आत ही बैठक निश्चितपणे बोलावली जाईल.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : या रुग्णाला कोणता आजार झाला होता? तो रुग्णालयाबाहेर जाऊन लगेच मृत कसा आढळून आला?

डॉ.विजयकुमार गावीत : हा रुग्ण मे महिन्याच्या 24 तारखेला बेशुध्दावस्थेत ॲडमिट झाला होता. त्याची प्रकृती सुधारल्यानंतर तो रुग्णालयातून बाहेर गेला. त्याचे पूर्णपणे निदान झालेले नव्हते. परंतु त्याच्या शरीरातील कॅल्शियम कमी झाल्यामुळे हृदयावर परिणाम झाला असावा अशी शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. रुग्णाचा व्हिसेरा तपासणीसाठी पाठविण्यात आला आहे, त्याचा अहवाल आल्यानंतर निदान कळू शकेल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, नागपूरच्या जीएमसी आणि मेयो या अति विशेषोपचार रुग्णालयाच्या प्रश्नासंबंधी ही लक्षवेधी सूचना मांडण्यात आली आहे. नागपूर ही राज्याची उप राजधानी आहे. उप राजधानीतील रुग्णालयांची ही अवस्था आहे. रिक्त पदे पुढील महिन्याभरात भरण्यात येतील असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. आतापर्यंत ही कार्यवाही का झाली नाही? वर्ग.2 ते 4 च्या 200 पदांना मंजुरी मिळण्याचा प्रस्ताव दिनांक 29.8.2006 रोजी सादर केलेला असताना आजपर्यंत प्रस्ताव मंजूर का होऊ शकला नाही? राज्यामध्ये रुग्णांना योग्य ती रुग्णसेवा मिळण्याबाबत शासन किती नैराश्येने पहात आहे हेच यावरुन दिसून येते. 180 खाटांना मंजुरी मिळण्यासाठी 2006 पासून प्रस्ताव प्रलंबित आहे. त्याचबरोबर रुग्णालयातील युरॉलॉजी, न्यूरॉलॉजीचे स्वतंत्र विभाग निर्माण करण्याचा प्रस्ताव देखील प्रलंबित आहे. भारतीय परिचर्या परिषदेच्या प्रमाणकानुसार प्रत्येक 3 रुग्णांमागे 1 नर्सचे पद मंजूर करणे आवश्यक आहे. वैद्यकीय महाविद्यालयात 914 पदे मंजूर असून त्यापैकी फक्त 342 पदे कार्यरत आहेत. वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर हे फार जूने महाविद्यालय आहे. नागपूर ही उप राजधानी असल्यामुळे संपूर्ण विदर्भातील रुग्ण उपचारासाठी या महाविद्यालयांमध्ये येत असतात. उप राजधानीतील चारही रुग्णालये सुसज्ज करण्याच्या दृष्टीने शासन तातडीने कोणती उपाययोजना करणार आहे?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जे प्रश्न उपस्थित केले त्याबाबत मी सांगू इच्छितो की, युरॉलॉजी आणि न्यूरॉलॉजी विभागाला मंजुरी देण्यात आली, परंतु ही मंजुरी देत असताना पदे भरण्यासाठी परवानगी दिलेली नाही. 300 खाटांचा प्रस्ताव मंजुरीसाठी वित्त विभागाकडे सादर केला आहे आणि हा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 2006 पासून शासनाकडे प्रस्ताव प्रलंबित आहे. शासन विदर्भाकडे कोणत्या नजरेने पाहते हेच या भूमिकेवरुन दिसून येते. आता करु, लगेच करु, दोन महिन्यात करु असे मंत्री महोदयांकडून उत्तर दिले जाते. परंतु निश्चित कारवाई केव्हा केली जाणार आहे? 2006 पासून प्रस्ताव प्रलंबित का आहे?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या मी एक गोष्ट निदर्शनास आणू इच्छितो की, हे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आहे. बेसिकली एज्युकेशनल विभाग म्हणून मंजुरी नाही. प्रामुख्याने जीएमसी, आयजीएमसी, सुपर स्पेशालिटीमधील कार्डियाक, गॅस्ट्रो एंट्रॉलॉजी, न्यूरॉलॉजी हे एज्युकेशनल विभाग आहेत. शेवटच्या दोन विभागांसाठी पदे निर्मितीसाठी प्रयत्न करीत आहोत. हे एज्युकेशनल विभाग म्हणून निर्माण करीत आहोत. मेयो, जीएमसी येथे मेडिकल कौन्सिलच्या नॉर्म्सप्रमाणे मागच्या काळात दुर्दैवाने पदे मंजूर केली नव्हती. आता सचिव समितीने मान्यता दिलेली आहे. संपूर्ण महाराष्ट्रात आयएमसीच्या नॉम्सप्रमाणे पदे मंजूर नव्हती, त्या पदांना मंजुरी देऊन जे संकट या कॉलेजांपुढे ॲफिलिएशनच्या दृष्टीने उभे राहिले होते त्यातून त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरु आहे. सचिव समितीने पदांना मान्यता दिली असून महिन्याभरात मंत्रिमंडळासमोर मान्यता मिळेल.

पदे रिक्त का राहतात या संदर्भात मी सुरुवातीलाच सांगितले की, 50 टक्के पदे पदोन्नतीने आणि 50 टक्के पदे सरळसेवेने भरती केली जातात. मधल्या काळात काही अडचणींमुळे एमपीएससीकडून सरळसेवेची पदे भरण्यासाठी उमेदवार उपलब्ध झाले नव्हते. मागील वर्षात मोठया प्रमाणात एमपीएससीकडून लेक्चरर्स, असोसिएट प्रोफेसर्स आणि प्रोफेसर्सची पदे भरण्यात आली असून उर्वरित पदोन्नतीची पदे भरण्याबाबत अट शिथील करण्यास परवानगी दिली आहे. पदोन्नती देताना लेक्चररला पाच वर्षांचा अनुभव आवश्यक असतो.

नंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित..

एक वर्षाचा अनुभव असला तरी आम्ही पदोन्नती देत आहोत. कारण सर्व पदे भरण्याचा आमचा प्रयत्न आहे. वित्त विभाग आणि सामान्य प्रशासन विभागचे मी या ठिकाणी अभिनंदन करतो. कारण त्यांनी या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. या पूर्वी असे कधी घडले नव्हते. आम्हाला देखील आश्चर्य वाटले. त्यामुळे पुढील एक-दीड वर्षात एकही रिक्त पद राहणार नाही. इंडियन मेडिकल कौन्सिलच्य नॉर्म्सप्रमाणे खूप पदे लागतात. आज आपल्याकडे सहा हजार नर्सेसची पदे मंजूर आहेत. इंडियन मेडिकल कौन्सिलच्या नॉर्म्सप्रमाणे आठ हजार नर्सेसच्या पदांची आवश्यकता आहे. वित्त विभागाने सांगितले की, आपण ही पदे दोन टप्प्यांमध्ये भरावीत. आम्ही त्यास मंजूर दिलेली आहे. तेव्हा हे काम अंतिम टप्प्यामध्ये आहे. मेयो रुग्णालयाचे अपग्रेडेशन होण्यासाठी सर्व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. जीएमसीला देखील मान्यता दिलेली आहे. पीडीएफ अपग्रेडेशनसाठी सुध्दा केंद्र शासनाकडून मोठ्या प्रमाणावर निधी मिळाला आहे. तेव्हा नजिकच्या सहा महिन्याच्या काळामध्ये या रुग्णांलयांमध्ये चांगला बदल झालेला दिसून येईल.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी**. :स्वर्गीय चांदीबाई शिक्षण संस्था, वडद, ता.महागाव, जि.यवतमाळ या संस्थेने अपंगांच्या राज्य स्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये लाखो रुपयांचा केलेला भ्रष्टाचार

**मु.शी**. : स्वर्गीय चांदीबाई शिक्षण संस्था, वडद, ता.महागाव, जि.यवतमाळ या संस्थेने अपंगांच्या राज्य स्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये लाखो रुपयांचा केलेला भ्रष्टाचार या संबंधी श्री.संदीप बाजोरिया, ॲड.उषा दराडे, सर्वश्री विक्रम काळे, हेमंत टकले, सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. संदीप बाजोरिया (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"शासनाने यवतमाळ येथे दिनांक 21 व 22 फेब्रुवारी, 2011 रोजी राज्यस्तरीय अपंगांच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करणे, यासाठी यवतमाळ येथील स्वर्गीय चांदीबाई शिक्षण संस्था वडद, ता.महागाव, या संस्थेला आयोजकत्व देताना या संस्थेकडे स्पर्धेसाठी लागणारी जागा, खेळांसाठी आवश्यक असलेले बास्केट बॉल, हॉलीबॉल, इत्यादी सुविधां बरोबरच संस्थेची आर्थिक स्थिती आहे काय, याबाबत कोणतीही माहिती न घेणे, तसेच सदर संस्थेजवळ अपंग अधिनियम, 1995 अंतर्गत अपंग क्षेत्रात काम करण्यासाठी सक्षम प्राधिकारी, आयुक्त, अपंग कल्याण यांचे नोंदणी पत्र सुध्दा नसणे, या संस्थेने या क्रीडा स्पर्धेत केलेला लाखो रुपयांचा भ्रष्टाचार नुकताच उघडकीस येणे, या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची तेथील लोकप्रतिनिधी व जनतेची होत असलेली मागणी, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे ( सामाजिक न्यायमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी असत्य उत्तर दिलेले आहे. समाज कल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद, यवतमाळ यांच्याद्वारे त्या संस्थेची शिफारस केली होती असे सांगण्यात आलेले आहे. परंतु त्यांनी असे कोणतेही पत्र दिलेले नाही असे समाज कल्याण अधिकाऱ्यांचे पत्र आमच्याकडे आहे. निवेदनात नमूद केलेले आहे की, " निवास, भोजन, वाहतूक इत्यादी खर्चासाठी आर्थिक तरतूद 25 लाख रुपये विभागीय समाज कल्याण अधिकारी, अमरावती विभाग, अमरावती यांचेमार्फत उपलब्ध करुन देण्यात आली होती." परंतु त्या पत्रामध्ये 40 लाख रुपयांची तरतूद केल्याचे नमूद केलेले आहे. या ठिकाणी अधिकाऱ्यांनी सभागृहाची दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे. तेव्हा त्या अधिक्ाऱ्यांना तत्काळ निलंबित करुन त्यांची प्रधान सचिवांमार्फत चौकशी करण्यात येईल काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, ज्या संस्थेला या स्पर्धेचे काम देण्यात आले होते त्या संस्थेची जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांनी दिनांक 17.1.2001 रोजी शिफारस केली होती. सन्माननीय सदस्यांना 40 लाख रुपयांची माहिती कोठून मिळाली मला माहीत नाही. परंतु माझ्या माहिती प्रमाणे त्या संस्थेला 25 लाख रुपये मिळालेले आहेत आणि ते त्यांनी खर्च केलेले आहेत.

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय कोणत्या आधारे ही माहिती देत आहेत हे मला माहीत नाही. शासनामार्फत झालेल्या पत्र व्यवहाराची माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. त्यामध्ये 40 लाख रुपयांचा उल्लेख आहे. सदरहू समाज कल्याण अधिकारी गट-अ यांनी सांगितलेले आहे की, आम्ही असा कोणताही पत्र व्यवहार केलेला नाही. असे असताना निवेदनात नमूद करण्यात आलेले की, "समाज कल्याण अधिकारी गट-अ जि.प.यवतमाळ यांनी सदर संस्थेस मान्यता देणेबाबत अपंग कल्याण आयुक्तालयामार्फत शासनास प्रस्ताव सादर केला होता." आम्ही याठिक्ाणी माननीय मंत्री महोदय उत्तर देत आहेत ते सत्य मानायचे की, शासनामार्फत जो पत्र व्यवहार झालेला आहे तो सत्य मानायचा ? जर एवढी मोठी तफावत असेल तर आम्ही दोषी कोणाला समजायचे ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य 40 लाख रुपयांचा उल्लेख करीत आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, एकूण 25 लाख रुपये वितरित झालेले आहेत म्हणून 25 लाख रुपये असा उल्लेख केलेला आहे.

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, ज्या संस्थेला हे पैसे देण्यात आले त्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय मंत्री महोदय आहेत, अशी मला माहिती मिळालेली आहे.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा काही तरी गैरसमज झालेला आहे. जिल्हा विकास समितीचा मी सदस्य देखील नाही. मी यवतमाळ जिल्हा विकास संस्थेचा अध्यक्ष आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांचा तसा गैरसमज झालेला आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सदर संस्थेचे अध्यक्ष माननीय मंत्री महोदय आहेत. गट विकास अधिकाऱ्यांनी 40 लाख रुपये असे स्पष्टपणे पत्रात म्हटले आहे आणि मंत्री महोदय सांगत आहेत की, फक्त 25 लाख रुपये मिळाले. मंत्री त्या विभागातील पालकमंत्री आहेत. त्यांनी स्वत: संस्थेसाठी पैसे घेतले आहेत आणि शासनाने 40 लाख रुपये दिले असताना 25 लाख रुपये मिळाल्याचे ते सांगत आहेत. ही बाब अतिशय गंभीर आहे. या प्रकरणाची वरिष्ठ पातळीवर चौकशी झाली पाहिजे. माननीय मंत्री महोदयांनी ताबडतोब राजीनामा दिला पाहिजे. ही पहिलीच बाब आहे असे नाही. त्यांनी 50 लाख रुपये घेतलेले आहेत. त्या संस्थे संदर्भातील काही पत्रे माझ्याकडे आहेत ती मी आपल्याकडे पाठवितो. यवतमाळ जिल्हा विकास समिती संचालित, वाधवानी कॉलेज ऑफ फार्मसी, न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, कला महाविद्यालय, चित्रकला महाविद्यालय यांचा अर्ज दिनांक 17.1.2011 रोजी प्राप्त झाला. स्व.चांदीबाई शिक्षण संस्था,वडद, ता.महागाव, जिल्हा यवतमाळ ही मंत्री महोदयांची संस्था आहे. या संस्थेची सर्व माहिती माझ्याकडे आहे. मी माहितीच्या अधिकाराखाली सर्व माहिती घेतलेली आहे. खरे म्हणजे मी आपल्याकडे नोटीस दिली नाही. मी या संदर्भातील माहिती देणार आहे. मी माननीय मंत्री महोदयांना नोटीस दिलेली नाही. मी माननीय मंत्री महोदयांना अधिकृत नोटीस देईन, त्यावेळी बोलेन. 40 लाख रुपये दिले असे गट विकास अधिका-यांचे पत्र असताना फक्त 25 लाख रुपये मिळाले असे मंत्री महोदय सांगत आहेत. अशा प्रकारे स्वत:च्या संस्थेसाठी पैसे घेता येतात काय, कुंपणच शेत खात आहे, या महाराष्ट्रामध्ये काय चालले आहे ?

..6..

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, असत्य बाबी कितीही मोठयाने ओरडून सांगितल्या तरी त्या सत्य होत नाहीत. जिल्हा विकास समिती ज्याचे वाधवानी अध्यक्ष आहेत. ती माझी संस्था नाही. माझी यवतमाळ जिल्हा विकास संस्था आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 40 लाख रुपये मिळाले. मी सांगू इच्छितो की, 40 लाख रुपये मंजूर झाले परंतु त्यापैकी 25 लाख रुपये वितरित झाले आणि त्यापैकी 23 लाख रुपयांमध्ये सर्व कार्यक्रम केले. त्या संस्थेने स्वत:कडील 3 लाख रुपये खर्च करुन एक करमणुकीचा कार्यक्रम केला आहे.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## <u>विशेष उल्लेख</u>

**पृ. शी.**: वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतर डॉक्टरांनी ग्रामीण भागात एक वर्ष सेवा देणे कायद्याने बंधनकारक असतानाही कायद्याचे उल्लंघन होत असणे

**मु. शी.** : वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतर डॉक्टरांनी ग्रामीण भागात एक वर्ष सेवा देणे कायद्याने बंधनकारक असतानाही कायद्याचे उल्लंघन होत असणे याबाबत श्री.हेमंत टकले,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

वैद्यकीय शिक्षण घेतल्यानंतर एक वर्ष डॉक्टरांनी आपली सेवा ग्रामीण भागात देण्याचे कायद्याने बंधन घातले आहे. पण त्यातून सवलत मिळण्याचीही तरतूद ठेवलेली आहे. ग्रामीण भागात अशी सेवा देण्यास नकार देणाऱ्या डॉक्टरांकडून काही रक्कम सरकार घेत असते. गेल्या 15 वर्षात ह्या प्रकारातून शासनाकडे 34 कोटी रुपये जमा झालेले आहेत. मेडिकल पदवीधारकांकडून एक वर्ष सेवेचा बॉण्डही घेण्यात येतो. सेवा न देणाऱ्या व भरपाईही न देणाऱ्या डॉक्टरांची संख्या 1200 वर पोहोचली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयात एकूण 7419 पदे आहेत. त्यापैकी फक्त 4 हजार पदे भरलेली आहेत. अशा परिस्थितीत प्रस्तुत धोरणाचा आढावा घेऊन त्याची पुनर्रचना करण्याची नितांत आवश्यकता आहे. शासनाने याबाबत त्वरित निर्णय घ्यावा अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे सूचना मांडत आहे.

-------

यानंतर श्री.सरफरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कोकण प्रांतातील काजू व आंबा फळ पिकांना प्रक्रियोत्तर भाव मिळण्यासाठी सहकारी संस्थाना अर्थसहाय्य देण्याचा घेतलेला निर्णय

**मु. शी.** : कोकण प्रांतातील काजू व आंबा फळ पिकांना प्रक्रियोत्तर भाव मिळण्यासाठी सहकारी संस्थाना अर्थसहाय्य देण्याचा घेतलेला निर्णय याबाबत श्री.राजन तेली,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : सन्मा□□य सदस्य श्री. राजन तेली यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"राज्यातील कोकण प्रांतातील काजू व आंबा या नगदी फळ पिकांना प्रक्रियोत्तर दर्जेदार भाव मिळण्यासाठी राज्य सरकारने सहकारी संस्थाना भरीव अर्थ सहाय्य देण्याचा घेतलेला निर्णय, परंतु राज्याला राष्ट्रीय फळबाग सहकारी विकास निगममार्फत संभाव्य अर्थसहाय्य अद्यापि माहे जुलै, 2011 अखेरपर्यंत प्रतिक्षाधीन राहिल्याने सदर आंबा काजूच्या सहकारी विकास संस्थाना मुदत वाढीपूर्वी परतफेड करण्याविषयी निर्माण झालेला यक्षप्रश्न, राज्याने काजूवरील मूल्यवर्धित कराचा परतावा तातडीने करण्याची गरज, सदर बाबतीत महत्वाच्या व गंभीर विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे".

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : चंद्रपूर वन विभागांतर्गत मध्य चांदाच्या उप वनसंरक्षकांकडून कर्मचाऱ्यांचा होत असलेला मानसिक छळ

**मु. शी.** : चंद्रपूर वन विभागांतर्गत मध्य चांदाच्या उप वनसंरक्षकांकडून कर्मचाऱ्यांचा होत असलेला मानसिक छळ याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"चंद्रपूर वन विभागांतर्गत मध्य चांदाचे उप वन संरक्षक श्री. अब्दुल सत्तार यांच्याकडून कर्मचाऱ्यांची होत असलेली पिळवणूक व छळ, सदर अधिकाऱ्यांनी कोठारी रेंज मधील फॉरेस्ट गार्ड यांना मानसिक व शारीरिक छळ करुन त्यांच्या कुटुंबातील आई बहिणींना केलेली अश्लील शिवीगाळ, त्यातच नांदगाव येथील वनपाल यांच्या घराला कुलूप लावून बेकायदेशीरपणे केलेले कृत्य, संबंधित विभागांतर्गत येणाऱ्या कर्मचाऱ्यांचा संबंधित उप वन संरक्षकाकडून चाललेला छळ, त्यामुळे कर्मचाऱ्यांनी माननीय वन संरक्षक, चंद्रपूर यांच्याकडे तक्रार करुन न झालेली कारवाई, त्यामुळे संबंधित बेजबाबदार अधिकाऱ्याविरुध्द वनसंरक्षक कार्यालयापुढे कर्मचाऱ्यांना दिनांक 20 जुलै, 2011 पासून उपोषणाला बसण्याची आलेली वेळ, त्यामुळे संबंधित अधिकाऱ्याकडून कर्मचाऱ्यांवर सतत होत असलेला अन्याय, त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची आवश्यकता".

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : परळी तालुक्यामध्ये 13 सज्जांच्या ठिकाणी स्वतंत्र तलाठयांची नियुक्ती करणे

**मु. शी.** : परळी तालुक्यामध्ये 13 सज्जांच्या ठिकाणी स्वतंत्र तलाठयांची नियुक्ती करणे याबाबत श्री.धनंजय मुडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"परळी तालुक्यात गेल्या वर्षभरापासून 13 सज्जांना तलाठीच कार्यरत नसल्याने तालुक्यातील 16 तलाठयांना तलाठी नसलेल्या ठिकाणी अतिरिक्त काम करावे लागत आहे. ग्राम पातळीवर महसूल प्रशासनाचा अत्यंत महत्वाचा घटक म्हणून तलाठी या पदाकडे पाहिले जाते. गावातील प्रत्यक्ष महसूल वसूल करुन शासकीय कोषागारात हा महसूल जमा करणे, जमा महसूलाची माहिती तहसीलदारांना देणे, शेतकऱ्यांना आवश्यक असणारे सात-बारा व इतर कागदपत्रे देणे, आदी कामे करावी लागतात. 13 सज्जांना तलाठी नसल्याने या अंतर्गत येणाऱ्या गावांमधील नागरिकांना त्यांच्या गावच्या तलाठी पदाचा चार्ज असणारा तलाठी शोधण्याची पाळी आली आहे. ग्रामस्थांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी या रिक्त 13 सज्जांच्या ठिकाणी स्वतंत्र तलाठयांची नियुक्ती करण्यात यावी."

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील शेतकऱ्यांना कृषी कर्ज पुरवठा करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची उपाय योजना

**मु. शी.** : राज्यातील शेतकऱ्यांना कृषी कर्ज पुरवठा करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची उपाय योजना याबाबत श्री.केशवराव मानकर,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यातील शेतकऱ्यांची कर्ज मिळविण्यासाठी जिल्हा बँकांकडे सतत धावपळ सुरु असणे, परंतु जिल्हा बँकांकडे कर्ज वितरणासाठी पुरेसा पैसा नसल्यामुळे त्यांना राज्य सहकारी बँकांकडे वारंवार हात पसरावे लागणे, मात्र राज्य सहकारी बँकांनी यातील काही बँकांना कर्ज मागणीच्या निम्माच निधी पुरविला असणे, परंतु सद्याच्या परिस्थितीत रिझर्व्ह बँकेचा कर्ज वितरणाचा परवाना जिल्हा बँकांना सक्तीचा केला जाणार असल्यामुळे राज्य सहकारी बँकेने जिल्हा बँकेला दिला जाणारा कर्जाचा निधी थांबविला असणे, त्या मुळे नाबार्डने गहाण ठेवीवर कर्ज देण्याचे नियम लागू करणे, परंतु जिल्हा बँकांकडे ठेवी आणि सोने तारण ठेवता येण्यासारखी परिस्थिती नसणे, यातूनच संपूर्ण राज्यात कृषी कर्जाचा गंभीर प्रश्न निर्माण होणे, त्याचप्रमाणे राष्ट्रीयीकृत बँका शासनाच्या आदेशानंतरही कर्ज वाटायला तयार नसणे, त्या मुळे राज्यातील शेतकरी बँकांच्या कोंडीत सापडला असणे, त्या मुळे राज्यातील शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष लक्षात घेता, शेतकऱ्यांना कृषी कर्ज पुरवठा करण्यासाठी शासनाने तात्काळ उपाय योजना करण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही, प्रतिक्रिया व करावयाचे निवेदन".

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शेगाव तीर्थक्षेत्र विकास आराखडयांतर्गत निधीअभावी अपूर्ण असलेली विकास कामे

**मु. शी.** : शेगाव तीर्थक्षेत्र विकास आराखडयांतर्गत निधीअभावी अपूर्ण असलेली विकास कामे याबाबत श्री.पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"शेगांव, जिल्हा बुलढाणा येथील संत गजानन महाराजांच्या संजीवन समाधीला दिनांक 12 सप्टेंबर, 2010 रोजी 100 वर्षे पूर्ण झाल्यामुळे शेगांव येथे वर्षभर श्री समाधी शताब्दी महोत्सव आयोजित करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या तीर्थक्षेत्र विकास योजनेतून शेगांव तीर्थक्षेत्र विकास आराखडा दिनांक 8 मार्च, 2010 च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आला. या आराखडयांतर्गत शहरातील रस्ते, परिक्रमा मार्ग, शहरात येणारे पोच रस्ते, उनाड नाल्याचे बळकटीकरण व प्रवासी पादचारी मार्ग, विस्थापितांचे पुनर्वसन, शासकीय विश्रामगृह, मलनि:स्सारण व भू गटार योजना, बस स्थानक व्यवस्था, रेल्वे स्थानकावरील पायाभूत सुविधांचा विकास, सुरक्षा आपत्ती व्यवस्थापन कक्ष व आपत्कालीन व्यवस्थापन,भू संपादन, पाणी पुरवठा, वाहन तळ, वाणिज्य संकुलाचा विकास इत्यादी कामांचा अंतर्भाव आहे. या विकास कामांपैकी काही विकास कामांना अद्यापपर्यंत शासनाकडून प्रशासकीय मान्यता मिळालेली नसल्यामुळे ही विकास कामे सुरु करण्यात आलेली नाहीत तसेच काही विकास कामे शासनाने दिलेल्या निधीतून सुरु असून निधीच्या कमतरतेमुळे पूर्ण झालेली नाहीत. श्री समाधी शताब्दी महोत्सवाची सांगता होऊनही शेगांव विकास आराखडयांतर्गत घेण्यात आलेली कामे पूर्णत्वास गेली नसल्यामुळे समाधी स्थळाला भेट देणाऱ्या भाविकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. शेगांव तीर्थक्षेत्र विकास आराखडयांतर्गत प्रस्तावित करण्यात आलेल्या ज्या कामांना अद्यापपर्यंत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

त्यांना लवकरात लवकर प्रशासकीय मान्यता मिळावी व जी कामे निधीअभावी पूर्ण झालेली नाहीत त्यांना त्वरित निधी उपलब्ध करुन देण्याबाबत सन्माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना सूचित करावे म्हणून या विशेष उल्लेखाव्दारे ही बाब मी सदनाच्या निदर्शनास आणीत आहे".

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: महाराष्ट्र विधानमंडळ अमृत महोत्सव उद्घाटन समारंभाबाबत

**उप सभापती** : सर्व सदस्यांना विदित करण्यात येते की, महाराष्ट्र विधानमंडळ अमृत महोत्सव कार्यकारी समितीची बैठक आज दिनांक 4ऑगस्ट, 2011 रोजी विधानमंडळाचे माननीय पीठासीन अधिकारी, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि अन्य मान्यवर समिती सदस्यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. सदरहू बैठकीत सर्वांनुमते असे ठरविण्यात आले की, मंगळवार, दिनांक 18 ऑक्टोबर, 2011 रोजी महाराष्ट्र विधानमंडळ अमृत महोत्सव उद्घाटन समारंभ आयोजित करण्याच्या दृष्टीने महामहिम राष्ट्रपती महोदयांना त्या दिवशी समारंभास उपस्थित राहण्याच्या दृष्टीने विनंती करावी व त्यांनी मान्य केल्यास मंगळवार, दिनांक 18 ऑक्टोबर, 2011 रोजी अमृत महोत्सवी वर्षाचा उद्घाटन सोहळा आणि बुधवार, दिनांक 19 ऑक्टोबर, 2011 रोजी विधानमंडळाच्या विद्यमान व माजी सदस्यांकरिता विविध विषयांवर परिसंवाद आयोजित करण्यात येईल. माननीय सदस्यांनी याची नोंद घेऊन दोन दिवस राखून ठेवावेत.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : भंडारा येथील श्री. प्रकाश पोटभरे यांना जामीन न मिळण्याबाबत ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेटकडून पोलिसांवर दबाव आणणे

**मु. शी.** : भंडारा येथील श्री. प्रकाश पोटभरे यांना जामीन न मिळण्याबाबत ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेटकडून पोलिसांवर दबाव आणणे याबाबत श्री.एस. क्यू. जमा, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री एस.क्यू.जमा : सभापति महोदय, मैंने एक विशेष उल्लेख दिया है. लेकिन मैं कल उपस्थित नहीं रहूंगा क्योंकि मुझे एक मिटींग के लिए दिल्ली जाना है. यदि आप अनुमति दे तो दो मिनिट में विशेष उल्लेख के बारे में कहना चाहूंगा.

**उप सभापति** : ठीक आहे. सन्मा□□य सदस्य श्री. एस. क्यू. जमा यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.एस.क्यू.जमा (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"सभापति महोदय, 21 तारीख को भंडारा जिले में एक घटना हुई. श्री प्रकाश पोटभरे अपनी पत्नी के साथ मोटर साईकिल पर जा रहे थे. एक शहर में कार से गड्ढे में किचड़ उछल गया. उन दोनों के शरीर पर किचड़ आ गया. उन्होंने आगे रोककर कार चालक से पूछा तो पता चला कि कार चालक वहां के ज्युडिशियल मजिस्ट्रेट है. उनका नाम श्री वसावे साहब है. उन्होंने बात खत्म कर दी और वे चले गए. लेकिन श्री वसावे साहब ने रात को पुलिस स्टेशन में एफआईआर दर्ज किया और उनके खिलाफ 341,324,504,506, 34 यह धाराएं लगा दी गई. ये सभी बेलेबल ऑफेन्स है. लेकिन पुलिस उनको खोज रही है और कह रही है कि आपको बेल नहीं मिलेगी. आपको जमानत नहीं देने के बारे में न्यायाधीश साहब का आदेश है. पूरे जिले में उनको एक भी वकील नहीं मिल रहा है. जो पुलिस अधिक्षक है, उनको आदेश देकर उन्होंने सभी वकिलों से कहा है कि इनका ब्रीफ लेना नहीं. कोई भी वकालतनामें पर साईन करने के लिए

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस. क्यू. जमा...

तैयार नहीं है. मैं शासन का ध्यान इस ओर आकर्षित करना चाहता हूं श्री और श्रीमती पोटभरे को संरक्षण दिया जाए और इस तरीके से न्यायाधीश साहब नाराज हुए थे, उनके प्रकोप से उनको बचाया जाए, धन्यवाद."

**उप सभापती** : ही अतिशय गंभीर बाब आहे. या घटनेमध्ये पती-पत्नी दुचाकीवरुन रस्त्याने जात असतांना एका वाहनाचे चाक खड्डयामध्ये गेल्यानंतर दुचाकीवरील पती-पत्नीच्या अंगावर चिखल उडाला. अशा प्रकारच्या घटनेमध्ये एखादा माणूस आपली दुचाकी पुढे नेऊन ते वाहन थांबवितो व वाहन चालकास जाब विचारतो. या घटनेमध्ये ते वाहन न्यायाधीश महोदयांचे होते, त्यांनी रात्री संबंधित दुचाकीवरील पती-पत्नींना पकडून आणण्याबाबत पोलिसांना आदेश दिले. कायदा हा सर्वांना सारखाच असतो. पोलिसांनी त्या दुचाकी चालकावर कोणती कलमे लावणे आवश्यक होते या बाबत तारतम्य बाळगलेले दिसत नाही. या सूचनेच्या बाबतीत मी या आसनावरुन असा निर्णय देतो की, या संदर्भात ज्या पोलीस स्टेशनमध्ये हा गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे त्या पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांना सन्माननीय गृहमंत्र्यांनी किंवा सन्माननीय गृह राज्यमंत्र्यांनी आजच आदेश देऊन सोमवारपर्यंत मुंबईमध्ये बोलावून घ्यावे आणि या प्रकरणी त्या व्यक्तीविरुध्द विनाकारण लावण्यात आलेली कलमे मागे घेण्याबाबत त्यांना सूचना देण्यात याव्यात. न्यायाधीश ही एक सन्माननीय व्यक्ती आहे, तरीसुध्दा सर्वोच्च ठिकाणी असलेल्या व्यक्तीकडून रस्त्यावर घडलेल्या एखाद्या घटनेच्या बाबतीत आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करण्याचा त्यांना कोणताही नैतिक अधिकार नाही.

श्री. एस. क्यू. जमा : सभापती महोदय, धन्यवाद.

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/KT पूर्वी श्री.सरफरे . . . . 16:20

**पृ.शी./ मु.शी.** : विशेष हक्क समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे.

श्री.अरुण गुजराथी (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी प्रस्ताव प्रस्तुत करतो की,

1) श्री.पांडुरंग फुंडकर, माननीय विरोधी पक्षनेते, विधानपरिषद यांनी श्री.श्रीनिवास कर्वे, सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण

2) श्री.पांडुरंग फुंडकर, माननीय विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंगाचे व अवमानाचे प्रकरण.

या दोनही प्रकरणांवरील विशेष हक्क समितीचे अहवाल सादर करण्याकरिता म.वि.प.नियम 178 (1) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----

. . . .2 जे-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : बुलढाणा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या नवीन इमारतीच्या भूमीपूजनाच्या कार्यक्रम निमंत्रण पत्रिकेवर श्री.पांडुरंग फुंडकर, विरोधी पक्षनेता यांचे नाव न छापणे

**मु.शी.**: बुलढाणा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या नवीन इमारतीच्या भूमीपूजनाच्या कार्यक्रम निमंत्रण पत्रिकेवर श्री.पांडुरंग फुंडकर, विरोधी पक्षनेता यांचे नाव न छापणे याबाबतचा विशेष हक्क समितीचा अहवाल विचारात घेणे व अहवालास अनुलक्षून प्रस्ताव

श्री.अरुण गुजराथी (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई व औद्योगिक प्रशिक्षण संस्था शेगांव, जिल्हा बुलढाणा तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव, जि.बुलढाणा यांच्या वतीने दिनांक 01 मे 2007 रोजी आयोजित शेगांव, जिल्हा बुलढाणा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या नवीन इमारतीच्या भुमिपूजनाच्या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेवर श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय विरोधी पक्षनेते, विधान परिषद यांचे नाव न टाकल्यामुळे तसेच त्यांना कार्यक्रमाचे निमंत्रण न दिल्यामुळे उद्‌भवलेल्या सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या व महाराष्ट्र विधान परिषदेच्या विशेष हक्क भंगाच्या व सभागृहाच्या अवमानाच्या प्रकरणा" संदर्भातील हक्क समितीचा अहवाल विचारात घेण्यात यावा असा प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अहवाल विचारात घेण्यात आला आहे. आता माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रस्ताव मांडावा.

श्री.राजेश टोपे (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी प्रस्ताव मांडतो की,"व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई व औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेगांव, जिल्हा बुलढाणा तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांघकाम विभाग, खामगांव, जि.बुलढाणा यांच्या वतीने दिनांक 1 मे 2007 रोजी आयोजित शेगांव, जिल्हा बुलढाणा येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या नवीन इमारतीच्या भुमिपूजनाच्या कायर्क्रमाच्या निमंत्रण पत्रिकेवर श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद यांचे नाव न टाकल्यामुळे तसेच, त्यांना कार्यक्रमाचे निमंत्रण न दिल्यामुळे उद्‌भवलेल्या सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या व महाराष्ट्र विधान परिषदेच्या



APR/KT 16:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष हक्क भंगाच्या व अवमानाच्या प्रकरणा संदर्भातील विशेष हक्क समितीचा अहवाल विचारात घेतल्यानंतर हे सभागृह सदर अहवालातील निष्कर्षांशी सहमत असून असा ठराव करीत आहे की, श्री.ज.द. भुतांगे संचालक (प्रशिक्षण) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येऊ नये.तथापि भविष्यात अशा घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी त्यांच्या अधिपत्या खालील सर्व कार्यालयांना लेखी सूचना देऊन दक्षता घेण्याचे कळवावे.श्री.एम.डी.कुचर, प्राचार्य,औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शेगांव, जि. बुलढाणा व श्री.मिलिंद वानखेडे,तत्कालीन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, खामगांव, जिल्हा बुलढाणा यांनी शासकीय परिपत्रकांमधील वेळवेळी दिलेल्या सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी न करता कर्तव्यात कुचराई केल्याबद्दल त्यांच्यावर प्रचलित नियमानुसार शासनातर्फे तत्काळ शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----

2 जे-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**उप सभापती** : आता शासकीय विधेयके चर्चेला घेण्यात येतील.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आता 04 वाजून 27 मिनिटे झाली आहे. आपण आम्हाला पहिल्या दिवशी नियमाबाबत सांगितले आणि नियम समितीमध्ये देखील निर्णय झालेला आहे की, सभागृहाचे कामकाज सकाळी 11.00 ते संध्याकाळी 06.00 वाजेपर्यंत होईल. अपवाद म्हणून एखाद्या वेळेस पुढे मागे होऊ शकते.परंतु या वेळी प्रत्येक दिवशी तसे झालेले आहे.त्यामुळे आपण नियम समितीमध्ये केलेल्या नियमाचा भंग करीत आहोत असे वाटते. आता साडेचार वाजले आहेत. याठिकाणी विरोधी पक्षातर्फे एक प्रस्ताव चर्चेसाठी शिल्लक आहे. तसेच आपण अजून एखादे विधेयक चर्चेसाठी घ्यावे असे सांगत आहात. सभागृहाचे कामकाज अपवाद म्हणून 6.00 नंतर देखील चालणार आहे का असा माझा प्रश्न आहे.

. . . .2 जे-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगर परिषदा,

नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा)

विधेयक

L.A. BILL NO. XXVII OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949, THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948 AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

AND MOTION FOR REFERRING THE BILL TO JOINT COMMITTEE THEREON.

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 27 - मुंबई प्रांतिक महानगर-पालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम,1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्या-करिता विधेयक मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक - 27 मुंबई प्रांतिक महानगर- पालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

यानंतर कु.थोरात . . . .

यानंतर कु.थोरात ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव......

सभापती महोदय, या विधेयकाच्या माध्यमातून 13 एप्रिल रोजी मध्यरात्री नंतर आणि 14 एप्रिलला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या दिवशी महिलांना 50 टक्के आरक्षण देण्याचा या सभागृहाने एक मताने निर्णय घेतला आणि संपूर्ण सभागृहाने स्त्री शक्तीचा आणि महिला भगिनींविषयी असलेला आपला आदरभाव व्यक्त केला. 50 टक्के महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अधिकार देण्यात आले. या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लवकरच नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवडयामध्ये किंवा डिसेंबरच्या पहिल्या आठवडयामध्ये ज्या महागरपालिकांच्या, नगरपालिकांच्या आणि नगर पंचायतींच्या निवडणुका होतील त्या निवडणुकांमध्ये स्त्रियांसाठी 50 टक्के आरक्षण असावे अशा प्रकरचे बहुसदस्यीय विधेयक सभागृहासमोर मांडण्यात आलेले आहे. मुंबई महानगरपालिका सोडून अन्य महानगरपालिकांपेक्षा 2 पेक्षा कमी नाही आणि 3 पेक्षा जास्त नाही अशा प्रकारची सदस्य संख्या राहील आणि त्याचबरोबर अ,ब,क वर्ग नगरपालिका आणि नगर पंचायती यामध्ये 4 पेक्षा कमी नाही आणि 5 पेक्षा जास्त नाही अशा प्रकारची सदस्य संख्या या विधेयकामुळे राहणार आहे.त्याचा सर्वच पक्षांना फायदा होणार आहे. सध्या वॉर्ड लहान असल्यामुळे नगरपालिकांच्या निवडणुका जिंकताना साधारणपणे गणिते मांडली जातात की, हा 500 ते 700 मतदारांचा वॉर्ड आहे. या वॉर्डमध्ये 7 ते 8 उमेदवार निवडणुकीला उभे राहिले तर त्यापैकी यांनी 50 मते घेतली, त्यांनी 25 मते घेतली, आणखी कोणी 75 मते घेतली तर आपल्याला निवडूण येण्यासाठी 250 मते लागतील. या 250 मतांपैकी 100 मते आपल्याकडे आहेत मग 100 मतांसाठी कशा पध्दतीने बाजार मांडायचा, ती मते कशा पध्दतीने मिळवायची, याचे गणित आखले जाते आणि तशा प्रकारचा नाही म्हटले तरी खूप मोठया प्रमाणात पैशाचा बाजार आणि देवाण-घेवाण होते. त्यामुळे एखाद्या चांगल्या कार्यकर्त्यामध्ये चांगल्या प्रकारचे गुण असतानासुध्दा त्याला निवडून जाता येत नाही.

सभापती महोदय, दुसरी गोष्ट अशी की, मागासवर्गीय समाजामध्ये किंवा अल्पसंख्यांक समाजामध्ये अत्यंत चांगल्या प्रकारचे लोक असतात परंतु त्यांना फक्त त्यांच्या प्रभागापुरते निवडून जाण्याची संधी मिळते. अन्य प्रभागामध्ये त्यांच्या समाजाची, जातीची लोकसंख्या फारशी नसेल तर मग त्यांना मोठया प्रमाणात संधी मिळत नाही किंवा ओपन वार्डामधून त्यांना संधी मिळत नाही. आता ही प्रभाग पध्दती झाल्यामुळे सर्वांना सर्व समाजाचे आणि एकंदरच त्या प्रभागातील क्षेत्राचे

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव...

प्रतिनिधीत्व करण्याची संधी या विधेयकामुळे निर्माण होणार आहे. उद्या या भागामध्ये होणाऱ्या निवडणुकीमध्ये निवडून गेलेले सदस्य कशा पध्दतीने संपूर्णपणे या प्रभागाला जबाबदार राहतील, मिळणारा निधी कुठे जाईल. यातून काही समस्या निर्माण होतील अशा प्रकारची भीती सुध्दा सन्माननीय सदस्यांच्या मनात असेल. परंतु मुंबई महानगरपालिका आणि मोठया महानगरपालिका सोडल्या तर सदस्यांना निधी दिला जात नाही. तो निधी त्या प्रभागाला दिला जातो. विकासाच्या कामाला दिला जातो. जो विकास करावयाचा असतो त्या एखाद्या कामाकरिता निधी दिला जातो. त्यामुळे तो निधी सगळीकडे सारखा वापरला जाईल. त्याबाबत मनामध्ये काही शंका बाळगण्याचे कारण नाही. अशा प्रकारे हे सगळया अर्थाने विचार करुन आणलेले विधेयक आहे. सन 2002 साली शासनाने हीच पध्दती आणली होती आणि 2007 साली पुन्हा ती पध्दती मागे का घेतली अशा प्रकारचा एक प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच सन्माननीय सदस्यांचा तसा आक्षेप असू शकतो. परंतु काही गोष्टी पुर्वानुभवातून शिकावयाच्या असतात. काही त्रुटी राहिल्या असतील, उणिवा राहिल्या असतील, काही चूका झाल्या असतील तर त्या डोळयासमोर ठेवून भविष्यामध्ये त्या चूका होऊ नयेत म्हणून तशा प्रकारचा विचार पुन्हा करायचाच नसतो, असे कधी होत नसते. म्हणून तशा प्रकारचा विचार केला जातो.

सभापती महोदय, ज्यावेळी 1995 ते 1999 मध्ये शिवसेना व भारतीय जनता पार्टीचे सरकार सत्तेवर आले त्यावेळी त्या सरकारमध्ये मी स्वत: आमदार म्हणून काम केलेले आहे. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री सन्माननीय श्री. मनोहर जोशी यांनी मुंबई महानगरपालिकेमध्ये मेअर ईन कौन्सिल अशा प्रकारची एक पध्दती आणली होती. परंतु त्याच वेळच्या सरकारने त्यानंतर आलेल्या तत्कालीन मुख्यमंत्री सन्माननीय श्री. नारायण राणे यांनी त्यावेळी ती रद्द ठरविली. अशा अनेक बऱ्या-वाईट गोष्टी घडत असतात. पुन्हा अनुभवातून त्या नव्याने स्वीकारावयाच्या असतात. पूर्वीच्या आलेल्या अनुभवातून किंवा पूर्वीच्या राहिलेल्या त्रुटी दूर करुन पुन्हा एकदा त्या वाटेने जाण्याचा प्रयत्न आपण अनेक वेळा अनेक प्रकारे करीत असतो. तशाच प्रकारचा हा एक प्रयत्न आहे. हा प्रयत्न करीत असताना याच्यामध्ये कुठलीही नगरपालिका डोळयासमोर ठेवून ते केलेले नाही. शासनाने आपले राजकारण व निवडणुका डोळयासमोर ठेवून हे सर्व केलेले आहे. अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित केले जाऊ शकतात.

..3...

श्री. भास्कर जाधव.....

सभापती महोदय, शेवटी कोणाला निवडून द्यावयाचे हे निवडून देणारे मतदार ठरवत असतात. म्हणून कुणीही अशा प्रकारचा निर्णय घेतला म्हणजे निवडणुकीकरिता त्यांनी असे केले असे म्हणण्याचे काही कारण नाही. शेवटी तेथील असलेली परिस्थिती, तेथील लोकप्रतिनिधी आणि आताचा मतदार स्वत: खूप जागरुक झालेला आहे. कोणाला निवडून द्यावयाचे, का निवडून द्यावयाचे हे आता बऱ्यापैकी प्रत्येकाच्या लक्षात येत आहे आणि म्हणून एका बाजूला महिलांना 50 टक्के आरक्षण देत असताना या सगळया वॉर्डसमध्ये किमान 2-2 महिला या कम्पलसरी असणारच आहेत. उरलेले 2 सदस्य हे वेगवेगळया कॅटॅगरीनां दिले जाणार आहेत आणि ते वॉर्डस ओपन असणार आहेत. म्हणून महिला त्यांचा 50 टक्के आरक्षणाचा अधिकार गाजवतीलच पण त्याच्याही पलीकडे जाऊन आणखी एखाद्या वॉर्डामधून त्या निवडणुकीसाठी उभ्या राहू शकतील अशा प्रकारचा महत्वपूर्ण निर्णय महिलांचा सन्मान करण्याकरिता शासनाने घेतलेला आहे. त्या अनुषंगानेसुध्दा या विधेयकाचा फायदा होईल. म्हणून अधिक विस्ताराने फार काही मी सांगत नाही. ज्या काही महत्वाच्या गोष्टी होत्या त्या मी या ठिकाणी सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे म्हणून सर्वांनी एकत्रितपणे किंवा एकमताने जसा महिलाच्या आरक्षणाच्या विधेयकाला पाठिंबा दिला होता तशाच प्रकारचा पाठिंबा या विधेयकाला द्यावा अशा प्रकारची मी सभागृहाला विनंती करतो व माझे भाषण संपवितो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 27. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या 30 सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त 6 महिन्याच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडते.

सभापती महोदय, खऱ्या अर्थाने मंत्री महोदयांनी अतिशय गोड, गुलाबी कपडयाच्या वेस्टनात गुंडाळून महिलांपुढे प्रभागाचे हे विधेयक सादर केलेले आहे. बोलण्यामध्ये ते अतिशय हुशार आहेत. लोकांना गुंडाळण्यामध्येही ते तेवढेच हुशार आहेत. एकीकडे 50 टक्के आरक्षण दिले असे कौतुक करत असताना महिलांना मोकळीक कुठे दिली आहे? याच्या अगोदरच्या निवडणुकांमध्ये शासनाने प्रभाग पध्दती आणली होती. त्यामध्ये काही त्रुटी राहिल्या असतील तर त्या कुठल्या त्रुटी राहिल्या हे मंत्री महोदयांनी का सांगितले नाही? त्रुटी अशा राहिलेल्या आहेत की, त्यावेळी तिघांचे प्रभाग होते. दोन पुरुष आणि एक महिला. कारण त्यावेळी स्त्रियांना 30 टक्के आरक्षण होते. दोन्ही पुरुष असल्यामुळे स्त्रियांनी प्रभागात एखादी गोष्ट मंजूर केली तर त्यासंबंधीचा बोर्ड पुरुष स्वत: लावत होते. त्यावेळेला महिलांना बोलावत सुध्दा नव्हते त्यामुळे एक प्रकारचा रोष महिलांमध्ये होता. त्यामुळे ते कॅन्सल करुन प्रत्येक वार्डमध्ये महिला प्रतिनिधी निवडणुकीसाठी उभ्या केल्या आहेत. आज 50 टक्के आरक्षण देत असताना आम्ही त्याचे मोठया प्रमाणात कौतुक केले की, आता आम्हाला मोकळीक मिळाली. जर अनुसूचित जाती, जमातीतील आरक्षणातील महिला असतील तर त्या प्रभागात टिकण्यापेक्षा त्या स्वतंत्र अस्तित्वात टिकून राहिल्या असत्या. शासनाने आमचे अस्तित्व कमी करुन आमचे हात-पाय गुंडाळून प्रभागामध्ये टाकलेले आहे. अनुसूचित जातीची महिला असेल तर तिच्या विरुध्द अनुसूचित जातीचीच महिला निवडणुकीला उभी रहाणार होती. त्यामुळे कुठल्याही पध्दतीचे पैशाचे आणि दबावाचे राजकारण त्या ठिकाणी झाले नसते. एक दलित महिला दुसऱ्या दलित महिलेच्या विरुध्द जेव्हा उभी रहायची

..5...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

श्रीमती शोभा फडणवीस.....

तेव्हा ती खुलेआम उभी रहायची.कारण स्त्रियांची आर्थिक परिस्थिती चांगली नसते, हे सर्व जगाला माहीत आहे. त्यामुळे शेवटी नवरा पैसे देईल तरच ती निवडणूक लढवेल. नवऱ्याने पैसे दिले नाही तर घराचा कर भरण्या इतपत सुध्दा तिची परिस्थिती नसते.

सभापती महोदय, आम्ही आरक्षण एवढयाचसाठी मान्य करतो की, आमच्या विरुध्द उभी राहणारी महिला आमच्याच कॅटॅगरीची असली पाहिजे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभाताई फडणवीस ....

म्हणून मग त्या ठिकाणी दलित विरुध्द दलित किंवा अनुसूचित जमाती विरुध्द अनुसूचित जमाती अशी निवडणूक होऊन महिला निवडून आली तर तिचा प्रभाग वेगळा असतो. तिची काम करण्याची मर्यादा त्या क्षेत्रामध्ये असते. त्यामुळे ती स्वत: चांगले काम करु शकते. स्वत:च्या हक्कासाठी भांडू शकते. पण या ठिकाणी आपण प्रभाग केल्यामुळे दोन पुरुष आणि 2 महिला असतील. त्यामध्ये कॉँग्रेसचा एक गट उभा राहील, कदाचित राष्ट्रवादी कॉँग्रेसचा एक गट उभा राहील. भारतीय जनता पक्षाचा तर राहणारच आहे. शिवसेना उभी राहील. जसे मी राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या बाबतीत कदाचित म्हटले तसेच इकडे सुध्दा कदाचित असेल. अशा वेळेला चार चार उमेदवार उभे राहतील आणि मग एखाद्या चांगल्या महिलेला उभे राहावयाचे असेल तर त्या प्रभागामध्ये प्रत्येक आरक्षणाचाही माणूस राहील. मागासवर्गीय-ओबीसीच्या आरक्षणाचा माणूस उभा राहील. खुल्या प्रवर्गातील उमेदवार उभा राहील. अशा वेळेला चांगल्या व्यक्तीला जर आर्थिक मदत नसेल तर ती व्यक्ती कशी निवडून येईल ? मागच्या वेळी प्रभागामध्ये दोन पुरुषांमागे एक महिला उभी राहात होती त्यावेळेला तिला कोणत्याही पध्दतीचे मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्य नव्हते. आणि आज आपण विशेषत्वाने असे दाखविले आहे की, जो पैसा मिळणार आहे तो वैयक्तिक देणार नाही. तो पैसा सदस्यांना वाटून देणार नाही. तो पैसा प्रभागाला देणार आहात. मग प्रभागाला पैसे दिल्यानंतर 'जिसकी लाठी उसकी भैंस' अशी परिस्थिती होईल. जो तगडा असेल तो पैसे घेऊन जाईल. मग ज्यांना कामे करावयाची आहेत त्यांचे स्वत:चे काय अस्तित्व असणार आहे ? विशेष म्हणजे महिलांचे अस्तित्व काय राहणार आहे, याचा विचार करावा.

सभापती महोदय, महिला कितीही मोठ्या पदावर गेली तरी सुध्दा तिला आजही जे स्थान दिले जाते ते नंबर एक चे दिले जाते असे मी मानू शकत नाही. या सभागृहामध्ये सुध्दा आम्ही पाच-सहा महिला सदस्य आहोत. या ठिकाणी आम्ही भाषणाला उभे राहतो पण पुरुष सदस्यांचे सगळ्यात जास्त हात वर असतात. कारण पुरुष सदस्यांची संख्या जास्त आहे. पण महिलांनी हात वर केल्यानंतर एखाद्या वेळेसच संधी मिळत असते. मला संधी मिळते तो भाग वेगळा. पण मी सगळ्या महिलांचा विचार करते. जर आपण विधानसभेत, विधान परिषदेत, लोकसभेत आणि



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्रीमती शोभाताई फडणवीस ....

राज्यसभेत 33 टक्के आरक्षण दिले असते तर खऱ्या अर्थाने आपण महिलांच्या बाजूने उभे राहून महिलांना न्याय देण्याचे काम केले असे आम्ही मानले असते आणि आम्ही आपले स्वागत केले असते, कौतुक केले असते. या ठिकाणी आपण 50 टक्के महिलांना स्वातंत्र्य दिले. जर आपण प्रभाग पध्दती आणली नसती तर आज 50 टक्के महिला स्वत:च्या विभागामध्ये स्वत:चे कर्तृत्व आणि नेतृत्व उभे करु शकल्या असत्या. म्हणून मी सुरुवातीला म्हटले की, गुलाबी वेस्टनात बांधून आपण हे विधेयक आणलेले आहे. पण या ठिकाणी आपण आमचे हातपाय बांधून आम्हाला लढण्यासाठी पुढे केलेले आहे. एकीकडे हातपाय बांधून लढण्यासाठी पुढे करता आणि आमच्यामध्ये आर्थिक बळ नाही हे तुम्हाला माहीत आहे. आमच्यामध्ये भांडण्यासाठी किंवा स्वत:च्या अस्तित्वासाठी लढण्याचे बळ असले तरी पुढचा माणूस जर तगडा असेल किंवा त्याच्या परिस्थितीमध्ये जर आम्ही टिकलो नाही तर या ठिकाणी आम्हाला 50 टक्के आरक्षण देऊन काहीही फायदा होणार नाही. आपण प्रभागाच्या नावाने निधी ठेवण्यापेक्षा प्रभागाचे जे 4 सदस्य असतील त्यांना सारखा निधी वाटून दिला तर आम्हाला स्वत:चा निधी आपल्या क्षेत्रामध्ये उत्तम पध्दतीने वापरता येईल. त्या ठिकाणची उद्‌घाटने करता येतील. त्या ठिकाणी फलकावर कधी कधी महिलांचे नाव सुध्दा नसते. पैसे आम्ही आणणार, सगळे आम्ही करणार पण महिलांचे नाव फलकावर नसते. म्हणून अशा पध्दतीने आपण आमची कुचंबणा करु नका.

सभापती महोदय, स्वातंत्र्य दिले असे दाखवित असताना आम्हाला गुलामगिरीसारखे वागवू नका. जर प्रभाग पध्दतीमध्ये वैयक्तिक निधी वाटप झाला तर ती महिला आपला निधी स्वतंत्ररित्या आपल्या क्षेत्रामध्ये वापरु शकेल. मागची प्रभाग पध्दत आपण रद्द केली आणि नंतर पुन्हा वॉर्डप्रमाणे निवडणूक घेण्याचा प्रयत्न केला. ती यंत्रणा आपल्याला कोठे चुकीची वाटली हे सांगावे. प्रभाग पध्दत चुकीची होती म्हणून पुन्हा तुम्ही जुन्या पध्दतीवर आलात. मग ती पध्दत चुकीची आहे असे आपल्याला का वाटले ? त्याबाबत सुध्दा आपण खुलासा केला पाहिजे. ती प्रभाग पध्दत चुकीची का वाटली याचाही खुलासा केला पाहिजे. आज आम्ही जे स्वतंत्ररित्या निवडणूक लढवून आमचे स्वत:चे नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व त्या ठिकाणी दाखवत होतो त्या ठिकाणी तुम्ही पुन्हा एकदा

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्रीमती शोभाताई फडणवीस ....

आम्हाला बंधनात टाकलेले आहे. आम्हाला पुन्हा या ठिकाणी पुरुषी अहंकार जाणवला असे जर आम्ही म्हटले तर वाईट वाटणार नाही किंवा कदाचित वाईटही वाटेल. 50 टक्के आरक्षण देता का, मग आमच्या बरोबरीने उभे रहा, अशा पध्दतीने पुन्हा आपल्या अहंकारामध्ये गुंडाळून या ठिकाणी प्रभाग पध्दतीने एका हाताने देऊन दुसऱ्या हाताने काढून घेतले. एकीकडे आम्हाला स्वातंत्र्य देऊन मोठ्या खुर्चीवर बसवावयाचे आणि दुसरीकडे पाठीमागे दंडा घेऊन उभे राहावयाचे अशी ही पध्दत आहे. म्हणून या ठिकाणी महिलांना सुरक्षितता आज कोठेही नाही. या ठिकाणी महिलांना जरी आरक्षण दिले तरी संरक्षणाची हमी कोणी घेणार नाही. कोणतीही महिला असली तरी ती आज आर्थिकदृष्ट्या कमजोर आहे, हे कोणीही सांगू शकेल. मग अशा पध्दतीने जर आम्हाला लढायलाच पुढे केले आहे तर मग आर्थिक बाजू आपण सांभाळणार का ? एखादी चांगली काम करणारी महिला असेल, तिच्यामध्ये कर्तृत्व असेल, ती मतेही घेऊ शकेल पण आर्थिकदृष्ट्या कमजोर असेल तर अशा महिलांना आपण तिचे फॉर्म भरण्याचे पैसे तरी भरु शकणार आहात का ? आपण फॉर्म भरण्याचे जरी पैसे भरले, तिच्या घराचा टॅक्स जरी भरुन दिला आणि तिला जर आपण शक्ती दिली तर कोठे तरी 50 टक्क्याचा चांगल्या रितीने वापर केला असे आम्ही समजू. म्हणून या विधेयकाला विरोध करताना सांगू इच्छिते की, महिलांना यामध्ये स्वातंत्र्य नाही. महिलांना गुलामगिरीत टाकणारे हे विधेयक आहे. म्हणून हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावे अशी मी विनंती करते.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**उप सभापती** : आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीच्या प्रस्तावावर एकत्रित चर्चा होईल. त्यानंतर मंत्र्यांचे उत्तर झाल्यानंतर प्रथम विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव मतास टाकला जाईल व तो असंमत झाल्यास विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकला जाईल. आता सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी आपले भाषण सुरु करावे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, समजा अलीकडे जर 50 टक्क्याचे महिला धोरण आले नसते तरी सुध्दा आम्हाला जे काही दिसते त्यामध्ये प्रभाग पध्दत करावयाची हा शासनाचा इरादा जवळजवळ गेल्या वर्षभरापासून चर्चेमध्ये होता. यापूर्वी आपण प्रभाग पध्दत सुरु केली होती. ती प्रभाग पध्दत का बदलली, त्या अनुभवातून आपण काय शिकलो याबद्दल कोठेही नगरविकास विभाग किंवा लोकल सेल्फ गव्हर्नमेंट इन्स्टिटयूट अथवा या बद्दलच्या अनुभवाचे फायदे तोटे विशेषत: महिलांवर, मागासवर्गीयांवर ओबीसींच्या बाबतीत काय झाले याबद्दल कोठेही मोठे डिबेट किंवा मोठी चर्चा झालेली नाही. ज्या ज्या वेळेला स्त्रिया आणि अनुसूचित जातीचे सदस्य चांगले काम करीत नाहीत अशी पूर्वी चर्चा व्हावयाची त्या वेळेला कै. यशवंतराव चव्हाण यांनी सुध्दा असे लिहिलेले आहे की, जे चांगल्या प्रकारे भूमिका बजावत नाहीत अशी आपल्याला शंका वाटते त्यावर त्यांना जास्त अधिकार देणे हे उत्तर आहे. म्हणून मग नंतरच्या काळामध्ये आपण आरक्षित जागांची संख्या वाढवत वाढवत पुढे येऊन पोहोचलेलो आहोत.

सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात माझे तीन मुद्दे आहेत. या संदर्भात सर्वांचाच अभ्यास आहे पण आपल्या लक्षात असेल की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांचे जे मतभेद होते आणि ज्या येरवडा कराराबाबत कायम चर्चा होते त्यामध्ये हीच अपेक्षा होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना असे वाटत होते की, दुहेरी सदस्यत्व पध्दत असावी. म्हणजे एक सवर्ण किंवा दलितेतर आणि दुसरा दलित असा दोघांचा मिळून प्रभाग असावा, ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका होती. त्या भूमिकेवरुन मोठा वाद झाला. मग फक्त दलितेतर आणि दलित अशा पध्दतीने जर दुहेरी मतदानाची पध्दत असेल तर तिथेच फूट पडल्यासारखे होईल आणि म्हणून आपण एक समझोता म्हणून दुहेरी सदस्यत्व सोडून त्यावेळेला अशी पध्दत स्वीकारली की राखीव जागांवर दलितेतर उमेदवार उभा राहू शकत नाही, त्या ठिकाणी दलित उमेदवारच उभा राहणार आणि त्याला मतदान मात्र दलित आणि दलितेतर दोघेही करणार.

आज ज्या ज्या वेळेला वादविवाद होतात त्यामध्ये चळवळीच्या अंतर्गत मी नेहमी चर्चा ऐकलेली आहे की, अनुसूचित जातीचे जे दलितेतरांना जास्त अपेक्षित आहेत ते निवडून येतात. म्हणजे राखीव जागांवर सुध्दा दलित मतदारांना हवा असलेला उमेदवार निवडून येतोच असे नाही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

तर दलितेतर मतदारांना जो उमेदवार हवासा आहे तो निवडून येतो. लोकशाहीचा पाया म्हणून आपण ते स्वीकारले. त्याचा आपण ज्यावेळी विचार करावयास लागलो तेव्हा आपण ही प्रभाग पध्दत स्वीकारली. मी याच्या विरोधात आहे किंवा बाजूने आहे असे म्हणण्यापेक्षा मला ज्या दोन तीन गोष्टी यामध्ये स्पष्ट दिसतात त्यामध्ये पहिली गोष्ट अशी की, व्यक्ती कितीही चांगली असली तरी आपण पक्ष पध्दत स्वीकारलेली आहे. जशी मी महिला म्हणून काम करते तशीच मी पुणे जिल्ह्यामध्ये आणि पुणे शहरामध्ये पक्षाची संपर्क प्रमुख आहे. आम्हाला तरी असे चित्र दिसते की, महिलांना निवडून येताना एखादवेळी याचा फायदा होऊ शकेल असा माझा उलट अनुभव आहे. याचे कारण असे की, महिलांनी कोठे उभे राहावयाचे असा मतदारसंघच ठरविला नव्हता. कारण आरक्षण कोठे लागू होणार हे त्याना माहीत नाही. तसेच आपला भाग आरक्षणात जाणार आहे की नाही हे पुरुष उमेदवारांना सुध्दा माहीत नाही. अशा वेळेला पक्ष म्हणून ज्या ठिकाणी काम असते आणि विशेषतः नगरपालिकेमध्ये तर आपण चार वॉर्डांचा एक प्रभाग केलेला आहे त्या ठिकाणी अनुसूचित जाती, ओबीसी आणि महिला अशी वेगवेगळी चारपैकी तीन आरक्षणे लागू होणार आहेत. त्यामुळे त्याचा जो परिणाम झाला आहे तो चांगला आहे की वाईट आहे यावर निवडणुकीनंतर चर्चा होऊ शकते परंतु एक परिणाम असा झालेला आहे की, या संपूर्ण मतदारसंघामध्ये प्रचंड अस्वस्थता आहे. राजकारणातील एक मोठे संक्रमण आणि जातीयतेच्या संदर्भातील प्रचंड विचार म्हणजे माझा वॉर्ड आता ओबीसीकरिता आरक्षित होणार की अनुसूचित जातीसाठी आरक्षित होणार की, महिलांसाठी आरक्षित होणार की, सर्वसाधारण होणार याबाबत अस्वस्थता आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

आणि मग ट्रेन जशी फलाटाला लागताना प्रवासी ट्रेनमध्ये उडी मारण्याच्या पवित्र्यात असतात तसे आमचे उमेदवार ठिकठिकाणी उभे आहेत आणि जसे आरक्षण लागेल त्याप्रमाणे त्या त्या पक्षाचे नगरसेवक तेथे उड्या मारणार आणि तेथे जाऊन उभे राहणार. मग त्या व्यक्तीला सोयीस्कर असेल अशा महिलेला राजकीय पक्ष तिकीट देणार अशी राजकीय पक्षातील वस्तुस्थिती आहे.

मला खरा प्रश्न असा पडतो की, आरक्षणामुळे आपण कायम असे म्हणतो की, स्त्रियांना अधिकार मिळतो. मी स्वतः सुध्दा ते मानते. परंतु ते मानत असताना "बेटी, बहू, ब्रिगेड" यापैकी त्या प्रभागात कोणाला स्वीकारले जाईल, जिच्या कुटुंबाचे, जिच्या घराचे, जिच्या पतीचे, तिच्या राजकीय सत्ता परिवाराचे स्थान आहे अशा स्त्रियांनाच स्वीकारले जाणार आहे. कारण जसजसा वॉर्ड मोठा होत जातो मग पुरुष असो की, स्त्री असो. तसतसे तेथे निवडणूक लढविणे अवघड होत असते. म्हणून मला प्रभाग पध्दतीबाबत असे वाटते की, पुणे शहर व पिंपरी-चिंचवड या दोन्ही ठिकाणी महिलांना जर का असे आरक्षण द्यावयाचे असेल तर दुहेरी पध्दत करावी, त्यामुळे तिकिटे देण्यासाठी पक्षांना सोयीचे होईल. पूर्वीच्या प्रभाग पध्दतीची द्विरुक्ती होईल की नाही हे मला माहीत नाही. परंतु पूर्वी प्रभाग झाले होते त्यावेळी मतदार संघात एकगठ्ठा मतदान होत होते किंवा त्या भागात थोडीशी दादागिरी असते ती मोडून पडली. त्याचा फायदा असा झाला की, अनेक ठिकाणी नवीन नवीन लोक निवडून आले, असा अनुभव सुध्दा प्रभागातून दिसून आला. म्हणून एका बाजूला मला प्रभागाचे फायदे दिसून येतात. दुसऱ्या बाजूला नगरपालिकांमध्ये 4 वॉर्डाचा प्रभाग केल्यामुळे ज्या छोट्या नगरपालिका आहेत तेथे पैशाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होणार आहे. कारण तेथे एका ऐवजी 4 ठिकाणच्या बहुमतांचा गठ्ठा तयार होईल आणि पैशाचा व्यवहार सुध्दा सोपे होईल. कारण 4 जणांशी डिल करण्याची गरजच नाही. त्या 4 जणांपैकी एका प्रमुखाशी पैशाचा व्यवहार झ ाला की, चारही ठिकाणी माझे लोक बसविणार आहे असे तो म्हणेल. सोंगट्यांप्रमाणे त्याचे लोक निवडून आणले जातील. असा प्रकार प्रत्येक प्रभागात झाल्याचे दिसणार आहे. त्यामुळे कोणतीही रचना केली तरी ज्याच्याकडे पैसा असतो तेच स्वार झालेले दिसतात. असे चित्र दिसते.

सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी महिलांच्या व्यथा मांडल्या आहेत.

2....

डॉ.नीलम गोऱ्हे...

महिलांविषयी कसे बोलले जाते व इतर गोष्टी मांडल्या आहेत, ते खरे आहे. पण राजकारणात महिला खूप हुशार होत चालल्या आहेत. त्यामुळे मी जे चित्र बघते त्यात महानगरपालिका, जिल्हा परिषदांमध्ये स्त्रिया आता वाट काढत निघाल्या आहेत, आपण कसे बोलावे, मुद्दा कसा मांडावा हे त्यांना समजू लागले आहे. खेड्यापाड्यातील महिला सरपंचांची परिस्थिती थोडी वेगळी आहे. ज्यांच्या कुटुंबाला राजकीय पार्श्वभूमी नसेल त्या महिलेला पक्षाच्या वतीने मार्गदर्शन देऊ शकलो नाही तर ती स्त्री कामच करु शकत नाही. त्यामुळे आपापल्या पक्षातून महिलांना मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. ही राजकीय पक्षाची जबाबदारी आहे. त्या प्रभागातील मतदारांना न्याय देत असताना महिला सदस्य अनुसूचित जाती, इतर मागासवर्गातील दोन दोन सदस्य वेगवेगळ्या महानगरपालिकांमध्ये निवडून येतील.

सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी असे म्हटले की, त्यांची नावे पाटीवर लागत नाहीत. ही व्यथा खरी आहे. परंतु त्यावर मात करता येते, स्वतःच्या कामाचे स्वतः श्रेय कसे मिळविता येते हे देखील राजकारण असते. माझ्या माहितीप्रमाणे इंग्लंडमध्ये लेबर पार्टीने महिलांना लोकसभेत आरक्षण दिले होते त्यावेळी ट्विन मतदार संघ ठेवलेला आहे. तेथे संयुक्त सदस्यत्वाची सोय आहे. एकाच ठिकाणी दोन प्रतिनिधी निवडून येतात. त्यामुळे सदस्यांची संख्या दुप्पट केलेली आहे. म्हणून आपण हा एक प्रयोग करीत आहोत. त्याचे जर का विश्लेषण केले नाही तर आपल्याला पुन्हा सभागृहासमोर यावे लागेल. नंतर कोणी तरी दुसरे मंत्री महोदय पुन्हा वॉर्ड पध्दत करण्याची दुरुस्ती विधेयक आणतील. आता प्रभाग झाल्यानंतर जे उमेदवार निवडून येतील ते पुन्हा इकडे तिकडे फिरत बसतील. थोडक्यात राजकारणाची चौकट बदलता बदलता आम्ही राजकारणाचा पायच कमकुवत करीत आहोत याचाही विचार करण्याची वेळ आलेली आहे, एवढेच बोलून मी थांबते, जय भीम, जय महाराष्ट्र.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.अरुण गुजराथी ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, वि.स.वि.क्रमांक 27 सभागृहासमोर चर्चेसाठी आलेले आहे. या विधेयकाला पाठिंबा देत असताना त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मघाशी असे सांगण्यात आले की, यापूर्वी 1 सदस्यांचा एक प्रभाग करण्यात आला, नंतर 5 सदस्यांचा प्रभाग करण्यात आला, पुन्हा 1 सदस्याचा प्रभाग करण्यात आला. अशा पध्दतीने गेल्या 10-15 वर्षांची नगरपरिषदांच्या निवडणुकीच्या संदर्भातील प्रभाग रचना प्रत्येक 5 वर्षामध्ये बदलत राहिली आहे. मागील 40-45 वर्षापूर्वी नगरपरिषदांमध्ये प्रभाग होते. त्या प्रभागामध्ये 3 सभासद असत. ही योजना आताच आलेली आहे अशातील भाग नाही. या योजनेमुळे सर्व ठीक ठाक होईल अशातीलही भाग नाही. कारण याला रिलेटिव्ह ॲडव्हान्टेजेस ॲण्ड डिस्ॲडव्हान्टेजेस आहेत. एक सदस्य आणि एक वॉर्ड असेल तर संपूर्ण जबाबदारी त्याच्या डोक्यावर असते. त्यामुळे त्या नगरसेवकाला आपण सांगू शकतो की, तू या वॉर्डाचा नगरसेवक आहेस आणि आमच्या या तक्रारी आहेत. त्यानंतर 3,4 किंवा 5 नगरसेवकाचा प्रभाग केला तर लोकांनी आपली तक्रार घेऊन नेमके कोणत्या नगरसेवकाकडे जायचे ? एखादा असू म्हणू शकतो की, माझ्याशिवाय आणखी 4 नगरसेवक आहेत त्यांच्याकडे जा, तक्रारी देण्यासाठी मीच तुम्हाला दिसतो का ? असे होऊ शकते. हा अनुभवाचा भाग आहे. एक वॉर्ड, एक नगरसेवक असेल तर एकावरच जबाबदारी फिक्स असते. मी तुम्हाला मतदान केलेले आहे. याची दुसरी बाजू पाहिली तर लहान वॉर्ड केल्यावर जो समाज त्या भागात असेल त्या समाजाचा सदस्य किंवा ज्याची तेथे दहशत असेल किंवा त्याची दादागिरी असेल तर तो निश्चित निवडून येत असे. आता प्रभाग मोठे झालेले आहेत. पूर्वीप्रमाणे 400-500 च्या लोकसंख्येचे वॉर्ड राहिलेले नाहीत. आता 4 हजार, 5 हजार लोकसंख्येचे वॉर्ड झालेले आहेत. त्यामुळे एका विशिष्ट समाजाचा किंवा जातीचा किंवा त्या पॉकेटमध्ये त्याची दादागिरी आहे म्हणून निवडून येईल असेही होण्याची शक्यता नाही. त्यामुळे याचे काही फायदेही आहेत काही तोटेही आहेत. महिलांच्या विरोधात हे विधेयक आहे असेही नाही. महाराष्ट्रात ज्या नगरपालिका आहेत, मुंबई महानगरपालिका सोडून उर्वरित ज्या महानगरपालिका आहेत मग अ,ब, क व ड वर्ग नगरपालिकांमध्ये 50 टक्के महिला नगराध्यक्षा होणार आहेत. ज्याला आपण प्रथम नागरिक म्हणतो. ग्रामपंचायतीच्या सरपंचांना सुध्दा मान आहे. मी 1974 मध्ये नगराध्यक्ष होतो. नाशिकच्या विभागीय आयुक्तांसोबत एका डोंगरावर जात होतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4....

NTK/

श्री.अरुण गुजराथी.....

तेथे एक लहानसे विरवाड गाव होते. त्या गावच्या सरपंचांचा विभागीय आयुक्तांनी माननीय सरपंच असा उल्लेख केला होता. ते त्या गावातील पहिले नागरिक आहेत. आता 50 टक्के महिला नगराध्यक्ष असतील, जेवढया विषय समित्या आहेत त्यांचे 50 टक्के सभापती महिला असतील. अनुसूचित जातीच्या, जमातीच्या, इतर मागासवर्गाच्या महिला असतील. सर्वसाधारण गटातील महिला असतील. तसेच स्वकर्तृत्वाने, त्या महिलेचा सेवाभाव असेल तर त्याही निवडून येतील. म्हणजे कमीत कमी 50 टक्के महिला तर होतीलच व जास्तीत जास्त किती महिला सदस्य करावयाच्या हे तुम्ही ठरवू शकता. काही ग्रामपंचायतींमध्ये तर संपूर्ण ग्रामपंचायतीच्या सदस्य व सरपंच महिला आहेत. या ठिकाणी सर्व पक्षाचे नेते आहेत. किमान 1-2 नगरपालिकांमध्ये सर्व महिला सदस्य असू शकतील. निवडून येवा न येवो तो प्रश्न वेगळा आहे. काही वेळा पुरुषी संस्कार किंवा अहंकार असतो. माझ्या तालुक्यात 2-3 ग्रामपंचायती आहेत. त्यामध्ये सर्व सदस्य महिला आहेत. त्यांनी पुरुषांना तिकिटच दिलेले नाही. ग्रामपंचायतीच्या निवडणुका पक्षाच्या नावाने लढविल्या जात नाहीत, परंतु नगरपालिका, महानगरपालिकांमध्ये शक्य होईल की नाही ते माहीत नाही. पण अ,ब, क व ड नगरपालिकांमध्ये सर्व महिला सदस्या निवडून आल्या तर महिलांना जास्तीत जास्त सुविधा मिळू शकतील. महिलांमध्ये जे सुप्त गुण आहेत ते पुरुषांमध्ये नाहीत. संघटन शक्ती भरपूर आहे. कन्व्हिन्सिग पॉवर खूप असते. गुजरात, आंध्र प्रदेश आणि बिहार या राज्यांनी महिलांसाठी 50 टक्के आरक्षण ठेवलेले आहे. महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे त्यामुळे मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. ते अत्यंत कर्तबगार, कर्तव्यदक्ष आहेत. त्यांच्यात सर्वांना गुंडाळून ठेवण्याची जादू आहे असे कोणी तरी बोलत आहे. पण मला ते अजून लक्षात आलेले नाही. परंतु मला सांगितले ते बरे केले. त्यामुळे मी मंत्री महोदयांपासून सावध राहीन. या विधेयकाला पाठिंबा देऊ या. पण यामध्ये जर का त्रुटी असतील तर त्यात सुधारणा करावी लागेल. कारण 5 वर्षापूर्वी जे सुरु केले होते ते बंद केले आहे. आता पुन्हा तशी दुरुस्ती करीत आहोत. म्हणून यासंबंधी नेमकी काय सुधारणा केली पाहिजे, जेणे करुन पुढील निवडणुकीमध्ये त्या दृष्टीने आपल्याला काम करता येईल. एवढे बोलून मी या विधेयकाला पाठिंबा देतो आणि येथेच थांबतो.

-----

यानंतर श्री.खर्चे.....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यामध्ये सुधारणा करण्यासाठी आणलेल्या विधेयक क्रमांक 27 वर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

या दुरुस्तीनुसार महानगरपालिकांच्या प्रत्येक प्रभागातून तीन व नगरपालिकांच्या प्रभागातून चार सदस्य निवडण्यासाठी हा कायदा आणला आहे. आताच सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितले की, राज्यात यापूर्वी देखील अशा प्रकारची प्रभाग सिस्टम अस्तित्वात होती. ही सिस्टम करीत असताना महिलांना 50 टक्के आरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या निमित्ताने मी मंत्री महोदयांच्या एक बाब निदर्शनास आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे की, आपण अशा प्रकारे महिलांना 50 टक्के आरक्षण सुरु केल्यानंतर त्यांचा कालावधी मात्र कमी ठेवला आहे, तो 10 वर्षांपर्यंत करावा. कारण त्याशिवाय त्या प्रभागाचा विकास होणे शक्य नाही. 10 वर्षापूर्वी पुणे महानगर पालिकेत प्रभाग रचना झाली होती त्यात प्रामुख्याने प्रभागाचा व शहराचा विकास हा महत्वाचा भाग समजून ही कालमर्यादा वाढविणे आवश्यक आहे. कारण कमी कालमर्यादेत नवीन निवडून आलेल्या नगरसेवकांना प्रशिक्षण देणे व प्रत्यक्षात काम करण्यामध्ये हा काळ निघून जातो. पण ही मर्यादा वाढविली तर त्या प्रभागाचा विकास तर होईलच पण प्रभागातील लोकांपर्यंत पोहचणे हे देखील शक्य होईल. म्हणून ही मर्यादा 10 वर्षे केली पाहिजे. 5 वर्षाची मर्यादा ठेवली तर त्या प्रभागाचा विकास होणार नाही, याबाबतीत मंत्री महोदयांनी जरुर विचार करावा अशी विनंती करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

----------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : महोदय, महापालिका व नगरपालिकांच्या प्रभाग पध्दतीबाबत जे विधेयक शासनाने आणले आहे त्यावर माझे विचार मी व्यक्त करणार आहे. यामध्ये महिलांसाठी 50 टक्के आरक्षण नव्यानेच सुरु झालेले आहे. या आरक्षणाबाबत जातवार मुद्दे देखील सदनात मांडण्यात आले, त्याच अनुषंगाने मी दोन तीन मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे.

साधारणपणे अशी परिस्थिती निर्माण होते की, दर वेळेस कायद्यात बदल केले जातात आणि मग प्रत्येक गावात प्रत्येक भागात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये असे काही कार्यकर्ते असतात की ज्यांना त्या भागाचा, त्या गावाचा विकास करण्याची इच्छा असते. त्यांच्या आधारे चालणारी माणसे त्या तालुक्यात, महापालिका अथवा नगरपालिकेत असतात. आज मात्र अशी परिस्थिती होते की, अशा प्रकारचे आरक्षण दरवेळेस टाकले जाते, त्यामुळे प्रभाग सुध्दा प्रत्येक वेळी बदलत असतात, त्यातून सत्तेवर जे लोक येतात ते आणि प्रशासनाच्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून कोणाला वगळायचे आणि कोणाला बाहेर ढकलावयाचे याचे समीकरण मांडण्याचे प्रकार सुरु होतात. या विधेयकाच्या अनुषंगाने शासन जो बदल करीत आहे त्याच्या आधारे शासनाला अभिप्रेत असलेले महिलांसाठी 50 टक्के आरक्षण तसेच मागासवर्गीयांचे रोटेशन यासाठीची प्रणाली निश्चित केली गेली पाहिजे. त्यामुळे स्थानिक पातळीवर तडजोड करण्यासाठी, त्यांचा गैरफायदा घेण्यास वाव राहणार नाही व त्यासाठी शासनाने सुधारित विधेयक आणून बदल करण्याची गरज आहे, हा एक फरक आहे.. तसेच महिलांसाठी जे आरक्षण दिले त्यामुळे शासनाचा उद्देश सफल होईल असे जरी वाटत असले तरी आज मात्र तसे होत नाही, असा अनुभव आहे. कारण कोणालाही आपल्या इशाऱ्यावर चालणारी, सांगू तेथे सही करणारी व्यक्ती पाहिजे. अशा व्यक्तिच्या अज्ञानाचा गैरफायदा कसा घेता येईल असे प्रयत्न होऊ शकतात. हे होऊ नये असे वाटत असेल आणि शासनाची इच्छाशक्ती असेल तर यासाठी दुसरे विधेयक सभागृहात आणावे लागेल. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

-------

....3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्य मंत्री) : महोदय, या विधेयकाला पाठिंबा देत असताना सन्माननीय सदस्यांनी अनेक शंका देखील उपस्थित केल्या आहेत. त्यात सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्या शंकेचे निरसन करण्याचा प्रयत्न मी करणार आहे. सन्माननीय सदस्या असे म्हणाल्या की, ज्या महिलांची आर्थिक परिस्थिती नाही त्या अनामत रक्कम भरु शकणार नाही. अशा प्रकारे शासन "आमचे हातपाय बांधून मारायला लावते" असेही सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस म्हणाल्या. तसेच पुढे "जिसकी लाठी उसकी भैंस" असे बरेच काही त्या उदाहरणादाखल बोलल्या. त्या म्हणाल्या की, एखादी मागासवर्गीय महिला असेल आणि तिच्यासोबत त्याच कॅटेगरीची महिला निवडणुकीसाठी उभी राहिली तर त्या दोघींमध्येच लढत झाली असती. शेवटी कोणाच्याही विरोधात लढत झाली तरी निवडून एकच उमेदवार येणार आहे. अशा प्रकारे चार वॉर्डांचा एक प्रभाग झाल्यामुळे या लोकांना केवळ त्यांच्याच जातीच्या अथवा समाजाच्या ठराविक मतांवर अवलंबून रहावे लागणार नाही. याचे कारण म्हणजे त्या प्रभागात वेगवेगळ्या प्रकारचे चार लोक असतील तर त्यां सर्वांची मदत घेतल्याशिवाय त्यांची नाव किनाऱ्याला लागणार नाही. म्हणून चारही वॉर्डामध्ये वेगवेगळ्या समाजाचे तीन वॉर्ड असले तरी चौथ्या वॉर्डातील ठराविक समाजाच्या उमेदवाराला मते दिल्याशिवाय, त्याला निवडून आणल्याशिवाय पर्याय राहणार नाही, त्यांना संपूर्ण प्रभागाचाच विचार करावा लागणार आहे.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे ज्या वॉर्डात दोन महिला असल्या तरी त्यांना मते दिल्याशिवाय, त्यांना निवडून आणल्याशिवाय इतर दोन उमेदवारांना व लोकांना पर्याय नाही. म्हणून चारही उमेदवारांना निवडून आणावेच लागेल. अशा प्रकारे या कायद्यामुळे कळत नकळतपणे महिला सक्षम झाल्या, कळत नकळत महिलांना जबरदस्त आधार झाला. कारण त्या दोन महिला निवडून आल्याशिवाय तरणोपाय नाही. म्हणून आमच्या भगिनी या विधेयकातील दुरुस्तीमुळे भक्कम झाल्या असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

आता पुढील काळात प्रत्येक वॉर्डात कमीतकमी दोन महिला राहतील व दोन ओपन राहतील. यामध्ये बहुसंख्य पुरुष राहणार आहेत. दोन महिला राहिल्यानंतर दोन पुरुष राहतील यावेळेस मला उमेदवारी मिळाली नाही तरी पुढील वेळेस उमेदवारी मिळेल या आशेवर काम करणारे पुरुष सुध्दा आनंदाने त्यामुळे कामे करु शकतील. महिला कोणावर अवंबून राहण्याऐवजी खांद्याला खांदा लावून यामुळे एकत्रितपणे काम करु शकतील. या बहुसदस्य प्रभागाचे वर्णन एका वाक्यात करावयाचे झाले तर,"मिले सुर तेरा मेरा तो सुर बने हमारा" असे केले तर ते वावगे होणार नाही. या प्रकारे वॉर्डाची रचना आहे.

आरक्षण 10 वर्षाचे ठेवावे असे सन्माननीय सदस्य श्री. अनिल भोसले यांनी सांगितले आहे. गेल्या 10 वर्षापासूनच्या आरक्षणात काहीही बदल झालेला नाही. आरक्षण रोटेशन प्रमाणे असावे व आरक्षण हे रोटेशन प्रमाणेच राहणार आहे. जे आरक्षण यावेळेस पडले आहे ते आरक्षण पुढील वेळेस त्या वॉर्डाला वगळून पुढील वॉर्डात पडेल. यामध्ये 50 टक्के सभापती, 50 टक्क्यामध्ये सर्व सदस्य राहणार आहेत. या विधेयकामुळे महिला सक्षम व मजबूत होतील. 33 टक्के आरक्षणाचा अनुभव अतिशय चांगला आहे. महिला कोणत्याही बाबतीत मागे नाहीत व महिलांचे आरक्षण आता 50 टक्के झाल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत त्या मागे राहणार नाहीत. त्यामुळे सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी आपला प्रस्ताव मागे घ्यावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितले की, तक्रार कोणाकडे करावयाची ? चारही व्यक्तींपैकी जबाबदार कोण राहणार आहे ? आपल्याला माहिती आहे की, कोणीही निवडून गेला तरी सत्तेमध्ये, पक्षांमध्ये सत्तासंघर्ष, सत्तास्पर्धा मोठया प्रमाणात असते. निवडून येणा-याला टिकवणे, आपल्या बाजूला कायम ठेवणे, पुढील वेळेस सुध्दा निवडून आणणे हे पक्ष प्रमुखाचे किंवा आमदारांचे काम असते.

सभापती महोदय, यामध्ये अपक्षांना कमी प्रमाणात संधी मिळणार आहे. अपक्ष जास्त प्रमाणात निवडून आले तर त्यांना पक्षाची बांधिलकी नसते. सत्तास्थापनेच्या वेळी जो कोणी काही बोलेल त्याच्या बाजूने जाण्याची अपक्षांची प्रवृत्ती राहते. या विधेयकामध्ये अपक्षांना निवडून येण्याची संधी कमी असल्यामुळे ब-याचअंशी फायदा होणार आहे. यासंदर्भातील मागील निर्णय आपण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ....

बदललेला आहे. मागच्यावेळे सारखी वेळ आताही येऊ नये यासाठी पुढील काळात सर्वमिळून काम करु अशी ग्वाही देऊन या ठिकाणी जे चांगल्या प्रकारचे विधेयक आले आहे त्याला सर्वांनी एकमुखाने पाठिंबा द्यावा व सन्माननीय सदस्यांनी आपला ठराव मागे घ्यावा अशी विनंती करतो.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आपण असे विचार मांडले आहेत की, वॉर्डामध्ये एका समाजाचा एक गट असतो आणि ते संबंधितांना मतदान करुन निवडून आणतात. परंतु आपले हे म्हणणे चुकीचे आहे. वॉर्ड हा एक समाजाचा नसतो. सर्व समाजाची मते मिळाली तरच उमेदवार निवडून येतो. आपण त्यांना छोटयाशा एरियामध्ये गुंतवून ठेवू नका. येथे कोणत्याही जातीचा किंवा धर्माचा विषय होऊ शकत नाही. ही व्यक्ती आमच्या विभागाचा विकास करेल असा त्या ठिकाणच्या मतदारांचा विश्वास असल्यामुळे त्या ठिकाणच्या सर्व समाजातील मतदार मतदान करुन उमेदवाराला निवडून आणत असतात. निवडून देत असतांना ठरावीक पध्दतीचे स्वप्न मतदार आपल्या डोळयासमोर ठेवत असतात.

सभापती महोदय, चार उमेदवार उभे राहिले व त्यातील तीन व्यक्ती निवडून आल्या पाहिजेत अशा पध्दतीचा जेव्हा विचार होईल त्यावेळेस मतदार बाहुले निवडून आणतील, ताकद निवडून आणतील. परंतु स्वतंत्र माणूस निवडून आला असे चित्र राहणार नाही.

सभापती महोदय, आपण जर प्रभागासाठी पैसे देणार असाल तर कोणी तरी दांडगा माणूस ते पैसे घेऊन जाईल. जर यामध्ये महिलांना पैसे मिळाले नाही तर 5 वर्षे काम करुन विकासाचे काही तरी काम केले हे सांगण्यासाठी त्यांच्याजवळ काहीच मार्ग राहणार नाही. त्यामुळे प्रत्येकाला वेगळा निधी दिला जाईल असे आपण सांगावे असे मला वाटते. महिलांनाही यातील एक हिस्सा मिळणार आहे व हा हिस्सा विभागामार्फत मिळणार आहे अशा पध्दतीचा विचार व्हावा अशी मी आपल्याला विनंती करते.

सभापती महोदय, महिलांना 50 टक्के आरक्षण करतांना आपण एवढा मोठा दिलदारपणा दाखवता तर महिलांचे फॉर्म्स व त्यांचा टॅक्स भरण्यास आपल्याजवळ इतकाही मोठेपणा नाही ? आपण हे सर्व महिलांसाठी करीत आहात ना ? अनुसूचित जाती-जमातींच्या महिलांसाठी आम्ही हे मागत आहेत. "क" वर्ग नगरपालिका, "ड" वर्ग नगरपालिकांमधील गरीब महिलांसाठी आपण दिलदारपणा दाखवल्यानंतरच या विधेयकाला मंजुरी देईन. विधेयकाला मंजुरी देण्यापूर्वी मी ज्या दोन गोष्टी मागितलेल्या आहेत त्या आपण मान्य कराव्यात अशी विनंती करते.

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, ज्यावेळेस आपण उमेदवारी अर्ज भरतो त्यावेळेला डिपॉझिटची रक्कम सरकार ठरवत नाही तर निवडणूक आयोग ठरवत असतो. यामध्ये निवडणूक आयोगाचा पूर्णपणे अधिकार असावा असे मला वाटते. आपण प्रभागाला निधी देण्याच्या संदर्भात विचार मांडलेला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, प्रभागाला निधी देत असतांना त्या त्या शहराचा विकास आराखडा व त्या त्या शहराचे डीसी रुल हे वेगवेगळे असतात. परंतु एक मात्र निश्चितपणे होऊ शकेल की, मोठया महानगरपालिकेतील नगरसेवकांना नगरसेवक म्हणून निधी दिला जात असतो व बाकीचा निधी विकासावर खर्च केला जात असतो. वॉर्डातील विकास कामामध्ये या विधेयकान्वये समतोलच साधला जाईल अशा प्रकारच्या गाईडलाईन्स निश्चितपणे देण्यात येतील एवढे सांगून सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा दिलेला प्रस्ताव मागे घ्यावा अशी विनंती करतो. श्रीमती शोभाताई फडणवीस : माननीय मंत्रीमहोदयांनी प्रश्न सोडविण्याच्या संदर्भात सहकार्य केल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देते व हा प्रस्ताव मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागते.

सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेण्यात आला.

**उप सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 5 ( दोन्ही सम्मिलित ) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतू वाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 27 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 27 संमत झाले आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शैक्षणिक संस्था (फी वसुलीचे विनियमन) विधेयक.

**L. A. BILL NO. XXIV OF 2011.**

( A BILL TO PROVIDE FOR THE REGULATION OF COLLECTION OF FEE BY EDUCATIONAL INSTITUTIONS IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH AND INCIDENTAL THERETO. )

प्रा.फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 24 महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांकडून घेतल्या जाणाऱ्या शुल्काचे विनियमन करण्यासाठी व त्याच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक, 2011 मांडते.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

प्रा.फौजिया खान : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि. स. वि. क्रमांक 24 महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांकडून घेतल्या जाणाऱ्या शुल्काचे विनियमन करण्यासाठी व त्याच्याशी संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक, 2011 विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडते.

सभापती महोदय, अलिकडच्या काळात मोठया प्रमाणात खाजगी विनाअनुदानित शाळा बेमालूमपणे पालकांकडून शुल्क वसूल करीत असल्याच्या तक्रारी अनेक पालक व संघटनांकडून शासनास प्राप्त होत आहेत. सदरच्या गैर प्रवृत्तीस आळा घालण्याच्या हेतून व जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ निकषाच्या आधारे पारदर्शक पध्दतीचा अवलंब करुन योग्य शुल्क आकारले जावे या हेतूने सदरचे विधेयक शासनाने मांडले आहे. सदर विधेयक सभागृहात मांडण्यापूर्वी शासनाच्या वेब साईटवर देखील प्रकाशित करुन सर्व शाळा आणि पालक संघटना यांच्याकडून हरकती मागविण्यात आल्या होत्या. या शिवाय सदर विधेयक सभागृहात मांडल्यानंतर विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या सदस्यांच्या संयुक्त समितीने एकूण सुमारे नऊ बैठका घेतल्या. त्यापैकी दोन बैठकांमध्ये शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी व पालक संघटनांचे प्रतिनिधी यांच्याशी देखील विचारविनिमय केला आहे. दोन्ही सभागृहाच्या सदस्यांचा समावेश असलेल्या सदरच्या संयुक्त समितीने पूर्ण विचारांती एकमताने सदरच्या विधेयकात आवश्यक सुधारणा करुन संतुलित स्वरुपाचे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान........

विधेयक सभागृहात सादर केले आहे. सदर विधेयकातील काही ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत :-

सदरचे प्रस्तावित विधेयक हे कोणत्याही माध्यमाच्या, कोणत्याही भारतीय अथवा परदेशी अभ्यासक्रमामध्ये अथवा मंडळास संलग्न असणाऱ्या कोणत्याही पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा अथवा अध्यापक विद्यालये यांना लागू होणार आहे. त्या शिवाय सर्व शाळांना शिक्षक-पालक संघाची स्थापना दरवर्षी करण्याचे त्यांच्यावर बंधनकारक करण्यात आले आहे. 15 ऑगस्ट पूर्वी संघाची बैठक घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. शिक्षक पालक संघाची स्वतंत्र कार्यकारिणी समिती असेल, त्यामध्ये पालक व शिक्षक यांचे प्रतिनिधी असणार आहेत. प्रत्येक इयत्तेकरिता इच्छूक पालकांच्या नावाच्या चिठ्ठया टाकून सोडतीद्वारे कार्यकारिणी समितीची निवड केली जाणार आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधेयकाचा उद्देश कुठेच दिसून येत नाही. जे विधेयक संयुक्त समितीकडून आलेले आहे. त्या समितीमध्ये काय चर्चा झाली, समितीने मूळ विधेयकात काय बदल केले? मूळ विधेयक या सभागृहापुढे कधीच आले नव्हते. विधानसभेपुढे विधेयक मांडल्यानंतर मंत्री महोदयांनी संयुक्त समिती जाहीर केली होती. माननीय सभापतींच्या दालनात चर्चा झाली होती व आमच्याकडून सदस्यांची नावे मागविण्यात आली होती. या सभागृहापुढे पहिल्यांदाच हे विधेयक सादर झालेले आहे. या विधेयकाची प्रत आम्हाला आजपर्यंत देण्यात आलेली नाही. मी स्वत: ही प्रत मागून घेतली, तेव्हा या विधेयकामध्ये उद्देश नसल्याचे दिसून आले. हा नवीन कायदा केला जात असल्यामुळे बदल करण्याचा प्रश्न येत नाही. परंतु उद्देश कुठेच नमूद केलेला नाही.

**उप सभापती** : या विधेयकावरील चर्चा या ठिकाणी थांबविण्यात येत आहे. माननीय मंत्री महोदया ऑन लेग राहतील.

------------------

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## अर्धातास चर्चा

**पृ. शी.** : रायगड जिल्हयातील कंत्राटी ग्रामसेवक पदाच्या भरती प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**मु. शी.** : रायगड जिल्हयातील कंत्राटी ग्रामसेवक पदाच्या भरती प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार या संदर्भात श्री.जयंत पाटील, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

(माननीय सदस्य अनुपस्थित)

-----

अर्धा तास चर्चा क्रमांक-2 बाबत

**उप सभापती** : आता माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील हे त्यांची अर्धातास चर्चा उपस्थित करतील.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सदर अर्धातास चर्चेशी संबंधित माननीय ऊर्जा मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत, त्यामुळे सभागृहाची बैठक स्थगित करावी. अन्यथा मंत्री महोदय सभागृहात का उपस्थित राहिलेले नाहीत हे सभागृहाला कळले पाहिजे. तो आमचा अधिकार आहे. ऊर्जा विभागाचे राज्यमंत्री, कॅबिनेट मंत्री कुठे गेले आहेत हे सभागृहाला कळले पाहिजे.

श्री.संजय देवतळे (सांस्कृतिक कार्य मंत्री) : सभापती महोदय, कॅबिनेटची बैठक सुरु आहे, त्यामुळे माननीय ऊर्जा मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत. परंतु मंत्री महोदयांना सभागृहात उपस्थित राहण्याबाबत निरोप पाठविला आहे.

श्री.रामदास कदम : सभागृहाला कॅबिनेट सुरु आहे त्यामुळे मंत्री महोदय उपस्थित नाहीत असे सांगता येत नाही. हे वाक्य रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे. सभागृहाचे कामकाज चालू असताना संबंधित विषयाच्या मंत्री महोदयांना कॅबिनेटची बैठक आहे म्हणून उपस्थित राहू शकत नाही असे सांगता येत नाही. हा सभागृहाचा अवमान आहे. सभापती महोदय, आपण सक्त ताकीद द्यावी.

**उप सभापती** : सभागृहाचे कामकाज सुरु असताना कॅबिनेटची बैठक आहे ही वस्तुस्थिती असली तरी त्या त्या मंत्री महोदयांनी ही खबरदारी घेतली पाहिजे की, आपल्या विभागाशी संबंधित कामकाज असेल तर त्या विभागाचे कॅबिनेट मंत्री वा राज्यमंत्र्यांपैकी कोणी तरी सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे.

नंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**..

माननीय मंत्री महोदयांनी मी किती वेळा ताकीद द्यायची, त्याला सुध्दा काही मर्यादा आहेत. मी दिलेल्या ताकिदीचा मानसन्मान राखला जावा अशी माझी इच्छा आहे. माननीय मंत्री महोदयांचा राजीनामा घेणे आपल्या हातात असते तर इतके दिवस आपण थांबलो असतो का ?

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या,शुक्रवार, दिनांक 5 ऑगस्ट, 2011 रोजी सकाळी 10.00 पुन: भरेल. सकाळी 10.00 ते 11.30 पर्यंत सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल. या बैठकीमध्ये नियम 260 अन्वये शेतकऱ्यांच्या विविध प्रश्ना संदर्भातील प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.45 वाजता भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 31 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 5 ऑगस्ट, 2011 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही